विश्वभारती ▪ भारतीय नारी ▪ विश्वदर्शन

नि. ६२५९

स्वप्न आणि सत्य व इतर

साने गुरुजी

स्वप्न आणि सत्य व इतर

साने गुरुजी

रिया पब्लिकेशन्स्

स्वप्न आणि सत्य व इतर : साने गुरुजी

प्रकाशक

रिया पब्लिकेशन्स्

२५०, ब-३०, शितल बंगला,

नागाळा पार्क, कोल्हापूर.

मोबा. : ९४२२४२१५०२

अक्षरजुळणी

रावजी देसाई

मुखपृष्ठ

चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

मुद्रक

ॐकार मुद्रणालय, कोल्हापूर.

आवृत्ती

१५ ऑगस्ट, २०११

किंमत

रुपये २१०/-

© सदर पुस्तकातील मजकुराचा हक्क मुक्त आहे; परंतु या पुस्तकातील मांडणी, मुखपृष्ठ किंवा एकंदरीत रचना यांची नक्कल करता येणार नाही, तसेच ट्रेसिंग किंवा निगेटिव्हच्या साहाय्याने छापताही येणार नाही. तसे आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

स्वप्न आणि सत्य

अनुक्रमणिका

स्वप्न आणि सत्य

- स्वातंत्र्य आणि स्वराज्य ७
- जातिधर्मनिरपेक्ष राष्ट्र व सामाजिक समता १६
- सर्वोदय व अनाग्रही निष्ठा २९
- समाजवाद ३९
- सत्याग्रह ५०
- संयुक्त महाराष्ट्र, आंतरभारती व एकात्म भारत ६०
- संस्कृती व साहित्य ८१
- राष्ट्रीय चारित्र्य ९०
- संतांचा मानवधर्म ९६
- निसर्ग १२३
- मृत्यूचे काव्य १३५

विश्वभारती

- एक सुंदर चिनी पत्र १४५
- एक चिनी लेखक १४८
- सादी १५०
- फिरदौसीचे तेजस्वी उत्तर १५३
- महान तत्त्ववेत्ता नित्शे १५५
- जलालुद्दीन १५७
- मानसशास्त्रज्ञ फ्राइड १६३
- अंधार अंधार १६६
- विश्वमंगल १६८

भारतीय नारी

- वेदकाल १७१
- वेदोत्तरकाल १७३
- इस्लामच्या आगमनानंतर १७७
- इंग्रजी अमदानी १८४
- स्वातंत्र्याचा उषःकाल १९०

विश्वदर्शन

- प्रस्तावना १९९
- विश्व हे अनंत २०३
- सजीव सृष्टी २०६
- भावनाविश्व २०९
- जीवशास्त्राची वाटचाल २१४

+++

स्वातंत्र्य आणि स्वराज्य

स्वातंत्र्यानंतर तीन वर्षांच्या आतच गुरुजींनी जगाचा निरोप घेतला, तो भग्न आशा आणि निराशेत. गुरुजींनी स्वराज्याचे जे दिव्य स्वप्न पाहिले ते अणुमात्रही प्रत्यक्षात अवतरले नाही. शेतकऱ्यांना, गरिबांना मी आश्वासने दिली त्यांना आता तोंड कसे दाखवू या भावनेने सानेगुरुजी तडफडत होते. गुरुजींच्या शब्दांतच स्वराज्याचे शब्दबद्ध केलेले चित्र......

ब्रिटिशांची सत्ता आपल्या देशात दृढ झाल्यापासून आपले फायदे काय झाले ते मला तरी सांगता येत नाहीत; परंतु सहस्रावधी तोटे झाले ते पर्वताप्रमाणे डोळ्यांसमोर उभे राहतात. आपण नि:शस्त्र केले गेलो. आपले पौरुष मारले गेले. आपला आत्मा खच्ची करण्यात आला. आपण लुळे व बुळे झालो. सदासर्वदा सरकारच्या तोंडाकडे पाहणारे आपण झालो. आपली कर्तृत्वशक्ती गेली, आपले धैर्य गेले. पोलीस हा आपला राजा झाला. वाघाशीही झुंज घेणारे पोलीस पाहून भिऊ लागले. पोलीस हा परमेश्वर. तो मागेल ते द्यावे. तो म्हणेल तेथे यावे. आपण गाईहूनही गाय झालो. गायही पिळून पिळून शेवटच्या थेंबापर्यंत दूध काढणाऱ्याला लाथ मारते; परंतु आपणात रामच उरला नाही. बस म्हटले की बसावे, ऊठ म्हटले की उठावे, अशी जनतेची स्थिती झाली.

ब्रिटिशांच्या सत्तेने माणसांची मेंढरे केली. काँग्रेस मायमाउलीने अवतार घेतला. तिने पुन्हा माणुसकी दिली. ब्रिटिश सत्तेमुळे माणसांची माणुसकी गेली. उद्योगधंदे सारे बुडाले, बुडविण्यात आले. जेथे सोन्याचा धूर निघे तेथे रडण्याचा सूर घरोघर निघू लागला. कोट्यवधी लोक बेकार झाले. लाखो अर्धपोटी राहू लागले. बेकारी वाढली, त्याबरोबरच दुष्काळही वाढले. पूर्वी शंभर वर्षांत एखादा दुष्काळ पडे तर

आता दरसालच जणू दुष्काळ. दुष्काळात टिकाव धरणे कठीण होऊं लागले. लोकांमध्ये प्राणच उरले नाहीत. जरा पावसाने डोळे वटारले की जनतेचे डोळे पांढरे होतात. महिनाभर पाऊस न पडला तर लगेच आईबाप चार चार आण्यांत पोटचे गोळे मिशनरी लोकांना विकू लागतात.

बेकारी, दुष्काळ, त्यांच्याबरोबरच नवीन नवीन व्यसने आणि नवीन नवीन रोगही आले. जुगार रूढ झाले. दारू गावोगाव झाली. प्लेग, कॉलरा, इन्फ्लुएन्झा आले. भांडणे वाढली. आमच्यामध्ये भेद पाडण्यात आले. नोकरीशिवाय दुसरा उद्योगधंदा नसल्यामुळे हे भेद आणखीनच वाढले. हिंदू, मुसलमान, ब्राह्मण-ब्राह्मणेतर, स्पृश्यास्पृश्य या सर्वांच्या मुळाशी पोटापाण्याचा प्रश्न आहे. तुला नोकरी की मला, तुझ्या लोकांना किती प्रमाणात, माझ्या लोकांना किती प्रमाणात, याच गोष्टीला महत्त्व आले. कर्तृत्वाला वावच कोठे उरला नाही. असा हा राष्ट्राचा अंतर्बाह्य नाश या दीडशे वर्षांत झाला. आणि स्वातंत्र्य पाहिजे ते मूठभर भांडवलवाल्यांचे नव्हे, खरे गोरगरिबांचे स्वातंत्र्य हवे. असे स्वातंत्र्य येईल तेव्हाच रोग हटतील, पोटभर खायला मिळेल, ज्ञान येईल, आनंद येईल.

असे गरिबांचे स्वातंत्र्य आणण्यासाठी एक काँग्रेस धडपडत आहे. बाकी इतर संस्थांचे गरिबांकडे लक्षही नाही. इतर संस्था वरिष्ठ वर्गाच्या, वरिष्ठ जातींच्या. कोट्यवधी शेतकरी, लाखो कामकरी यांच्याकडे काँग्रेसचे लक्ष आहे, अधिकाधिक जात आहे. इतर संस्था धर्माच्या नावाने ओरडत आहेत; परंतु खरा धर्म सर्वांना सुखी करणे हा आहे. ब्रह्माच्या अनेक व्याख्या आहेत; परंतु पहिली व्याख्या जी शिकविली पाहिजे ती म्हणजे अन्नब्रह्म. परंतु हा ओदनरूपी परमेष्ठी, हे अन्नब्रह्म सर्वांना नेऊन भेटवू असे कोणाला वाटते आहे? कोट्यवधी लोकांच्या पोटात घास नाही म्हणून कोणाला पोटदुखी लागली आहे? धर्माच्या वरवरच्या गप्पा काय कामाच्या?

भगवान बुद्धांनी एकदा शिष्यांना सांगितले, "जा आता दशदिशांत आणि प्रेमाचा उपदेश करा." शिष्य निघाले. काही शिष्यांना जवळच एका झाडाखाली एक मनुष्य आढळला. ते शिष्य त्याच्याजवळ गेले आणि म्हणाले, "म्हण, अक्रोधाने क्रोध जिंकावा, जगाला प्रेम द्यावे' म्हण." तो म्हणेना. शिष्य म्हणाले, "याला उचलून भगवान बुद्धाकडे नेऊया." त्यांनी त्याला उचलून बुद्धांकडे आणले. ते म्हणाले, "भगवान, हा नास्तिक दिसतो. याला सूत्रे शिकवतो तर म्हणत नाही." कारुण्यसिंधू

बुद्धदेवांनी त्या माणसाकडे पाहिले. ते शिष्यांना म्हणाले, "घरात काही फळे असली तर त्याला आणून द्या. काहीतरी याला आधी खायला द्या." शिष्यांना आश्चर्य वाटले. धर्मसूत्रे शिकविण्याऐवजी आधी हे खायला कसे देतात! परंतु त्यांनी सांगितल्याप्रमाणे केले.

नंतर बुद्धदेव त्या माणसाला म्हणाले, "मित्रा, आता झोप; विश्रांती घे." तो मनुष्य झोपला. "भगवान, तुम्ही त्याला धर्म शिकविण्याऐवजी खायला दिलेत, झोपायला सांगितलेत हे कसे?" शिष्यांनी विचारले. बुद्धदेव म्हणाले, "या माणसाजवळ अन्नाच्या भाषेत बोलले पाहिजे; तरच त्याला समजेल. उपाशीपोटी माणसाजवळ अन्नाच्या भाषेत बोला. त्याला अन्नदेव नेऊन प्रथम भेटवा. पोटभर लोक जेवू देत. नीट झोप घेऊ देत. मग त्याच्याजवळ इतर गोष्टी बोलू." हिंदुस्थानातील कोट्यवधी लोकांस भाकर आधी देऊ द्या. त्यांना पोटभर खाऊ दे. अन्नब्रह्म आधी द्या. मग विज्ञान-ब्रह्म, मग आनंद-ब्रह्म. परंतु आधी कोठला धर्म, कोठली संस्कृती? ते सारे- 'आधी कळस मग पायारं-,' असे होईल. कोट्यवधी उपाशी लोकांच्या पोटापाण्याचा प्रश्न सोडवावयास जो उभा राहिला, तो खरा धार्मिक, तो खरा हिंदू धर्माचा. तो खरा देवाचा उपासक, जगन्मातेचा उपासक, परंतु स्वतंत्र झाल्याखेरीज व स्वराज्य आल्याखेरीज हे कसे जमणार?

स्वातंत्र्य म्हणजे सर्वांच्या विकासाला संधी. स्वातंत्र्य म्हणजे सुखसंपन्न होण्याचे साधन. अत:पर या देशात कोणी दु:खीकष्टी नको. सर्वांना स्वाभिमानाने जगता येऊ दे. विकासाच्या आड दारिद्र्य येता कामा नये. ज्ञानविज्ञानाचा प्रकाश सर्वत्र जाऊ दे. स्वच्छता, आरोग्य येऊ दे. अन्याय जाऊ दे. उपासमार जाऊ दे. नको लाचलुचपत, नको वशिले, नको कोणी उन्मत्त. सर्वांची सरळ मान होऊ दे. सर्वांना वाव असू दे. सर्वांना अन्नवस्त्र मिळो, राहायला साधे-सुधे घरदार असो. मिरासदारी कोणाचीच नको. जमीन नसेल त्याला जमीन द्या. ते स्वत:च कसायला तयार असले म्हणजे झाले. कामगारांचे हितसंबंध आधी संरक्षिले जावोत. अहिंसक रीतीने सर्वांना संघटना करण्याची मोकळीक असो. सरकारी सत्तेने कोणावर दडपण आणू नये. श्रमणाऱ्यांनी आपली प्रतिष्ठा ओळखावी. मालकांनी नम्रता शिकावी. वरच्यांनी खाली यावे; खालच्यांनी वर चढावे. दोघांनी एकमेकांस भेटून रामराज्य निर्माण करावे.

स्वातंत्र्यात असे हे सारे आपणास निर्मावयाचे आहे. एक नवे युग आजमावायचे आहे. एक नवी दृष्टी आजमावायची आहे. हे महान कार्य आहे. त्यासाठी सर्वांनी संयम पाळायला शिकले पाहिजे. स्वातंत्र्य म्हणजे उच्छृंखलपणा नव्हे. स्वातंत्र्य म्हणजे जबाबदारी. आपण एकमेकांच्या भावना ओळखावयास शिकले पाहिजे. सर्वांना सांभाळले पाहिजे. सर्वांना सन्मानिले पाहिजे. माझी जात, माझा प्रश्न, माझा प्रांत, माझी भाषा, माझा धर्म असे सारखे म्हणणे बरे नव्हे. अखिल भारतीय दृष्टी कधी विसरून चालणार नाही. एवढेच नव्हे तर आज भारतीय असूनही अतिभारतीय झाले पाहिजे. आपण जगाचे नागरिक एका अर्थाने झाले पाहिजे. म्हणून क्षुद्र कुंपणे घालू नका. क्षुद्र घरकुल नका बांधू. विशाल दृष्टी, व्यापक सहानुभूती याची अत्यंत आवश्यकता आहे. तरच संस्कृती फुलेल.

आपल्या सर्व व्यवहारांत एक प्रकारची नैतिक तळमळ हवी. स्वराज्य, लोकशाही म्हणजे थट्टा नाही. ही एक गंभीर वस्तू आहे. आपल्याला जनतेचे कल्याण करावयाचे आहे. एखाद्या जातीचे, पंथाचे स्तोम नाही माजवावयाचे. सार्वजनिक नीती म्हणून वस्तू आहे. इंग्लंडमध्ये प्रधानालाही त्याने सार्वजनिक वाहतुकीचा नियम मोडला म्हणून दंड करण्यात आला; परंतु आपल्याकडे काय प्रकार आहे? स्वराज्यात आपणच कायद्याची प्रतिष्ठा मानली पाहिजे. हातून बेकायदा काही झाले तर दिलगिरी दाखवावी. शिक्षा-दंड झाला तर भोगावा. अन्याय्य कायदे असतील तर त्यांच्या विरुद्ध आपण जनमत तयार करू शकतो; परंतु जे कायदे जनतेचे जीवन नीट चालावे म्हणूनच केलेले असतील ते मोडणे पाप आहे. ते मोडून त्यात प्रतिष्ठा मानणे म्हणजे तर महान पाप आहे. तो माझ्या पक्षाचा, तो माझ्या जातीचा, तो माझ्या धर्माचा, तो माझ्या प्रांताचा, तो माझा आप्त, तो माझा सखा, असले संबंध न्यायालयासमोर आणू नयेत. जनतेने हे शिकावयाचे आहे. जनतेच्या पुढाऱ्यांनी स्वतःच्या थोर वर्तनाने हे जनतेला शिकवावयाचे आहे.

आपण अजून सर्व राष्ट्राची, सर्व समाजाची अशी दृष्टी घेऊ शकत नाही. परंतु जोवर ही येत नाही तोवर लोकशाही म्हणजे एक थट्टा होईल. आलेले स्वातंत्र्य, मिळालेले स्वराज्य जर टिकवावयाचे असेल, कार्य जर करावयाचे असेल तर संकुचितपणा, क्षुद्रता, स्वार्थ इत्यादी गोष्टी आपण दूर करावयास शिकले पाहिजे. काहीतरी सार्वजनिक भान आपणास आले पाहिजे. स्वराज्याच्या महान साधनाने आपणास मानव फुलवावयाचे आहेत. संस्कृती समृद्ध करावयाची आहे. त्यासाठी

अखंड साधना हवी. जीवन अनेकांगी आहे. जीवनाच्या सर्व क्षेत्रांत, सर्व व्यवहारांत आपण साधकाच्या वृत्तीनेच वागण्याची धडपड केली पाहिजे. यालाच पुरुषार्थ असे म्हणतात. याचा अर्थ उत्तरोत्तर अधिक चांगले होण्याची खटपट करणे. एका अमेरिकन लेखकाने 'पुन्हा धर्माकडे' म्हणून एक सुंदर अनुभवजन्य पुस्तक लिहिले आहे. त्यात त्याने Betterism असा शब्द योजिला आहे. 'बेटरिझम' म्हणजे माणसाने चांगला होईन, अधिक चांगला होईन–, हा ध्यास घेणे होय. चांगले कसे होता येईल? जीवन अधिक समृद्ध, अंतर्बाह्य संपन्न कसे करता येईल? 'मी आणि माझे' हे तुणतुणे दूर करून दुसऱ्याच्या सुखदु:खाचा जेव्हा आपण विचार करू, सेवा करू, दुसऱ्यांचे चांगले करू, सर्वांचे स्वागत करू, अधिक लोकांशी मिसळायला लागू, तेव्हा अधिक चांगले होण्याचा मार्ग लाभेल.

भारतीय जनतेला हे शिकावयाचे आहे. येथे अनेक प्रांत, अनेक भाषा, अनेक जातिप्रजाती, अनेक धर्म यांचा संगम आहे. अशा देशांत जर खरी संस्कृती वाढवावयाची असेल तर मिळते – जुळते घेऊनच वागावे लागेल. वैराचा अभाव आणि विषमता नसणे ही रामराज्याची दोन लक्षणे होत. हीच व्याख्या गांधीजींनी केली होती. पण त्यांनी पाहिले की स्वराज्याचे दर्शन झाले नाही तोच, वैराचे शमन होणे तर दूरच राहिले, वैराची अशी काही आग पसरली आहे की तिची क्वचितच तुलना असेल. हे पाहून स्वाभाविकच गांधीजी दु:खी राहात. ज्या वस्तूंचे पालन गांधीजींच्या जिवंतपणी आपण केले नाही ते आता केले पाहिजे. स्वराज्याची ही दोन लक्षणे आपण पूर्णपणे सिद्ध केली पाहिजेत. हिंदुस्थानात इतके विविध समाज राहात आहेत ते मित्रभावाचा पाठ शिकण्यासाठी होत असे आपण समजावे. आपल्या उदार संस्कृतीचा हा बोध जर आपण घेतला तर वैरभावही नाहीसा होईल आणि विषमताही समाप्त होईल. वैरभाव व विषमता नष्ट करण्याची थोर साधना आपणास करावयाची आहे.

महात्माजींचा प्रथम श्राद्धदिन भारतातच नव्हे तर सर्व जगात पाळला गेला. ते भारताच्या द्वारा जगाचीच सेवा करीत होते. कारण येथे सर्व धर्म, सर्व संस्कृती. भारत म्हणजे मानवजातीचे प्रतीक. गांधीजी जगाचे हृदय झाले होते. त्यांच्यावरच्या आघाताने सारे जग क्षणभर निर्जीव झाले होते. साऱ्या जगाने त्यांना श्रद्धांजली वाहावी हे समुचितच होय.

श्राद्ध अति पवित्र व मंगल वस्तू आहे. कृतज्ञतेची ती मधुर खूण आहे. ज्यांचे आपण श्राद्ध करतो त्याला आपण श्रद्धापूर्वक स्मरतो. श्रद्धा चमत्कारजननी आहे. यजुर्वेदात म्हटले आहे की, अ-देवाला श्रद्धा देवत्त्व देते. जो अ-देव आहे, ज्याच्या जीवनात दिव्यता नाही, अशा माणसाला जर अमर श्रद्धा मिळाली तर, त्याचे जीवन ज्वलंत होते, ते दैवी होते. श्रद्धा ध्येयाकडे घेऊन जाते. ध्येयाचा ध्यास लावते. सारे जीवन धगधगीत, रसरशीत होते. मग अन्य काही सुचत नाही, रुचत नाही.

'तुका म्हणे व्हावी
प्राणासवे ताटी
नाही तरी गोष्टी
बोलू नये'

महात्माजींना आपण श्रद्धांजली वाहिली. त्यांना श्रद्धांजली म्हणजे त्यांनी दिलेल्या ध्येयाला श्रद्धांजली. आज सर्वोदय, समन्वय अनेक शब्द उच्चारले जात आहेत. सर्वोचा उदय व्हावा, सारे सुखी व्हावेत म्हणून प्राचीन ऋषिश्वरांपासून सारे सांगत आले; परंतु केवळ शब्दोच्चाराने सारे सुखी कसे व्हायचे हा प्रश्न आहे. सर्वांचा उदय व्हावा म्हणूनच स्वराज्य हवे होते; परंतु सर्वांच्या उदयाची तीव्रता लागून राहिली आहे का? भांडवलदारांना शत सवलती देऊन, आणखी काही वर्षे तुमचे कारखाने राष्ट्राचे होणार नाहीत असे आश्वासन देऊन त्यांचा उदय सुरक्षित केला जात आहे. गरिबांचे काय? - हा प्रश्न आहे.

महात्माजींनी स्वराज्यात चार गोष्टी हव्यात म्हणून लिहिले होते: (१) आर्थिक समता, (२) सामाजिक समता, (३) धार्मिक समता (४) लोकशाही सरकारचे धोरण पसंत नसेल तर शांततेने विरोध दाखवायला परवानगी. या चार गोष्टी अजून किती दूर आहेत हे पाहिले म्हणजे दु:ख होते. वेदना होतात. दिल्लीला महात्माजींनी म्हटले, ... 'एक दिवसही स्वतंत्र हिंदुस्थान आर्थिक विषमता सहन करणार नाही.' परंतु आज काय दिसते? शेतकऱ्याला दिलीत जमीन? काटकसर करून विकत घे असे सांगणे म्हणजे सर्वोदयी श्रद्धा नव्हे. शेतमजुराजवळ मालकीची जमीन नाही. त्याच्याजवळ दोन-चार बिघे जमीन विकत घेण्याइतके पैसे कधीही साठणार नाहीत हे का काँग्रेसी मंत्र्यांना माहीत नाही? चलनवाढीची सबब न सांगता जमीनमालकाला दीर्घ मुदतीची सेव्हिंग्ज सर्टिफिकिटे द्या आणि शेतमजुराला जमीन द्या.

कानावर आले की, कोणी काँग्रेसचे बडे अधिकारी म्हणाले, पुढच्या निवडणुकीनंतर हे करावयाचेच आहे. तुमच्या निवडणुकीसाठी आज या लोकांना असेच सडत पिचत ठेवणार होय? गरिबांच्या चितेची होळी पेटत ठेवून त्यावर भावी निवडणुकीची भाकर भाजणार? दुसऱ्यांना सत्तालोलुप म्हणणाऱ्या या लोकांची ही सत्ता टिकविण्याची कारस्थाने पाहिली की किळस येते. जो प्रकार शेतकऱ्यांच्या बाबतीत तोच प्रकार कामगारांच्या बाबतीत. उत्पादन वाढवा, उत्पादन वाढवा म्हणून त्यांना येता जाता सारे डोस पाजीत आहेत. चार महिन्यांत १०० कोट नफा उकळणाऱ्या गांधीभक्त मालकांसाठी का अधिक उत्पादन करायचे? ज्या कारखान्यात आपण श्रमतो तेथील माल जनकल्याणार्थ आहे. जनता पिळली जाणार नाही, काळा बाजार होणार नाही, तेथील नफा धनवंतांच्या विलासात दगडी राजवाड्यात उधळला जाणार नाही ही खात्री वाटली तर कामगार आनंदाने नाचेल, वाटेल तितका श्रमेल. परंतु जोवर गरिबांची होते होळी, बड्यांची पिकते पोळी, – हे त्याला दिसत आहे तोवर त्याचा जीव अधिक उत्पादनात संपूर्णतया कसा रंगेल? एवंच, आर्थिक समता दूर आहे. आणि सामाजिक समता? जोवर शिक्षणाने, राहणीने, संस्कृतीने सर्व थर समान पातळीवर येत नाहीत तोवर सामाजिक विषमता तरी कशी दूर होणार?

साऱ्या जातीपाती समान माना म्हणून म्हटले तसे जिच्या नेसू चिंधी अशी कातकरीण, स्वच्छ इरकली पातळ नेसलेल्या, वेणीफणी केलेल्या भगिनीजवळ कशी बसणार? तिला बसू कोण देणार? बिहारमध्ये चंपारण्यात गांधीजी गेले. कस्तुरबांना म्हणाले, 'भगिनींना स्वच्छता शिकव.' एक भगिनी कस्तुरबांना म्हणाली, 'अंग धुतले तर नेसू काय?' सामाजिक विषमता नष्ट करायलाही आर्थिक विषमता दूर करावी लागते. धार्मिक विषमता दूर करण्यासाठी सर्व धर्मांतील चांगल्या गोष्टींचा प्रसार करणे, कोणत्याही धर्माचा असो,– तो लायक असेल तर त्याला कामावर घेणे, धर्मामुळे भेदभाव न करणे, या गोष्टी हव्यात; परंतु सोलापूर म्युनिसिपालिटीने बस सर्व्हिस ताब्यात घेऊन मुसलमान कामगार काढले. एका मुस्लीम आझाद सैनिकाने, जो त्यात नोकर होता त्याने जाहीर पत्रकाने प्रसिद्ध केले. सोलापूर म्युनिसिपालिटीत कोणाचे बहुमत आहे? ती गोष्ट खरी असेल तर किती वाईट!

स्वराज्यातील चौथी महत्त्वाची गोष्ट म्हणजे अहिंसक रीतीने सरकारला विरोध दाखविण्याची मोकळीक असणे. गांधीजी म्हणत, "I am the greatest demo-

crat' – मी सर्वात मोठा लोकशाहीचा पुरस्कर्ता आहे. परंतु आज काय आहे? बिहारमध्ये समाजवादी पक्षाच्या अधिवेशनाला मंडपही घालण्याची परवानगी मिळणे कठीण होत आहे. विदर्भात समाजवादी अधिवेशनास परवानगी नाकारण्यात आली. आमचे काँग्रेस सरकार लोकशाहीचे पुरस्कर्ते असते तर येता-जाता समाजवादी पक्षाच्या कार्यकर्त्यांना अटक ना करते. त्यांच्या मार्गात अडचणी ना आणते. परंतु सेवा दलाचे 'बिजली नाचेल गगनात' हे सुंदर नृत्यगीत पाहून आमच्या एका अहिंसक सहिष्णु मंत्र्यांनी कपाळाला आठ्या घातल्या. सेवा दलाचे गाणे कशाला असे म्हणाले. पू. विनोबाजींनी धुळ्याला सेवा दलाच्या कलापथकाचा कार्यक्रम पाहून संतोष दर्शविला व खेड्यापाड्यांतून जा असे सांगितले. परंतु सेवादलाचे गाणे कानी पडताच या लोकशाही मंत्र्यांना अब्रह्मण्यम् वाटले ! एवढी असहिष्णुता सत्यअहिंसेशी, सर्वोदयाच्या ध्येयाशी सुसंगत आहे वाटते? सेवा दलाला लेझीमचीही बंदी; येथवर यांची अहिंसा गेली आहे. सेवादलात काहीही आकर्षक असता कामा नये. म्हणजे मुले तिकडे जाणार नाहीत, ही दुष्ट भावना मुळाशी. बाबारे, केवळ कायद्याने जनतेची हृदये का मिळत असतात? दुसऱ्या पक्षाला विधायक सेवाही सुरू करू द्यायची नाही, कारण त्याच्या नावावर सेवेचे भांडवल जमा व्हायचे ! बेळगावचे समाजवादी तरुण कार्यकर्ते म्हणाले, 'आमच्या साक्षरता वर्गांना मंजुरी मिळत नाही; मग मदत कोठून मिळणार?' उदाहरणे कोठवर सांगू? समाजवादी म्हणजे सरकारच्या दृष्टीने, काँग्रेसच्या दृष्टीने राष्ट्रद्रोही लोक, धन्य त्या काँग्रेसची.

काँग्रेसचे मोठमोठे नेते म्हणत असतात, 'एक काँग्रेस तरी सत्ता चालवील, नाहीतर कम्युनिस्ट. समाजवाद्यांना कोण विचारतो?' श्री रामानंद तीर्थांचे हेच हैदराबादी उद्गार. 'Either we rule or the Communists.' युक्त प्रांतातील एक मंत्री असेच एका मित्राजवळ बोलले. श्री. एस. के. पाटील वर्षापूर्वी हेच म्हणाले होते. निर्मळ साधनांनी, लोकशाहीवर श्रद्धा ठेवून समाजवाद आणू पाहणाऱ्या समाजवाद्यांना डोके वर काढू द्यायचे नाही. त्यांचे कार्यकर्ते तुरुंगात डांबून त्यांच्या संघटना मोडायच्या अशा रीतीने काँग्रेसच सत्ता चालवील या मदाने वागायचे. जनतेत असंतोष तर धुमसत आहे. समाजवादी त्याला संयमी मार्गाने संघटित करू बघतात, तर त्यांना मुंडी वर काढू द्यायची नाही. तेव्हा शेवटी कम्युनिस्टच या असंतोषाचा फायदा घेतील. आचार्य जावडेकरांनी म्हटल्याप्रमाणे मग उडेल भडका ! तुमचे आस्ते कदम धोरण. 'आधी भांडवलदारांजवळ

जमू दे तरी भरपूर-' हे भुसावळचे श्री. शंकरराव देवांचे तथाकथित उद्‌गार ! आणि पुरोगामी संयमी असे समाजवादी नेतृत्व येनकेनप्रकरणे हाणून पाडायची द्वेषी, दुष्ट वृत्ती. याने शेवटी एकच होईल - गुदमरलेला असंतोष पेट घेईल. आमच्या काँग्रेसवाल्यांना त्याचीच हौस आहे असे दिसते. 'एक आम्ही राज्य करू, नाहीतर कम्युनिस्ट' असे गमतीने शब्द उच्चारतात. परंतु म्हणावे तुमचा होईल खेळ; राष्ट्राचा जाईल जीव ! बर्नार्ड शॉने एके ठिकाणी सत्ताधाऱ्यांना उद्देशून म्हटले आहे - "If you want blood you will have it, at your own choice." "तुम्हाला रक्तपाताचेच डोहाळे असतील तर तीही तुमची इच्छा पूर्ण होईल." समाजवादी शक्ती नष्ट होणे, म्हणजे लाल कम्युनिस्टांना मोकळे रान. मग होईल तुमची रक्ताची हौस पुरी.

चीन लाल झाला; ब्रह्मदेशात लाल भेसूर छायांचे तांडव नृत्य चालू आहे. इंडोनेशियात लाल रंगाचे वातावरण आहेच. पॅलेस्टाईनकडे लाल पंजा धुमत आहे. या खुणा आहेत कम्युनिस्टांची शक्ती वाढायला नको असेल तर त्वरेने जनतेचा संसार नीट उभा करायला हवा. पंडित जवाहरलाल असे मागे म्हणाले. ऑस्ट्रेलियन अध्यक्ष नि मंत्री यांनी या उद्‌गाराचे स्वागत केल;. परंतु शब्दाबरोबर कृती हवी. 'भांडवलदारांजवळ आणखी जमू दे' असे म्हणण्याने कम्युनिस्टी शक्ती कमी होत नसते.

भारतीय जनते, भांडवलदारांना काँग्रेस जरासा चिमटा घेईल, परंतु ती त्यांना निर्विष करू इच्छित नाही. सर्पाचे विषारी दात काढून घ्या. मग ते निरुपद्रवी खुशाल खेळोत. परंतु सरकार आज त्याला तयार नाही. कम्युनिस्टांची राजवट येणे म्हणजे रक्तपात येणे, हुकूमशाही येणे, समाजाशी अविरोधी असे मर्यादित का होईना परंतु मोलाचे व्यक्तिस्वातंत्र्य गमावणे. या दोन्ही आपत्ती टाळायच्या असतील तर विचारपूर्वक आणि श्रद्धेने समाजवादी पक्षाभोवती तमाम जनतेने उभे राहिले पाहिजे.

दरिद्रीनारायणा! तुला सुखवणारे स्वराज्य दूर आहे. ते जवळ यावे म्हणून निर्मळपणाने जे संघटना करू पाहतात, जे लोकशाही मार्गाने जाऊ इच्छितात, त्यांच्या वाटेत निखारे पेरले जात आहेत; परंतु गांधीजींनी दिलेली श्रद्धा घेऊन आपण जाऊ. जय की पराजय हा सवाल नसून सारे सहन करीत, न दमता, न थकता उत्कटपणे काम करणे एवढेच आपल्या हाती.

+++

जातिधर्मनिरपेक्ष राष्ट्र व सामाजिक समता

भारताने लोकशाही शासन व्यवस्थेचाच नव्हे तर लोकशाही जीवन-पद्धतीचा स्वीकार केला; परंतु अनेक प्रकारच्या जाति-धर्मांनी आणि विषमतेने ग्रासलेल्या समाजात लोकशाही कशी यशस्वी होणार? एकराष्ट्रीयत्वाची भावना, सामाजिक समता आणि एकसंघ समाज ही लोकशाहीची अविभाज्य लक्षणे आहेत. यासाठीच गुरुजींना स्वराज्यात जातिधर्मनिरपेक्ष राष्ट्र व सामाजिक समता अत्यावश्यक वाटत होती. याबाबतची गुरुजींची मते येथे संकलित केली आहेत....

भारत हे जातिधर्मनिरपेक्ष राष्ट्र आहे, म्हणून आपण घटनेने घोषवले. तुमच्या घरी तुमचा धर्म. राष्ट्रीय कारभारात तुम्ही मानव म्हणून आहात. मानवतेला धरून कायदे करताना कोणत्याही धर्माला आड येऊ देता कामा नये. भारतात स्त्रियांना स्वातंत्र्य हवे. हिंदू भगिनींचे व मुस्लीम भगिनींचे घुंघट जायला हवेत. मुसलमानांनीही एकापेक्षा अधिक बायका करू नयेत. ते म्हणतील, 'आमच्या धर्मात हात घालता!' तर त्यांना नम्रपणे सांगावे की, कृपा करून पाकिस्तानात जा. अरबस्तानात स्त्रियांची संख्या अधिक होती म्हणून पैगंबराने तशी सूट दिली. हे त्रिकालाबाधित कायदे नसतात. मानव्याची विटंबना नाही होता कामा. भारतातील स्त्री-मग ती कोणत्याही धर्माची असो, तिला आपण मुक्त झालो असे वाटले पाहिजे. हिंदू कोड बिल, मुस्लीम कोड बिल -असे न करता सर्वांना बंधनकारक असा मानवतेचा कायदा करा. एकदम हे करणे बरे नाही असे वाटत असेल तर त्याचा प्रचार करावा. सरकारने जातिधर्मनिरपेक्ष वातावरण उत्पन्न व्हावे म्हणून प्रचंड प्रचार करायला हवा. मानव म्हणून जगा, वागा-अशी प्रचाराची झोड हवी.

तुर्कस्तानात केमालने या गोष्टी केल्या. मुस्लीम धर्मातील मानवतेला विरोधी गोष्टी त्यांनी फटक्यासरशी दूर केल्या. तो डगमगत नाही. हे खरे की, तुर्कस्तानातील क्रांतिकारक तरुण व तरुणी या गोष्टींचा कित्येक वर्षांपासून प्रचार करीत होत्या. भारतातील मुस्लीम बंधूंनी या प्रचारार्थ उठले पाहिजे. भारतातील सर्व जातीजमातींचे, सर्व धर्मांचे एक राष्ट्र केवळ घोषणांनी होणार नाही. सर्व जातीजमातींचे एकत्र जाणे-येणे, रोटी-बेटीचेही व्यवहार रूढ व्हायला पाहिजेत. ब्राह्मण-ब्राह्मणेतर, स्पृश्य-अस्पृश्य, हिंदू मुसलमान त्याचप्रमाणे भिन्न भिन्न प्रांतीयांचे एकत्र विवाह व्हायला पाहिजेत. जातिधर्मनिरपेक्ष राष्ट्र केवळ घटनेत शब्द घालून निर्माण होत नसते.

पंढरपूरच्या माझ्या उपासानंतर पू. आप्पासाहेबांनी मला एक महत्त्वाचे पत्र लिहिले होते. त्यात त्यांनी भारतातील सर्व जाती-जमाती, सर्व धर्म यांच्यामध्ये रोटी-बेटी-भेटी व्यवहार सुरू व्हायला हवेत असे स्पष्ट मत मांडले होते. आर्थिक समतेचाही प्रचार व्हायला हवा, असेही त्या पत्रात लिहिले होते. आपण खऱ्या अर्थाने अजून एक राष्ट्र नाही. एक राष्ट्र करायचे आहे. आज जी अमेरिका आहे ती युरोपातील अनेक राष्ट्रांतून आलेल्या लोकांनी बनली आहे. त्यांची मूळची राष्ट्रीयता महान अमेरिकन राष्ट्रीयतेत विलीन झाली. भारतात हे असे संमिश्रण करावयाचे आहे. भारतीय राष्ट्रीयतेला आकार यायचा आहे. भगीरथ काम आहे. ते क्षणात होणार नाही, हे खरे असले तरी त्या दृष्टीने आमचे सारे उद्योग पाहिजेत. आमची वृत्तपत्रे, आमचे बोलपट, सरकारी वा निमसरकारी सांस्कृतिक प्रचारक, आमच्या शाळा, महाशाळा, विद्यापीठे, देशातील अनेक संस्था या सर्वांचे उद्दिष्ट भारतातील ३३ कोटी लोकांचे असे एक प्राणमय राष्ट्र बनविणे, परस्परांचे भले घेणारे, परस्परांच्या संस्कृतीचा अभ्यास करणारे, एकत्र आणणारे, उठणारे, रोटी-बेटी-भेटी व्यवहार करणारे अशांचे एक खरेखुरे राष्ट्र बनविणे हे ध्येय पाहिजे. अलगपणा शिकवणे हा राष्ट्राचा व मानवतेचा भयंकर गुन्हा होय.

जाति-धर्मनिरपेक्ष घटनेला मान्यता देणाऱ्या सर्व लहानथोरांनी आपाआपल्या प्रांतात तसा नवराष्ट्र निर्मितीचा प्रचार केला पाहिजे. हिंदू, मुस्लीम, जैन, शीख, ख्रिश्चन, पारशी, ज्यू सर्वांनी आंतरिक ऐक्याच्या महान प्रयोगासाठी उभे राहिले पाहिजे. आपण जरी नकळत तोंडाने जातिधर्मनिरपेक्ष राष्ट्र म्हटले तरी भारतात आपाआपल्या जातिधर्माच्या डबक्यात बसणाऱ्यांची येथे अनेक राष्ट्रे आहेत असाच अर्थ होईल. दुनिया असेच म्हणेल.

स्वराज्यात ज्याप्रमाणे शेतकरी, कामकरी सुखी व्हावेत असे आपण म्हणतो त्याचप्रमाणे अस्पृश्यही सुखी व्हायला पाहिजेत. त्यांना इतरांप्रमाणे जमीन मिळेल, कारखान्यांत स्वाभिमानपूर्वक काम करता येईल. परंतु त्यांना शेतीवाडी मिळाली, काम मिळाले एवढ्याने सारे होईल असे नाही. अस्पृश्य बंधू विचारतात, ''स्वराज्यात आमची स्थिती कशी राहील ते सांगा.'' तुम्ही त्यांना काय सांगणार? १९४२ साली चले जावचा लढा ज्या वेळेस सुरू झाला होता, त्या वेळेस मुंबईस डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे एक भाषण झाले होते. त्या भाषणात ते म्हणाले होते, 'काँग्रेसचे पुढारी ब्रिटिशांना युद्धहेतू विचारत असतात. मीही चले जावच्या काँग्रेसी लढाईचे युद्धहेतू विचारत आहे. जे स्वराज्य तुम्ही आणणार त्यात पाच-सहा कोटी दलित जनता अशीच माणुसकीस पारखी राहणार ना? कोणते स्वराज्य तुम्ही आणू पाहाा?' असे त्यांनी विचारले होते. ब्रिटिशांनी हिंदुस्थानला युद्धाच्या खाईत ओढले. काँग्रेसने सांगितले, ''हे युद्ध लोकशाहीसाठी असेल तर या देशाला लोकशाही का देत नाही? युद्ध स्वातंत्र्यासाठी आहे तर मग आम्हाला स्वातंत्र्य का देत नाही?'' डॉ. बाबासाहेब आंबेडकर काँग्रेसला तोच प्रश्न विचारतात.

संपूर्ण सत्ता हाती आल्यानंतर सर्वांना जमीन वाटून देऊ तेव्हा देऊ; परंतु जे स्वराज्य आपण कोट्यवधी बंधूंना देऊ शकतो, ते आपण का देत नाही? स्वातंत्र्य दोन प्रकारचे आहे. एक आर्थिक नि दुसरे सामाजिक. सामाजिक स्वातंत्र्य या घटकेला आपण सर्वांना देऊ शकतो. त्यांच्या आड कोणी येत नाहीत. तुमच्या विहिरीवर हरिजनाने पाणी भरले तर का कोणी आड येणार आहे? हे सामाजिक स्वातंत्र्य आपणच अडवून ठेवले आहे. मनाचा मोठेपणा असेल तर एका क्षणात ते आजही दिले असते.

गेल्या शतकात ही अस्पृश्यता जावी म्हणून अनेकांनी प्रयत्न केले. महात्मा ज्योतिबा फुले यांनी प्रथम पुण्याला आपल्या हौदावर हरिजनांना पाणी भरू दिले. त्यांनी त्यासाठी शाळा काढल्या. त्यांनी निंदा, अपमान, बहिष्कार सारे सहन केले.

'तरिच संत व्हावे
जग बोलणे सोसावे'

हे मुक्ताबाईचे थोर चरण त्यांना माहीत होते. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी छात्रालये काढून खूप खटपट केली. हिंदुस्थानभर आर्य समाजाचे प्रयत्न चालू आहेत. परंतु अस्पृश्यता जाईना. लाखो खेड्यांतून अजूनही तशीच आहे.

आणि शेवटी १९३२ मध्ये महात्माजींनी उपवास केला. स्पृश्य हिंदू समाजापासून अस्पृश्य समाजास कायम पारखे करण्याचा इंग्रजी डाव होता. महात्माजींना वेदना झाल्या. ते म्हणाले, "हिंदू धर्मावर हा कायमचा कलंक राहील. हिंदू धर्माने आपल्या अनुदारपणामुळे आपल्या कोट्यवधी बंधूंना एका क्षणात दूर केले, असे इतिहास सदैव सांगत राहील. आम्ही अस्पृश्यता लवकर घालवू. तुम्ही अस्पृश्य बंधू कायमचे दूर करू नका. नाहीतर मी उपवास करीन." ब्रिटिश ऐकेनात. महात्माजींचे अग्निदिव्य सुरू झाले व शेवटी पुणे करार झाला.

महात्माजींनी करारानंतर पुन्हा २१ दिवस उपवास केला. ते म्हणाले, "हरिजनांच्या सेवेसाठी लाखो रुपये लोक देतील; परंतु माझ्या उपासाने मी आध्यात्मिक भांडवल देत आहे." तुमची आमची सर्वांची हृदये या कामात रंगावीत अशी महात्माजींची उत्कट इच्छा होती. १० वर्षांत ही अस्पृश्यता जाईल, अशी त्यांना आशा होती; परंतु १० ची १५ वर्षे झाली –आपणास काय दिसत आहे? किती मंदिरे उघडली? किती विहिरी मोकळ्या झाल्या? हॉटेले, खानावळी यांतून मोकळेपणाने त्यांना जाता येते का? भाड्याने राहण्यास घर मिळते का? कोणते उत्तर द्याल? बाबासाहेब आंबेडकर म्हणाले, "पुणे करार रद्द करा." तुम्हाला राग येतो. त्यांनी चर्चिलला तार केली तर तुम्हाला घुस्सा येतो; परंतु त्यांचे प्रेम मिळावे म्हणून तुम्ही काय केले आहे?

१९३१ मध्ये वर्तुळाकार परिषदेच्या वेळेस महात्माजी म्हणाले, "डॉक्टर आंबेडकरांना माझ्यावर थुंकण्याचा हक्क आहे. कारण हिंदूंची पापे माझ्याही शिरावर आहेत." आज आपण पुन्हा असेच म्हणावयास लावणार का? डॉ. आंबेडकर गांधीजींना जर म्हणाले, "चला लाखो खेड्यापाड्यांतून आणि दाखवा शिवाशिवी गेली का ते?" त्यांना आशा होती की स्वातंत्र्यानुसार हिंदी राष्ट्र अस्पृश्यता झपाट्याने दूर करील; परंतु आपण उदासीन राहिलो.

मी सेनापतींच्या बरोबर अस्पृश्यतानिवारणाच्या वेळेस गडहिंग्लज येथे गेलो होतो. तेथील ग्रामदेवतेच्या मंदिरात हरिजनांसह आम्ही गेलो. एक वृद्ध हरिजन डोळ्यांत पाणी आणून म्हणाला, "आमची ग्रामदेवता आज दृष्टीस पडत आहे." त्यानंतर सरकारी कायदेही झाले. सार्वजनिक जागी हरिजनांना बंदी होता कामा नये. मंदिरात त्यांना प्रवेश हवा. परंतु अजून लोकांची अढी कायमच आहे. ठिकठिकाणची पत्रे येतात. वाईट वाटते. हिंदुस्थान मुक्त झाला. हरिजनांचे ग्रहण कधी सुटणार?

'शेतकरी कामकरी राज्य' आहे असे सारे म्हणतात. परंतु शेतकरी हरिजनांना जवळ घ्यायला तयार नाहीत. कामगारही त्यांना समानतेने सर्वत्र किती वागवतील याची वानवाच. इतर पांढरपेशांची गोष्टच निराळी. गडहिंग्लज येथील मित्र लिहितो, तुम्ही आलात त्या वेळेस हरिजन मंदिर प्रवेशाचा कार्यक्रम झाला. त्यानंतर परवाच्या गांधी जयंतीपर्यंत स्पृश्य-अस्पृश्य भेद दूर करण्यासाठी काहीच झाले नाही. कोल्हापूरच्या राजकारणामुळे नाना भेद माजले आहेत, आणि त्याचाही परिणाम म्हणजे हे औदासीन्य असेल. ते काहीही असो, आम्ही येत्या गांधी जयंतीला गडहिंग्लज येथे मंदिर-प्रवेश, हॉटेल-प्रवेश इत्यादी कार्यक्रम ठेवले. आम्हाला वाटले होते, आता विरोध नाही होणार; परंतु आमचे डोळे उघडले. आम्ही कोठे आहोत याची जाणीव झाली. मोठमोठे विद्वान नागरिकही विरोध करू लागले. विरोधामुळे विद्यार्थी अधिकच खंबीरपणे उभे राहिले. वीस विद्यार्थ्यांनी उपोषणाची तयारी केली. गांधींच्या जन्मदिनी सकाळी आठ वाजता मंदिरप्रवेश, हॉटेलप्रवेश व्यवस्थितपणे पार पडले. दुसऱ्या दिवशी पुन्हा ये रे माझ्या मागल्या. त्यांना पुन्हा हॉटेल प्रवेशास बंदी. कित्येक शेतकऱ्यांनी त्यांना खळ्यावर येऊ नका म्हणून धमकी दिली.

ही भेदाची भुते आम्ही शांतपणे शांत करू पाहात आहोत; परंतु ज्या शेतकऱ्यांचे राज्य निर्माण होणार म्हणतो त्यांनीही विरोध करावा हे किती वाईट! तसेच सुशिक्षित आणि मोठ्या माणसांचे सहकार्यही मिळत नाही. किती लाजिरवाणी गोष्ट ! नवीन पिढी तरी नवयुगाचा अर्थ जाणून वागो.

हरिजनांना अजूनही मानवतेचे हक्क द्यायला आपण तयार नसू तर स्वराज्याचा अर्थच आम्हास कळला नाही म्हणायचा.

जोपर्यंत मानव मानवाला मानवतेने वागवायला तयार नाही तोपर्यंत स्वातंत्र्याचा अर्थ आम्हाला कळला नाही. परकीयांची सत्ता झुगारायला आपण अधीर असतो, परंतु आपणच आपल्या बांधवांवर गुलामगिरी लादीत असतो, तिचे समर्थन करीत असतो, हे आश्चर्य नव्हे काय? हैदराबादमधील हिंदी जनता निजामी जुलुमाला कंटाळली. रझाकारी जाचांनी त्रस्त झाली; परंतु हैदराबादमधील तमाम हरिजनांना सारे नागरिकत्वाचे हक्क मिळाले का? ज्या एकनाथांनी हरिजनाचे मूल कडेवर घेतले, त्या नाथांच्या समाधीचे दर्शन हरिजनांना घेता येते का? कार्तिकी एकादशीला पैठणला हरिजन मंदिरात जाणार आहेत असे ऐकले; परंतु मागून कळले की तेथे एक अडसर

घालून तेथपर्यंत त्यांना येऊ द्यायचे असे ठरले. जोपर्यंत हे असे अडसर आहेत, तोपर्यंत तुमची माणुसकी अर्धमेली आहे, तुमचे स्वातंत्र्य अपुरे आहे हाच त्याचा अर्थ. क्षणाचाही उशीर न लावता हरिजनांना सर्वत्र मोकळीक द्या. हे समजावयाचे तरी कधी आमच्या लोकांना? दुसऱ्याच्या मनाची, त्याच्या वेदनांची ज्यांना जाणीव होत नाही त्यांना काय म्हणावे?

भंग्यांची जातच्या जात मळाच्या टोपल्या उचलून नेत आहे हे माणुसकीस शोभत नाही. काहीतरी करून एकाच जातीचे हे काम पिढ्यान्‌पिढ्या करणे बंद व्हायला हवे. कामात सुधारणा व्हायला हवी. ते सुसह्य केले जावे, शास्त्रीय केले जावे. भंगीही मग दुसरे उद्योगधंदे करू लागतील, शिकतील. भंगी समाजात स्वाभिमानाची प्रखर ज्वाला पेटली पाहिजे. मागे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महार बंधूंना सांगितले, 'नका मृत गुरे फाडू.' कारण यांची ढोरे फाडायची, आणि तुम्ही गलिच्छ काम करता, दूर राहा-हे बक्षीस मिळायचे. नकोच ते काम. त्यात राष्ट्रीय संपत्तीची हानी होते, परंतु स्वाभिमानाची हानी ही सर्वांत मोठी हानी होय! भंगी बंधूंनी दुसरी कोणतीतरी मोलमजुरी करावी, आपल्या मुलाबाळांना शिकवावे, चरखा चालवावा; परंतु पिपे आजपासून उचलणार नाही अशी प्रतिज्ञा करावी.

'आवश्यक काम' बंद पाडले या आरोपाखाली सरकारने त्यांना अटक करता कामा नये. सरकाने अर्ज मागवावेत, किंवा म्युनिसिपालटीची गाडी फिरवून ज्याने त्याने आपल्या घरातील मळपात्र- पीप आणून ओतावे असे करावे. मूलग्राही पद्धतीनेच हा प्रश्न सोडवला गेला पाहिजे.

परंतु हे सारे होईल तेव्हा होईल. तोवर काय? तोवर काय या समाजसेवकांना दूर राखणार? मी कोल्हापूरला भंगी बंधूंत गेलो आहे. त्यांची कलापथके आहेत. किती सुंदर भजने ते करतात ! पेटी, तबला वाजविणारे, स्वतः कविता करणारे, गाणारे भेटले. त्यांच्यातील चित्रकार भेटले. घरी स्वच्छता, अन्यत्रही. त्यांची अंगणे सारवलेली. भिंतीवर चित्रे पाहिली. ओंगळ काम करतात तरी स्वच्छ राहतात. त्यांना दूर नका ठेवू. येऊ दे त्यांना मंदिरात, येऊ दे विहिरीवर त्यांना माणुसकी आहे. ते तुमच्याकडे येताना स्वच्छ होऊनच येतील. त्यांना समजते. जंजिऱ्याचा माझा मित्र गजा भंगी आंघोळ करून गंध लावून देवदर्शनास जातो. तुमच्या आमच्यापेक्षा अधिक भक्तीने नि स्वच्छतेने जातील. देवाजवळ सर्वांना वाव, सर्वांना ठाव. हिंदू धर्मीयांनो,

कोट्यवधी बंधू माणूसघाणेपणाने तुम्ही दवडलेत. मुसलमान झाले, ख्रिश्चन झाले. त्यातूनच पाकिस्तान जन्मली. तरी अजून हे पाप पुरे नाही झाले? हिंदू बंधूभगिनींनो, हिंदू धर्मातील दिव्य मानवता प्रकट करा.

कोणी म्हणत असतात, ''हिंदू धर्म जगभर नेला पाहिजे तरच शांती येईल.'' तो काही तलवारीने किंवा मारामारीने न्यायचा नाही; हिंदू धर्मातील उदारता नि उदात्तता जगाला पटवून देऊन. परंतु आम्ही हिंदू धर्माचे भव्य फळ जे गांधी त्यांचा खून करून आनंद मानतो. कोट्यवधी बंधूंना दूर ठेवतो. ही का हिंदू धर्माची थोरवी? परकीयांचे जू तुम्ही फेकाल तेव्हा फेकाल. आधी तुम्हीच स्वकीयांच्यावर लादलेले अन्याय नष्ट करून स्वराज्याची पात्रता सिद्ध करा. साऱ्या भारतातूनच ही अस्पृश्यता, सर्व पापजननी नष्ट होऊ दे. त्याच्यासाठी नकोत शास्त्रार्थ. नकोत युक्तिवाद! साध्या मानवतेचा सवाल आहे.

भारतातील मुलामुलींना आता नवसंकल्प करावयाला हवेत. कागदावर घटना लिहून काय उपयोग? घटना हृदयात हवी. अस्पृश्यता निवारणाचा कायदा आहे. नुसते कायदे करून काम संपत नाही. माणसे सुधारायची आहेत. मानवतेच्या कायद्यांचे आपण उपासक झाले पाहिजे.

'मी सर्व राष्ट्राचा आहे, लोकांचे भिन्न प्रवाह जोडणारा, त्यांचा संगम करणारा' हे ध्येय ज्याच्या डोळ्यांसमोर असेल, तदर्थ जो रात्रंदिवस धडपडत असेल, तो भारताचा सत्पुत्र. तो भारतीय संस्कृतीचा खरा उपासक. बाकीचे केरकचरा, फोलपट होत. एखादे वेळेस वाटते, नवभारताची मुले-मुली हजारोंनी उठावीत व ऐक्याची उदात्त गाणी गात हिंडावीत. प्रचाराचा, नवविचारांचा पाऊस पडायला हवा; परंतु आहे कोणाला स्फूर्ती? ही एक मिशनरी ज्वाळा पेटविल्याशिवाय कोणतेही कार्य होणार नाही. जात्यंधांच्या संघटना विषे पेरीत आहेत. हिंसक लोकांच्या संघटना आगी लावीत आहेत. माझे एक मित्र नगर जिल्ह्यात काम करतात. त्यांनी त्यांच्या तालुक्यात सहकारी पद्धतीने केवढे काम केले! जनतेचे, शेतकऱ्यांचे केवढे कल्याण केले. काळ्या बाजाराला किती आळा बसविला! परंतु त्यांचा वाडा परवा हिंसकांनी भस्मसात केला. माझे हे मित्र हिंसक, आगलावे आणि गरळ ओकणारे धर्महीन, धर्मांधांच्या विरुद्ध प्रत्यक्ष सेवेने नि सहविचार प्रसाराने झगडत होते. त्यांच्या सेवेमुळे आपला प्रभाव पडत नाही, आपले कोणी ऐकत नाही असे पाहून दुष्टांनी आग लावून

त्यांचा वाडा भस्मसात केला. बंगालमध्ये, पंजाबमध्ये अशा हजारो आगी गेल्या दोन-तीन वर्षांत लागल्या; परंतु व्यक्तीच्या सुख:दुखाने ऐतिहासिक मूल्ये, ऐतिहासिक घडामोडी आजमावायच्या नसतात. स्वत:च्या वैयक्तिक जीवनाची फूटपट्टी घेऊन महान् आंदोलने योजता कामा नयेत. प्राचीन कालापासून एकीकडे आसुरी वृत्तीचे लोक व दुसऱ्या बाजूला उदार वृत्तीचे नम्र परंतु निर्भय असे दैवी वृत्तीचे लोक, यांचा लढा चालत आला आहे. तो आजही चालू आहे. यात अनेकांच्या आहुत्या पडतील. अनेकांचे संसार रसातळाला जातील. जगन्नाथाच्या रथाखाली चिरडून घेतल्याशिवाय नवनिर्मिती कोणती?

परवा मीही हिंदी साहित्यसम्राट प्रेमचंद यांच्या पद्धतीने लिहिलेले स्मृतिरम्य चरित्र वाचीत होतो. मराठीत हे पुस्तक यायला हवे. प्रेमचंद मानवधर्माचे उपासक होते. ते हिंदू-मुस्लीम ऐक्याचे पुरस्कर्ते म्हणून त्यांनाही धर्महीन, धर्मांध लोक 'मुल्ला' म्हणून-उपहासाने म्हणत. धुळ्याच्या काही लोकांनी मला 'मुल्ला' म्हणून संबोधिले होते. निदान एका बाबतीत तरी त्या थोर साहित्यिकांशी माझे नाते जडले म्हणून मला अपार आनंद झाला.

माझा एक मारवाडी तरुण मित्र आहे, तो अमेरिकेतून शिकून आला. आता एका गिरणीत मोठा अधिकारी आहे. पाचसातशे रुपये पगार आहे. त्याच्या बहिणीचे मला पत्र आले आहे की त्याला आंतरजातीय लग्न करावयाचे आहे. एखादी सुशिक्षित वधू पाहा. मी कोठे जाणार वधू संशोधन करीत? परंतु मला माझ्या या तरुण मित्राचे कौतुक वाटले. साऱ्या देशभर आंतरजातीय विवाह सुरू व्हायला हवे आहेत. राष्ट्र घुसळून निघो, सारी सरमिसळ होवो. त्यातून चैतन्यमय नवभारत उभा राहील.

मीही अनेक लग्ने बघत आहे; परंतु रूढ बंधने मोडून कोणी लग्न करीत आहे का, इकडे माझे लक्ष आहे. त्याच त्या जातीतील लग्ने आता पुरे असे वाटते. सरमिसळ झाल्याशिवाय भारतात सर्वगामी नवचैतन्य येणार नाही. अजून आपल्याकडे ही जात, ती जात याच कल्पना आहेत. श्रेष्ठ, कनिष्ठपणाची बंडे आहेत. हिंदू धर्मात हे आहे असे नाही तर सर्व धर्मांच्या अनुयायांतही हे प्रकार दिसतील.

ख्रिस्ती धर्मातही बडे सरदार लोक गरिबांशी लग्न लावायला तयार होत नाहीत. तो इंग्लंडचा आठवा एडवर्ड राजा. त्याला गादी सोडावी लागली! का? तर तो राजघराण्यातील एखाद्या राजकन्येशी लग्न न करता दुसऱ्या एका मुलीशी लग्न करता

झाला म्हणून. इंग्लंडमधील लोकशाहीचा हा पराजय होता. नुसते सर्वांना मत देऊन लोकशाही येत नाही. सर्वांना दर्जाही समान लेखायला हवा.

मानवता सर्वत्र एकच आहे. आमचे अतार घराण्यातील एक मित्र शेख घराण्यातील मुलीशी लग्न करणार आहेत म्हणून त्यांची अतार मंडळी त्यांच्यावर रागावली आहेत. अतार समाजातीलच मुलीशी लग्न लाव असा त्यांचा आग्रह. तसे पाहिले तर शेख हें अतार समाजाहूनही श्रेष्ठ मानले जातात; परंतु आपल्या समाजातील हवी हा त्यांचा आग्रह. वास्तविक पैगंबर हे मानवतेचे महान उपासक. त्यांनी कालपर्यंत गुलाम असणाऱ्या मुली मोठमोठ्या खानदानांना देवविल्या. ज्या एका गुलामाला त्यांनी स्वतंत्र केले त्याने आपल्या मागून खलीफा व्हावे अशी इच्छा त्यांनी प्रदर्शित केली होती. त्याच पैगंबरांच्या धर्मातील हे लोक तू अतार, मी शेख करीत बसले. मनुष्याला समता का आवडत नाही?

भारतात सर्रास सर्वत्र मिश्र विवाह सुरू व्हावत अस मला वाटत. मुलामुलांना याबाबत बंड करावे; परंतु आई बापांच्या आधारावर अवलंबून असलेली मुले अशी लग्ने करू शकणार नाहीत.

स्वतंत्र व्हावयाला स्वत:चा संसार स्वतंत्रपणे चालवावयाची अंगात धमक हवी. नाहीतर, 'अर्थस्य पुरुषो दासा:' याप्रमाणे शेवटी 'आईबाप असे म्हणतात, मग काय करायचे?' असे रडके उद्गार काढणारे तरुणच सर्वत्र आढळावयाचे.

हिंदू धर्माने सर्व मिश्र विवाहांस अत:पर संमती द्यायला हवी. आज वेळ आली आहे. कधी कधी संकर हा शंकर म्हणजे कल्याणप्रद असतो. ज्यांना आपाआपल्या जाती-जमातींत विवाह करायचा असेल त्यांना आहेच स्वातंत्र्य. तुम्ही मिश्र विवाह करा अशी सक्ती नाही. परंतु कोणी केला तर तोही शास्त्रीय मानला जायला हवा. हिंदू धर्म त्यालाही आशीर्वाद द्यायला उभा हवा. हिंदू धर्मात हा लवचिकपणा, ही उदारता नाही. विनोबाजी धुळे जेलमध्ये म्हणाले, ''विवाह समुद्रामधले नसावेत. डबक्यातले नसावेत, नदीतील असावेत.'' आता आम्ही या डबक्यात आहोत. जरा डबकी फोडा. अगदी सागर नको असला तरी नदीत या. एकदम परदेशातील मुलगी नका करू किंवा तेथील नवरदेव नका आणू; परंतु या भारतात तरी एक व्हा. आपणास नवराष्ट्र उभारावयाचे आहे ते मातीच्या डबक्यात राहून कधीच होणार नाही.

मुलगा पित्याच्या इस्टेटीत वारस असतो. मुलगी का नसावी? इस्लामी कायदा मुलीसही वारसा देतो. या बाबतीत स्त्रियांना न्याय मिळाला पाहिजे.

घटस्फोटाचा पुष्कळसा त्रास वाटतो. अनेक जातीजमातींत घटस्फोट रूढच आहे. काही प्रतिष्ठित गणल्या गेलेल्या जातींत नाही; परंतु त्यांची केवढी कुचंबणा होते. मला पाचदहा उदाहरणे तरी माहिती आहेत की जेथे स्त्रियांचा आत्मा गुदमरे. तेथेही त्यागाने ती राहिली. ती प्रातःस्मरणीय होय.

परंतु कायद्याने-धर्माने तरी मोकळीक द्यायला हवी. भारतीय संस्कृतीने संयम शिकवला आहे. घटस्फोटाचा येथे दुरुपयोग होणार नाही. कदाचित वासराला सारखे बांधून ठेवल्यामुळे दावे सोडताच ते मोकाट सुटते. हिंदू स्त्रियाही त्या गाईप्रमाणे बांधल्या गेल्या; त्या स्वातंत्र्य भोगायला अधिकच अधीर होतील; परंतु पुन्हा सारी परिस्थिती समतोल होईल. साने गुरुजी

घटस्फोटाच्या बिलाची चर्चा करताना अनेकांची भाषणे झाली. सर्व विवाहांचा विचार केला का? पूर्व पंजाबमध्ये नुसता बांगड्यांचा जोड दिला की विवाह होतो. नाना प्रकार आहेत असे प्रतिनिधी म्हणत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले, "सारा विचार केला आहे."

महाराष्ट्र महिलांच्या स्वातंत्र्याचा भक्त. येथे मुक्ताबाई मुक्तपणे विहरली. येथे वेणाई, अक्काबाई रामदासांच्या मठांत काम करीत. येथे श्री. रमाबाई, अहिल्याबाई, लक्ष्मीबाई झाल्या. येथे ना गोषा ना पडदा.

परंतु काही मोठ्या समजल्या जाणाऱ्या मराठा घराण्यांतून गोषा-पडदा असतो. किती मुलींची कुचंबणा होते ! एकीकडे क्रांतीच्या गप्पा मारणाऱ्या लोकांतही ही गुलामगिरी आहे. त्याविरुद्ध कोणी का बोलत नाही? परंतु मराठा मुलींनीच याबाबत बंड करावयास हवे. मी खानदेशांत अनेक ठिकाणी हे सांगत असे. शेकडो प्रकारची गुलामगिरी आहे; परंतु ही सामाजिक गळवे आपण झाकून ठेवीत असतो. मराठा समाजात स्त्री स्वातंत्र्य जायला हवे. पुनर्विवाहाची चळवळ व्हायला हवी. स्त्रियांचा आत्मा मुक्त व्हायला हवा. क्रांतिकारक तरुणांनी हे बंड करावयास पाहिजे. मला मराठा मुलींची पत्रे आली आहेत. एक मुलगी लिहिते, "गुरुजी, मी शिकले, पण आज पडद्यात येऊन पडले. कोणास सांगू हे दुःख? मनात निराळ्या प्रकारचे सामाजिक कार्य करावे असे येते; परंतु मी सभेलाही जाऊ शकत नाही." मला वाईट वाटते. मार्क्सवादाच्या आम्ही गप्पा

मारतो. परंतु घरीदारी हा साधा मोकळेपणाही आम्ही न्यायला तयार नाही. मराठा मुलींतच क्रांतीची ज्वाळा पेटायला हवी. इतर जागृत भगिनींनी त्यांना या बाबतीत मदत करायला हवी. मराठा मुलामुलींनीच हे काम करावे असे मी म्हणतो याचा अर्थ मी जातीय दृष्टीने हे सांगत नाही; परंतु माझ्या सांगण्यापेक्षा त्यांनी सांगितले तर अधिक पटेल म्हणून. अर्थात लोक गैरसमज करतील म्हणून मी भीतीने टाळता कामा नये. जोवर माझे मन शुद्ध आहे तोवर मला भय कशाला? objective condition प्रत्यक्ष परिस्थिती सांगितली. चार मराठा तरुण-तरुणी सामाजिक बंड करायला निघाली तर त्यांच्याबरोबर पाचवा मीही येईन; परंतु ही सामाजिक गुलामगिरी जायला हवी. शिकूनही गुलामगिरी जात नसेल तर शिकण्याचा फायदा काय?

हिंदू धर्म उदार होवो. काळानुरूप बदला नाहीतर मरा, हा सृष्टीचा कायदा आहे. भारतीय नारींची, हिंदू भगिनींची मान धर्मामुळे तरी खाली न होवो. धर्म कोणाला दु:खात लोटण्यासाठी नसतो. तो तर आनंद व सुख हे देण्यासाठी असतो. सर्वांना न्याय, समता, विकास, संधी-यासाठी धर्म. धर्माची ही उदारता पुन्हा उज्ज्वलपणे प्रतीत होवो.

भारतीय संस्कृती निसर्गाशी वैर नाही करीत. वृक्षवेली, लता, नद्या-पर्वत, पशुपक्षी -सर्वांना आपल्या संस्कृतीत, आपल्या जीवनांत स्थान. तुळशीचे गोपाळकृष्णाशी आपण लग्न लावतो. जणू चराचराला भावना आहेत. हा मूर्खपणा नाही. ही व्यापक सहानुभूती आहे. परंतु या सर्व गोष्टींचा विचार झाला म्हणजे वाईट वाटते की एवढी थोर जीवनदृष्टी ज्या देशातील लोकांना देण्यात आली होती तेथील लोक एकमेकांपासून दूर कसे राहिले? येथे कोट्यवधी अस्पृश्य कसे दूर ठेवण्यात आले? शेकडो वन्य जातींना आपण जवळ केले नाही. आपण व्यवहार आणि तत्त्वज्ञान यांची फारकत केली म्हणून वाईट दिवस आले.

एका गावी सभेस गेलो. तेथे निरनिराळ्या जातींचे लोक वेगवेगळे बसले. कधी सुधारणार हे सारे? आपला देश शतखंड आहे. सहस्रखंड आहे. तरी आम्ही संस्कृतीच्या गप्पा मारतो. हिंदू धर्माची महती गातो. समाजाची शकले पाडणे हा का हिंदू धर्म? त्या महान धर्माचा आत्मा या लोकांना कधी कळणार?

हिंदुस्थानला हजारो वर्षांपासून जातीय दृष्टीने बघावयाची सवय आहे. त्या त्या जातींच्या नि धंद्यांच्या पंचायती आहेत. त्या आपाआपल्या जातींचे नियमन करीत.

सुखदु:ख बघत. आज काळ निराळा आहे. धंदे गेल्यामुळे जातींना आर्थिक महत्त्व राहिले नसले तरी जातीच्या डबक्यापलीकडे पाहण्याची आजही दृष्टी नाही. आपण जातिनिरपेक्ष राष्ट्र उभे करण्याची घोषणा केली आहे; परंतु प्रत्येक पक्षाला जातीय दृष्टी ग्रहण लावीत आहे. निवडणुका आल्या म्हणजे जातीय दृष्टीनेच उमेदवार उभे करण्यात येतात. कोठेही प्रश्न उभा राहो, कोणतेही कार्य असो, तेथे आधी जात डोळ्यांपुढे येते. परवा महाराष्ट्र साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदाविषयी लिहितानाही कोणत्या जातीला अध्यक्षपद मिळाले याचा उहापोह वृत्तपत्रांतून झाला. अध्यक्षपदासाठी ज्याला उभे राहायचे असेल त्याने अर्ज करावा लागतो. त्यातून बहुमताने निवड केली जाते. एक प्रकारची लोकशाही पद्धत आहे. कोणत्याही जातीचे असा, तुम्ही साहित्यसेवा केली असेल, साहित्याविषयी तुम्हाला आस्था असेल, अध्यक्ष म्हणून निवडून यायची महत्त्वाकांक्षा असेल तर अर्ज भरून पाठवा. स्वागत सभासदांनी बहुमताने निवडले तरी ठीक, न निवडले तरी खेळीमेळीने वागावे. यात रागवण्या-रुसण्यासारखे काय आहे?

परंतु खरी गोष्ट हीच आहे की, आम्ही कोठेही गेलो, कोठेही असलो तरी आमची जातीय दृष्टी घेऊन जाऊ. डॉ. बाबासाहेब आंबेडकर व श्री. राजभोज यांच्या मते हिंदू धर्मीय बुद्धधर्मी झाले म्हणजे जातीयता जाईल. एक तर बुद्धांना दशावतारांत घालून त्यांची 'अहिंसा परमो धर्म:' वगैरे शिकवण घेऊन आम्ही बुद्ध धर्म आत्मसात केलाच होता; परंतु हिंदू धर्माऐवजी बुद्ध धर्म नाव घेतल्याने का क्रांती होणार आहे? ख्रिश्चन धर्मात गेलेल्यांत हा ब्राह्मण ख्रिश्चन, हा महार ख्रिश्चन असे भेद आम्ही ठेवलेच आहेत. बुद्ध धर्म नाव घेतले तरी ही खोड का जाणार आहे? परवा एका महार मित्राच्या घरी लग्नास चांभार बंधूला बोलाविले तर तेही तेथील अनेकांना आवडले नाही. ही तर आपली दशा आहे.

धर्मांची नावे बदला, पक्षांची नावे बदला. जातीचे बिल्ले लावूनच आपण सर्वत्र असेच मिरवणार. जे आपल्याला मार्क्सवादी म्हणतात, अधिक क्रांतिकारक समजतात, त्यांच्याजवळही आधी जातीला मान असतो हे पाहिले म्हणजे मनात येते; तो मार्क्स उद्विग्न होऊन म्हणेल, "या मित्रांपासून वाचवा मला!" कोठला मार्क्सवाद, कोठली जातिधर्मनिरपेक्ष दृष्टी! एका प्राथमिक शिक्षकाचे मला पत्र आले, "मी सोनार जातीचा आहे म्हणून माझी सतरा ठिकाणी बदली. मी ब्राह्मणेतर असलो

तरी पुन्हा सोनार पडलो, त्यामुळे ही दशा.'' आपण एका थोर ध्येयाचे उपासक आहोत, त्यासाठी लढणारे झिजणारे आहोत, आपण सारे एक, आपण जणू एक आत्मा, एक भ्रातृमंडळ अशी निष्ठा जोवर नाही तोवर कोणतेही नाव घ्या, कोणतीही बिरुदे मिरवा सारे फोल आहे. तुमच्या मनातून जाती, धर्म, नावे, आडनावे हे सारे गळून तेथे उज्ज्वल जळजळीत ध्येयनिष्ठा तळपू लागेल तेव्हाच पाऊल पुढे पडेल. नाही तर सेवा व्हायची दूर राहून हेवेदावे मात्र माजतील. ध्येयाकडे जायचे दूर राहून जातीयतेच्या डबक्यातच रुतून बसाल आणि राष्ट्रालाही त्यात फसवाल. मनातील घाण जावो म्हणजे बाहेरची जाईल

+++

सर्वोदय व अनाग्रही निष्ठा

गांधीजींच्या मृत्यूनंतर त्यांच्या अनुयायांनी सर्वोदयाचा नवा पंथ काढला पण गांधीजींवर अनन्यसाधारण निष्ठा असूनही साने गुरुजींनी सर्वोदयाचे तत्त्वज्ञान झिडकारले. ते का याची उत्तरे अत्यंत परखड शब्दांत गुरुजींनी दिलेली आहेत, त्याचा हा परिचय......

आज सर्वोदय शब्द सर्वत्र उच्चारला जात आहे. महात्माजींच्या महाप्रयाणानंतर वर्ध्याला महात्माजींचे अनुयायी जमले व सर्वोदय समाजरचनेचे ध्येय त्यांनी उद्घोषिले. ठिकठिकाणी सर्वोदय शाखा सुरू झाल्या. जयपूरला सर्वोदय प्रदर्शन भरले. धुळे येथे पू. विनोबाजींनी महात्माजींचा प्रयाण दिन ३० जानेवारी हा सर्वोदय-दिन म्हणून माना म्हणून परवा सांगितले. ते प्रवचनात म्हणाले, ''सर्वांची हिते अविरोधी आहेत.'' परंतु सर्वांची न्याय्य हिते अविरोधी असू शकतील. कामगाराला खायला हवे नि कारखानदारासही हवे. दोघांचे हित अविरोधी आहे आणि म्हणूनच दोघांना सारखेच द्या. उत्पन्नात थोडीफार तफावत चालेल. मालकाला लाखो रुपये फायदा देण्याची जरूरी नाही; परंतु ज्या समाजात असे होत असेल तेथे अविरोधी हिते कशी असणार? उदय म्हणजे उद्धार. गरिबांचा गरिबीतून उद्धार करण्यासाठी त्याला अधिक द्यायला हवे; मेहेरबानी म्हणून नव्हे. त्याला देणे धर्म्य आहे, न्याय्य आहे, म्हणूनच; आणि श्रीमंताची विलासातून, श्रीमंतीतून मुक्तता करणे, त्याला गरिबीकडे आणणे यात त्याच्या आत्म्याचा उदय, त्याचा उद्धार. महात्माजी एकदा म्हणाले होते, ''ब्रिटिशांचे साम्राज्य नष्ट करण्यातच त्यांचा उद्धार आहे.'' त्याचप्रमाणे भांडवलशाही पद्धती नष्ट करण्यातच भांडवलदारांचा उद्धार आहे, तेव्हाच सर्वोदय होईल.

ब्रिटिश कंपन्या मागे म्हणाल्या, ''हिंदुस्थानात उद्या आम्हालाही समान हक्क द्या.'' गांधीजींनी लिहिले, ''बलभीम आणि सुदामदेव यांची बरोबरी कशी? बलभीमाचा खुराक कमी करायला हवा आणि सुदाम्याला अधिक द्यायला हवे.'' जो उपेक्षित आहे, ज्याला घर ना दार, ज्याच्या मुलांना शिक्षण घेता येत नाही, ज्याला पदोपदी ददात, त्याला अधिक देणे व ज्याला गडगंज आहे त्याचे बरेचसे काढून घेणे म्हणजे समता. याला सर्वोदय म्हणतात. असे करावयाचे असेल तर समाजवाद हाच त्याला मार्ग आहे; परंतु कॉंग्रेस तो या देशात लवकर आणू इच्छित नाहीच, उलट ब्रह्मदेश आणीत असेल तर तेथील हिंदी भांडवलदारांना नि जमीनदारांना भरपूर मोबदला मिळाला पाहिजे असा हट्ट धरला जात आहे असे कानी येते.

सर्वोदयाचे शाब्दिक बुडबुडे आम्हाला नकोत. कारखानदार कोट्यवधी रुपये नफा उकळीत आहेत. विश्वासास नालायक असल्याचे स्वतःच्या देशद्रोही वर्तनाने त्यांनी सिद्ध केले आहे. केलेत का त्यांना पदभ्रष्ट? श्रीमंतांची श्रीमंती गरीबांसाठी आणाल तेव्हाच उभयतांचा उद्धार नि उदय होईल. प्रश्नाच्या मुळाशी हात घाला. मलमपट्टी करून सर्वोदय येणार नाही. समाजवादी पक्ष बाहू उभारून हे सांगत आहे. जनतेला गरिबांची मान उंच करणारी समाजव्यवस्था नि अर्थव्यवस्था हवी असेल तर ती समाजवादी पक्षाच्या पाठीमागे जात-पात, नाते-गोते, धर्म-बिर्म, प्रांत-भाषा, इत्यादी सारे बाजूला ठेवून उभी राहील. जनता मत देईल. आर्थिक मदतही देईल. समाजवादी पक्ष घुबडाच्या घुत्कारांस न भिता, सरकारी दरडावणीस न भिता, पुंजीपतींच्या पत्रांची भुंकणी न जुमानता सेवेने, संघटना करीत, नवश्रद्धा, नवस्फूर्ती सर्वत्र पेटवीत एक अभिनव भारत निर्मायला उभा आहे. तरुण भारतास तो हाक मारत आहे. ती हाक तरुण हृदयास नि तरुण बुद्धीस उचंबळवल्याशिवाय कशी राहील?

समाजवादी पक्ष देशभर प्रचार करून लोकशाही मार्गाने कायदेशीर समाजवाद आणण्यास धडपडत आहे. महात्माजी दिल्लीला म्हणाले, ''स्वतंत्र हिंदुस्थान एक दिवसही आर्थिक विषमता सहन करणार नाही.'' ते जळजळीत उद्गार कोण विसरेल? आता हिंद मजदूर, हिंद किसान पंचायत अशा अखिल भारतीय संघटना निर्माण केल्या आहेत. कोटीकोटींनी त्यांचे सभासद व्हा. खरा समाजवाद आणून खरा सर्वोदय शक्य करा.

(१५ जानेवारी १९४९)

प्रश्न : तुम्ही सर्वोदय समाजात का जात नाही?

उत्तर : मी कोणत्याच पक्षाचा वा संस्थेचा सभासद नाही. मी मोकळा आहे. ज्याचे विचार मला पटतात त्यांची बाजू मी मांडतो. सर्वोदय समाज मला आकर्षू शकत नाही. प्राचीन काळापासून 'सर्वेऽपि सुखिन: सन्तु' असे आम्ही घोकीत आलो, परंतु काही मूठभर लोक सुखात असावेत आणि बाकीची जनता राबत असावी असे दृश्य दिसते. सर्वोदय समाज जोपर्यंत जमीनदारी रद्द करीत नाही, मोठे कारखाने राष्ट्राच्या मालकीचे करा असा आग्रह धरत नाहीत तोवर सर्वोदयाचे ध्येय स्वप्नच राहणार आहे. मला श्रमणाऱ्यांचा उदय हवा आहे.

प्रश्न : आज जमीनदारी दूर करावयाची असेल तर कोट्यवधी रुपये मोबदला म्हणून द्यावे लागतील. चलनवाढ आणखीनच होईल. सरकारने कोठून आणावयाचे पैसे?

उत्तर : मोबदल्याची मर्यादा घातली पाहिजे. बिहार सरकार जमीनदारी रद्द करण्याचे बील आणणार होते. काही नुकसान भरपाई देणार होते, परंतु दिल्लीच्या बड्या नेत्यांनी त्याला विरोध केला, असे ऐकतो. ते म्हणाले, दरभंग्याच्या महाराजांची हजारो एकर जमीन. त्यांना का दोन-चार लाखच नुकसान भरपाई म्हणून देणार? हा अन्याय आहे. घटना समितीने योग्य मोबदला द्यायला पाहिजे असे म्हटले आहे. योग्य याचा अर्थ काय? १९३१ मध्ये गोलमेज परिषदेला महात्माजी गेले होते. एकदा प्रश्नोत्तराच्या वेळी ते म्हणाले, 'ज्याचे शंभर रुपयाचे उत्पन्न जात असेल त्याला मी ५० रुपये नुकसान भरपाई किंवा मोबदला देईन, परंतु ज्याचे एक कोटीचे नुकसान होत असेल त्याला शेकडा १ टक्का नुकसान भरपाई देईन. आचार्य नरेंद्र देवांनी पाटण्याच्या अध्यक्षीय भाषणात हीच मर्यादा सांगितली. त्याहून अधिक मोबदला देऊ नका. दरभंग्याच्या महाराजांस द्या एक लक्ष रुपये. करा जमीनदारी नष्ट; परंतु कोणी सांगावयाचे, कोणी करावयाचे !

प्रश्न : सर्वोदय समाज कोणत्या पक्षाचा नाही तरी तुम्हाला का पसंत नाही?

उत्तर : सर्वोदयासाठी जे आर्थिक धोरण हवे असे मला वाटते, ते स्वीकारायला सर्वोदय समाज आज तयार नाही. शिवाय श्री. राजेंद्रबाबू जरी म्हणाले की सर्वोदय समाज पक्षीय राजकारणापासून अलिप्त आहे, तरी श्री. शंकरराव देवांचे लेख निराळे सांगतात. श्री. शंकरराव देव म्हणतात, 'सर्वोदयाचे राजकारण काँग्रेसमार्फत चालेल.' उद्या समजा, निवडणुका आल्या आणि मी सर्वोदयाचा सभासद असूनही समाजवादी

पक्षास मते द्या म्हटले किंवा प्रचारलें तर मला सर्वोदयाचा सभासद म्हणून ठेवतील काय? मला गचांड़ी मिळेल. राजकारणात सर्वोदयातील लोकांनी काँग्रेसलाच पाठिंबा द्यावयाला हवा. म्हणजे सर्वोदय समाजही राजकारणात पक्षनिष्ठच राहील असे वाटते. १९३८ मध्ये त्रिपुरीला काँग्रेस भरली होती. त्यावेळी महत्त्वाच्या प्रश्नावर मतमोजणी व्हायची होती. म्हणून ऑल इंडिया काँग्रेस कमिटीच्या आपाआपल्या सर्व सभासदांना प्रत्येक पक्ष आणीत होता. तारेने पैसे पाठवून अनेक सभासदांना बोलवण्यात आले. माझा एक तरुण मित्र एका खादी भांडारात होता. तो म्हणाला, 'गुरुजी, माझी इच्छा असो नसो, मला सांगतील तसंच मत दिलं पाहिजे.' अशी ही गुलामी येते. माझे एक मित्र हरिजन सेवा संघात काम करतात. त्यांनी खेडेगावात साधना घेत जा असे सांगितले. म्हणून त्यांना ठपका देण्यात आला! साधनेत हिंदू-मुस्लीम ऐक्यांवर, जातीय ऐक्यावर, अस्पृश्यतेवर, स्वच्छता-सफाईवर, शिक्षण पद्धतीवर वगैरे किती जरी आले तरी समाजवादी प्रचार त्यात असतो म्हणून साधना या लोकांना शापरूप वाटते! अशी ही अनुदारता आहे. ही सर्वोदय समाजातही कशावरून नसणार? काँग्रेसच्या आर्थिक व इतर धोरणांस तो पाठिंबा देणारच. मी तेथे बहिष्कृतच राहावयाचा.

प्रश्न : श्री. शंकरराव देव सर्वोदय मेळाव्यात भाषण करताना म्हणाले, 'समाजवाद्यांची-कम्युनिस्टांची स्फूर्ती मार्क्सपासून आहे. आम्ही गांधीजींपासून घेतो, हा फरक आहे.' तुमचे काय म्हणणे?

उत्तर : कम्युनिस्टांविषयी मला काही म्हणावयाचे नाही, परंतु हिंदी समाजवादी भारतीय संस्कृतीवर, गांधीजींच्या विचारांवर पोसलेले आहेत. महाराष्ट्रातील आचार्य जावडेकर केवळ मार्क्सवर पोसलेले आहेत असे श्री. शंकरराव देव म्हणू शकतील काय? आचार्य भागवतही समाजवादाची तरफदारी करतात. त्यांची स्फूर्तीही मार्क्सपासून का? काशी विद्यापीठ चालवणारे आचार्य नरेंद्र देव हे का भारतीय संस्कृती जाणत नाहीत? काँग्रेसमधील काही पुढाऱ्यांनी ही फॅशन पाडली आहे की, समाजवादी पश्चिमेकडे पाहणारे, मार्क्सचे अनुयायी. समाजवादी मार्क्स आणि महात्माजी यांचा समन्वय करतात. स्वत: महात्माजी म्हणाले होते की, 'All communism is not bad.' तेही चांगले असेल ते घ्यायला तयार होते. श्री महादेवभाईंनी एकदा लिहिले की, 'तुम्ही निवडणुकीत समाजवादी कार्यक्रम जनतेसमोर ठेवून निवडून आलात

आणि मग तद्नुरूप कायदे करू लागलात तर त्यात वाईट काय? पश्चिमेकडे काही चांगले नाही की काय? रस्किन, टॉलस्टॉय, थोरो यांच्यापासून स्फूर्ती घेऊन गांधीजी नाही का उभे राहिले? त्यांनी का पश्चिमेवर बहिष्कार घातला होता?' आपल्या प्रार्थनेत गीता, कुराण, बायबलादी सर्वांचा समावेश करणारा महात्मा जगातील इतरही मंगलदायी विचार घ्यायला तयार असे. श्री. लक्ष्मणशास्त्री मागे एकदा म्हणाले होते की, 'मार्क्स हा महान मानवतावादी होता.' आचार्य नरेंद्र देव परवा तेच म्हणाले. सारे जग जवळ येत आहे. अशा वेळेस अनेक विचारांचा समन्वय लागतो. आपण लोकशाही समाजवाद आणू इच्छितो. या शब्दात समन्वय आहे. व्यक्तिगत स्वातंत्र्य ठेवून समाजवाद आणणे. हुकूमशाही नको. ती नको असेल तर निर्मळ साधनांनी समाजवाद आणावयाला हवा. समाजवादी केवळ मार्क्सचे ठोकळेबाज अनुयायी नाहीत. त्यांनी गांधींपासून स्फूर्ती घेतली आहे. मार्क्सपासून घेतली आहे. पंडित जवाहरलालना मार्क्सपासून नाही का थोडीफार स्फूर्ती मिळाली? काही काँग्रेसचे लोक समाजवाद्यांना 'दोन बापांचे' असे तुच्छतेने म्हणत असतात. मार्क्स व महात्माजी दोघांनाही ते आपला तात मानतात, यात चूक काय झाली? ही वस्तू उपहासाची नसून गौरवाची आहे. खरे म्हणजे आपला मानसिक नि बौद्धिक पिंड हजारो वर्षांच्या विचाराने बनलेला असतो. आपली बौद्धिक पितरे दोन नाहीत तर अनंत असतात. जवाहरलाल 'भारताचा शोध' या पुस्तकात म्हणतात, 'जीवन सोपे, सुटसुटीत नाही, ते अति गुंतागुंतीचे असते. दहा हजार वर्षांचा मानवाचा इतिहास आपणात असतो. सुसरूप असतो.' जगात जेथे जेथे भव्य दिसेल ते घ्यावे. मग माझे शत बाप झाले तरी हरकत नाही. समाजवाद्यांना हिणवणाऱ्यांची क्षुद्र वृत्ती व मनोहीनता मात्र दिसून येते. एक गांधीवादी तुरुंगात म्हणाले, 'समाजवादाला शिंग असते की शेपूट असते आम्हाला माहीत नाही.' दुसऱ्यांच्या विचाराविषयी संपूर्णपणे बेफिकीर अज्ञान दाखवणे म्हणजे का गांधीवाद? गांधीवाद विशाल वस्तू आहे. दुनियेतील सारे मांगल्य घेणारी ती वस्तू आहे. खिडक्या दारे बंद करणारी ती वस्तू नाही. (२६ मार्च, १९४९)

प्रश्न : तुमचे कम्युनिस्टाशी व कम्युनिस्टांशी संबंध ठेवणाऱ्या पक्षांशी पटत नाही. सर्वोदयवादी पक्षाशी तुमचे का पटत नाही ?

उत्तर : एस. एम. जोशींनी अप्पासाहेबांना विचारले की, 'तुम्ही काँग्रेसला का पाठिंबा देता ?' ते म्हणाले, 'काँग्रेस, काँग्रेसचे मंत्री, सरकारी अधिकारी सर्वांवर

माझा विश्वास आहे. माझा विश्वास गेला तर मी प्रथम विरोध करीन.' आजची काँग्रेस काही करू शकेल असे समाजवादी पक्षाला वाटत नाही. आजची काँग्रेस सरकारें भांडवलशाहीला अनुकूल धोरणच चालवीत आहेत. जगाच्या आजच्या परिस्थितीत आस्ते कदम जाऊन चालणार नाही. सरंजामशाही, जमीनदारी त्वरित दूर व्हायला हवी. छोटे छोटे यांत्रिक ग्रामोद्योग देशभर न्यायला हवेत. आजच्या काँग्रेस सरकारजवळ कार्यक्रमच नाही. हा मंत्री बदल, तो बदल. जयरामदास बदलले, आता मुन्शी आले. आर. के. पाटील आहेतच. तरी अन्नधान्य आहे तिथेच आहे. जिल्ह्यात १०-२० गावांमध्ये लाखो रुपये घेऊन सर्वोदयी प्रयोग करून कायापालट नाही होणार. सर्वत्र सहकारी दुकानांना प्राधान्य द्या, जमीनदारी दूर करा, पडिक जमिनी भूसेना उभारून लागवडीस आणा, त्यांची मालकी सहकारी सामुदायिक करा, ज्याला जमीन घ्यायची इच्छा आहे, त्याला घेता येईल असे करा-हा मार्ग आहे. काँग्रेस सरकारचे कामगारविषयक धोरणही पक्षांध आहे. सर्वोदयवाल्यांना हे लोकशाहीविरोधी धोरण मान्य आहे का? दिल्ली सरकार जी कामगारविषयक बिले आणीत आहे ती किती घातक आहेत ! अशोक मेहतांनी आव्हान दिले. जागतिक लोकशाही ट्रेड युनियन फेडरेशनने ही बिले योग्य आहेत असे सांगितले तर विरोध मागे घेऊ. आहे छाती काँग्रेस सरकारची? सर्वोदयवाले जर अशा काँग्रेसी नीतीलाच पाठिंबा देणारे असले तर कसे जमायचे? काँग्रेसवाले आज सत्याग्रहांचे नाव काढू देत नाहीत. श्री. मश्रूवाला यांनी प्रश्न विचारला, 'मग का तुम्हाला रक्तपात हवे आहेत?' परंतु असा नुसता प्रश्न विचारून तरी काय? सर्वोदयवादी किंवा सर्वसेवावादी कोठेही सत्याग्रह करीत नाहीत, किंवा समाजवादी पक्षाने केला तर त्याला आशीर्वाद देत नाहीत. तो सत्याग्रह योग्य का अयोग्य-या बाबतीत मतभेद होईल, परंतु अन्य घातक मार्गांनी न जाता निदान या मार्गाने समाजवादी पक्ष जात आहे ही समाधानाची गोष्ट आहे असे तरी कधी सर्वोदयवाले व सर्व सेवावाले म्हणतात का कोणी? म्हणून काँग्रेसवर या थोरांचा राग असला तरी उपयोग काय? (३ जून १९५०)

देश स्वतंत्र झाला. स्वतंत्र भारत आता लोकशाही मार्गाने समाजवादी ध्येय प्राप्त करून घेईल अशी कोट्यवधी भारतीयांस आशा वाटत आहे. हे ध्येय जास्तीत जास्त लवकर प्राप्त होण्यातच देशाचे जास्तीत जास्त कल्याण आहे. आंतरराष्ट्रीय

शांती राहण्यासही भारताने त्वरेने समाजवादी ध्येय गाठणे आत्यंतिक जरूरीचे आहे, असे समाजवादी पक्षाला वाटते. स्वतंत्र राष्ट्रात अहिंसेचे व्यापक बंधन पत्करून आपापल्या मतांची नि योजनांची सर्वत्र प्रसिद्धी करायला सर्वांना वाव हवा, मोकळीक हवी. तरच लोकशाहीचा आत्मा जिवंत राहील.

देशात लोकशाहीचे तत्त्वज्ञान तेव्हाच दृढमूल होईल, जेव्हा आपण आपापल्या मतांचा अति अभिनिवेश बाळगणार नाही. याचा अर्थ आपल्या मताविषयी आपणासच श्रद्धा नको असा नाही; परंतु सत्य समजणे कठीण आहे. मी माझ्या श्रद्धेप्रमाणे जावे, परंतु तोच एक सत्याचा मार्ग असे मी कसे म्हणू? कदाचित उद्या माझीही चूक मला कळेल आणि मी निराळा मार्ग घेईन. म्हणून मी माझे मन मोकळे ठेवायला हवे. नवीन प्रकाश घ्यायला सदैव ते तयार असायला हवे. 'बुद्धेः फलमनाग्रह' असे वचन आहे. तुमच्याजवळही बुद्धी आहे, विचार करायची शक्ती आहे हे कशावरून ठरवावयाचे? तुम्ही आग्रही नसाल, हट्टी नसाल तर. सत्याचा संपूर्ण ठेवा जणू आपणासच सापडला अशी भावना विचारी मनुष्य कधी करू शकणार नाही. तो आपल्या श्रद्धेप्रमाणे जाईल, परंतु त्या श्रद्धेप्रमाणे न जाणाऱ्यांचा तो खून करणार नाही. त्यांचा आत्यंतिक द्वेष तो करणार नाही. त्यांचे करणे आज तरी मला चुकीचे वाटते असे फारतर तो म्हणेल.

गांधीजींसारख्यांची या देशात हत्या झाली, याचे कारण काय? आपण सर्वांनी या घटनेचा गंभीर विचार केला असेलच. मताचा अभिनिवेश हाच या गोष्टीच्या मुळाशी नाही का? मला वाटते तेच सत्य, बाकीचे सारे चूक, एवढेच नव्हे तर राष्ट्राला ते खड्ड्यात लोटीत आहेत म्हणून त्यांना दूर केले पाहिजे. ही स्वतःच्या मताची आत्यंतिक आग्रही वृत्तीच या खुनाला प्रवृत्त करती झाली. कम्युनिस्ट आज कित्येक महिने तेलंगणात निःशंकपणे खून पाडीत आहेत. ही जनतेची चळवळ आहे. मग खून पाडले म्हणून काय झाले असे त्यांचे लोक म्हणतात. ब्रह्मदेशातही जनतेची (म्हणजे स्वतःच्या पक्षाची) न्यायासने नेमून ते अनेकांचा शिरच्छेद करीत आहेत असे कळते. कम्युनिस्टांचे आजकालचे तत्त्वज्ञान 'आम्हीच अचूक' या समजुतीवर उभारलेले आहे. रशियातील स्टॅलिनची कारकीर्द रक्ताने माखलेली आहे. जो जो विरोधी तो तो दूर केला गेला. अपार छळ त्यांचे झाले. नाझी लोकच क्रूर होते असे नाही. रशियातील तुरुंगांतूनही जे लाखो जीव संशयावरूनही ठेवले जातात त्यांचेही

कसे भीषण हाल केले जातात, ते ज्यांना शक्य झाले त्यांनी स्वानुभवाने लिहिले आहे. पूर्वी ख्रिस्ती लोकही धर्माचा असाच प्रचार करीत. प्रत्यक्ष ख्रिस्ती धर्मातही कॅथॉलिक किंवा प्रॉटेस्टंट यांनी एकमेकांचा का कमी छळ केला? मुसलमानी धर्माचा काही प्रचार 'कुराणातच सारे सत्य आहे. ते माना, नाहीतर मान उडवतो' या अभिनिवेशानेच झालेला आहे. असे हे जुलूम का केले जातात? मनुष्य इतका कठोर, निर्दयी कसा होतो? माझ्याजवळच सारे सत्य आहे, बाकी सारे चूक या वृत्तीतून अखेर अहंकार बळावतो. मनुष्य आंधळा होतो. माझ्याजवळ जे आहे तेच सत्य असल्यामुळे त्याच्या आड जो जो येईल तो तो उडवलाच पाहिजे, ही आसुरी वृत्ती जन्मते. माझ्या सत्याला विरोध करायला कोणी उभा राहता कामा नये, यासाठी या सर्वांना दहशत बसावी असे मला वाटते. नाझी लोकांना वाटे, 'जर्मन वंशच श्रेष्ठ; बाकीचे मानव म्हणजे केरकचरा. त्यांना जाळले काय, छळले काय, काय बिघडले?' कम्युनिस्टांना वाटते, 'आम्हीच जगाचे उद्धारकर्ते. दुसऱ्यांजवळ सत्य नाही. आमचा मार्ग म्हणजे मानवी सुखांचा, विकासाचा. त्या मार्गात जे जे आड येतील ते ते वाटेल त्या रीतीने नष्ट करणे हेच योग्य.' अशा वृत्तीमुळे कम्युनिस्टी छळबुद्धी आणि खुनी वृत्ती जन्मली. संघाच्या लोकांना असेच वाटे आणि अखेर महात्माजींचा वधही अशाच प्रवृत्तीतून झाला. एकदा 'मी खरा' हा अहंकार जडला की त्याच्यामागून अंधता, निर्दयता, सारे काही येते.

जैन हे अहिंसा धर्माचे उपासक. स्याद्वादाचा त्यांचा सिद्धांत. 'इदमपिस्यात्' हेही असू शकेल असे ते म्हणत. स्वतःचे मत मांडताना, त्याची सत्यता स्थापताना दुसरीही बाजू असू शकते अशी अनाग्रही वृत्ती स्याद्वादात आहे. स्याद्वाद म्हणजे संशयात्मा नव्हे. मला या क्षणी जे सत्य वाटते ते मी घेऊन जावे, परंतु त्याला विरोध करणाऱ्यांची मी चटणी नाही उडवता कामा. कारण कदाचित् उद्या माझे हे सत्यही चुकीचे ठरेल. अशी वृत्ती जर समाजात राहील तर समाजात अहिंसा राहील. हिंदुस्थानात नाना दर्शने, नाना तत्त्वज्ञाने जन्मली, परंतु कोणी कोणाला छळले नाही, जाळले-पोळले नाही. चार्वाकवादी आपले मत मांडीत आहेत, अद्वैती आपले तत्त्वज्ञान मांडीत आहेत. आपापली मते मांडा. जनतेला पटेल ते जनता घेईल. अशानेच सत्याची पूजा होईल. सत्य का तरवारीने शिकवायचे असते ! जेथे संकुचितपणा असेल तेथून सत्य निघून जाते. अहंकाराजवळ कोठले सत्य? महात्माजी नेहमी म्हणत,

''मला पटवा. माझी चूक दिसली तर मी निराळा मार्ग घेईन.'' ते स्वतःच्या श्रद्धेने जात होते. ती श्रद्धा अचल होती, परंतु सदैव नवीन घ्यायला ते सिद्ध असत.

कृष्णमूर्ती एकदा म्हणाले; "(Truth Can never be organised.)" सत्याची संघटना नाही करिता येत. विनोबाजी हेच म्हणाले होते. तुरुंगातून सुटून आल्यावर ते महात्माजींना म्हणाले, ''मला कोठे अध्यक्ष, चिटणीस नका नेमू. हे घ्या राजीनामे.'' महात्माजींनी विचारले, ''परंतु काम करणार आहेस ना?'' ते म्हणाले, ''हो.'' महात्माजी म्हणाले, ''मग दे तुझे राजीनामे.'' संघटना बांधली की थोडा तरी अभिनिवेश येतोच. माझाच पक्ष खरा, माझीच संघटना सत्यावर उभी असे मला वाटते. सत्य तर सूर्यप्रकाशाप्रमाणे मोकळे हवे, वाऱ्याप्रमाणे सर्वगामी हवे. तरच ते सतेज, निर्मळ, प्राणमय राहील. पंडित जवाहरलाल संघटना करू शकणार नाहीत. कारण संकुचितपणा त्यांच्या वृत्तींस मानवणार नाही. अहंकार मानवणार नाही. ते एखादे वेळेस रागाने बोलले तरी पुन्हा चुकलो म्हणतात. मुत्सद्याच्या ठिकाणी असा दैवी गुण भाग्यानेच आढळतो. परंतु गांधीजींनी या राष्ट्राला, जगाला दिलेली ती शिकवण आहे. लंडन कराराच्या बाबतीत परवा बोलताना नेहरू 'समाजवादी प्रतिगामी आहेत' वगैरे बोलले. परंतु मागून ते शब्द त्यांनी परत घेतले. आपल्या निर्णयाची सत्यता स्वतःला पटत असूनही दुसऱ्याविषयी सद्भाव ठेवणे ही अहिंसा; यातच लोकशाहीचा आत्मा. महात्माजींनी आमरण ही गोष्ट कृतीने शिकविली. भारतीय संस्कृतीतच ही गोष्ट आहे. विनोबाजी हेच सांगत असतात.

संघटनेमुळे, पक्षामुळें अंधता येते, जडता येते; म्हणजे मीच खरा ही वृत्ती येते, अभिनिवेश येतो, सत्य गुदमरते हे सारे खरे; परंतु जगात कार्य करायचे तर काही संघटना तर लागते. विवेकानंद एके ठिकाणी म्हणतात, ''जगात कार्य करायचे तर थोडा अहंकारही लागतो.'' परंतु थोडा अहंकार म्हणजे अहंकाराचा कुंज नव्हे. लोकमान्य एकदा म्हणाले की, ''खोटे बोलून स्वराज्य येणार असेल तर मी खोटेही बोलेन.'' यातील 'ही' शब्द महत्त्वाचा आहे. आता अगदी माझ्या खोटे न बोलण्यामुळेच अडत असेल तर बोलतो बाबा. म्हणजे ते 'ही' दुःखच दाखविते. खोटे बोलणे वाईटच, परंतु आलीच वेळ तर तेही करीन; परंतु लोक 'ही' विसरून गेले, आणि म्हणू लागले लोकमान्य म्हणत की, स्वराज्यासाठी खोटे बोलले म्हणून काय झाले? राजकारणात हे चालायचेच, असा अर्थ करू लागले. विवेकानंदांच्या

वरील म्हणण्याचाही असा अर्थ कोणी करतील; परंतु विवेकानंद ‘थोडा अहंकार’ म्हणतात. आपापले पक्ष करा, संघटना करा. आपण बरोबर आहोत ही श्रद्धा ठेवून, हा थोडा अहंकार ठेवून काम करा, परंतु अहंकार फाजील झाला की दुसऱ्या पक्षांचे नि:संतान करायला निघाल. म्हणून जपा. गांधीजींनीही संघटनेचा आश्रय करूनच प्रयोग केले. काँग्रेस संघटनेद्वारा त्यांनी काम केले. इतरही अनेक संस्था त्यांनी काढल्या; परंतु त्यांची स्वत:ची विशिष्ट श्रद्धा असूनही ते मोकळे असत. बॅ. जिनांकडे पुन: पुन्हा बोलणी करायला जात. ‘मला पटवा’ म्हणत. कम्युनिस्ट, सोशालिस्ट, सर्वांस ते असेच सांगत.

आपण मानव अपूर्ण आहोत. ज्याप्रमाणे संपूर्ण सत्य आपणास मिळणे कठीण, त्याचप्रमाणे मिळालेल्या श्रद्धेनुसार अहंकाररहित होऊन जाणेही कठीण. परंतु प्रयत्न करावा, त्या दिशेने जावे. आपापल्या विचारांचा, कल्पनांचा प्रचार करा, त्या पटवा, परंतु हाणामारीवर येऊ नका. सत्याला हाणामारीची, तुमच्या शस्त्रास्त्रांची जरूर नाही. ते प्राणमय असेल तर जगात विजयी होईल. सत्य जर सत्तेवर अवलंबून असेल, आत्मा ॲटमबॉम्बवर अवलंबून असेल, तर सत्ता व ॲटमबॉम्ब, म्हणजेच विश्वाचे आदि तत्त्व वा अंतिम तत्त्व असे म्हणावे लागेल आणि तसे असेल तर जीवनाला आशा तरी कोणती?

+++

समाजवाद

या देशातील गोरगरिबांचे जीवन सुधारावयाचे असेल तर समाजवादाखेरीज तरणोपाय नाही. आर्थिक आणि सामाजिक विषमता नष्ट झाल्याखेरीज कसले स्वराज्य आणि कसली लोकशाही? समाजवादाची देशाला तीव्रतेने का गरज आहे, त्याचा हा परिचय......

समाजवाद आणल्याशिवाय तरुणोपाय नाही. समाजवाद म्हणजे का केवळ राजकरण? समाजवाद ही एक जीवननिष्ठा आहे. 'अवघाचि संसार सुखाचा करीन' असे ज्ञानदेव म्हणतात.संपत्ती एकाच्या हाती असेल, वाटेल तेवढी जमीन एकाच्या मालकीची असेल तर लोक सुखी कसे होणार? सर्वांना घरदार, पोटभर अन्न, अंगभर कपडा, स्वस्त शिक्षण, विकासाची संधी, जीवनातील ज्ञानविज्ञान, कलांचे आनंद ही सारे कसे मिळणार? आणि हा समाजवाद लोकांना पटवून त्यांच्याच मताने आणायचा यात वाईट काय आहे? अहिंसेने लोकांना पटवून आणलेला समाजवाद आणि गांधीवाद, यांत काही फरक नाही; परंतु काही लोक उगाचच समाजवादाला शिव्या देत असतात. कोणी कोणी म्हणतात, हे परकीय तत्त्वज्ञान आहे. परदेशातील शेकडो वस्तू घ्यायला त्यांना काही वाटत नाही आणि जीवनातील कोणताही महान विचार कोठेही उत्पन्न होवो तो आपलाच आहे. देशकालानुरूप त्या विचाराची वाढ निरनिराळी होईल; परंतु तो विचारच नको म्हणणे वेडेपणाचे, आत्मघातकीपणाचे आहे. महाभारतात एक पृथ्वीमोलाचे सूत्र सांगण्यात आले आहे. भीष्म शरपंजरी पडले आहेत. ते धर्मराजाला म्हणतात, ''धर्मा, तुझे राज्य नीट चालायला हवे असेल तर-

'दरिद्रान् भर कौन्तेय

मा प्रयच्छेश्वरे धनम् ।'

गरिबांची धन कर, जे आधीच श्रीमंत आहेत त्यांची भर नको करू; परतु आज असे गरीबांचे अर्थशास्त्र येत आहे का प्रत्यक्षात?

भांडवलशाही, जमीनदारी आता दूर व्हायलाच हवी. संपत्ती देशाच्या, समाजाच्या कल्याणासाठी हवी. त्याप्रमाणे सामाजिक क्रांतीही करावयाची आहे. कोणी जन्माने, वर्णाने श्रेष्ठ नाही. डॉ. आंबेडकरांनी पूर्वी मनुस्मृती जाळली. का नाही जाळणार? मानवी हक्कांपासून वंचित ठेवणारी नीती, तिचे भस्मच व्हावयास पाहिजे. आम्ही नाही का १९३५ चा घटना कायदा मागे जाळला? परंतु दिल्लीच्या नव्या घटनेत मानवी हक्कांची घोषणा झाली. 'मानव तेवढा समान' अशी घोषणा झाली. तेव्हा खऱ्या अर्थाने मनुस्मृतीतील मानवविरोधी भाग जाळला गेला. आपल्याला प्रत्यक्ष जीवनातून सर्व तऱ्हेची विषमता दूर करावयाची आहे. आता एखाद्या जाती-जमातीचे राज्य नाही. हे आम जनतेचे आहे. मुख्यत: श्रमणाऱ्यांचे आहे. ते संपत्ती निर्माण करतात, परंतु तिच्यापासून ते वंचित राहणार. हा अन्याय दूर करावयाचा आहे. सर्व युवक शक्ती या कार्यासाठी संघटित करा. प्रांतोप्रांतीची युवक शक्ती संघटित झाली या समाजवादी ध्येयासाठी संघटित झाली तर उज्ज्वल भविष्य दूर नाही.

कोणी तुम्हाला संस्कृतीच्या नावाने भुलवू पाहतील. हिटलर संस्कृती स्वत:ला संस्कृतीच म्हणत असे. आपण इतरांहून श्रेष्ठ हा त्यात अहंकार असतो. खरी संस्कृती सर्वांच्या जीवनाचे मूलभूत प्रश्न सोडवण्यात आहे. एखाद्या धर्माच्या नावे संघटना करून प्रश्न सुटत नसतात. म्हणून तुम्ही धर्म, संस्कृती या पोकळ शब्दांनी विचलित होऊ नका.

काँग्रेस पूंजीपतींची झाली आहे. कम्युनिस्ट आततायी मार्गाने जात आहेत व सरकारला नागरिक स्वातंत्र्य रोखायला कारणे देत आहेत. कोणी संस्कृतिधर्म या नावाने विषे पसरीत आहेत. अशातून आपणास जावयाचे आहे. सरकार समाजवादी कार्यकर्त्यांसही हद्‌पार करते. आपण गांगरून जाता कामा नये. अत्याचारापासून दूर राहिले पाहिजे. काम करीत राहू. एक तुरुंगात गेला, दुसरा उभा करा. अशा रीतीने कार्यकर्ते पुरवू. अभ्यास करा, संघटना करा, निरहंकारी वृत्तीने काम करा. यशापयश पक्षाचे. आपण व्यक्ती कोण? ही भावना असू दे. म्हणजे काम वाढते, माणसे जोडता येतात. तुम्ही नवयुगास स्मरून पुढे चला. समाजवाद हा आमचा युगधर्म आहे. तुम्ही

संकुचितता सोडून पुढे चला. जात, पात, धर्म न बघता गरिबांचे प्रश्न डोळ्यांसमोर ठेवा.

भारतात जमीनदारी नष्ट करण्याची थातुरमातुर बिले केली जात आहेत. अशाने कोट्यवधी किसान कसे शांत होणार? गोविंद वल्लभपंत कोट्यवधी रुपये जमीनदारांना मोबदला देण्यासाठी मागतात. निजामातील जमीनदारांना मोबदला द्यायचा तर म्हणे १७ कोट रुपये लागतील. बिहार, ओरिसा, मध्य प्रदेश येथील बिलेही भिकार व तुटपुंजी. ठायी ठायी लाखो शेतकरी लढत आहेत. ओरिसामध्ये काँग्रेसी लोकांच्या व सरकारच्या विरोधी प्रचाराला व धमक्यांना धूप न घालता लाखो शेतकरी पायी मोर्चे काढीत आले व प्रत्येक शेतकरी कुटुंबास १२।। एकर जमीन द्या, शेतसारा प्राप्तीवरील कराप्रमाणे क्रमवार ठरवा, शेतीच्या मालाच्या किमती कारखान्यातील वस्तूंच्या किमतीहून कमी असता कामा नयेत वगैरे मागण्या करते झाले. हैद्राबादकडे म्हणे कम्युनिस्टांचे बंड आहे. तेथील शेतकऱ्यांची दैना सरकारला माहीत आहे? जेथे घाण, दलदली, अंधार तेथे डासांचा बुजबुजाट न झाला तरच आश्चर्य! त्याप्रमाणे कोट्यवधी श्रमजीवींची जर अन्याय्य लूट होत असेल तर कोठवर त्यांनी सहन करावयाचे? काश्मीरमध्ये जर प्रत्येक शेतकऱ्याला ५ एकर जमीन देण्यात येते तर येथे का देता येऊ नये? सरकार कम्युनिझमला खाद्य पुरवीत आहे.

देशासमोर चलनवाढ नि महागाईचा गंभीर प्रश्न आहे. कामगारच उत्पादन कमी करतात हे खोटे आहे असे श्री. जगजीवनराम यांच्या भाषणावरूनच दिसते. या सर्व कारवाया मालकांच्या असतात. अधिक भांडवल गुंतवायचे नाही, उत्पादन वाढवायचे नाही, वॅगनी दिल्या तरी माल चढवायचा नाही असे करून सरकारला सतवायचे, छळायचे, अशी आज हिंदी भांडवलशाहीची दुष्ट देशद्रोही नीती आहे. सरकार भांडवलदारांना तेव्हाच खणखणीतपणे बजावील जेव्हा कामगार एकजुटीने प्रचंड आवाज करतील. कामगारांची असंघटित शक्ती जोवर सरकारला दिसत आहे तोवर सरकार आपले मालकधार्जिणे धोरण कशाला सोडील? सरकार कामगारांची कसोटी पाहांत आहे. कामगारांनी राष्ट्रव्यापक उत्तर दिले पाहिजे. चलनवाढ थांबवता येत नसेल, तर तुमच्याच पे-कमिशनच्या म्हणण्याप्रमाणे महागाई भत्ता द्या. असे कामगारांचे व त्यांच्या नेत्यांचे म्हणणे आहे. न महागाई भत्ता द्याल तर कसे जगायचे? देशासाठी सतत उपासमारीचा त्याग गरिबांनीच करायचा का? त्यांनीच अंधारचाळीत

राह्यचे, उघड्यावर पडायचे, उघडे राहायचे, उपाशी काम करायचे, दव्याशिवाय मरायचे–असे का ठरलेले आहे?

शतदा मागणी करूनही सरकार बेफिकीर असेल तर संपावर जाण्याशिवाय कोणता उपाय? सरकारला का संपच पाहिजेत? संप केलात तर नफा–वाटणी नाही, संप कराल तर युनियन नोंदवली जाणार नाही. एवढेच नव्हे तर परवा म्हणे सांगण्यात आले, तुमच्या मनात संपाविषयी सहानुभूती. कशी मान्यता द्यायची युनियनला? सारे सरकारी हपिसरांच्या मनावरच चालायचे असेल तर प्रश्नच संपला.

अशा मुस्कटदाबीने संप हाणू बघतात. कोठे आर्बिट्रेशन मागितले तर देत नाहीत. जणू अंत बघतात. वर्षापूर्वी दापोडी वर्कशॉपमधील कामगार ४७ दिवस शांतपणे संपावर होते. शंभर टक्के, १०१ टक्के, गांधी तत्त्वानुसार संप झाला! परंतु सरकारने लक्ष दिले नाही. कोणी उपासमार करून मरायला निघावे किंवा मारामारी करावी हेच सरकारला हवे?

ठाण्याला मागे रेमंड वूलन मिलमध्ये संप बरेच दिवस चालला. शांतपणे चालला. तीवर काही नाही. एक दिवस मारामारीत कोणी मरताच लगेच आर्बिट्रेशन! दहा वर्षांपूर्वी धुळ्याला ४० दिवस संप चालला. मिल उघडेना, 'तापीत मरतो' म्हटले तेव्हा हालचाली.

कामगारांची शांततेच्या मार्गावरची अशा रीतीने श्रद्धाच उडाली तर या देशात लाल नाश येईल. महात्माजी म्हणाले होते, "I see red ruin every where. मला लाल नाश दिसत आहे."

हिंदुस्थानात कोठल्या एका कारखान्यात 'पिटाई बोनस' शब्द रूढ असल्याचे कळले! शांततेचा मार्ग संपतो, तेव्हा उपवास करून मरण किंवा पिटापिटी हे दोन मार्ग उरतात. सरकारला कामगारांची कोणत्या मार्गावर श्रद्धा वाढावी असे वाटते?

आज इंग्लंडमध्ये चैनीत दिडकी जात नाही. सक्तीनेच जणू शिल्लक पडते. त्यामुळे चलनवाढीला आळा बसतो. इंग्लंडहून आलेला एक मित्र म्हणाला, "इंग्लंडमध्ये एका सुटापुरते वर्षाला कापड मिळते; तेथील बिस्किटे इकडे येतात. निर्यात होते; परंतु देशात सारे प्रमाणात मिळते." आणि आमच्याकडे? मोटारी येतच आहेत, चैनीच्या वस्तू येतच आहेत. सक्तीची बचत कशी होईल? आवश्यक नसलेल्या वस्तूच बाजारात नकोत, परंतु यासाठी राष्ट्रहिताची जळती भावना हवी. ते

धोरण अमलात आणण्याची हिमालयाची हिंमत हवी. कारखानदार उत्पादन कसे घटवतात, वाढवीत कसे नाहीत, ते कठोरपणे परिक्षिले पाहिजे, योग्य ते मार्ग अवलंबले पाहिजेत.

मागे श्री. अण्णासाहेब सहस्रबुद्धे यांनी लिहिले की, देशी गिरण्यांचा कपडा निर्यातीसाठी ठेवा. देशाला सारा कपडा हातमागावरचा द्या. हातमागाला खेड्यापाड्यांतून सूत पुरवा. जर सारी सरकारी चक्रे या दिशेने फिरती तर कोट्यवधी रुपयांचे उत्पादन वाढते. निर्यातीलाही माल झाला असता. देशात ग्रामोद्योगाला प्रचंड चालना मिळाली असती; परंतु गांधीजींचे नाव जपणारे हे बेगडी लोक चरखा वर येऊ देतील तर शपथ!

मध्ये ऐकले की मरहूम जिना पाकिस्तान चरखा संघाचे अध्यक्ष होते. परवा कळले की दहा हजार चरख्यांची पाकिस्तानने मागणी केली होती; परंतु आम्ही नाही कळविले. पाकिस्तान चरखा सर्वत्र नेऊ इच्छित होते; परंतु आम्हीच त्याला मारीत आहोत. पाकिस्तानात हिंदी गिरण्यांचे महाग कापड गिरणी मालकांना खपवायचे आहे. ते चरखे कसे पाठवू देतील? मध्यवर्ती सरकारने त्या त्या प्रांतात सर्वत्र सूतनिर्मिती व माग विणाई सुरू करा- गिरणी कापड निर्यातीसाठी, असे ठरवून पाच वर्षांची योजना आखून यशस्वी करायचे ठरवले असते तर देशाचा कायापालट झाला असता. पू. विनोबाजींना दुःखाने असे म्हणावे लागले, "स्वराज्य मिळण्यापूर्वी चरखा होता. आज त्याची आठवणही कोणाला नाही."

अधिक उत्पादनाचे हे असे मार्ग आहेत. भांडवलदारांची मग मिजास नको. चरखे सर्वत्र थोड्या भांडवलात तयार करू. कापूस पुरवू. त्याबरोबर इतर उत्पादनेही वाढू लागतील.

लाखो खेड्यांतून उत्पादन वाढवा; परंतु त्याची योजना नाही. लुटारू भांडवलवाल्यांचे, देशद्रोही पुंजीपतींचे पाय चाटीत व कामगारांची आणि त्यांच्या संयमी नेत्यांची टिंगल करीत मात्र बसलो आहोत.

नाना फालतू खाती आणि समित्या पदोपदी निर्माण होत आहेत. 'अर्थशास्त्र संशोधन ब्यूरो' काढा नवीन खाते. त्यातील एकाने अधिकाऱ्यांस विचारले, "आपण आठ दिवस जात आहात तोवर आम्ही कोणते आकडे काढू? कोणते संशोधन?"

तो अधिकारी म्हणे म्हणाला, "सध्या काम नाही. बसून राहा."

असा हा डोईजड फापटपसारा वाढत आहे. दिल्लीस आणखी डेप्युटी कारभारी म्हणे नवे नेमायचे आहेत! इकडे असे खर्च वाढवीत जा. कशी चलनवाढ थांबायची? येथे 'शिल्लक टाका' मोहिमेची प्रचंड लाट उठवायला हवी, सरकारने स्वत:च्या प्रखर धोरणाने ज्याचे उदाहरण घालून द्यायला हवे, तेथे असले प्रकार चालले आहेत.

सारे चुकत आहे, चुकत आहे: सरकारने वेळ गेली नाही तो अंतर्मुख होऊन काय काय चुकते ते पाहावे. आचार्य जावडेकर लिहितात, "देशात लवकर लोकशाही समाजवाद न आणाल तर घोर संकट आहे. हिंदुस्थान जर असा समाजवाद लवकर आणील तर रक्ताळ क्रांती न करताही समाजवाद येतो अशी त्रस्त जगाची खात्री होईल. परंतु दहा वर्षे, वीस वर्षे थांबा म्हणाल तर जग पेट घेईल." आचार्य जावडेकरांचा अशा प्रकारचा गंभीर इशारा आहे. ताबडतोब उत्पादन वाढेल असे प्रकार निर्मा. ते हिंदुस्थानभर सर्वत्र वाढेल असे करा.

खादीचे प्रचंड सामर्थ्य लक्षात आणा. कामगारांना उगीच फार दुखवू नका. मालकधार्जिणे बनू नका. समाजवादाकडे झपाट्याने जा. जमीनदारांना कोट्यवधी नुकसानभरपाई द्यायला हवी. 'चलनवाढ कशी थांबेल? म्हणून जमीनदारी राहो' असे मूर्ख तत्वज्ञान नका सांगू. जमीनदारांना उद्योग करू दे. त्यांचे वाडे, इमले, दागदागिने आहेत, ते का फूटपाथवर पडणार आहेत? कशाला नुकसान भरपाई? आणि द्यायचीच तर ती १९७० मधील लांबच्या कॅश सर्टिफिकेटात द्या.

तीव्रता असली म्हणजे सारे करता येते. तीव्रता कृत्रिमपणे निर्माण करता येत नसते. गरीब जनतेच्या दु:खाशी, दैन्याशी सर्वभावाने एकरूप व्हाल तर सारे उपाय दिसतील आणि ते अमलात आणायला खंबीरपणे, गंभीरपणे उभे राहाल.

आशिया खंडात नवीन युगाचा उदय होत आहे. आम्ही अॅटलीकडे जातो, आम्ही ट्रूमनकडे जाणार, कारण आम्हाला सुरक्षित वाटत नाही. का नाही सुरक्षित वाटत? देशात सर्वत्र असंतोष आहे म्हणून का? हिंदला बाहेरच्या संकटाचे भय आहे का? तीस कोटींचे हे राष्ट्र आतून खंबीर असेल तर तितके भिण्याचे कारण नाही.

आता स्वराज्य मिळून दोन वर्षे होतील. निर्वासितांचे गंभीर प्रश्न, काश्मीर युद्ध, ही संकटे होती व अजून आहेत. निर्वासितांची पुनर्वस्ती अजून व्हायची आहे. काश्मीरचे घोंगडे अजून भिजत पडले आहे. संस्थानांचा प्रश्न बराचसा सुटला आहे; परंतु या प्रश्नांना तोंड देत असताही आम्ही यातील प्रगतिशील धोरण आखले पाहिजे होते.

झपाट्याने जमीनदाऱ्या नष्ट करावयास पाहिजे होत्या. जमीनदारांना मोबदला किती द्यायचा याची गणिते करीत आम्ही बसलो. जवळ शेजारी क्रांतीच्या लाल ज्वाळा पेटलेल्या. अशा वेळेस आकडेमोडीने भागत नाही. प्रतिभासंपन्न उज्ज्वल आर्थिक धोरण आखावे लागते.

वर्तमानपत्रांतून भरमसाट बातम्या बंगालमधून येत आहेत. त्या का भिववण्यासाठी? आणि बंगालमध्ये समजा कम्युनिस्टी लाटा उसळल्या, तर त्या बिहार, युक्त प्रांताकडे नाही का येणार? मोठ्या जमीनदाऱ्या, लोखंड, सिमेंट, साखर यांचे कारखाने तिकडेच.

तुमचे धोरण प्रतिभाहीन, भांडवलशाहीला गोंजरणारे. केवळ बंगालमधून हा लाल रंग सर्वत्र पसरत येईल, म्हणून बंगालमध्ये थोरामोठ्यांनी गेले पाहिजे. तेथील जनतेला साफ विचारले पाहिजे, समजावून दिले पाहिजे. बंगालचे आजचे सरकार नको असेल तर तुम्ही निवडणुकीने नवीन आणा; परंतु रक्तपात नको. अशातून हुकूमशाही येईल, निराळीच संकटे येतील हे समजावून सांगा. बंगालमध्येच नव्हे तर सर्व देशभरच नवे प्रतिभासंपन्न आर्थिक धोरण अवलंबा.

रेंगाळत बसण्याची ही वेळ नाही. कधी कधी हजार वर्षांची प्रगती एका क्षणात होत असते. एखादा समाजवादी मंत्री मध्य सरकारात येऊन परिस्थिती सुधारत नसते.

आर्थिक धोरणच जेव्हा नव्याने आखाल तेव्हा काहीतरी करता येईल. या सर्व गोष्टींचा गंभीर विचार मनात येतो व भारताचे भवितव्य काय असे वाटून चिंता मनाला ग्रासते. परंतु हा महान देश हजारो वर्षे जगला आहे. त्याचे भलेच होईल असे मनात तर येते; परंतु धैर्याने, प्रतिभेने, व्यापक सहानुभूतीने, मारुतीची पावले टाकत प्रगती करू तरच आशा आहे.

देशाला आज स्वच्छ विचारांची भूक आहे. सर्वांना गोंधळल्यासारखे वाटते. मी पूर्वी काँग्रेस, काँग्रेस असे करीत असे. मरताना ओठावर काँग्रेस नाव असो असे म्हणत असे. परंतु ती काँग्रेस कुठे आहे? जिचे लाखो सभासद व्हावेत म्हणून १९४० साली मी एकवीस दिवस उपवास केला, ती काँग्रेस आज नाही. ती काँग्रेस गेली. आज एक सत्ताधारी काँग्रेस पक्ष आहे.

काँग्रेस म्हणजे भांडवलशाही धोरण १५-२० वर्षे चालवू पाहणारी एक पार्टी आहे. ती गरिबांना का आज विसरली? चले जाव ठरावात म्हटले होते, जे स्वराज्य

आणावयाचे ते Toiler in the field and factory -शेतात राबणारा आणि कारखान्यात राबणारा यांच्यासाठी आणावयाचे. मग शेतात राबणाऱ्यांना मिळाली का थोडीफार शेती? श्री. मुरारजीभाई म्हणतात, ''शिल्लक टाका पैसे, काटकसर करा नि घ्या जमीन.'' गरीबांच्या दुःखावर डागण्या देऊ नका.

१९३९ मध्ये मी मुरारजींना भेटावयास गेलो होतो. तेव्हाही खानदेशात ओला दुष्काळ होता. एदलाबाद पेट्यातील एका पाटलाने गुरे विकून शेतसारा भरला. मी श्री. मुतुरारजींना सांगितले तर ते म्हणाले, ''एकदा दुष्काळ येताच का गुरेढोरे विकावी लागतात?'' मुरारजींना काय माहीत खेड्यातील स्थिती? खानदेशात काँग्रेसचे सभासद करीत हिंडत असताना खेड्यातील कोणी बंधू म्हणत, ''गुरुजी, उडीद घ्या आणि मला सभासद करून घ्या. रोख चार आणे कोठून आणू?'' परंतु मुरारजीभाईंना सारी गंमत वाटते. मी खेड्यातील जनतेला सांगत असे, स्वराज्यात तुम्हाला थोडी तरी जमीन मिळेल. आज त्यांना हे तोंड कसे दाखवू?

मी माझ्या पदरचे सांगत नसे. आमच्या सरकारला हे का करता येऊ नये? यांना जमीनदारी, कारखानदारी पाहिजे आहे. ते स्वच्छ तसे सांगतात. उत्पादन कसे वाढणार? प्रगतिहीन भांडवलदार का उत्पादन वाढवणार आहेत? त्यांची ती दृष्टी तरी आहे का? उत्पादन वाढले नाही तर वस्तू स्वस्त होणार नाहीत. वस्तू स्वस्त नाही झाल्या तर शेतकऱ्याला धान्याचा भाव कमी मिळतो म्हणून तो अधिक धान्य पिकवावयास तयार होणार नाही.

खऱ्या शेतकऱ्याला कमी धान्य पिकावे अशी इच्छा नसते. त्याला पत्रकांनी शिकवण्याची जरूरी नाही, परंतु त्याला गूळ, तेल, कापड, साखर, लोखंडी सामान, रॉकेल, सिमेंट, सारे महाग, याचे भय. तो धान्याऐवजी तंबाखू, भुईमूग, कपाशी पेरतो. वस्तू स्वस्त करा. भांडवलदार करणार नाहीत म्हणून कारखाने राष्ट्राच्या मालकीचे करा. दर वर्षी नफा उरेल, तो पुन्हा नवीन उत्पादनात घाला. ५०० कोटी रुपये दडवलेला काळा नफा बाहेर खेचा. संस्थानिकांची पूंजी, वर्षासने थोडी उद्योगधंद्यासाठी घाला. असे योजनापूर्वक कराल तर बेकारी कमी होईल. मग शेतकरी धान्य अधिक पिकवतील. मुळात हात घातला पाहिजे. काँग्रेस सरकारची ही हिंमत नाही.

गांधीजींच्या जीवनाचा यांना विसर पडला आहे. म्हणतात, गांधीजी गेले आणि सत्याग्रहही गेला. श्री. किशोरलालभाईंनी विचारले, ''मग का रक्तपात हवे आहेत?''

अन्याय दूर करण्याचा मार्ग गांधीजींनी तुम्हाला दाखविला. तो दूर सारलात तरी आम्ही दूर सारू इच्छित नाही. काँग्रेसला समाजवादी प्रतिष्ठा वाढवून द्यायची नाही. १९३१ मध्ये धुळ्याच्या धर्मशाळेत व्यापाऱ्यांसमोर बोलताना विनोबा म्हणाले, "गांधीजी आहेत, म्हणून रक्तपात नाहीत, परंतु उद्या हा मोठा बांध दूर झाला व तुम्ही शोषणाचे धोरण बदलले नाहीत तर गरीब लोक तुम्हाला काकडीप्रमाणे खाऊन टाकतील."

त्या शब्दांची काँग्रेस कार्यकर्त्यांस मी नम्रपणे आठवण देऊ इच्छितो. जबाबदार काँग्रेस कार्यकर्ते म्हणत असतात, "आम्ही तरी राज्य करू नाहीतर कम्युनिस्ट तरी राज्य करतील." मध्ये एक समाजवादी पक्ष सत्याग्रही मार्गाने जाणारा आहे, हे ते विसरतात.

काँग्रेसवर टीका करताना मला आनंद नसतो. वाटे डोळे मिटावे, नवजन्म घेऊन नवा लढा करावयास यावे. परंतु या देहात राहूनही नव-जन्म घेता येतो. माझी ध्येयभूत काँग्रेस माझ्या हृदयात आहे. त्याच ध्येयांची समाजवादी पक्ष पूजा करीत आहे. ती प्रत्यक्षात यावी म्हणून सत्याग्रहाच्या मार्गाने जात आहे.

समाजवादी पक्षाला सहानुभूती द्या. तो खरा नवधर्म. कोणी संस्कृतीच्या गप्पा मारतात. जोवर कोट्यवधी संसार उद्ध्वस्त आहेत, तोवर कोठली संस्कृती? संघाचे लोक म्हणतात, समाजवाद पाश्चिमात्य आहे. तो नको. त्यांना पाश्चिमात्य यंत्रे चालतात. आगगाडी, विमान, रेडिओ, लाउडस्पीकर सारे हवे. नवी शस्त्रास्त्रे हवीत.

त्यांना कळत नाही की यंत्रापाठोपाठ समाजवाद येतोच म्हणून कारखाने एकाच्या हाती संपत्ती देतात. तेथे असलेले कामगार मग म्हणतात, 'ही संपत्ती आम्ही निर्मिली, आमचीच आहे.' यंत्रे हवीत तर समाजवादही हवा; नाहीतर एक उपाशी, एक तुपाशी, असली विषमता राहील. ती विषमता म्हणजे का संस्कृती? असल्या संस्कृतीला दूर फेका. खरी संस्कृती सर्वांचे संसार सुखी करण्यास उभी राहील. समाजवाद प्रत्यक्षात आणणे म्हणजे संस्कृती. खोट्या मृगजळात फसू नका. स्वच्छ विचार करावयाला शिका.

मी समाजवादी पक्षाचा सभासद नाही, परंतु माझी सहानुभूती त्या पक्षाला आहे. काँग्रेसमध्ये राहणे नव्या घटनेमुळे समाजवादी पक्षास अशक्य झाले. तो अलग झाला. महात्माजी काँग्रेसमध्ये समाजवादी असावेत असे इच्छित. नरेंद्र देवांना अध्यक्ष करा,

ते म्हणाले. परंतु त्यांचे तरी ऐकतो कोण? ते तर या राष्ट्रांत समंजसपणा यावा म्हणून गेले. ज्या स्वराज्यासाठी धडपडत होते ते अजून यायचे आहे.

नियंत्रणे उठवा, किमती उतरतील. भांडवलदार महात्माजींना म्हणाले, नियंत्रणे उठली. किमती उतरण्याऐवजी वाढल्या. आपल्या देशातील भांडवलदार, व्यापारी यांना पैशापलीकडे काही नाही. परंतु सरकार त्यांच्या बाबतीत दयाशील. आम्ही दहा–वीस वर्षे भांडवलदारांस हात लावू इच्छित नाही ते म्हणतात. हिंदुस्थानच्या भोवती लाल ज्वाळा आहेत. लवकर समाजवादाकडे पावले टाकल्याशिवाय सोय नाही.

समाजवादी राजवट आली तरी एकदम स्वर्ग नाही येणार; परंतु संस्थानिक, भांडवलदार सर्वांची अधिक संपत्ती राष्ट्राची करण्यात येईल. अशी आर्थिक समता आणून कामगारांना मंत्र सांगू, की अजून काटकसरीनेच राहू. जे अधिक उत्पादन होईल ते अधिक उद्योगधंद्यांसाठी वापरू, अशा रीतीने पुढे जाऊ, समाजवादी वातावरण निर्माण होईल.

तुम्हालासुद्धा जर एकदम स्वर्ग नसेल निर्माण करता येत तर काँग्रेसला का नावे ठेवता असे कोणी विचारतात. त्यांना उत्तर हे की, काँग्रेस त्या दिशेने पावलेही टाकीत नाही. समाजवादी पक्ष आता सांगितल्याप्रमाणे महिना ५०० रुपयांहून अधिक उत्पन्न असता कामा नये असे ठरवून त्या दिशेने वेगाने नियोजनपूर्वक जाईल.

परंतु ही जीवननिष्ठा देणे हे का पाप? हवा, पाणी, प्रकाश ही सर्वांना हवीत. त्यांच्यावर व्यक्तीची मालकी नसावी. त्याप्रमाणे मोठमोठे कारखाने राष्ट्राच्या मालकीचे करावेत असे म्हटले तर का पाप आहे? जमिनी सामुदायिक सहकारी पद्धतीने कसाव्यात, म्हटले तर का पाप?

राजकारण म्हणजे पाप नव्हे, महात्माजी म्हणत, राजकारणही आपण आध्यात्मिक करू. नामदार गोखलेही म्हणत की, निर्मळ भूमिकेवरून राजकारण करू आणि नुसती लोकसेवा करून का साग्रा समाज सुखी होणार आहे? श्रीमंतांच्या जवळून देणग्या घेऊन, समाजाच्या दुःखावर मलमपट्टी करीत बसल्याने रोग हटणार नाही. कीव करणे याहून वाईट गोष्ट ती कोणती?

जो रात्रंदिवस श्रमतो; त्याची कीव करून त्याला कपडे नका वाटू; त्याचा हक्क नाही का? जो काम करायला तयार आहे त्याला काम द्या, स्वाभिमानी भाकर त्याला

खाऊ दे. हे सारे करावयाचे म्हणजे समाजवादी दृष्टीच हवी. ती देणाऱ्या पक्षांविषयी निष्ठा असली म्हणून काय बिघडले?

ती निष्ठा जोवर नाही तोवर खरी जीवनदृष्टीच आली नाही असे मी म्हणेन. मी समाजवादी तत्त्वज्ञानाकडे केवळ राजकीय दृष्टीने नाही पाहात तर मानवतेच्या दृष्टीने पाहतो.

'समाजवादी लोकांना श्रमाची महती वाटत नाही.' वगैरे वाटेल ते मोठमोठेही बोलतात. समाजवादी तर सर्वांना काम द्या म्हणत आहेत; परंतु त्यांच्या श्रमातून उत्पन्न होणारी धनदौलत व्यक्तीच्या हातात न जाता सर्व राष्ट्रासाठी असावी असे त्यांचे म्हणणे.

जोवर भरपूर उत्पादन नाही तोवर नफा राष्ट्राचा होणार असेल तर ते अधिक श्रमतील. पुढे उद्योगधंदे भरपूर वाढले म्हणजे थोडे कामाचे तास कमी करून मागणार आहे असे वाटले तर तास कमी करून मिळालेली विश्रांती ज्ञान, विज्ञान, कला यांच्यासाठी ते दवडतील. सारा समाज संस्कृती-विकासात रमेल असे हे जीवन-दर्शन आहे. सर्वांच्या सर्वांगीण विकासाचे नवदर्शन; त्यांची टिंगल नका करू.

अद्वैत कृतीत आणणे म्हणजे समाजवाद. ही तुच्छ वस्तू नाही. कृतीत आणलेला वेदांत म्हणजे समाजवाद. 'सर्वेऽपि सुखिनः सन्तु' असे पुटपुटून का सारे सुखी होतील? सर्वांना सुखी करण्याच्या योजना हव्यात. त्यांचा प्रचार करायला हवा. तशा माणसांचे सरकार व्हावे म्हणून धडपड हवी. एकीकडे पूंजीपती आणि एकीकडे उपाशी जनता ही का समाजाची धारणा? विषमता म्हणजे धर्म नव्हे. समता म्हणजे धर्म. समाजवाद आणणे म्हणजेच धर्म आणणे. सर्वांचा विकास व्हायला संधी निर्माण करणे याहून श्रेष्ठ धर्म कोणता?

+++

सत्याग्रह

या देशात समाजवाद आणावयाचा असेल तर श्रमिकांच्या हाती सत्याग्रहाखेरीज अन्य हत्यार नाही. लोकशाहीत सत्याग्रह कशासाठी आवश्यक आहे याचे तर विवेचन या प्रकरणात आहेच,

पण कामगारांच्या बोनस लढ्याचेही. त्याचा हा परिचय...

कामगार बोनसचा काय अर्थ करतात हे सरकारला माहीत नाही काय? युद्धकाळापासून महागाई वाढली. महागाई जितक्या प्रमाणात वाढली तितक्या प्रमाणात काही पगार व महागाई भत्ता वाढला नाही. कामगाराला संसार चालवणे जड जाते. महागाई जर पूर्वीच्या ३ ।। पट, काही काही वस्तूंच्या बाबतीत चौपट झाली असेल तर तितक्या पट काही मजुरी कामगाराला मिळत नाही. ते जे अंतर पडते ते बोनसच्या रकमेने काहीसे भरून येते. झालेले कर्ज वगैरे थोडेफार फिटते. कामगारांचे म्हणून बोनसकडे डोळे असतात.

मुंबईचे कामगार असे आहेत की, ज्यांचे तिकडे जमिनीशी संबंध असतात. कोकणात तिकडे बाप, भाऊ शेती करीत असतात. त्यांना मुंबईचा कामगार मदत पाठवतो. सातारा, नगर, पुणे वगैरे जिल्ह्यांतील कामगार मुंबईस असतात. आणि ते घरी शेतीच्या कामाला मदत पाठवतात. उत्तरेचे भय्येही तिकडील खेड्यापाड्यांतील आपल्या श्रमणाऱ्या बांधवांना शेतीसाठी मदत पाठवतात. परवाच माझ्या एका कामगार बंधूला रत्नागिरी जिल्ह्यातून त्याच्या वडिलांचे पत्र आले, 'जुना बैल थकला आहे. नवीन घ्यायला हवा. हा जुना बैल चिखलात लावणीसाठी नांगरट करू शकणार नाही. नवीन बैल घ्यायचा म्हणजे पैसे हवेत. तू न पाठवलेस तर इकडे कर्ज काढायला हवे. कर्ज तरी कोण देतो? सावकार शंभर लिहून घेऊन ५० च देतो. इतरत्र स्वस्त

कर्ज मिळण्याची सोय नाही.' असे हे पत्र. शेकडो, हजारो कामगारांना अशी पत्रे आली असतील. कामगार मिळालेला बोनस चैनीत नाही दवडीत. कोणी एखादा सिनेमा अधिक पाहील. क्वचित कोणी दारू पिईल वा स्पिरिट पिईल, परंतु सर्वसाधारण कामगार बोनसातून कर्ज फेडतो, घरी शेतीला मदत पाठवतो. हे शेतीच्या कामाचे दिवस, घर, बियाला, बैल घ्यायला, मजुरीला पैसे लागतात आणि ती अडचण मुंबईचा कामगार घरी पैसे पाठवून भागवतो. सरकारने जर सहानुभूतीने या गोष्टींचा विचार केला असता तर असा वटहुकूम निघता ना.

खरे म्हणजे गरिबांविषयीची आमची सहानुभूती तोकडी पडते. १९३८-३९ साली खानदेशात पिके बुडाली होती. स्थानिक अधिकाऱ्यांनी गावच्या पाटलांना तुम्ही उदाहरण घालून देण्यासाठी आधी शेतसारा भरा आणि मग लोकांना तगादा लावा असे सांगितले. एका गावच्या पाटलाने गुरे विकून शेतसारा भरला. आम्हाला खेड्यांची कल्पनाच नसते. काँग्रेसचे सभासद करीत हिंडताना खेड्यातील शेतकरी मला म्हणायचे, "रोख पैसे नाहीत. उडीद घ्या नि सभासद करा." खानदेशासारख्या जरा सुखी जिल्ह्यातील ही परिस्थिती, मग कोकणात काय असेल? अशा बांधवांना मुंबईचा कामगार रोख पैसे पाठवून आधार देतो. बोनसकडे या दृष्टीने कामगार पाहतो. सरकारी वटहुकूमाचा त्याला का बरे संताप येणार नाही?

साऱ्या देशातच 'शिल्लक टाका, सरकारी सेव्हिंग्ज सर्टिफिकिटे घ्या' असे वातावरण निर्माण केले असते तर त्या महान् लाटेत स्वभावतःच देशप्रेमी असणारा कामगारही सामील झाला असता. घरच्या विवंचना क्षणभर दूर ठेवून तोही पुढे आला असता; परंतु अशी महान लाट देशभर निर्माण करण्याची शक्ती नि स्फूर्ती आजच्या धुरंधर नेत्यांत दिसत नाही, किंवा त्यांना तशी इच्छा नसावी. आधी स्वतः उदाहरण घालून देणे जरूर असते. १७ साली रशियन क्रांती झाली. इंजिनिअरांना, इतरांना अधिक पगार देणे भाग होते. कारण तज्ज्ञ माणसे कमी; परंतु त्यांना तसा पगार देत असून स्वतः लेनिन वगैरे ५० रुपये घेत. हिंदुस्थानजवळ ही उत्कृष्ट उदात्तता आहे का? गांधीजींनी दिलेली शिकवण कोठे आहे? समजा, पगार कमी न केलेत तरी ज्यांना ५०० हून अधिक पगार मिळतो, त्यांनी बाकीचा पगार शिल्लक टाकावा, सरकारी सेव्हिंग्ज सर्टिफिकिटे घ्यावी असा वटहुकूम का नाही काढीत? कलेक्टर, कमिशनर, प्रधान, सेक्रेटरी, मोठमोठे अधिकारी, इंजिनिअर यांच्यावर का नाही अशी

सक्ती ? ५०० रुपयांत ते राहू शकतील. राहिले पाहिजेत. गरीब देशातील ना तुम्ही? त्याचप्रमाणे मोठमोठे भांडवलदार, कारखानदार यांच्या बाबतीत का वटहुकूम काढीत नाहीत की त्यांनीही नफ्याचा काही भाग सरकारी सेव्हिंग्ज सर्टिफिकिटांत गुंतवलाच पाहिजे म्हणून? आज युक्त प्रांतात जमीनदारी रद्द करण्याचे बिल येत आहे. जमीनदारांना जो मोबदला शेतकऱ्यांमार्फत मिळणार, त्या मोबदल्यातील काही भाग जमीनदारांनी सेव्हिंग्ज सर्टिफिकिटांच्या रूपाने गुंतवावा असे करणार आहात का? सर्व देशभर असे वातावरण का नाही उत्पन्न करीत? हे धोरण का योग्य, का न्याय्य?

सरकारने भांडवलदारांना उत्पादक धंद्यात भांडवल गुंतवा म्हणून परोपरीने सांगितले. त्यांनी नकार दिला. सरकारलाही कर्ज देण्यास बेटे नाखूश. कोट्यवधी रुपये नफा त्यांच्या हातात तुंबलेला आणि तो पैसा परदेशातील बँकांतून ठेवणार असे कळते. हिरे, जडजवाहीर खरेदून परदेशातील बँकांतून ते ठेवणार. असा हा भांडवलदारांचा देशद्रोह, बंधुद्रोह सुरू आहे. मोटारी नवीन नवीन मागवीत आहेत, परंतु उत्पादक धंदे वाढवतील तर शपथ! नवीन मोटार घेणाऱ्या प्रत्येकाला मोटारच्या किमतीच्या निम्मे पैसे आधी सरकारी सेव्हिंग्ज सर्टिफिकेटांच्या रूपाने गुंतव असे का नाही म्हटलेत? एकेका खोलीत दहा दहा, वीस वीस राहणारे, फूटपाथवर झोपणारे शेवटी कामगारच तुम्हाला दिसले-की ज्यांचा बोनस घ्यावा म्हणून! मोठमोठे घरमालक आहेत, त्यांना जे हजारोंनी भाडे मिळते त्यातील काही भाग त्यांनी सेव्हिंग्ज सर्टिफिकेटांच्या रूपाने गुंतवावा असे नाही का करता येणार? परदेशांतील चैनीच्या वस्तू घेण्यात बड्यांचा पैसा जात आहे आणि घरी शेतीच्या बैलासाठी, मजुरीसाठी, घर शाकारण्यासाठी म्हणून जो पैसा कामगार पाठवणार, त्यांवर तुमची धाड. म्हणून हा वटहुकूम अन्याय्य आहे. आधी बड्या धेंडांना कात्री लावा. सर्वत्र एक वातावरण निर्माण करा. सक्तीची देशभक्ती फक्त कामगारांनाच शिकवायला का येता तुम्ही?

उत्पादन वाढल्याशिवाय देशाचा प्रश्न सुटणार नाही. शेतीचे उत्पादन व कारखानदारी उत्पादन दोन्ही वाढली तरच देशाचा तरणोपाय आहे. राष्ट्र दिवाळखोर होत आहे. शंभर कोटींहून अधिक अंतर आयात-निर्यात किमतीत पडले. परदेशाला आपण शंभर कोटींहून अधिक रुपये दरसाल कोठवर देत राहणार? देशातील अन्नधान्य कधी अधिक होणार? कापसासाठीही पंचवीस-तीस कोटी रुपये मागील वर्षी पाठवावे लागले. वस्त्रासाठी प्रसिद्ध असा हा प्यारा भारत देश आज पुरेसा कापूसही पिकविनासा

झाला. कापूस नाही म्हणून गिरण्या बंद होऊ लागल्या. एकीकडे अधिक उत्पादनाची हाक तर इकडे गिरण्याच बंद आहेत. हे सारे गाडे कसे सुधारणार? मालक, भांडवलदार अधिक उत्पादन करायला नाखूश आहेत. भांडवलदार नफेबाजीसाठी चणचणच ठेवू इच्छित असतात. अशांच्या बाबतीत सरकार कठोर होऊ इच्छित नाही. कामगारांची योग्य मजुरी ठरवावी, याला मालकांनी विरोध केला. श्री. अशोक मेहता म्हणतात, ''त्या बाबतीत काढा ना वटहुकूम. ठरवून टाका योग्य वेतन.'' परंतु येथे वटहुकूम काढायची हिंमत नाही. मालकांसमोर नरमाई आणि श्रमणाऱ्या कामगारांबाबत वटहुकमी वृत्ती, याची आम्हाला चीड येते. हिंदुस्थान सरकारने आजूबाजूच्या घडामोडी लक्षात घ्याव्या. चीनमध्ये एका लष्करी उत्पादनाच्या कारखान्यात ट्रॅक्टर सुरू झाले. आमच्याकडे नाही होत अजून आगगाडीचा डबा तयार, नाही होत ट्रॅक्टर. आमच्या कागदी योजना –वीस वर्षांनी होणाऱ्या प्रचंड धरणाच्या. आज या घटकेला अन्न आणि इतर आवश्यक वस्तू यांचे उत्पादन झपाट्याने वाढेल अशी प्रेरणा नाही, स्फूर्ती नाही. थातुर–मातुर काम. इंग्लंडमधील हेंडरसन हिंदुस्थानात हिंडून गेले. श्री. दादासाहेब मावळंकर रत्नागिरी जिल्ह्यांतील कार्यकर्त्यांच्या सभेत म्हणाले, ''मी विलायतला गेलो तेव्हा हेंडरसन साहेबांस विचारले, 'हिंदुस्थानबद्दल काय वाटले?'

हेंडरसनना बोलतांना शेवटी आग्रहच केला तेव्हा ते म्हणाले, 'There is no one in earnest there तेथे कोणाला तळमळ लागली आहे असे दिसले नाही.' ते शब्द ऐकून मी मान खाली घातली! हिंदुस्थानात एकच तळमळ आहे. सरकारला हाती सत्ता ठेवण्याची तळमळ. व्यापारी, कारखानदार यांना नफेबाजीची आणि देशाचे नाव दुनियेभर बद्दू करण्याची तळमळ. सामान्य जनता स्वराज्य आले तरी ते अनुभवास येत नाही म्हणून दुःखी, कष्टी. असे हे आज दृश्य आहे. सरदार कलकत्त्याच्या मतदारांना म्हणतात, 'आम्ही होतो म्हणून इतके केले; राष्ट्र वाचवले.' कोठवर टिऱ्या बडवणार! राष्ट्राला आर्थिक संकटातून वाचवायचे आहे. तेथे खंबीर हात हवे आहेत –जे भांडवलशाहीच्या उच्चाटनास सज्ज होतील, परंतु ते वज्र–हस्त भांडवलदारांस गोंजारीत आहेत आणि कामगारांच्या बोनसवर येऊन पडत आहेत. नाना मंत्र्यांवर लाचलुचपतीचे आरोप केले जात आहेत.

वकिलातींच्या उधळपट्टींवर टीका होत आहेत. नैतिक तेज नष्ट होत आहे. त्याग, ध्येयवाद आम्ही विसरत चाललो. हां देश दरिद्रीनारायणाचा, ही गोष्ट विसरत

चाललो. आप्तेष्टांना नोकऱ्या-चाकऱ्या देऊ लागलो. महात्माजींनी १९३७ साली मंत्रिमंडळे घेतली तेव्हा लिहिले होते, "Ceasar's wife must be above suspicion."

सर्वांहून अधिक मंत्र्यांनी जपावे. निर्दोष हवे त्यांचे वर्तन, परंतु आज देशभर बुजबुजाट होत आहे. मंत्र्यांच्या गावाला, त्यांच्या शेतीकडे जाणारा रस्ता आधी होतो, तर जो गाव कित्येक वर्षे पावसाळ्यात त्रास होतो म्हणून सांगतो तेथे रस्ता नाही होत. कोणा मंत्र्याला तारेनेही सिमेंट मिळते, तर शेतकऱ्यांच्या वाट्यास येणे कठीण. अशा वार्ता देशभर, गावोगाव आहेत. त्या सर्व खऱ्याच असतील असे नाही, खोट्या असतीलही; परंतु असे हे गलिच्छ वातावरण आज निर्माण झालेले आहे. त्याला का कारण नसेल? या वातावरणात प्रखर त्यागाची, उज्ज्वल ध्येयवादाची स्वच्छ हवा आली तरच राष्ट्राचे प्राण वाचतील. आजच्या काँग्रेसी सरकारजवळ आहे ही शक्ती? ज्यांच्या राजवटी बरबटलेल्या होत आहेत, जे भांडवलदारांचे कैवारी म्हणवून घेत आहेत, स्वच्छ-स्पष्ट तात्कालिक योजना ज्यांच्याजवळ नाहीत, त्यांनी कामगारांना मिळणाऱ्या बोनसवर तेवढी वटहुकुमी दृष्टी ठेवली तर याचे समर्थन मी कसे करू? सरदार मागे मद्रासला म्हणाले, "काँग्रेसला लवकरच आम्ही हुसकून लावू अशा स्वप्नात समाजवादी वगैरे आहेत, परंतु पाच-पंचवीस वर्षे तरी त्यांना आशा नाही." सरदारही स्वप्नात आहेत. गुजरातमधील एक थोर सर्वोदय कार्यकर्ते, गांधीजींचे निकटवर्ती सेवक कोठे म्हणाले, "हे सरकार दहा-पंधरा टक्के लोकांचे. सरदारांचे धोरण असेच चालू राहील तर दहा-वीस वर्षांनी त्यांच्या नावे खडे फोडण्यात येतील." परंतु हे उद्गार सरदारांच्या कानावर कोण घालणार?

हे कोणी कोणाला सांगायचे? मुंबईच्या कामगार बंधूंना मी एवढेच सांगेन की, शांती राखा. नुसते सरकारवर रागवून रुसून काय होते? आजचे सरकार दूर करायचे असेल, तुमचे प्रश्न सोडवणारे समाजवादी सरकार यावे असे वाटत असेल तर तुम्ही श्रमणाऱ्यांनी डोळे उघडे ठेवून संघटित झाले पाहिजे. त्यासाठी शर्थीचे प्रयत्न हवेत. त्याग हवा. कष्ट हवेत. तरच पुढेमागे निराळे सरकार येऊ शकेल. बोनसच्या सक्तीच्या शिलकेपासून हा बोध घ्या. शांत राहून परंतु मनाशी खूणगाठ बांधून इंटकचे प्रातिनिधिक स्वरूपच उखडून टाका. इंटकचे सभासद होणे आत्मघातकी असे तुम्हास वाटले पाहिजे. तरच तुमचा असंतोष प्रामाणिक आहे असे जनतेला वाटेल.

'सरंजामशाही नि भांडवलशाही आजवर रक्तशोषण करीत आली. आपण बदला घेऊया. पाडूया मुडदे. सारी सत्ता विशिष्ट गटाच्या हाती घेऊया,' असे हे कम्युनिस्टी लाल तंत्र. तेथे लोकशाही नाही. मानवता नाही. सत्तालोलुपांचा एक नवा वर्ग निर्माण होईल. जो त्यांना विरोधी त्याला यमसदनास पाठवतील. कदाचित, भाकरीची व्यवस्था करतील; परंतु मोकळे बोलण्याची; वागण्याची चोरी व विरोधी बोलाल तर गोळी खाल. मित्रांनो, या भारतात नको हे राक्षसी प्रकार. परंतु कम्युनिस्ट ते सारं इच्छित आहेत. जनतेने त्यांच्यापासून दूर राहावे. गोडगोड थापा नकोत. घी देखा लेकिन बडगा नही देखा. सुखस्वप्ने दूर राहतील आणि छातीवर सदैव पिस्तुल मात्र रोखले जाईल. समोर पिस्तुल रोखल्यावर भाकर मिळाली तरी काय आनंद?

काँग्रेस धीमेपणाने जात आहे. समाजवादी स्वतंत्र संघटना करून लवकर समाजवाद यावा म्हणून प्रयत्न करीत आहेत. इंग्लंडमध्ये रक्तपात न होता उशिरा का होईना समाजवाद येत आहे. थोडा वेळ लागतो; लागू दे. परंतु मानवी मूल्यांचा बळी देऊन लवकर काही मिळेल अशी आशा नको. कुत्र्याचे स्वातंत्र्य काय करायचे? भाकरी मिळते, पण गळ्याला पट्टा. तर काय किमतीची ती भाकरी? मग तो पट्टा कम्युनिस्टांचा असला तरी पट्टाच. जीवनात मोकळेपणा नसेल तर सारे फोल आहे. इंग्रजी गुलामी आपण दवडली. आता लाल गुलामगिरी, हूं की चूं न करण्याची कम्युनिस्ट आणू पाहात आहेत. भारतातील जनतेने अशांच्या वाऱ्यासही उभे राहू नये. कम्युनिस्ट संघटनेशी चुकूनही संबंध नको कारण तेथे विश्वास नाही. केव्हा मान कापतील, उलटतील त्याचा भरंवसा नाही. पिशाच्चांचे तंत्र!

कम्युनिस्टांच्या राष्ट्रद्रोही संकटामुळे सरकार नवे कायदे करीत आहेत. नवीन सत्ता हाती घेत आहे. त्या कायद्यांचा निर्मळ मार्गाने जाणाऱ्यासही उद्या कदाचित त्रास व्हायचा. गुंडकायदा मग सरकारला जो जो गुंड वाटतो त्यांना लागतो. मग भले कार्यकर्तेही तुरुंगात लोटले जातात. श्री. जयप्रकाश मागे म्हणाले की, "असे कायदे करून प्रश्न सुटत नसतात. रेल्वे वगैरेसारख्या राष्ट्रव्यापी धंद्यांतील प्रश्न सोडवण्यासाठी स्पेशल मशिनरी-एखादे कायमचे मंडळ निर्मा. त्यात सरकारचे, कामगारांचे प्रतिनिधी घ्या." परंतु कोण ऐकतो? असो. सरकारच्या आजच्या धोरणामुळे अडचणी आल्या तरी समाजवादी पक्षाने धीरगंभीरपणे जात राहावे. ओल्याबरोबर सुके जळते. कम्युनिस्टांबरोबरच कदाचित् समाजवाद्यांचीही थोडीबहुत लांडगेतोड व्हायची.

संघाला बंदी झाली नि सेवा करणाऱ्या थोर सेवा दलासही निमबंदी. परंतु अधीर नि आततायी न होता, ज्वलंत श्रद्धा न गमावता समाजवाद्यांनी संघटना करीत राहावे. विचारप्रसार करीत राहावे. लोकांना सुशिक्षित करीत राहावे. आलीच वेळ तर संपासही त्यांनी उभे राहावे. बोलणीही करावीत, हट्टास शक्यतो पेटू नये. संप पुकारावा लागलाच तर तोही शांतपणे, सत्याग्रही मार्गाने चालवावा. तेथे आगलावेपणा नको. मोडतोड नको. अशी भारताची नीती असू दे. या मार्गाने ध्येयाकडे जाऊया. महात्माजींनी साऱ्या जगाला जरा उंच पातळीवर नेले. त्यांच्या जन्मभूमीत तरी शिसारी आणणारे, आगलावे कम्युनिस्टी प्रकार नकोत.

पुणे, चाळीसगाव, सोलापूर या शहरांत कामगारांचा सत्याग्रह चालू आहे. पुण्यात सत्यांग्रह ५ तारखेपासून सुरू झाला; परंतु चाळीसगावची दु:खकथा आज चार महिन्यांपासूनची आहे. ११ मेला तेथील गिरणी बंद झाली. कामगारांनी शेवटचा उपाय म्हणून सत्याग्रह सुरू केला, तेव्हा गिरणी उघडली; परंतु कामगारांना स्टँडर्डचा काही भाग हातखर्चासाठी म्हणून देऊ असे कबूल करूनही फसविण्यात आले. नाथा ताम्हणे यांनी उपवास सुरू केला. १५ दिवस उपवास झाला. तो इकडे पुन्हा मालकांनी गिरणी बंद केली तेव्हा पुन्हा मूळ पदावरच प्रश्न आला. त्यांनी उपवास सोडला. चाळीसगावचे कामगार आणि त्यांची मुलेबाळे यांनी काय खावे? मालकांचा खेळ होत आहे; सरकारची त्याला साथ. चाळीसगावला इंटकचे मूळ धरेना. तेथील समाजवादी कामगार संघटना मोडून काढण्याचे का हे किळसवाणे कारस्थान आहे? गिरणी बंद करून कामगार शरण येतील अशी मालकांची अपेक्षा; परंतु कामगार सत्याग्रहावर गेले. तेव्हा मिल तात्पुरती उघडून पुन्हा अटी मोडून चावटपणा सुरू झाला, पुन्हा मिल बंद. कामगार तेथे सत्याग्रह करीत आहेत. सत्याग्रहींना दोरखंड बांधून नेण्यांत आले असे कळते. सक्त मजुरीच्या शिक्षा ठोठावल्या. आधीच चार-चार महिने मिल बंद म्हणून घरात उपासमार. आता सत्याग्रही चार-चार महिने तुरुंगात पाठविले, तर घरी काय दशा असेल? किती दिवस कामगार सत्याग्रह करणार? फार तर काय, चार-आठ दिवस करतील. पुढे काय? मालक बेफिकीर आहेत. उद्या नियंत्रणे उठली, म्हणजे बेटे पुन्हा एका महिन्यात गिरणी बंद असलेल्या काळातील तूट भरून काढतील. मालक म्हणतात, "आमच्याजवळ पैसा नाही. माल साठला

आहे.'' जो माल खपणार नाही तो का काढलात? तुम्हाला अक्कल नव्हती? सरदार वल्लभभाई पटेल चरखा संघाला पाठविलेल्या संदेशात म्हणतात, ''देशात कापडाची टंचाई आहे. चरखा संघाला साथ देऊन लोकांनी ही टंचाई दूर करावी.'' इकडे कापडाची टंचाई तर इकडे गिरण्यांतून साठे साठलेले ! कापडाच्या भरमसाट किमती, वाटेल तो माल काढलेला, असा हा भांडवलदारीचा चावटपणा आहे. पाकिस्तानने यांचा कपडा नको म्हटले. तुमचे महाग कापड कोण घेणार? हे गिरणीमालक देशद्रोही आहेत. परंतु डॉ. श्यामाप्रसाद त्यांना मिठ्या मारीत आहेत. देशातील ४० गिरण्या बंद पडल्या, त्याचे त्यांना काहीच नाही. ४०० मधील ४० बंद पडणे ही बाब त्यांनी मामुली वाटली. याचा अर्थ ३० कोटींतील ३ कोटी लोक गेले तरी त्यांना मामुली बाबच वाटेल !

सरकारने लक्षात घेतले पाहिजे की जसजशी वेळ येईल तसतसे धैर्याने पाऊल पुढे टाकून कारखाने राष्ट्राचे करणे आवश्यक ठरेल, आणि जे मालक परवडत नाही म्हणून खुशाल कारखाने बंद करतात अशांचे तर ताब्यात घेतलेच पाहिजेत. चाळीसगावची गिरणी सरकारला हाक मारीत आहे. चाळीसगावचे सत्याग्रही कामगार आजच्या युगधर्मानुसार वागा असे सरकारला नि मालकाला सांगत आहेत. हजारोंच्या जीवनाचा खेळखंडोबा नाही होता कामा. ही गमतीची गोष्ट नाही. जीवन-मरणाचा हा सवाल आहे. सरकारने नि मालकाने दोन महिन्यापर्यंत उपाशीपोटी असूनही शांत राहिलेल्या व अखेर शांतपणे सत्याग्रहाचा मार्ग अवलंबिणाऱ्या कामगारांच्या सहनशीलतेचा अंत पाहू नये. कामगारांना यश येवो. त्यांची हाक ऐकली जावो. खऱ्या सत्याग्रहींचा त्यांच्या सत्याग्रहास पाठिंबाच मिळेल.

समाजवादी पक्षाच्या नेतृत्वाखाली पूर्व पंजाबात हिस्सार जिल्ह्यात तसेच तिकडे बिहारमध्ये काही ठिकाणी शेतकऱ्यांनी सत्याग्रह केला. हिस्सार जिल्ह्यात यश आले. आज लोकशाही सरकार आहे. लोकशाही मानणारे सत्याग्रह कसे करू शकतात असा सवाल काही बडेबडेही करीत असतात. श्री. गोविंद वल्लभ पंतांनी हाच मुद्दा म्हणे युक्त प्रांतात मांडला. आपल्याकडेही कोणी असला अपवित्र पवित्रा घेत असतात. दैनंदिन जे अन्याय होत असतात तिकडे जर सरकारची उपेक्षा होत असेल तर अन्याय दूर करायला मार्ग कोणता? पुढील निवडणुकीपर्यंत का हरीहरी म्हणत बसायचे? केवळ निवडणूक म्हणजे लोकशाही असेच मानणाऱ्यांच्या अकलेची

कीव येते. एकदा निवडणूक संपली की सर्वांनी का चूप बसायचे? गांधीजींनी जर सर्वात मोठी गोष्ट शिकवली असेल तर ती ही की, लोकशाही राज्य असूनही जर तेथे अन्याय होत असेल तर तेथे सत्याग्रह करणे कर्तव्य ठरते. त्यासाठी सरकार शिक्षा करील तर ती भोगावी. मला वाटते, 'Square of Swarajya-स्वराज्याचा चौकोन' या सुप्रसिद्ध लेखात गांधीजींनी ही गोष्ट मांडली होती. सत्याग्रह आणि संप या गोष्टी शांततेने चालविण्यात आल्या तर त्या सनदशीर आहेत असे महात्माजींचे म्हणणे होते. अर्थात सर्व उपाय थकल्यावरच हे मार्ग अनुसरायचे, परंतु त्यांना स्थान आहे; आणि ज्या गोष्टी सनदशीर आहेत त्या लोकशाहीशी का विसंगत? महात्माजींची लोकशाहीची कल्पना विशाल होती. नेमळट आणि बावळट नव्हती. लोकशाही मानून पुन्हा सत्याग्रह करता, संपाचीही भाषा बोलता, असे म्हणणाऱ्यांना महात्माजीप्रणित लोकशाहीचा आत्माच कळला नाही. जयप्रकाश एकदा म्हणाले होते की, 'अशा सत्याग्रहाने लोकशाही अधिक संपन्न होते.' चाळीसगावच्या कामगारांनी शांततेने आपला लढा चालवावा. मुंबई सरकारने या बाबतीत ताबडतोब काही तरी केले पाहिजे. अशा प्रसंगी कारखाने ताब्यात घेऊन चालविले पाहिजेत. व्यक्तीच्या मालकी हक्काची सबब येथे पुढे आणून चालणार नाही.

श्रमणाऱ्यांची मान उंच करावयाची असते. गादीवर लोळणाऱ्या पुंजीपती शेणगोळ्यांची नसते करायची.

काँग्रेस मंत्र्यांच्या पहिल्या राजवटीतही चाळीसगावच्या कामगारांचा संप झाला होता. एक मंत्री म्हणे, मालकावर दडपण आणून गिरणी उघडावी या मताचे होते तर दुसरे मुनशी की खुनशी कोण होते ते म्हणतात, आणखी थोडे दिवस जाऊ देत. यांची जिरू दे चांगली. तुम्हाला कामगारांची जिरवावयाची आहे की देशाचे वाटोळे करायला निघालेल्या भांडवलदारांची जिरवावयाची आहे? तुम्ही नियंत्रणे उठविता, बसविता, उठविता; हा काय खेळखंडोबा चालविला आहे? मागे साखरेवरचे नियंत्रण उठवले तर मालकांनी किती महाग किमती ठरवून घेतल्या! नियंत्रणे उठवली, तरी यांचा नफा चालूच. किमती खाली येतच नाहीत. मालही रद्दी, भिकार, परदेशातील पत गेली. चहामध्ये लाकडाचा भुस्सा मिसळतात. कापड रद्दी कापसाचे, अन्नधान्यात माती नि रेती मिसळतात. अशा पशुसम भांडवलदारांना बडगा दाखविण्याऐवजी बिचाऱ्या निरुपाय म्हणून सत्याग्रह करणाऱ्या कामगारांच्या मुसक्या बांधण्यात येत

आहेत. दुर्दैव देशाचे! महात्माजींच्या नावावर पिकणाऱ्या या काँग्रेस सरकारच्या राज्यात जगणे म्हणजे वेदना आहे.

कामगारांनो, तुम्हाला चालवेल तोवर सत्याग्रह चालवा. शांततेने चालवा. आत्मक्लेश हाच आपला मार्ग. गांधीजींनी मरायला शिकविले आहे. मारायला नाही. न्याय यावा, समता यावी, श्रमजीवींची हेटाळणी टळावी म्हणून सत्याग्रहाचा, शांत-आत्मबलिदानाचा आपला मार्ग आहे!

+++

संयुक्त महाराष्ट्र, आंतरभारती व एकात्म भारत

मराठी माणसाच्या हक्कासाठी झगडणारे गुरुजी, साऱ्या भारत साहित्य, कला व जीवनाशी एकरूप होण्यासाठी तळमळत होते. एकात्म भारताची स्वप्ने त्यांना पडत होती. संकुचितता गुरुजींना मानवत नव्हती. चळवळींचा संस्कृतीशी जोडलेला संबंध. त्याचा हा परिचय.....

भाषावार प्रांतरचनेचे काँग्रेसचे ध्येय होते. स्वराज्य आल्यावर इंग्रजांनी केलेले कृत्रिम प्रांत मोडून भाषावार सुसंघटित प्रांत बनविणे कर्तव्यच होते. भारताची दृष्टी ठेवून असे प्रांत करणे यात हानीही नव्हती. ते ते प्रांत हालचाल करू लागले. कर्नाटकने चळवळ सुरू केली. महाराष्ट्रही धीरगंभीर उभा राहिला. देशभर चर्चा सुरू झाली. देश स्वतंत्र झाल्यावर जातिद्वेष, धर्मद्वेष बळावले. अनेक संकटे. अशा वेळेस प्रांतांचे प्रश्न उभे करू नका अशीही भाषा कानी येऊ लागली. फुटीर वृत्ती वाढेल अशीही शंका प्रदर्शित केली जाई. पुढे काँग्रेसने एक समिती नेमली. पंडित नेहरू, सरदार आणि पट्टाभि हे त्या समितीचे सदस्य. त्यांनी आपला अहवाल जाहीर केला. आजच इतर प्रांतांविषयी मी लिहीत नाही. महाराष्ट्राविषयीची वेदना मांडतो.

आंध्रचा आता प्रांत होणार. म्हैसूर विलीन व्हायला सिद्ध झाले तर कर्नाटकाचा प्रांत उभा राहील; परंतु महाराष्ट्राची कुचंबणा आहे. आज दिल्लीला महाराष्ट्राचे जणू वावडे आहे. महाराष्ट्राने अघोर पाप केले आहे; परंतु पापाची शिक्षा सर्व महाराष्ट्राला नको. पापाची क्षमा करा. महाराष्ट्राचे धिंडवडे थोरामोठ्याने काढू नयेत. महाराष्ट्राचे चांगले आठवा. स्वातंत्र्यासाठी मागे तो तीनशे वर्षांपूर्वी लढला. ५७ साली लढला. सारखा लढतच आहे. महाराष्ट्राने अपार त्याग ओतला आहे. थोर माणसे दिली आहेत. विधायक कार्यातही महाराष्ट्र मागे नाही. स्वच्छतेची दीक्षा सेनापतींनी दिली

आहे. अस्पृश्यता-निवारणाचे काम येथे कधीपासून होत आहे. राष्ट्रभाषेला हजारो विद्यार्थी बसतात. आज अप्पासाहेब, आण्णासाहेब, आचार्य भिसे इत्यादी थोर माणसे सेवेत रमली आहेत आणि महात्माजींच्या वधानंतर दु:ख गिळून आश्रम सोडून पू. विनोबाजी सर्वत्र एकतेचा संदेश देत भारतभर सेवामय परिभ्रमण करीत आहेत. महाराष्ट्राचे पाप विसरा. थोरांनी अपराध क्षमावे. महात्माजींच्या पायाजवळ सत्य अहिंसेचे धडे ना घेतलेत? अपकाराची फेड उपकाराने करावी असे ना शिकलात? मग महाराष्ट्राला शासन का करता? महाराष्ट्राला प्रेम द्या. विश्वास द्या. महाराष्ट्राचे प्राण गुदमरवू नका.

महाराष्ट्राच्या एकीकरणाच्या आड मुंबईचा प्रश्न म्हणे येतो. मुंबई महाराष्ट्राचीच आहे. सर्व प्रकारचे लोक येथे आले. व्यापार वाढला. म्हणून का मुंबई दुसऱ्याची झाली? कुलाबा, ठाणे जिल्हे सोडून मुंबईची गावदेवी पाच-सहाशे वर्षांची जुनी. येथील दैवते, येथील वाड्या, येथील भाऊचा धक्का सारे महाराष्ट्राचे मुंबई महाराष्ट्रापासून अलग करणे पाप आहे. आमचा लचका का तोडता? तुमचा व्यापार का कमी होणार आहे? आज कमी होत नाही, उद्या का कमी होईल? संपत्ती श्रमातून निर्माण होते. महाराष्ट्रीयांनीच अपार श्रम केलेत. तुम्ही आमच्या घरी आलात आणि घरच बळकावून बसलात. महाराष्ट्राने कधीच कोणास नाही म्हटले नाही. गावोगाव गुजराथी, मारवाडी, दुकानदार, सावकार झाले तरी हेवा-दावा केला नाही. कांदा-भाकरी हे त्याचे राष्ट्रीय अन्न, परंतु म्हणून त्याला त्याच्या घरून हाकलणार?

नागपूर-वऱ्हाडचे लोक म्हणतात, "मुंबई मिळाली तर आम्ही संयुक्त महाराष्ट्रात सामील होऊ. मुंबई नसेल तर आम्ही महाविदर्भ स्वतंत्र ठेवू." मुंबई तर काही केले तरी देणार नाही, असे काँग्रेस श्रेष्ठींची समिती निक्षून सांगते. म्हणजे महाविदर्भही सामील होणार नाही हे त्यांना दिसत होते. महाराष्ट्राचे तुकडे पाडून ठेवणे यातच काँग्रेसश्रेष्ठींना मोठेपणा वाटतो का? मुंबई देता येत नाही म्हणून महाविदर्भ येत नसेल तर ही घ्या मुंबई नि संयुक्त महाराष्ट्र उभा करा, अशी उदार नि न्यायी दृष्टी ठेवून काँग्रेसश्रेष्ठींनी वास्तविक म्हटले पाहिजे. परंतु त्यांना महाराष्ट्राच्या हृदयाची काय पर्वा? त्यांना मुंबईचे कोट्यधीश प्यारे आहेत. महाराष्ट्रातील कोट्यवधी जनतेच्या हृदयाचे तुकडे करून पूंजीपतींच्या चरणी का ते वाहणार? अरेरे ! मानवतेचा हा वध आहे.

मुंबई दिली नाही म्हणजे महाविदर्भही मिळणार नाही. इकडे बृहन्मुम्बई करून ठाणे जिल्ह्याचा भागही कापून घेणार. तिकडे सत्य, अहिंसेचा उपासक गुजरात, महागुजरातची स्वप्ने रंगवीत उंबरगाव वगैरे आक्रमित येऊ पाहातच आहे. वारली आमचीच भाषा बोलतात. डांगमध्ये आम्हीच असा दावा चालला आहे. वारली लोकांतील 'गुजरात दमणच्या पलीकडे. आम्ही दमण्ये नाही' ही भाषा या गुजराती आक्रमकांस माहीत नाही वाटते? मोरोली, मांडे वगैरे उंबरगावच्या सीमेवरील भागात ८० टक्के लोक मराठी बोलणारे, परंतु सावकार गुजराती. यांनी आपल्या चार मुलांसाठी शाळा काढायला लावायच्या, त्या असायच्या गुजराती ! आणि दावा सांगायचा की येथे गुजराती बोली आहे. वारली लोकांची नावे घेतली तर ज्ञानेशाची ओवी, तुकोबाचे अभंग यांची आठवण येते. वारली लोकांना हे सारे समजते. या भागात काही कार्यकर्त्यांनी प्रचारसभा घेतली तेव्हा वारली बंधू सभेत म्हणत, ''यांनी आम्हाला वीतभर जमीन ठेवली नाही. आता आमची बोली पण नेणार? जिच्यात पोटातली सुखदु:खे सांगणार ती भाषाही मरणार?'' वारलीचे हे करुण-गंभीर उद्गार काय सांगतात? दमणजवळ इंद्रगड किल्ला आहे. तिकडील शिलालेख मराठीत आहेत. या महाराष्ट्राच्या भागात जुलमाने तुम्ही खाली आलात आणि आता सारेच बळकावू म्हणता? तुम्हाला प्रेमाने आधार दिला त्याचे का हे उपकार?

मुंबई समाचारने लिहिले, शिवाजी महाराजांनी स्थापलेले स्वराज्य ज्यांनी घालवले त्यांना महाराष्ट्राच्या वतीने बोलण्याचा काय अधिकार? या समाचाराला विचारावेसे वाटते की, तो अधिकार गांधीजींचे ओठावर नाव खेळवून काळा बाजार करणाऱ्या लोकांना मिळाला आहे काय? गुजरातमध्ये, खुद्द अहमदाबादेसही लग्नासारख्या समारंभातही पिठाची गाय वगैरे करून मारण्याचा विधी आत्तापर्यंत होता असे म्हणतात. हे कशाचे द्योतक? पिठाची तरी गाय करून मारली पाहिजे ही गुलामी तुम्ही पत्करलीत, तुम्ही महाराष्ट्राला हिणवावे? कोणी कोणाला हिणवू नये. सर्वच प्रांतांना थोर इतिहास आहेत. शौर्य, धैर्याची उदाहरणे आहेत. उत्कर्ष, अपकर्ष आहेत. उदयास्त आहेत. मुंबई समाचाराने जरा विवेकाने लिहावे. मुंबई नाहीच मिळू देणार म्हणून अहमदाबादी काँग्रेसवाले गर्वात आहेत. डांग भागात आम्ही गुजराती शाळा खोलणारच, गुजराती प्रचार करणारच, असे गुजराती काँग्रेसवाले म्हणत आहेत, हे सत्य नव्हे. अहिंसाही नव्हे. भाषा मारणारे तुम्ही का साम्राज्यवादी इंग्रजांच्या जातीचे होणार?

गुजरातमध्ये तेव्हा मुसलमान अंमल होता. मराठ्यांनी गुजरात जिंकला; परंतु गायकवाडांनी राज्यभाषा मराठी नाही, गुजरातीच ठेवली. त्यांनी तुमच्या भाषेवर कधी आक्रमण केले नाही. विलिनीकरणास तत्काळ त्यांनी संमती दिली. महाराष्ट्र दिलदार आहे. तो अन्यायाने अतिक्रमण करणारा नाही.

पालघर येथे मागे ठाणे जिल्हा महाराष्ट्राचाच, वारलींची भाषा मराठीच, म्हणून घोषवायला मोठी सभा झाली होती. आता बेळगावला संयुक्त महाराष्ट्राची परिषद आहे. पुन्हा १४ तारखेला जिल्हा प्रातिनिधिक परिषद आहे. उंबरगाव, डहाणू वगैरे भागांतील गावोगावच्या पंचायतींचे ठराव आहेत. ठाणे जिल्हा महाराष्ट्राचा, डांग भागही महाराष्ट्राचाच. बेळगाव व कारवारकडील जो भाग सलग मराठी बोलणारा असेल त्या बाबतीत कन्नड बंधूंजवळ प्रेम, स्नेहाने वाटाघाटी कराव्यात. थोडा भाग इकडे तिकडे गेला तरी दुःख नको. आपण शेवटी भारताची लेकरे-कोठेही असलो तरी भारतात आहोत.

मुंबईची बृहन्मुंबई बनवावयाची, तिकडे वसईपर्यंत गुजरात आहे असे म्हणावयाचे, आणि महाराष्ट्राची या पट्ट्यातून हकालपट्टी झाल्यावर बृहन्मुंबईने ठराव करावा की, महागुजरातेत आम्ही सामील होतो. द्वारकेपासून मुंबईपर्यंत 'गरवी गुजरात' वैभवाने उभा राहील असे हे आक्रमक धोरण ! महाराष्ट्राच्या थडग्यावर गुजरातचे वैभव उभे राहणार का? वैभव भारताचे वाढवायचे आहे. ना गुजरातचे ना महाराष्ट्राचे. आणि भारताचे वैभव त्या त्या प्रांतांना तेव्हा वाढवता येईल जेव्हा त्यांचे तुकडे तुकडे केले जाणार नाहीत. महाराष्ट्र विस्कळित ठेवणे हा का धर्म? ही का नीती? ही का सत्य अहिंसेची प्रीती?

पंडित नेहरूंनी प्रांतांच्या स्वतंत्री-करणाची घाई करू नका म्हणून प्रार्थना केली होती. आज देशभर शांत वातावरण नाही. सर्वत्र कडवटपणा भरलेला. हिंदू-मुसलमानांची अंतःकरणे दुखावलेली. सूड, द्वेष, मत्सर यांच्या वृत्ती अजून न शमलेल्या. अशा वेळी आणखी प्रांतीय भावनांनी प्रक्षोभी वादळे नका उठवू. थांबा थोडी वर्षे. इतकी वर्षे गेली, देशाच्या कल्याणासाठी आणखी थोडी कळ सोसा; असे त्यांचे सांगणे होते; परंतु ते त्या त्या अलग होणाऱ्या प्रांतांना पटले नाही. आपल्यावर दुसऱ्याचे आक्रमण होत आहे ही जाणीव असली म्हणजे मग मनुष्य थांबावयास तयार नसतो. पैशाच्या जोरावर आपल्याला मागे रेटण्यात येत आहे ही तीव्र जाणीव होताच मनुष्य

अस्वस्थ होतो. तुम्ही सर्वत्र पाय पसरत चाललात, दहा वर्षांनी आणखी काय होईल देव जाणे ! मुंबईच काय सारा ठाणे जिल्हाही जायची पाळी यायची अशी भीती वाटली म्हणजे मनुष्य सावध होतो. म्हणून ताबडतोब प्रांत करा अशी संयुक्त महाराष्ट्राची मागणी आहे.

महाराष्ट्राचे चार-पाच भाग पाडून त्यांचा एक महाराष्ट्र संघ बनवणार? नागपूरचे जिल्हे, विदर्भ, महाराष्ट्र, कोकण असे का भाग पाडणार? असे करणार तर महाराष्ट्राचे पंचप्राण पाच ठिकाणी करून का एकजिनसी महाराष्ट्र बनणार? सारा बृहन्महाराष्ट्र एक करा. त्यात आणखी पुन्हा शकले नकोत. त्या त्या भागांना आणखी पुन्हा स्वायत्तता पाहिजे असेल तर त्याला अर्थ काय आहे? जर असे भाग राहणार असतील तर मुंबईही मग तशीच राहू दे असे काही मुंबईकर म्हणतील. म्हणून एक गोष्ट निश्चित ठरवली पाहिजे की, नागपूर ते कारवार हा सलग भाग एक घटक म्हणून राहील. मराठवाडाही महाराष्ट्राचे माहेर. तोही पुढे येईल. या सलग एकजिनसी महाराष्ट्रातच तो सामील व्हायला हवा. कोकणी भाषेचा सवता प्रदेश – असल्या विचारांना अर्थ नाही. मग खानदेशातील अहिराणी भाषेचा का नको?

सीमेवरच्या काही प्रदेशांबाबत मतभेद होणे शक्य आहे, परंतु सीमा समिती नेमून तिच्या द्वारा सर्व प्रश्न सोडवून घ्यावेत. थोडा भाग इकडे का तिकडे अशी भाऊबंदकी वाढवू नये. शेवटी भारताचेच ना? बेळगावचा प्रश्न, कारवारचा प्रश्न, असे अनेक प्रश्न येतील. बेळगाव म्युनिसिपालिटीने मागे ठराव केला की, आम्हाला महाराष्ट्रात अंतर्भूत करा. कारवारातील काही भागात मराठी, काही भागात कानडी आहे. दोन्ही भाषा पुष्कळांना समजतात. हे प्रश्न विकोपास जाऊ देऊ नका. कोठे तरी शेवटचे न्यायमंदिर आपण मानले पाहिजे. तेथील निर्णय मानायला हवा.

सर्वांत कठीण प्रश्न मुंबईचा आहे. मुंबई महाराष्ट्रात असावी की नसावी हा प्रश्न का निघाला, समजत नाही. मुंबईच्या सभोवती महाराष्ट्र आहे. मुंबई कोठे जाणार? मुंबईला पाणी महाराष्ट्रातून मिळते, मुंबईला वीज महाराष्ट्रातून मिळते. मुंबईला काम करायला कामगार महाराष्ट्र देतो, हिशोब ठेवायला महाराष्ट्र येतो. गरीब परंतु हृदयाने श्रीमंत अशा महाराष्ट्राची मुंबई आहे. मुंबईच्या धनसंपन्न लोकांचा असा दावा आहे की, आम्ही मुंबईचे वैभव वाढविले. आम्ही मरिन लाईनला राजवाडे उभारले, मलबार

हिलवर बंगले बांधले. या गिरण्या, हे कारखाने आमचे. या धनाढ्यांना एवढेच सांगणे की सारी संपत्ती श्रमांतून निर्माण होत असते. श्रमणारांच्या कष्टांतून ते वैभव फुलले आहे. तुम्हाला खोलीत कोंडले तर का पैसा निर्माण कराल? शेतकरी धान्य पिकवतो, तुम्ही विकता व कुबेर होता. गिरणीतील कामगार कापड विणतो, तुम्ही विकता नि कोट्यधीश होता आणि पुन्हा त्या संपत्तीच्या जोरावर तोरा मिरवता? हे न्याय्य नाही, माणुसकीला शोभणारे नाही.

धनाढ्यांनो, तुम्ही कोणीही असा, तुम्हाला भीती नको. महाराष्ट्रातील खेड्यापाड्यात मारवाडी, गुर्जर शेकडो वर्षे दुकाने थाटून बसले आहेत. आम्ही त्यांना कधी परके नाही मानले. तुम्हाला मुंबईत परके नको वाटायला, जरी ती महाराष्ट्रात गेली तरी महाराष्ट्र दिलदार आहे.

कोणी म्हणतात, मुंबईचा प्रश्न दहा वर्षे बाजूला ठेवा. का रे बाबा? दहा वर्षांची एखादी योजना असेल बहुधा. धनिक लोक भराभर सर्वत्र जागा घेऊन नव्या नव्या वस्त्या मुंबईच्या उपनगरांत करीत आहेत. सिंधी बंधू, गुर्जर बंधू सर्वत्र पसारा वाढवीत आहेत. दहा वर्षांनी म्हणाल, आता तर तेथे महाराष्ट्रीय अल्पसंख्यच आहेत ! आजच कोणी असे म्हणत आहेत. कोणी महाराष्ट्रीय म्हणतो की, त्या बिचाऱ्या सिंधी बंधूंच्या बोटी जवळच्या उखा बंदरात उतरविता आल्या असत्या; अहमदाबादमध्ये त्यांची भरती करता आली असती. मुंबईतच लाखो आणून का ठेवलेत? याच्या मागे भूतदयाच होती की मुंबईचा रंग पालटायचा होता? जेव्हा तुम्ही आणखी दहा वर्षांचे बोलू लागता तेव्हा अशा शंका डोकावू लागतात. म्हणून समाजवादी पक्षाने, मुंबई म्युनिसिपालिटीत प्रश्न दहा वर्षे दूर ठेवायचा असला तरी दहा वर्षांनंतरही मुंबई महाराष्ट्रातच राहील असे निश्चित ठरवा असे म्हटले, परंतु काँग्रेसी नगरपिते त्याचा विचारही करावयास तयार झाले नाहीत. मुंबईची काँग्रेस म्हणजे श्रीमंतांची काँग्रेस आहे. तिचे मत ते का मुंबईचे मत?

भाषावार प्रांतरचना करा असे म्हणताना जुने इतिहास दाखवणे अप्रस्तुत आहे. जुने इतिहास शौर्यधैर्याने भरलेले असले तरी त्यांच्या जोरावर इतर भारतीयांना नावे ठेवत असाल तर त्याला अर्थ काय? प्रत्येक प्रांताने कोठल्या ना कोठल्या काळात भव्य-दिव्य निर्माण केलेच आहे. कोणी कोणाला हिणवू नये. आपणास एकदिलाचा नवभारत निर्माण करावयाचा आहे. तो अशा तेढी वाढवून निर्माण होणार नाही.

शिवाजी पार्कवर एक वजनदार वक्ते म्हणाले, "संयुक्त महाराष्ट्रास हिंदी संघराज्यातून फुटण्याचाही अधिकार हवा." आणि या जबाबदार नेत्याने पुढे असे सांगितले, "आता नवरा-बायकोच्या काडीमोडीचाही कायदा झाला आहे !" त्यांना टाळ्या मिळाल्या, जणू राष्ट्राचे प्रश्न म्हणजे नवरा-बायकोचा चिमकुला संसार ! बाबांनो, गंभीर प्रश्नांचा असा खेळ नका करू. तुमचा होईल खेळ, राष्ट्राचा जाईल जीव. रशियन घटनेतही असा फुटून जायचा अधिकार आहे म्हणूनही कोणी बोलतात. तेव्हा या फुटून निघण्याच्या बोलण्याच्या पाठीमागे कम्युनिस्ट बौद्धिक आहे असे दिसते.

हिंदुस्थान एक राष्ट्र आहे असे आपण म्हणत आलो. मरहूम जिनांचा द्विराष्ट्रवाद आपण मान्य केला नव्हता. या देशातील मुसलमानांचीही केवळ भिन्न संस्कृती नाही. आम्ही एक संस्कृती निर्मित होतो. मुसलमान मूळचे येथलेच. जिनांनी ही गोष्ट मानली नाही. इंग्लंडमधीलही मोठमोठे हिंदुस्थान एक राष्ट्र नसून खंडप्राय देश आहे असे म्हणत. जिनांनी तर चुकूनही Subcontinent खंडप्राय देश याशिवाय उल्लेख केला नाही. अपरिहार्य म्हणून, द्विराष्ट्रसिद्धांत मान्य म्हणून नव्हे, पाकिस्तानलाही राष्ट्रनेते तयार झाले. आता महाराष्ट्रीय हे का निराळे राष्ट्र आहे? तिकडे द्रविडी लोकही निराळेपणाची भाषा बोलू लागले आहेत. म्हणजे जिनांचे म्हणणे एकंदरीत खरे का? हिंदुस्थानात अनेक राष्ट्रे आहेत, हे जे त्यांचे म्हणणे त्यालाच तुम्ही उचलून धरीत आहात का? म्हणजे अप्रत्यक्षपणे जिनांचेच अनुयायी सारे होत आहात.

हिंदी संघराज्यातील कोणत्याही भागाला फुटून निघण्याचा अधिकार असता कामा नये. मग राष्ट्रच कोठे राहिले? रशियाने कागदावर फुटून जाण्याचा अधिकार ठेवला तरी त्याची लष्करी ताकद एवढी अवाढव्य आहे की, फुटून जाण्याची भाषा कोण बोलेल? सूर्याने माझ्या भोवती फिरू नका असे म्हटले तरी ग्रह त्याच्याच भोवती बिचारे फिरत राहणार आणि रशियन संघराज्यात जितकी विभिन्न राष्ट्रे आहेत, तशी का येथे आहेत? मंगोलियातील लोक आणि युक्रेनमधील लोक यांच्यातील तफावतीप्रमाणे का हिंदी प्रांतामध्ये आहे? भारतीय संस्कृती एकरूप आहे. प्रांतीय भाषा निरनिराळ्या आहेत, परंतु त्या भाषांतून मिळणारे संस्कृतीचे दूध एकच आहे. साधुसंतांनी, आचार्यांनी भारतीय संस्कृती एकरूप केली आहे. कसला फुटून निघायचा अधिकार मागता?

युरोप खंडातील छोट्या छोट्या राष्ट्रांची दशा तर बघा. बेल्जियम, हॉलंड, नॉर्वे, फिनलंड, पोलंड–महायुद्ध पेटताच त्यांचे अस्तित्व क्षणात नाहीसे होते. तुम्ही ३० कोटींचे महान् राष्ट्र आज आहात. तुम्हालाही कोटी–दोन कोटींची छोटी छोटी राष्ट्रे बनण्याची अवदसा आठवली वाटते? संयुक्त महाराष्ट्राच्या पुरस्कर्त्यांनी नि:शंक वाणीने सांगून टाकले पाहिजे की, 'फुटून निघण्याचा हक्क आम्ही मागणार नाही, एंवढेच नव्हे तर तो कोणालाच असता कामा नये.' हृदयाजवळून हातपाय अलग होऊ लागले तर तेही मरतील, आणि केवळ निरवयव हृदयही जगू शकणार नाही.

काही जबाबदार मंडळींनी फुटून निघण्याचे हे सूतोवाच एव्हापासून का सुरू केले? ते जाणतात की, उद्या मुंबई महाराष्ट्रात आली म्हणजे प्रश्न सुटण्याऐवजी गुंतागुंतीचा होणार. मुंबई महाराष्ट्राला कोणते उत्पन्न देणार बरे? येथे शेतसारा, जंगल नाही, मुंबईचे उत्पन्न प्राप्तीवरील कराचे व आयात–निर्यात जकातीचे. परंतु ही दोन्ही उत्पन्ने मध्यवर्ती सरकारलाच जातात. उद्या ३० लाख वस्तीच्या मुंबईच्या कारभारासाठी आम्हाला पैसा खर्च करावा लागणार. मुंबई देणार मात्र काही नाही. पांढरा हत्ती पोसावा तसे व्हायचे. मग येथील प्रांतिक प्रतिनिधी मध्यवर्ती सरकारला म्हणतील, यांतील बरेचसे उत्पन्न प्रांताला पाहिजे. मध्यवर्ती सरकार म्हणेल, 'ब्रिटिश होते त्यापेक्षाही लष्कराचा खर्च अधिक येणार, ब्रिटिशांची मुख्य लष्करी ताकद विलायतेत होती. आपणास तर सारेच येथे उभे करावे लागणार. पैसे कसे द्यावयाचे?' असा विरोध असला तर 'तुमचे आमचे पटत नाही, आम्ही फुटून निघतो' असे म्हणावयाचे. कम्युनिस्ट तर म्हणतील, 'फुटून स्वतंत्र व्हा व रशियन संघराज्यात सामील झाल्याचे जाहीर करा. रशियाची ताकद तुमच्या मागे मग उभी राहील.' संयुक्त महाराष्ट्राचे काही पुरस्कर्ते कम्युनिस्टांच्या धोरणाचे आहेत, म्हणून फुटून निघण्याच्या या सुरामुळे भेसूर भविष्य डोळ्यांपुढे उभे राहते. वेळीच सावध राहा.

ज्याप्रमाणे हिंदी संघराज्यातून फुटून जाण्याचा अधिकार असता कामा नये, त्याचप्रमाणे उपप्रांताच्या भाषेचा चावटपणा बंद झाला पाहिजे. नागपूर ते मराठी कारवार एकजिनसी, सलग प्रांत उभा राहिला तरच शोभा. जनतेसमोर संयुक्त महाराष्ट्राच्या किंवा इतर नुसत्या डरकाळ्या नकोत. राणा भीमदेवी भाषणांनी जनता अंधारात राहते. जनतेला सांगा की, उपप्रांत होणार नाही. हिंदी संघराज्यातून फुटून निघणार नाही. हिंदुस्थानचेच आपण अवयव; आपले हृदय एक, आत्मा एक,

भाषेच्या सोईसाठी प्रेमाने अलग व्हावयाचे, परंतु हे खेळीमेळीने, सर्वांच्या सोईने, उपप्रांताची भाषा काढलीत की, मुंबई शहरही मग एक स्वायत्त उपप्रांत म्हणून राहील.

उपप्रांताचे तुणतुणे का बरे वाजविण्यात येते? आपापल्या छोट्या प्रदेशातील आपली मिरासदारी दूर होईल असे का काहींना वाटते? ज्याप्रमाणे पूर्वी नोकऱ्या चाकऱ्यांकरिता आपापल्या जातीच्या संकुचित संघटना उभारीत त्यातलाच का हाही एक प्रकार? उपप्रांताचा सूर काढून संयुक्त महाराष्ट्राचा विचका करू नका. संयुक्त महाराष्ट्रात प्राण ओतीत असतानाच त्याचे दुसरीकडे हातपाय तोडून ठेवू नका.

खरे म्हणजे माझी वृत्ती भारतीय आहे. एका भारताची मूर्ती मनासमोर येऊन मी उचंबळतो. माझ्या मनात कोणता भाग कोठे असला पाहिजे हे फारसे येत नाही; परंतु जनतेच्या न्याय्य भावना असतात. राष्ट्रभाषा असली तरी त्या त्या प्रांतांतील जनता तेथील भाषेवर पुष्ट होणार. प्रांतीय मातृभाषेपासूनच विचारांचे दूध मिळणार. म्हणून भाषावार प्रांतरचनेची आवश्यकता. मुंबई कोठे असावी, अमुक भाग कोठे असावा याची चर्चा मला दु:खद होते; परंतु जेव्हा न्यायाची भाषा बोलली जाते, तेव्हा न्याय नीट मिळायला हवा. व्यापाराचे निमित्त करून मुंबई हिरावू पाहाल तर पैसा हे तुमचे दैवत ठरेल, आणि श्रमणाऱ्यांना कस्पटासमान लेखता असे म्हणावे लागेल. मुंबई न दिली तर महाविदर्भही यायला तयार नाही हे माहीत असूनही मुंबई न देणे म्हणजे महाराष्ट्राचे तुकडेच ठेवणे तुमचे ध्येय आहे असे दिसते. महाराष्ट्राची शक्ती खच्ची करून ठेवण्यातच काँग्रेस श्रेष्ठींना पुरुषार्थ वाटतो का?

मला असे का वाटते? त्याचे कारण असे, माझा प्यारा महान भारत मी हिंडून फिरून कधी पाहू? मुंबई म्हणजे भारताची पुंजीभूत मूर्ती. येथे महाराष्ट्रीय, गुजराती, पारशी, मारवाडी आहेतच. येथे दूध वाटणारे भैये आहेत आणि सिंधू नदीचे सिंधी बंधू आले आहेत. येथे माटुंगाच्या बाजूला मद्रासी बंधू व पाण्याचे नारळ विकणारे मोपला आहेत. येथे मलबारी, तामिळी, तेलगू सारे आहेत. येथे समुद्र उचंबळत आहे, त्याप्रमाणे मानव-सागरही उसळत आहे. त्या त्या प्रांतीय जनतेच्या लाटा येथील महान महामानव सिंधूत नाचत आहेत, खेळत आहेत. मुंबई पाहून भारत पाहिल्याचे श्रेय मिळते. हिंदू, मुसलमान, शीख, पारशी, ख्रिस्ती सर्व धर्मांचे येथे कितीतरी लोक. येथे सर्व धर्मांची पूजास्थाने. सारे प्रांत, साऱ्या जातीजमाती; सारे

धर्म यांचा महान मुंबापुरीत संगम झालेला आहे. हिंदुस्थानभर अशी काही मानवसंगमतीर्थे आपण निर्माण करूया.

मद्रास, कलकत्ता, मुंबई ही शहरे म्हणजे सर्व भारतीयांची जणू आहेत. आपण वाद न माजवता असे नाही का म्हणू शकणार? मुंबईतील महाराष्ट्रीयेतर जनता जर अशा उज्ज्वल नि उदात्त ध्येयवादाने प्रेरित होऊन भक्तिभावाने म्हणेल, 'आपण मुंबई सर्वैक्याचे प्रतीक करूया. सर्वांना एकत्र नांदवण्याचा प्रयोग करणारे तीर्थक्षेत्र करू या.' तर किती सुंदर झाले असते ! परंतु त्यांच्याजवळ ही दृष्टी नाही. ते 'आमचे पैसे, आमचे कारखाने, आमचे बंगले, आमचे वैभव' अशी भाषा बोलू लागतात. मग साहजिकच महाराष्ट्रीय म्हणतो, 'हे सारे वैभव आम्हीच निर्मिले, श्रमून, झिजून, आमचीच मुंबई, तुमची नाही.' भारतीय ऐक्याचे प्रतीक, या भावनने फार तर मुंबई स्वतंत्र ठेवा असे नम्रपणे, भक्तिभावाने एखादा भारतीय भावनेत रंगलेला माझ्यासारखा दूरचा मनुष्य म्हणू शकेल. मला एक मित्र म्हणाला, "तुमचे असे मत असले तरी कृपा करून लिहू नका, बोलू नका." मी म्हटले, "मी लिहिले किंवा बोललो म्हणून त्याचा परिणाम होणार आहे अशी भीती तुला वाटायला नको. ही भावना माझ्या मनातच मला पूजावी लागेल." प्रांतांच्या उभारणी नि संहारणी यात मला गोडी नाही. थोडा भाग इकडे वा तिकडे, मला त्यात विषाद नाही. काटेकोरपणा सोडून थोर दृष्टीनेच हे प्रश्न सोडवायला हवेत, अलग व्हायचे असेल तर व्हा, परंतु द्वेष-मत्सर वाढणार नाहीत म्हणून जपा. अखिल भारतीय दृष्टी ठेवा. फुटीरपणा वाढीला न लागो. प्रत्येक प्रांताची मोठी स्वतंत्र संस्कृती आहे असे नाही. भारतीय संस्कृतीचाच सुगंध प्रांतांतून घमघमत आहे. भाषा निराळी; थोडे रीतिरिवाज निराळे, परंतु तुम्हा सर्व भारतीयांचे हृदय एक.

ही एकता मनात जागृत असावी म्हणून तर आपण बद्रीकेदारपासून रामेश्वरपर्यंत जातो.

तुम्हाला देवी अहिल्याबाईंची मंगल प्रथा माहीत आहे का? त्या प्रातस्मरणीय मातेने अशी व्यवस्था केली होती की, रोज काशीतील गंगेची कावड, रामेश्वरावर ओतली जावी. कावडीवाले येतच आहेत. अखंड रांग जणू चालू आहे. हा त्यांच्याजवळ कावड देत आहे, तो त्याच्याजवळ. आज ही पद्धत सुरू आहे की नाही मला माहीत नाही. आज आगगाडीने, विमानाने हे सोपेही आहे; परंतु ज्या

काळात हे कठीण त्या काळातही आपण काशी, रामेश्वर, द्वारका नि जगन्नाथ अशी दृष्टी ठेवीत होतो. आज व्यवस्थेसाठी, त्या त्या प्रांतीय भाषांतूनच जनता बोलणार, शिकणार; म्हणून आपण सवते प्रांत केले, तरी हृदय काशीतील गंगेची कावड अखंड भारताच्या शिवपिंडीवरच सदैव अभिषेक करीत राहो. हीच माझी आशा, हेच माझे स्वप्न!

महाराष्ट्र मोठ्या दृष्टीचा होऊन अंतरी महाभारताचा जागृत उपासक असो एवढेच हात जोडून सांगणे, अधिक काय?

थोडक्यात, भारतीय दृष्टी न सोडता, प्रांत जोडीत असतानाच तो न तोडता, कोणालाही न हिणवता, द्वेष-मत्सर वाढणार नाहीत, याची अति काळजी घेऊ. सीमाप्रश्न सीमासमितीमार्फत सहृदयतेने सोडवून, भाषावार प्रांतरचना निर्मून हे पथ्य पाळू तर सारे साजिरे-गोजिरे होईल. नाहीतर या मंथनातून हलाहले मात्र निर्माण व्हायची. हलाहले प्राशून शांती देणारा, वाचविणारा मृत्युंजय महात्माही निघून गेला. अशा परिस्थितीत देशाचे भवितव्य खडतर दिसते.

'मारी नाड तमारे हाथे
प्रभू सांभाळजो रे'

प्रभो, या महान राष्ट्राची नाडी तुझ्या हातात असो. तूच सांभाळणारा!

एखादे वेळेस माझे काही मित्र मला माझे ध्येय विचारीत असतात. मानवतेचे सर्वत्र दर्शन व्हावे, सर्वत्र ममता असावी असे तर मला वाटतेच. ना कोणी उच्च ना कोणी हीन. माझ्या जीवनात तरी हे भेदाभेद नकोत असे मला वाटते. मी काँग्रेसच्या चळवळीत सामील झालो. स्वातंत्र्यार्थ हातून काही व्हावे ही ओढ तर होतीच, परंतु काँग्रेस म्हणजे मानवतेचे प्रतीक मला वाटे. माझी जातिधर्मनिरपेक्ष वृत्ती. काँग्रेस सर्वांची म्हणून मला तिचे प्रेम वाटे.

१९३० मध्ये धुळे तुरुंगात असताना थोर विधायक कार्यकर्ते श्री. शंकरराव ठकार यांनी मला विचारले, "तुम्ही पुढे काय करणार?" मी म्हटले, "मी खऱ्या धर्माचा लोकांत प्रचार करीन, मानव धर्माचा प्रचार करीन."

हिटलरने आत्मचरित्रात म्हटले आहे, "पक्ष्याचे जसे पंख तसे मला राजकारण." पंख म्हणजे पक्ष्याचा प्राण. जटायू रावणाला म्हणाला, "माझे प्राण माझ्या पंखांत

आहेत." हिटलरला राजकारण प्राणमय वाटत होते. राजकारणाशिवाय तो जगता ना. मला राजकारणात माझा प्राण असे वाटत नाही. राजकारण खेळायला जी वृत्ती लागते ती माझ्याजवळ नाही. सद्भावाने, थोर मार्गाने राजकारण करायचे असले तरी तेथे एक अभिनिवेश लागतो. शिवाय संघटना करावी लागते. मला संघटना जमत नाही. एखाद्या ध्येयासाठी मी प्रचार करीन, प्राणार्पण करीन, परंतु तणावे बांधणे मला जमत नाही.

आज मी कॉँग्रेसमध्ये नाही. ध्येयभूत कॉँग्रेस माझ्या हृदयात आहे. गरिबांना जवळ घेणारी, जमीन नाही त्याला जमीन देणारी, कोठे आहे ती कॉँग्रेस? ती माझ्या स्वप्नात आहे. ती ध्येयभूत कॉँग्रेस मला समाजवादी पक्षाजवळ दिसते, म्हणून त्यांच्याविषयी मला प्रेम वाटते, आस्था वाटते. समाजवादी पक्ष आज निर्मळ मार्गाने जाऊ इच्छितो. लवकर समाजवाद यावा म्हणून त्याची धडपड. संयमाने, धीरोदात्तपणाने तो पक्ष जात आहे, परंतु त्या पक्षाबद्दल श्रद्धा नि निष्ठा मला असली तरी मला त्यांचे संघटनात्मक कामं जमत नाही. त्यांच्या कायद्यांचा अभ्यास, त्यांच्या दैनंदिन तक्रारी सोडवणे, मिटवणे, लेबर ऑफिसरकडे जाणे, औद्योगिक कोर्टात जाणे, सरकारी मंत्र्यांस भेटणे, मला हे जमत नाही. त्याप्रमाणेच शेतकऱ्यांचीही संघटना मी करू शकत नाही. त्यांचे प्रश्न सोडवणे, कुळकायदा अभ्यासून त्यांना न्याय मिळवून देणे, सहकारी संस्था चालवणे, मला हे जमणार नाही. एक प्रकारे मी अशा कामाला अक्षम आहे.

मग माझे काम काय, ध्येय काय? समाजवादाचा मोघम प्रचार मी लेखनाने, बोलण्याने करीत असतो. उदार विचारांचा प्रचार व्हावा म्हणूनही मी धडपडतो. जातिधर्मातीत दृष्टी भारतीयांना यावी असे मला किती वाटते! समाजवाद यायला हवा असेल तर जातिभेद, प्रांतभेद, भाषाभेद आपण विसरणे अवश्य आहे. मानवतेचे वातावरण सर्वत्र आले तर समाजवाद येथे वाढणे सोपे होईल, म्हणून सेवा दलाकडे माझा ओढा. सेवा दलाची मुले भंगी, मुसलमान, हरिजन सर्वांना घरी जेवायला बोलावतात, आपण त्यांच्याकडे जातात हे ऐकून मी उचंबळतो. सेवा दल नवराष्ट्र निर्माण करीत आहे असे मला वाटते.

ज्या लहानशा खोलीत भारताची सारी लेकरे एकत्र जेवत आहेत, प्रेमाने बोलत आहेत, तेथे भारतमाता आहे, तेथे परमात्मा आहे. समाजवाद, सेवा दल यांच्यासाठी

म्हणून माझा जीव तळमळतो. मुंबईच्या परवाच्या निवडणुकीच्या वेळेस मी झोपताना देवाला म्हणे; 'देवा, गरिबांच्या या पक्षाला यश दे. या मित्रांना ना वृत्तपत्र, ना पैसा, ना सरकारी पाठिंबा. एकीकडे जातीय लोक, दुसरीकडे सत्ताधारी श्रीमंत लोक, यांच्यामध्ये समाजवादी पक्ष उभा आहे. महाराष्ट्रीय बहुसंख्य मतदार. तरी एक गुजराती मित्र उभा. समाजवादी उमेदवार यशस्वी होणे म्हणजे भारतीय वृत्ती यशस्वी होणे. हा गुजराथी, हा महाराष्ट्रीय आम्ही जाणत नाही. कोणत्या तत्वासाठी, सिद्धांतासाठी व्यक्ती उभी आहे हे आम्ही बघतो.' पुरुषोत्तम यशस्वी झाले ही फार मोठी गोष्ट आहे. समाजवादी वृत्ती देशात वाढणे ही अति मौल्यवान वस्तू होय.

एक काळ असा होता की, ज्या वेळेस सारे सोडून कोठे हिमालयात जावे असे मला वाटे. देव भेटावा असे वाटे, परंतु विकारांनी बरबटलेल्यास ना देव ना धर्म. देव हिमालयात भेटतो आणि येथे नाही का? प्रभूचा साक्षात्कार म्हणजे सर्वत्र मंगलाचे दर्शन, आपापल्या ध्येयासाठी झगडत असताही दुसऱ्यांविषयी मनात सहानुभूती ठेवणे. आज मला देव भेटायची तहान नाही. मी माझ्या जीवनात धडपडत असतो. आपल्या क्षुद्रतेला जिंकू पाहात असतो. प्रभूचे स्मरण होताच जेथे असेन तेथे मी डोके ठेवितो, नि मला समाधान लाभते. मला ऐक्याची तहान आहे. भारताला मी जगाचे प्रतीक मानतो. भारताच्या सेवेत मानवजातीची सेवा येऊनच जाते. तेथे सारे धर्म, सर्व संस्कृती. रामकृष्ण परमहंसांनी सर्व धर्मांचा साक्षात्कार करून घेतला. महात्माजींनी सर्व धर्म जीवनात आणले. दिवसेंदिवस आपण सर्वांनी ही एकता, विश्वात्मकता अनुभवायची आहे.

१९३० मध्ये आम्हाला त्रिचनापल्लीच्या तुरुंगात ठेवण्यात आले होते. अमळनेरच्या हायस्कुलातील नोकरी सोडून मी सत्याग्रहात सामील झालो होतो. आमच्या शाळेत एक बंगाली मित्र होते. त्रिचनापल्लीच्या तुरुंगातील एक मित्र श्री. व्यंकटावलम सुटणार होते. ते बी. एससी. होते. त्यांना तामील, तेलगू, तामिळ मल्याळम भाषा येत होत्या. मी अमळनेरच्या मित्रांना लिहिले, 'यांना आपल्या शाळेत घ्या. बंगाली मित्र आहेत. हे दक्षिणेकडील एक मित्र होतील. आपली शाळा भारतीय ऐक्याचे प्रतीक होवो. भारतातील सर्व प्रांतांतील तेथे शिक्षक असोत. त्या त्या प्रांतांची भाषा कानी येईल. त्या त्या प्रांताची संस्कृती, वाङ्मय सारे कळेल.' मी असे पत्र लिहिले होते. तेव्हापासून माझ्या मनात स्वप्न होते की, केव्हा तरी अशी संस्था क़ाढायची-ज़ी भारताचे ऐक्य शिकवील, अनुभवील.

आपण अखंड भारत म्हणून जगत आलो, परंतु या भारताचे आपणास ज्ञान नाही. हे सारे प्रांत माझे, या सर्व भाषा माझ्या, हे सारे माझे भाऊ, सर्वांना भेटेन, सारे अभ्यासीन–असे आपणास कोठे वाटते? महात्माजी देशातील निरनिराळ्या भाषा वेळात वेळ काढून अभ्यासीत. पू. विनोबाजी तेच करीत आले. आपणापैकी कितीकांना ही तहान आहे? मुंबईत रशियन, जर्मन, फ्रेंच वगैरे भाषा शिकवायची सोय आहे, परंतु अशी संस्था नाही – जेथे सकल भाषा शिकता येतील.

म्हणून आंतरभारती संख्या स्थापण्याचे माझे कधीपासूनचे स्वप्न. सुंदरशी जागा असावी, सरकारजवळ मागावी किंवा कोणी भल्या सज्जनाने दिली तर कृतज्ञतेने घ्यावी. तेथे त्या त्या प्रांतीय भाषेतील कोणी तज्ज्ञ असतील. त्या सर्वांना हिंदी येत असावे. त्या त्या भाषेतील वाङ्मय तेथे राहील.

संस्थेला जोडून विद्यालय असावे. शेती, हस्तोद्योग असावेत. भारतीय भाषा शिकण्याची तेथे सोय होईल. विद्यार्थ्यांच्या कानावर सर्व भाषा पडतील. निरनिराळ्या साहित्याचा मराठीला परिचय करून देण्यात यावा. इतर भाषांतूनही मासिके काढून त्या त्या प्रांतियांना सकल भारताची ओळख करून द्यावी – असे माझे स्वप्न.

गुरुदेव रवींद्रनाथ विश्वकवी. त्यांनी विश्वभारती स्थापिली. जगाचा नि भारताचा संबंध असू दे. पूर्व ती पूर्व, पश्चिम ती पश्चिम असे नाही. पूर्वेकडून निघाला तो पश्चिमेला भेटतो. पश्चिमेकडून निघाला तो पूर्वेला भेटेल. पृथ्वी वाटोळी आहे. पूर्ण आहे. भारत विश्वाच्या ऐक्याचा अनुभव घेण्यासाठी आहे, परंतु विश्वाचा अनुभव घेण्यासाठी स्वतःचा अनुभव घ्यावा.

भारतातील प्रांतांची तरी एकमेकास ओळख कोठे आहे? त्या त्या प्रांताचे सांस्कृतिक कार्य, नवसर्जन आपणास कोठे आहे माहीत?

प्रांतभारती भारतीयांना एकमेकांची भक्तिप्रेमाने ओळख करून देईल. त्या त्या प्रांतातील प्रमुखांच्या सर्व तसबिरी तेथे राहतील, हे सारे नवभारत निर्माते असे नवपिढीला सांगण्यात येईल.

केवळ भाषांचा अभ्यास हेच काही या संस्थेचे ध्येय नव्हे. तेथे दुसऱ्याही अनेक चळवळी जोडाव्यात असे मनात आहे. कला आणि ग्रामीण जीवन यांचा तेथे अभ्यास व्हावा. ग्रामीण धंद्यांतून कला कशी नेता येईल ते तेथे कलावान सांगतील. साध्या चटयाच विणायच्या, परंतु त्यांच्यात सुंदरता कशी आणता येईल; साध्या बांबूच्याच

टोपल्या, परंतु त्यात कला कशी मिसळता येईल, साधी मातीचीच भांडी, परंतु ती रमणीय कशी करता येतील—हेही येथे अभ्यासिले जावे, शिकविले जावे.

म्हणून ग्रामोद्योगतज्ज्ञ व कलावान यांना तेथे सन्मानाचे स्थान राहील. नाना प्रकारचे नृत्य प्रकार-तेही तेथे संग्रहित करून त्यांचा प्रचार करू. सहकारी जीवनाचे येथे शिक्षण देऊ. जर संस्थेभोवती बरीच जमीन असेल तर फुलझाडे, शेती, फळझाडे यांचे प्रयोग करू. विद्यार्थी श्रमतील, नवीन नवीन निर्माण करतील. माझ्या मनातील स्वप्न अनंत आहे ते कागदावर कोठवर मांडू?

राष्ट्राचे महान ऐक्य जीवनात अनुभवण्याचे मंगल प्रयत्न होवोत. निरनिराळ्या थोर कल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी देशातील सर्व प्रकारचे लोक एकत्र श्रमत आहेत असे देखावे राष्ट्रभर दिसू लागले पाहिजेत. हिंदू-मुसलमान, स्पृश्य-अस्पृश्य सारे एकत्र येऊन नवनिर्मिती करत आहेत, भिन्न भिन्न प्रांतीय लोकही परस्परांस प्रेमाने भेटत आहेत, परस्परांच्या संस्था पाहात आहेत, मदत देत आहेत, त्यातून स्फूर्ती घेत आहेत असे व्हायला हवे. भारतीय आत्म्याचे ऐक्यसंगीत अनुभवायला विविध कर्मांची सहस्रतंत्री भारतभर वाजू लागली पाहिजे. मला अशा भव्य प्रयोगाला कोठे आरंभ करता येईल, प्रभू जाणे !

साहित्याबरोबर तेथे चित्रकला, नृत्यकला यांचाही अभ्यास असावा. सहकारी शिक्षण दिले जावे. नवभारताच्या निर्मितीचे ते एक तीर्थक्षेत्र असावे. माझ्या डोळ्यांसमोर सुंदर स्वप्न आहे. प्रांतभारतीतील मुले सुटीत खेडोपाडी जातील. मेळे, संवाद करतील, स्वच्छता करतील. प्रांतभारतीतून सहकारी चळवळ फैलावायला ध्येयवादी तरुण बाहेर पडतील. ग्रामीण कला येथे फुलतील. कोकणातील काटखेळ, नाना नाच येथे अभ्यासले जातील. मौज-आनंद ! सेवा, संस्कृती उदारता, ज्ञान, विज्ञान, कला-एक गंभीर अशी प्रवृत्ती प्रांतभारती निर्मू पाहील.

परंतु हे स्वप्न कृतीत कसे आणायचे? महाराष्ट्रभर भिक्षा मंडळे तालुक्या तालुक्याला स्थापावीत. आठवड्यांतून एक दिवस या संस्थेसाठी भिक्षा मागणारे तरुण असावेत. शंभर तालुके धरले तर महिन्यांतून चार वेळा म्हणजे ४०० वेळा भिक्षा मागितली जाईल. पाच रुपये प्रत्येक भिक्षेत मिळाले तर दोन हजार रुपये मिळतील. संस्थेचा खर्च त्यातून भागवावा. कोणी देणगी देईल. सरकारही आपले आहे. ते नाही का वार्षिक मदत देणार? सारे सुंदर होईल. असे मनात तर येते, परंतु आरंभ केल्याशिवाय सरकारजवळ काय मागू?

महाराष्ट्रभर गीतेवर प्रवचने देत हिंडावे, बृहन्महाराष्ट्रभर हिंडावे, प्रवचनाच्या शेवटच्या दिवशी माझ्या या प्रांतभारतीच्या स्वप्नासाठी मदत मागावी असे मनात येत आहे. महाराष्ट्रभर मजविषयी प्रेमस्नेह बाळगणारे अनेक मित्र आहेत. त्यांना माझ्या या ध्येयपूर्तीसाठी मला नाही का मदत देता येणार? मी साऱ्या महाराष्ट्रासमोर माझे चिमुकले हात पसरीत आहे. हे स्वप्न पूर्ण करायला द्याल का मदत? महाराष्ट्राला भूषणभूत ही संस्था होवो. भारतीय ऐक्याचे थोर ध्येय शिकवणारी प्रांतभारती प्रियतम महाराष्ट्रात उभी राहो.

पुण्याला मराठी साहित्य संमेलन आहे. प्रांतभारतीच्या माझ्या स्वप्नाला पाठिंबा द्या अशी कदाचित् मी तेथे जाऊन सर्वांना प्रार्थना करीन; परंतु माझी संकोची वृत्ती. तेथे जाऊन बोलण्याचे मला धैर्य होईल की नाही प्रभू जाणे.

तुकारामांनी म्हटले आहे, "मेली लाज धीट केलो देवा." माझी भीती, खोटी लाजलज्जा जाऊन या स्वप्नाच्या पूर्तीसाठी नम्रपणे परंतु निर्भयपणे साहित्य संमेलनातील सज्जनांसमोर येऊन मी सहानुभूतीची भिक्षा मागितली तर मला हसू नका, उपहासू नका. भारतीय ऐक्याच्या साक्षात्कारासाठी तहानलेले महाराष्ट्राचे मी एक धडपडणारे लेकरू आहे. या लेकराची आळी थोरामोठ्यांनी पुरवावी.

'केली पुरवी आळी
नव्हे निष्ठुर कोवळी !'

महाराष्ट्रीय जनता निष्ठुर न होता, कोवळ्या वृत्तीने एका मुलाचा ध्येयार्थी हट्ट, हे स्वप्न, ही असोशी पुरवील अशी मला आशा आहे.

प्रांतभारतीच्या मूर्त स्वरूपासाठी धडपडण्याचे अतःपर मी ठरवीत आहे. हा संकल्प पार पाडायला प्रभू मला शक्ती देवो. सत्य संकल्पाचा तोच एक दाता !

प्रचड इमारत जव्हा उभारण्यात यत तव्हा आपल्याला काय ादसत? गवडा दगडांना इकडे तिकडे काटीत छाटीत असतो. मगच दगडांना त्या भव्य इमारतीत जागा मिळते. ज्याप्रमाणे दगड-विटा सारख्या करून त्यांची पुढे आलेली टोके काटून छाटून घ्यावी लागतात, त्याचप्रमाणे दगडा-दगडांमध्ये, विटा-विटांमध्ये सिमेंटही लागते; चुना लागतो. प्राचीन इमारती अजून भक्कम आढळतात. म्हणतात की, चुन्यात गूळही घालीत असत.

आज स्वतंत्र भारताची टोलेजंग इमारत उभारावयाची आहे. भाषावार प्रांत-रचना पूर्वीच मंजूर झालेली आहे, परंतु अशी रचना केली जात असता द्वेष, मत्सर न फैलावीत परस्पर प्रेम राहो, सहकार्य राहो. भारताचे एक हृदय आहे – ही जाणीव सर्वांना असो.

परमेश्वराला सहस्रशीर्ष, सहस्रांक्ष अशी विशेषणे आपण देतो, परंतु सहस्रहृदय असे विशेषण कधीच आढळत नाही. परमेश्वराला हृदय एकच, त्याप्रमाणे भारताचे प्रांत अनेक झाले तरी अंत:करण एक असो.

भारताची एक संस्कृती आहे. प्रत्येक प्रांताची एक विशिष्ट अशी संस्कृती कोठे आहे? थोडेफार फरक असतील, परंतु तेवढ्याने संस्कृती भिन्न नाही होत. भारतातील प्रत्येक प्रांताची का भिन्न संस्कृती आहे? भारतीय संस्कृतीची ध्येये आपल्या संस्कृत ग्रंथांतून आहेत.

वेद, उपनिषदे, रामायण, महाभारत, स्मृतिपुराणे–दर्शने यातूनच आपणास ध्येये मिळाली. संस्कृतातीलच हे ध्येय–घोष प्रांतीय भाषांतून जनतेचे कैवारी जे संतकवी त्यांनी दुमदुमविले. कृतिदासांचे रामायण बंगालीत, श्रीधरांचा रामविजय मराठीत, कंथसचे रामायण तामिळमध्ये; परंतु त्या त्या प्रांतातील जनतेला त्यांच्या त्यांच्या भाषेतून राम, सीता–लक्ष्मण, भरत, हनुमान यांचे जे आदर्श मिळाले ते का निरनिराळे आहेत? भगवान शंकराचार्य जन्मले मलबारात, परंतु तो ज्ञानसूर्य हिंदुस्थानभर गेला. द्वारका, जगन्नाथपुरी, बद्रीकेदार, शृंगेरी–चारी दिशांना चार पीठे स्थापून संस्कृतीचे ऐक्य निर्माण करता झाला.

शंकराचार्यांच्या अद्वैताचा सुगंधच सर्व प्रांतीय भाषांतील साहित्याला येत आहे. तुकारामांच्या अभंगात, नरसी मेहतांच्या भजनात, रवींद्रनाथांच्या गीतांजलीत, श्री बसप्पांच्या वचनात एकाच संस्कृतीची ध्येये दिसून येतील. भारतीय संतांनी आणि आचार्यांनी भारतीय संस्कृती एकरूप केली.

नामदेवांचे अभंग शिखांच्या धर्मग्रंथात जातात, कबीराची गाणी नि दोहेरे, मीराबाईंची उचंबळवणारी गीते, गोपीचंदांची गाणी सर्व हिंदुस्थानभर गेली आहेत. दक्षिणेकडील यात्रेला उत्तरेकडील लोक येत. उत्तरेच्या यात्रांना दक्षिणेकडील संस्कृतातून चर्चा चाले. तीच प्रांतीय भाषांतून मग जाई. अशा प्रकारे अखिल भारतीय संस्कृती आपण निर्मिली.

भारतीय संस्कृतीच्या कमळाच्या अनेक पाकळ्या म्हणजे या प्रांतीय संस्कृती, त्या अलग नाहीत. परवा कलकत्यात डॉ. कटजू आले होते. त्यांचे स्वागत करताना बंगाली पुढारी म्हणाले, ''बंगाली संस्कृती निराळी आहे. तिच्या विकासात अडथळे आणू नका.'' बंगाली संस्कृती निराळी म्हणजे काय? तुमचे विवेकानंद, विद्यासागर, रामकृष्ण, बंकिम, रवींद्र, शरदबाबू-यांनी का असे काही दिले की जे इतर प्रांतात नाही, जे इतर प्रांतांच्या परंपरांहून निराळे आहे? आज प्रत्येक प्रांताला असे वाटू लागले आहे की, आपण इतरांहून अगदी वेगळे, निराळे. बाबांनो, भाषा निराळी बोलत असाल, परंतु आईच्या दुधाबरोबर एकच संस्कृती भारतीय मुलांना पाजली जात आहे हे विसरू नका.

१९३० मध्ये आम्ही मुंबई प्रांतातले राजबंदी त्रिचनापल्लीला पाठवले गेलो. सायंकाळी प्रार्थना झाल्यावर कोणी काही लिहून वाची. व्यंकटाचलम् म्हणून मुंबईचा एक राजबंदी माझा मित्र झाला होता. मी त्याला इंग्रजीत काही लिही. त्याची भाषा मल्याळी. त्याने 'मलबारकडचा एक दिवस' म्हणून लेख लिहिला. मी त्याचे भाषांतर करून वाचले.

'सकाळी बायका उठतात, चूल सारवतात, सडासंमार्जन करतात. मग कॉफी होते. आजीबाई भाजी चिरते. आजोबा पूजेला बसतात. सुना तळ्यावर धुणी घेऊन जातात...' असे ते वर्णन होते. ऐकल्यावर महाराष्ट्रीय मित्र म्हणाले, 'आपल्याकडच्यासारखेच आहे.' मी म्हटले, 'भारताचे हृदय एकच आहे.'

तेलगू भाषेत आपल्या 'शारदा' नाटकासारखे नाटक आहे. तेच प्रश्न, त्याच सामाजिक समस्या. हुंडे, स्पृश्यास्पृश्यतेचे प्रकार. म्हणून मी म्हणतो की, भारतीय संस्कृती एक आहे; प्रांताप्रांताच्या विशेष अलग अशा नाहीत.

परंतु एकदा कोठे शुद्धीच्या नावावर हकालपट्टी सुरू झाली म्हणजे ती कोठे थांबेल ते सांगता येणार नाही. मराठीतून उर्दू शब्द हाकला चळवळ सुरू झाली. नाना शब्दांच्या नाना छटा असतात. आकाश शब्द नि अस्मान शब्द आपण एकत्र नाही घालणार, परंतु विवक्षित छटा दाखवायला अस्मान शब्द सुंदर वाटतो. साऱ्या जगातून घ्यावे, पचवावे अन् बलवान व्हावे. इंग्रजी कोषात, राजा, सरदार, जंगल इत्यादी शब्द आढळतील. शेकडो ठिकाणचे त्यांनी शब्द घेतले. भाषाशुद्धीची चळवळ आणि प्रांत शुद्धीची चळवळ, हिंदूंनी मुसलमानांना हाकलावे, मुसलमानांनी हिंदू-

शिखांना हाकलावे, एकमेकांची घाण जणू दूर काढावी असे प्रकार सुरू झाले; परंतु मुसलमानांनी हिंदू-शिखांना आणि हिंदू-शिखांनी मुसलमानांना हाकलल्यानंतर पुढे काय?

हाकलावयाची तर गोडी वाटू लागली. मग बंगाल्याने बिहाऱ्याला चले जाव म्हणावे, बिहारीने बंगालीला, तामिळ बंधूने तेलगू बंधूस, तेलगू बंधूने तामिळ बंधूस, कानडी बंधूने महाराष्ट्रीयांस, महाराष्ट्रीयांनी गुजराथीयांस-असे का एकमेकांना खो देत राहावयाचे? आज हे प्रकार सुरू होत आहेत. श्री. जयप्रकाश मद्रासच्या दौऱ्यावर असताना आम्हाला स्वतंत्र द्रविडीस्थान द्या, आर्यांनी आमचा नाश केला, आर्य भाषेतील शब्द काढून टाका, अशा चाललेल्या चळवळी त्यांनी पाहिल्या. त्यांना दु:ख झाले. कोठे आहे भारत? प्रत्येक प्रांत का सर्वतंत्र स्वतंत्र होणार? हे असहिष्णु प्रकार कोण थांबवणार? आपणच याला आळा घालूया.

आळा कशाने घालता येईल? परस्परांची भाषा अभ्यासून. विनोबाजी आज सांगत असतात की, एखादी तरी द्रविडी भाषा आपल्याला आलीच पाहिजे, मातृभाषा नि हिंदुस्थानी याशिवाय. जयप्रकाश मद्रासमध्ये हिंडताना आधी चार वाक्ये तामिळीमध्ये बोलत. लोकांना आनंद होई. भाषा अहंकारासाठी नसून हृदयाला पोहोचविण्यासाठीच आहे. सेनापती नि मी अस्पृश्यता निवारणार्थ हिंडत असता गडहिंग्लजला गेलो. मला चिठ्ठी आली. 'गुरुजी कानडीत बोला.' मी म्हटले, 'तुरुंगात वाचायला शिकलो, परंतु बोलायला नाही.' सेनापतींना वाईट वाटले. आमची मोटारलॉरी सारखी जात होती. बरोबरच्या सेवादल पथकांत कुंतुब होता. त्याला कानडी येई.

सेनापती म्हणाले, "बंधू-भगिनींनो वगैरे मला कानडीत शिकव." सेनापतींनी चार वाक्ये पाठ केली. पुढच्याच सभेत 'बांधव रे मत्तु भगिनी रे' त्यांनी म्हटले; - टाळ्यांचा कडकडाट झाला! हृदयाला ते शब्द भेटले. विवेकानंद शिकागोला सर्वधर्म परिषदेला गेले. सारे प्रतिनिधी 'सभ्य नर-नारींनो' असा आरंभ करीत. विवेकानंद 'बंधु-भगिनींनो!' म्हणाले आणि टाळ्या थांबत ना. त्या एका शब्दाने त्यांनी सारी हृदये जिंकली. अशी ही मौज आहे. कानडी भाषा बोलत असले म्हणजे 'काय यंडु-गुंडु चालवले आहे?' असे म्हणू नये. गुजराथीला 'सामळो' असे हिणवू नये. ती ती भाषा कानावर पडली तर भावाची भाषा भेटली म्हणून नाचावे. थोडे थोडे शब्द येत असावेत, गाणी येत असावीत. आनंद वाटावा.

मी मुंबईस माटुंग्याच्या उडपीवाल्याच्या खानावळीत जातो. तेथे कानडी, मद्रासी सारे येतात. मला अपार आनंद होतो. बंधूंचे दर्शन होते. मी देशभर कधी हिंडू फिरू? मला मित्र म्हणतात, "इतक्या लांब कशाला जाता?" तेथे मला माझा सारा प्यारा भारत भेटतो. हा आनंद त्यांना काय कळे? विनोबाजी एकदा म्हणाले, "आकाशातील सप्तर्षी पाहून मला नकाशातील काश्मीर नि युक्त प्रांत आठवतात." जेथे जातो तेथे भारताचे भव्य दर्शन. असे भारतमय आपण होऊ. हिमालय माझे डोके, विंध्याद्री माझ्या कंबरपट्टा, पूर्व-पश्चिम तीर माझे पाय, सर्व भारताच्या रूपाने मला नटू दे. साऱ्या माझ्यां भाषा, सारे माझे भाऊ, माझे मोठे कुटुंब आहे. १०-२० लाखांचे हे तुटपुंजे राज्य नाही. ३० कोटींचे. मग मोठ्या कुटुंबावर जबाबदारी अधिक. शिका दोनचार भाषा. प्रांताच्या सीमेवरचे भाग तर संगमाप्रमाणे तीर्थक्षेत्रे माना. ते इकडे का तिकडे भांडू नका. सीमा समितीचा निकाल मान्य करून प्रेम-स्नेहाने नांदा.

प्रांतांनी भारती व्हावे आणि भारताने अति भारती व्हावे. महात्माजी उर्दू लिपी शिका म्हणत. अरे, त्या महापुरुषाची दूरदृष्टी कोठे आहे तुमच्याजवळ? एकीकडे आशियाचा संघ करा म्हणावे. इजिप्तपासून तमाम मुस्लीम राष्ट्रांची उर्दू. फक्त तुर्कांनी रोमन लिपी घेतली. या सर्व देशांचे विचार करायला त्यांची लिपी नको का कळायला? या सर्व मुस्लीम देशांचे राजकारण वा अर्थकारण अमेरिकेच्या वृतपत्रांवरून का आपण वाचणार, समजून घेणार? हिंदी, मुस्लीम राष्ट्रांचे हृद्गत कळावे म्हणून उर्दू लिपी शिकणे आवश्यक आहे. युरोपातील लोक अनेक भाषा शिकतात. झेक राष्ट्रात हिंदीचे वर्ग चालतात. काय त्यांना जरूर?

म्हणून आपण क्षुद्र कुंपणे घालून बसता कामा नये. व्याप वाढवाल तर वैभव वाढेल. संकुचितता सोडा. सारे प्रांत एकमेकांजवळ प्रेमस्नेहाने वागोत. भारताचे एक हृदय असो. प्रांत एकजीवी असोत. प्रांतभारती आणि विश्वभारती अशी आमची दोन ध्येये आहेत. ते थोर पूर्वज म्हणाले,

'कृण्वन्तो विश्वमार्यम्'

आपण सर्व विश्वाला आर्य म्हणजे उदार, सुसंस्कृत करू. म्हणून चिनी भाषा शिकून त्या भाषेत आपल्या प्राचीन पंडितांनी ग्रंथ लिहिले. विनोबाजी अरबी शिकून कुराणाचा महिमा मुसलमानांना आज सांगत आहेत.

प्रांतांचा परस्परांशी आणि भारताशी प्राणमय संबंध – याला आपण प्रांतभारती ध्येय म्हणू.

दुसरे, रवींद्रनाथांनी उद्घोषिलेले विश्वभारतीचे. भारताचा सर्व जगाशी संबंध ठेवणे. असे हे संबंध संयम नि सहानुभूती, विशाल व थोर दृष्टी असतील तरच निर्माण होतील, प्रांतांचे भारत हृदय नि भारत विश्वाचे हृदय होईल.

+++

संस्कृती व साहित्य

आंतरभारतीचा विचार करताना गुरुजींची सर्वसमावेशक दृष्टी भारतीय भाषाभगिनींना गुण्या-गोविंदाने संसार करण्यास सांगत होती. साहित्य आणि संस्कृती यांचे परस्परांशी असलेले नाते तसेच चांगल्या साहित्याचे निकष यासंबंधींच्या विचारांचा परिचय....

राधाकृष्णन् गांधीजींना संस्कृतीची मूर्ती मानीत होते. मानव्याचे प्रतीक मानीत होते. गांधीजींविषयी त्यांना किती आदर, केवढे भक्तिप्रेम ! राधाकृष्णन् यांनी 'संस्कृतीचे भवितव्य' म्हणून पुस्तक लिहिले आहे. त्याचा मराठी अनुवाद प्रसिद्ध आहे. राधाकृष्णन् यांची संस्कृतीविषयक मते सर्व सुशिक्षित जगाला ज्ञात झाली आहेत.

सकल संस्कृतीचा पाया प्रेम आहे. विवेकानंद म्हणत, ''ख्रिश्चन धर्म सांगतो, शेजाऱ्यावर प्रेम कर.'' परंतु का प्रेम करावे, याचे कारण हिंदू धर्म देतो, वेदांत देतो. त्याच्या ठिकाणी तूच आहेस म्हणून तूच सर्वांत आहेस. दुसऱ्याची हत्या म्हणजे स्वत:चीच. मानवी जीवन सुखी करायचे तर हा महामंत्र घेऊनच कार्यप्रवृत्त व्हायला हवे. हृदयशून्यता म्हणजे मानवी जातीविषयी बेफिकिरी. हृदयशून्यता म्हणजे निर्दयता. जगांत दु:ख, दैन्य आहे; कारण हृदयशून्यता आहे. हे सारे माझे असे मानीन तर मी दुसऱ्याला छळणार नाही, पिळणार नाही. सर्वांना सुखी करण्यासाठी धडपडेन; म्हणून वेद घोष करतो, 'सर्वेऽपि सुखिंन: सन्तु.' म्हणून ज्ञानेश्वर महाराज घोषवतात, 'अवघाचि संसार सुखाचा करीन !'

ही भारतीय संस्कृती, ही मानव संस्कृती. रवींद्रनाथ म्हणतात, ''मनुष्याबद्दल प्रेम असल्याशिवाय कोठली संस्कृती? सामर्थ्य हे संस्कृतीचे माप नव्हे, मानवांच्या

संस्थांनी नि कायद्यांनी प्रेमवृत्तीचा किती विकास केला यावरून संस्कृती मापली जाते. जेव्हा मानव निर्दय होतात, तेव्हा संस्कृती धुळीस मिळते. स्वातंत्र्यप्राप्ती, समता, न्याय यांचे खून करणे म्हणजे संस्कृती नष्ट करणे. आसुरीपणा कराल तर संस्कृती जगणार नाही.'' राधाकृष्णन्, रवींद्रनाथ, विवेकानंद, महात्माजी, विनोबाजी, जवाहरलाल – कित्येक वर्षांपासून संस्कृती म्हणजे काय ते सांगत आहेत, आचरत आहेत. या संस्कृतीत अहिंसक समाजवाद आपोआप येतोच. राधाकृष्णन् परवा पुण्याला म्हणाले, ''धर्म म्हणजे भस्मे, गंधे नव्हेत. बाहेरची सोंगे, ढोंगे म्हणजे धर्म नव्हे. धर्म म्हणजे सर्वांची धारणा होणे.'' सर्वांचे कल्याण म्हणजेच समाजवाद. राधाकृष्णन् मागे मद्रासला म्हणाले, ''कम्युनिझम का फोफावतो? तुम्ही पिळवणूक दूर कराल, सर्वांना अन्न-वस्त्र मिळेल असे कराल, सर्वांच्या विकासास संधी द्याल तर कशाला कम्युनिझम वाढेल?'' हिंदी सरकार जर निराळे धोरण न स्वीकारील तर कम्युनिझम कसा रोखला जाईल? मानव संस्कृती नि अहिंसक समाजवाद यांचा संदेश त्या विख्यात तत्त्वज्ञाकडून त्यांना मिळेल. गांधीजी याच गोष्टी आमरण शिकवीत होते आणि मारणाऱ्यालाही प्रणाम करून भारतीय संस्कृतीचा परमोच्च बिंदू त्यांनी दाखवला.

संस्कृतीचा आणि अहिंसक समाजवादाचा हा प्राणमय अर्थ सर्वांनी हृदयाशी धरला पाहिजे. तदनुरूप वागले पाहिजे. मी आशा करतो की, ते नवे पान उलटतील, मानव संस्कृतीचा अर्थ खरोखर त्यांना समजून घ्यायचा असेल, तर ज्याने तो अर्थ जीवनात प्रकट केला त्याची मूर्ती ते आदर्श मानतील. ज्याने मानवजातीला वीतभर उंच नेले त्याला शत्रू मानणे ही का संस्कृती? तो अविवेक होता.

आपण मंगलमूर्तीची मूर्ती आणतो. एखादा अवयव मोडला-तुटला, तर अशुभ मानतो. समग्र दर्शनात सत्य आहे. पावित्र्य आहे. Wholeness is holiness गणपतीची संपूर्ण मूर्ती असेल तर ती पवित्र. गणपतीची मूर्ती म्हणजे मानवतेची मूर्ती. सकाल गणांच्या, सकल मानवी समुदायांच्या पालनकर्त्याची ती मूर्ती. मानवतेच्या मंगलमूर्तीचे नका तुकडे करू. सर्वांच्या कल्याणातच तुमचे कल्याण. म्हणून शेक्सपिअरने म्हटले की, 'जे करशील ते देशासाठी, देवासाठी, सत्यासाठी असू दे.' त्याने नुसता देश असे नाही म्हटले. माझ्या देशसेवेत देवाची नि सत्याची सेवा आपोआपच व्हायला हवी. किंबहुना असे म्हटले तरी चालेल की, सत्य

आणि देव यांच्या सेवेत देशाची सेवा येऊन जाते. मोठ्या वस्तूत छोटी वस्तू येऊन जाते.

संस्कृती म्हणजे जीवनाला जे जे उजाळा देते, सुंदरता देते, समृद्ध करते, पुढे नेते, ते ते संस्कृतीच होय. संस्कृती म्हणजे संयम. मानवाला सुसंस्कृत व्हायचे असेल तर मानवाने संयम राखला पाहिजे. मी मोठा, माझा धर्म मोठा, माझी जात मोठी, माझा प्रांत मोठा, माझे तेवढे चांगले; बाकीचे त्याज्य, असे म्हणणाऱ्याला संस्कृती कळली आहे असे मला वाटत नाही. संस्कृती जगातील जे जे चांगले ते ते घ्यायला तयार राहील. संस्कृती सहकार करील, संस्कृती संगम करील, असे न करणारी ती संस्कृती नसून विकृती होय.

म्हणून वेद गर्जना करतात; 'भूमा स्याम्' आम्हाला मोठ्या दृष्टीचे होऊ दे. भूमा म्हणजे विशाल, महान्. दहा हजार वर्षांपासून वेद ही गर्जना करीत आहेत. संत सांगत आहेत. तोच संदेश महात्माजींच्या रूपाने उत्कटपणे मानव-जातीसमोर प्रकट झाला. तो संदेश घेऊन चला सारे जाऊ. भारत मानव्याने तीर्थक्षेत्र करू. प्रेमस्नेहाचे माहेरघर करू. तेथे नकोत क्षुद्र भेद. तेथे नको विषमता. येथे अहिंसक समाजवादाने मानवाची प्रतिष्ठा स्थापू: व्यक्ती आणि समाज यांचे सुमधुर सामंजस्य निर्मू आणि भारताचे व भारताच्या द्वारा मानवजातीचे सेवक बनू.

साहित्याचा, कलेचा तसा फारसा अभ्यास मी केलेला नाही. मराठी साहित्याशी माझा परिचय तीस सालापर्यंतचा. त्यानंतरचे वाङ्मय मी फारसे वाचले नाही, कारण गेली बरीच वर्षे खेड्यापाड्यातून हिंडण्यात गेली. साहित्य हा माझा जीवन-धर्म नाही. रवींद्रनाथांसारखे साहित्य हा स्वधर्म मानतात. ते गीतांजलीत म्हणतात, "माझ्या गीतांच्या पंखांनी मी तुझ्या पायांना स्पर्श करीन." साहित्याच्या द्वारा ते स्वतःचे जीवन कृतार्थ मानीत होते. साहित्याने प्रभूला, पूर्णतेला ते गाठू बघत होते. माझी तशी वृत्ती नाही. जुन्या भाषेत बोलायचे तर मी शूद्रवृत्ती आहे. लेखणीच्या लालित्यापेक्षा मला झाडू घेऊन झाडणे आवडते. आजाऱ्याची शुश्रुषा करायला आवडते. कोणाला स्वयंपाक करून जेवायला घालायला आवडते. मी थोडेफार लिहिले परंतु साहित्य, कला यांचा मोठा विचार करून लिहिले असे नाही. तेव्हा माझ्यापासून तसल्या व्याख्यानाची अपेक्षा करू नका.

मराठीची तुम्हीं निरपेक्ष सेवा करा. आपल्या मराठीत अमुक नाही असे म्हणण्याची पाळी न येवो. रवींद्रनाथांनी देवाघरी जाण्याच्या आधी विश्वरचनेवर शास्त्रीय ग्रंथ लिहिला. तो महाकवी वीणा बाजूला ठेवून शास्त्र-ग्रंथ लिहायला घेतो. आमचे विज्ञानवेत्ते काय करीत होते? त्यांची अजून परिभाषा नसेल परंतु तोवर ऑक्सिजन, कार्बन असेच शब्द वापरा. भराभरा शास्त्रीय कल्पना, ज्ञान सर्वत्र न्यायचे आहे. वाट कोठवर बघायची? घेतली तीच शास्त्रीय भाषा तर काय बिघडले? जग जवळ आले आहे. तीही भाषा आपलीच समजा. पंडित जवाहरलाल एकदा म्हणाले, ''मी राजकारणात पडलो नसतो तर संक्षेपाने जगातील सारे चांगले ग्रंथ हिंदीत आणले असते.'' तुम्ही मराठीत आणा. ज्याला स्वतंत्र गंगा निर्माण करता येत असेल त्याने नये अनुवाद करू; ज्यांना ते नसेल जमत त्यांनी आणावे पाट आणि मातृभाषा समृद्ध करावी. तुरुंगात मला चांगले पुस्तक मिळताच मी अनुवाद करून ठेवीत असें. प्रसिद्ध होईल तेव्हा होईल. मेल्यानंतर हस्तलिखिते इतिहास संशोधक मंडळाला मिळतील. माझ्या पेटीत अजून कितीतरी अनुवाद पडून आहेत. मोबदला मिळो न मिळो. करून ठेवा. ज्ञानेश्वरांनी अमृतासारख्या ओव्या कोळशाने लिहिल्या. त्यांनी का कधी धनाची अपेक्षा केली? जुन्या वागीश्वरांनी निरपेक्षपणे सेवा केली. आईच्या सेवेची का आपण मजुरी मागतो? अर्थात आपणाला जगायचे असते, मिळाले काही तर उपयोगी पडते, परंतु तेवढ्यासाठीच म्हणून लिहू नये, मराठीच्या प्रेमाने लिहा.

पूज्य विनोबाजी धुळे तुरुंगात एकदा म्हणाले, ''ज्या भाषेत ज्ञानेश्वरी आहे ती माझी मातृभाषा याची मला कृतार्थता वाटते. ईश्वराची ही कृपा.' विनोबाजींना अनेक भाषा येतात; परंतु भक्तिप्रेमाने ते म्हणाले, ''रामायणास तुलना नाही. ज्ञानेश्वरीस तुलना नाही. आणि ती ज्ञानेश्वरी एका कुमाराने लिहिली. का लिहिली? ब्रह्मविद्येचा सुकाळ व्हावा म्हणून, आणि ती ब्रह्मविद्या आबालवृद्धांस समजावी म्हणून.''

'आबालवृद्धसुबोध' असे शब्द श्री. ज्ञानदेवांनी लिहिले. त्यांच्यासमोर सारा समाज होता. केवळ प्रतिष्ठित लोक नव्हते. विनोबांनी गीताई लिहिली. आश्रमातील मुलींना अनुवाद समजला तर पास, न समजला तर नापास, अशी अवघड कसोटी त्यांनी लावली. 'यज्ञवशिष्ट जे खाती' हा अनुवाद मुलींना अवघड गेला हे पाहताच 'यज्ञात उरले खाती' असा बदल त्यांनी केला. महाराष्ट्रात २ लाख गीताई खपली. गावोगाव ती गेली. राष्ट्रीय ग्रंथ जणू गीताई झाली आहे. परंतु कोणा साहित्य

संमेलनाच्या अध्यक्षाला तिचा उल्लेख करावा असे वाटले नाही. जे जनतेपर्यंत जाऊन पोहोचतील ते राष्ट्रीय ग्रंथ. हरिपाठाचे अभंग हेच अजून राष्ट्रीय पुस्तक आहे. तुमची पुस्तके गेली का जनतेपर्यंत? ती जनतेसाठी आहेत का?

लोकमान्यांनी गीतारहस्य लिहून अर्पण कोणाला केले? 'श्रीशाय जनतात्मने' जनतारूपी प्रभूला त्यांनी अर्पण केले. जनता हा त्यांचा देव होता. तुम्हा साहित्यिकांचाही जनता देव होवो. जनतेचे स्वरूप काय, तिचे सुखदुःख, तिच्या गरजा, यासाठी तुमचे वाङ्मय असो.

कला आनंदासाठी असते ही गोष्ट खरी; परंतु मला क्षणिक आनंद नको आहे. उपनिषदे, ब्रह्मज्ञानही आनंदासाठीच आहेत. ब्रह्मांची द्वारकाच आनंदरूप अशी केली आहे. आजचे जीवन निरानंद आहे. तेथे सुंदरता नाही. सर्वत्र दैन्याची, वैषम्याची कुरूपता भरली आहे. भरपूर पीक यायला हवे असेल तर शेतकरी कुंदा खणून टाकतो. टपोरे बी पेरतो. आपणासही समाजात आनंद यावा असे वाटत असेल तर सारा कुंदा खणून काढावा लागेल. रूढीचें, संकुचित विचारांचे तण लेखणीच्या नांगराने काढा. तुमच्या लेखणीची महान शक्ती आहे. रुसो, व्हॉल्टेर यांनी क्रांती केली. मार्क्सने क्रांती केली, अंकल टॉम्स केबिन कादंबरीने क्रांती केली. आपल्याला क्रांती करायची आहे. मूल्ये बदलायची आहेत. क्रांती म्हणजे रक्तपात नव्हे. आज श्रमणाऱ्याला मान नसेल नि ऐदी शेणगोळ्याला लोड मिळत असेल, तर हे चूक आहे असे दाखवा. श्रमणाऱ्यांची प्रतिष्ठा निर्मा नि बांडगुळांना भिरकावून द्या. याला क्रांती म्हणतात.

अशी क्रांती तेव्हा कराल– जेव्हा तुम्ही जनतेच्या जीवनात बुड्या घ्याल. परमेश्वराला कवींचा कवी असे म्हटले आहे. कारण तो सर्व विश्वाविषयी सहानुभूती बाळगतो, लहानशा फुलपाखराच्या रंगासमोर तुमच्या पातळाचे काठ खाली माना घालतील. तो मुंगीची काळजी घेईल. तृणपर्णाला जपेल. तुमची सहानुभूती ज्या मानाने व्यापक त्या मानाने तुम्ही मोठे साहित्यिक व्हाल. शेक्सपिअरच्या नाटकात सर्व धंद्यातील भाषा सापडेल. व्हिक्टर ह्यूगोला अमक्या धंद्याची भाषा माहीत नाही असे नाही. ते सर्वांत मिसळत, उठत, बसत. गाडीवान असो, झाडूवाला असो, सर्वांजवळ बोलतील, समजून घेतील. अशी व्यापकता तुमच्या अनुभवाला हवी. ज्ञानेश्वरीत कोकणातील 'मुडा' वगैरे शब्द आहेत. ते त्या बालवयात किती हिंडले हरी जाणे. शंकराचार्य हिंदुस्थानभर गेले. पंडितांसाठी भाष्ये, तर सामान्य जनतेसाठी

स्तोत्र लिहीत होते. सर्व जनता त्यांचेसमोर आहे. जनतेचे प्रश्न हाती घेताहेत. नाना दैवतांची भांडणे होती. त्यांनी पंचायतन पूजा सुरू केली. 'आणा सारे देव एकत्र. सर्वांची स्तोत्रे देतो करून. एकच तत्त्व आहे.' असे म्हटले.

तुम्हाला भारताचा इतिहास शब्दाशब्दात सापडेल. शब्दब्रह्माची उपासना करून मुक्त होता येते. पाणिनी मुक्त झाले. मराठीत हरिहर वगैरे नावे आहेत. शिवनारायण वगैरे मारवाडी लोकांची नावे असतात. महान् ऐक्याचा तो प्रयोग होता. आपण भांडलो परंतु पुढची पिढी तरी न भांडो असे या नावे ठेवणाऱ्यांच्या मनात असेल. ज्याने आपल्या मुलाला 'हरिहर' नाव आरंभी ठेवले असेल तो केवढा क्रांतिकारक ! शैव वैष्णवांचे भांडण त्याने मिटवले. दोन्ही दैवते त्याने एकत्र आणली.

भारताचा हा मोठेपणा उच्चरवाने सांगायला हवा आहे. सर्वत्र द्वेषमत्सर आहेत, जातीयता आहे. तुम्ही सांगा की, सर्वांना जवळ घेण्यात भारताचे अमरत्व आहे. समुद्र आटत नाही कारण तो सर्वांना जवळ घेतो. भारत सर्वांना जवळ घेई. म्हणून अजून कालोदरात गडप नाही झाला; परंतु आमचा जो मोठेपणा, ज्यात आमचे अमरत्व-तेच आम्हाला आज नकोसे झाले आहे.

वेदांतील ऋषी वाणीविषयी काय म्हणतो? ती वाग्देवता म्हणते,

'अहं राष्ट्री संगमनी जनानाम्'

पृथ्वीमोलाचा संदेश. वाणी सर्व राष्ट्रासाठी आहे. राष्ट्रातील सर्वांना जोडण्यासाठी. मग ते कोणत्याही धर्माचे असोत. आर्य आणि नाग आम्ही शेषशायी विष्णू निर्मून एकत्र आणले. जनांचे संगम करणारी मी आहे असे वाग्देवता सांगते. अनेक मानवी प्रवाहांना एकत्र आणणारी. संगम आपण पवित्र मानतो. त्रिवेणी संगम अधिकच पवित्र. तीन नद्या एकत्र मिळाल्या म्हणून जर पवित्र तर नाना धर्मांचे मानवी प्रवाह एकत्र आणण्यात किती पवित्रता? महर्षी अण्णासाहेब कर्वे आत्मचरित्रात म्हणतात, "मुरुड गाव वसवणाऱ्या पूर्वजांनी गावात मुसलमान आले तर त्यांच्या मशिदीसाठी जागा योजून ठेवल्या." शिवाजीमहाराज सूडाचे गणित नाही करीत बसले. मराठ्यांनी अजमेरचा नादुरुस्त दर्गा दुरुस्त करून दिला. मित्रांनो, आज तुमच्या वाणीसमोर हे महान कार्य आहे. तुमची वाणी 'संगमनी जनानाम्' होवो. कला जोडते. तोडीत नाही.

गीतेत 'वेदानाम् सामवेदोऽस्मि' असे म्हटले आहे. मी मनात म्हणे, 'ऋग्वेद महत्त्वाचा असून सामवेदाला का महत्त्व?' मला लक्षात आले की, सामवेद हा संगीताचा वेद आहे. ऋग्वेदातील मंत्र संगीतात बसविले की सामवेद. आणि संगीत ऐकणाऱ्यांची साम्यावस्था करते. सारे एका भावनेत पोहू लागतात. आपणास असे संगीत निर्मायचे आहे. विविधतेतून एकता निर्मायची आहे. तुमची वाणी भारतीय ऐक्य प्रस्थापो. सर्व जातीजमातींचे धर्मांचे ऐक्य. साम्राज्यशाहीने दहा हज़ार वर्षांचा प्रयोग खंडित केला. तो पुन्हा सुरू करायला उभे राहा.

तुम्हाला हे द्वेषमत्सर, हे दैन्य, ही विषमता पाहून बेचैन वाटायला पाहिजे. द्वेषमत्सर जातीजमातीतील दूर करण्यासाठीच लेखणी हाती घ्या. नागपूर हिंदुस्थानाच्या मध्ये उभा आहे. जणू भारताचे हृदय. येथे बंगाली लोक आहेत, तामिळ, तेलगू आहेत. येथे हिंदी आहे. मराठी आहे. येथील मराठीच्या उपासकांनी या इतर भाषांतील गोडी मराठीत ओतावी. परस्परांचा परस्परांस परिचय करून द्यावा. ऐक्य वाढवावे. हे एक महान कार्य आहेच, शिवाय आर्थिक विषमता दूर करण्याचे काम आहे. तोवर समाजात आनंद येणार नाही, सद्भावना फुलणार नाहीत; जोवर एक तुपाशी आणि एक उपाशी आहे. मी तुरुंगात होतो. एक हरिजन कैदी मला म्हणाला, "माझ्या घरी पत्र लिहा. पोरगा आईच्या अंगावर मारायला धावला. त्याला दोन शब्द लिहा." का बरे तो मुलगा आईला मारायला धावला? घरी गरिबी. आई त्याला म्हणायची, "ऊठ लवकर, जा रानात, आण मोळी." तो दहा, बारा बारा वर्षांचा पोर एखादे दिवशी थंडीत नसेल उठला, रागावला असेल आईवर. त्याची मातृभक्ती दारिद्र्याने स्पष्ट केली आणि मातेची वत्सलता दारिद्र्याने गोठली. हे दारिद्र्य दूर व्हायला हवे. तुमच्या सर्व लेखण्या यासाठी झिजवा. जातीय विषमता दूर व्हावी म्हणून तुम्ही तुमची साहित्यिक शक्ती घेऊन या.

तुम्ही जनतेशी एकरूप व्हाल तर असे कराल. विवेकानंद म्हणाले, "तुमचे हृदय जनतेच्या हृदयाबरोबर उडू दे." दुसऱ्याच्या दुःखाने दुःखी व्हा; असे आर्त भक्त व्हा. मग ते दुःख कसे दूर करावे, याची जिज्ञासा तुमच्या मनात येईल आणि मग कोणता कल्याणकारक मार्ग याचा विचार करून तो मांडाल. लाल हुकूमशाही नको. भांडवलशाहीही नको. परंतु समता तर आणायची. मग लोकशाही, समाजवाद हाच

एक मार्ग दिसेल. तुम्ही तुमच्या गोष्टी, कविता, कादंबऱ्या, नाटके, बोलपट या ध्येयाला प्रत्यक्षात आणण्यासाठी लिहा. ज्ञानेश्वर म्हणतात,

'जो जे वांछील तो ते लाहो !'

किंवा 'अवघाचि संसार सुखाचा करीन' असेही ते म्हणाले. तुमचे ध्येयही हेच असू दे. याहून कमी ध्येय मी नाही सहन करणार. आपापल्या शक्यतेनुसार यासाठी झटा. बर्नार्ड शॉ म्हणाले, "मला काही सांगायचे आहे म्हणून तर मी लिहितो." काहीतरी हेतू धरूनच आपण प्रवृत्त होतो. तो हेतू असा उदात्त असो. सामाजिक विषमता, आर्थिक विषमता झडझडून दूर करून राष्ट्राचा संसार उज्ज्वल नि उदात्त करायचा आहे. तुमचे लेखणीचे ललित या ध्येयार्थ असो. माझ्याजवळ सांगायला तरी दुसरे काही नाही.

"पुढील वर्षी कारवारला होणाऱ्या साहित्य संमेलनाचे अध्यक्ष करण्याचा अनेकांचा विचार आहे. तुम्ही साहित्य सभेचे सभासद मात्र व्हायला हवे." असे मला म्हणाले. म्हणूनच मी सभासद होत नाही. मला अध्यक्षपद नको. मजजवळ विशेष सांगायला काही नाही. लिहिणे माझा थोडासा स्वधर्म आहे; परंतु ती माझी जीवनव्यापी वृत्ती नाही. सावरकर म्हणाले, "लेखण्या मोडा, बंदुका घ्या." मी म्हणेन, "झाडू घ्या, कुदळी घ्या !" काम करताना जे अनुभव मिळतील ते वेळ मिळेल तेव्हा, राहवत नाही असे वाटेल तेव्हा जनतेला द्या. मी साधना चालवतो. काही विचार जायला हवेत अशी तहान वाटते म्हणून. मी ते साहित्य सेवा म्हणून करत नसून लहानशी जीवनसेवाच करतो; परंतु महाराष्ट्रभर झाडू घेऊन हिंडावे, अनुभव मिळवावे, ते साधनेला पाठवावेत, सेवा दलाच्या मुलांबरोबर सामुदायिक शेती करावी, श्रमाचे महाकाव्य अनुभवावे ही खरी मनोकामना. तुम्ही म्हणाल, मी आंतरभारती संस्था काढून तिच्यात गुंतणार. कधी जाल जमीन फुलवायला? शेतीचे प्रयोग करायला?

प्रांतातून फुटीर वृत्ती वाढत आहे. म्हणून अन्नधान्याइतकीच प्रांतीय सद्भावनांची नितांत आवश्यकता आहे. म्हणून ही संस्था काढण्याची कसोशी; परंतु या संस्थेतूनही मुले घेऊन मी उद्या अधून मधून महाराष्ट्रभर स्वच्छता करीन. मेळे-संवाद करीत हिंडेन. सारेच एकदम कसे साधणार? परंतु ज्याला वाङ्मयाला वाहून घेणे म्हणतात

तसा मी नाही. इंग्रजीत म्हणतात, 'He took to literature', त्याने साहित्य हा स्वधर्म केला. मी त्या अर्थी केला नाही. माझ्या जीवनात लेखणी, झाडू व जातिनिरपेक्ष वृत्ती या त्रिविध वृत्ती आहेत. तिर्हींचा थोडाफार चाळा मिळाला तर मी मस्त असतो. साहित्याने माझे सारे जीवन व्यापलेले नाही. म्हणून तेथे अध्यक्ष म्हणून येणे मला परधर्म वाटेल, आणि 'परधर्म भयावह' खरे ना?

+++

राष्ट्रीय चारित्र्य

साहित्य आणि संस्कृती ही राष्ट्रीय चारित्र्य घडविण्याची प्रभावी साधने आहेत. राष्ट्रीय चारित्र्याच्या अभावी देशाची प्रगती अशक्य आहे. राष्ट्र चारित्र्यसंपन्न का नाही? कोणत्या मार्गाने आज लोकजीवन भ्रष्ट करण्यात येत आहे, त्याची विदारक मीमांसा...

भगिनी निवेदिता यांनी एके ठिकाणी म्हटले आहे की, 'परिस्थिती कोणतीही असो, राष्ट्रीय चारित्र्य सतत प्रकट होत राहिले पाहिजे. जे राष्ट्र कोणत्याही परिस्थितीत नैतिक उदारता सोडीत नाही ते धन्य होय. जय की पराजय, स्वातंत्र्य की पारतंत्र्य हाही मुख्य सवाल नाही. सवाल हा आहे की राष्ट्राचे हृदय शुद्ध आहे की नाही?' हरिभाऊ उपाध्याय हे एक नामवंत हिंदी साहित्यिक आहेत. त्यांनी एके ठिकाणी पुढील अर्थाचे लिहिल्याचे स्मरते. "पारतंत्र्यातही लोकमान्य टिळक, देशबंधू, महात्माजी, रवींद्रनाथ, अरविंद, प्रफुल्लचंद्र अशी पृथ्वीमोलाची नवरत्ने आम्हाला लाभली. त्या पारतंत्र्यासही प्रणाम करावा असे वाटते."

आम्ही परतंत्र होतो ही गोष्ट खरी, परंतु हिंदुस्थानभर एक महान लाट गेली.शंभर वर्षे होती. कितीतरी मोठी माणसे दिसतात. त्याग दिसतो. सर्वसाधारण नीतीची उंचीही अधिक दिसते; परंतु आज भारतात सार्वजनिक चारित्र्य शिथिल झाल्याप्रमाणे वाटत आहे. ४२ चा मोठा लढा झाला. नेताजींनी अमर असा स्वातंत्र्यसंग्राम केला, खलाशांनी स्वातंत्र्याचे बंड पुकारले. अखेर स्वराज्य आले. विभागणीच्या रूपाने आणि नंतरच्या कत्तलीच्या रूपाने स्वराज्याची किंमत द्यावी लागली. द्वेषमत्सराचे वणवे भडकले. गोकुळातील आग गोपाळकृष्णाने गिळली. महात्माजी राष्ट्रातील वणवे गिळावयास उभे राहिले. त्यांचीही अखेर आहुती पडली. स्वातंत्र्याच्या

सूर्योदयाबरोबर द्वेषमत्सराचा सैतान हैदोस घालू लागला. महात्माजी गेले, परंतु एक प्रकारे शांती निर्मून गेले. असे वाटले, दिल्लीच्या अखेरच्या प्रवचनातून तो राष्ट्रपिता सर्वांना राष्ट्रीय सद्गुणांचा संदेश देत होता; परंतु आपण त्यांचा संदेश कितपत ऐकत आहोत प्रभू जाणे !

आज आम्ही असत्याचे जणू उपासक झालो आहोत. अशाने हे राष्ट्र कसे टिकेल? पश्चिमात्य राष्ट्रांत सार्वजनिक सद्गुण म्हणून काही वस्तू आहे. राष्ट्रे वाढतात, समृद्ध होतात, ती काहीतरी चारित्र्य असते म्हणूनच. कचऱ्यातून अंकुर कधी वर येत नसतो. कचऱ्याबरोबर दाणा असेल तर तो दाणा अंकुरतो. राष्ट्राच्या जीवनात काही सत्त्वच नसेल, सारा कचराच असेल तर नवीन अंकुर तरी कशाचा येणार? गांधीजी कधीपासून सांगत होते की, सद्गुण संवर्धन म्हणजे स्वराज्य. सद्गुण जर राष्ट्रात नसतील तर स्वराज्य यायचे कसे? आले तरी फलद्रूप व्हायचे कसे? मुंबईस मॅट्रिकची परीक्षा झाली, तिचा प्रकार जगजाहीर आहे. बोर्डाने म्हणे ती परीक्षा घेतली व बहुतेक साऱ्या प्रश्नपत्रिका फुटल्या. अनेक जिल्ह्यांत हा प्रकार. वेळेवर पुरेशा प्रश्नपत्रिका निघाल्या नाहीत. कधी सायंकाळी मिळाल्या,कधी मिळाल्या नाहीत, इत्यादी गोष्टी बाजूला ठेवू. बोर्डाला अनुभव नाही; पुढील वर्षी सुधारणा होईल असे समजू; परंतु प्रश्नपत्रिका विद्यार्थ्यांस कळतात कशा? प्रश्न सांगितले गेले हे खरे असेल तर किती वाईट ! परीक्षा म्हणजे एक गंभीर वस्तू आहे. तेथे काही प्रामाणिकपणा हवा. ही एक सार्वजनिक बाब आहे. राष्ट्रीय चारित्र्याचा हा प्रश्न आहे. जर आपण असे करू लागलो तर त्याने का राष्ट्राचा मोठेपणा वाढतो? महाराष्ट्रातील विद्वान मंडळींनी याचा विचार करावा. प्रश्नपत्रिका काढणारे, त्यावर देखरेख करणारे, यांना विद्वान नाही समजायचे तर कोणाला? परंतु राष्ट्राची तरुण पिढी बनवण्याचे ज्यांचे पवित्र कार्य, तेच जर सत्य, प्रामाणिकपणा, सार्वजनिक जबाबदारी यांना तिलांजली देतील तर या राष्ट्राला आशा कसली? महाराष्ट्राचे नाव अनेक रीतीने बदनाम होत आहे. ते आणखी बदनाम नका करू म्हणावे. सत्याला तिलांजली देऊन राष्ट्र मोठे होत नसते, आणि असत्याने क्षणभर मोठे दिसले तरी ते मातीला मिळाल्याशिवाय राहणार नाही.

परंतु परीक्षेत हे जे असत्याचे विराट दर्शन झाले ते सर्वत्रच आहे. व्यापारी, कारखानदार यांच्याजवळही सत्य ही वस्तू नाही. माल जवळ असून खुशाल नाही सांगतात. अधिक पैसा देतो त्याच्या घरी पाठवतात. नियंत्रित दराने मिळणे कठीण

जाते. मधले दलाल दुप्पट किंमत घेऊन इंजिने देतात. आणि काँट्रॅक्टर लोक व बोर्ड, म्युनिसिपालट्या यांचा कारभार तर केवळ असत्यावर चालला आहे म्हणा ना. रस्ते दुरुस्तीसाठी इतकी खडी घातली म्हणून बिले तयार होतात, परंतु काँट्रॅक्टर निम्मी सुद्धा खडी घालत नाहीत. रस्ते पुन्हा रद्दी. बिले होत आहेत, पैसे जात आहेत, एका जिल्हा बोर्डाच्या अहवालात एक लोखंडी तुळई वाळूने खाऊन नाहीशी केली. मुंबईच्या म्युनिसिपालिटीतही मागे हिशोबाची चर्चा झाली. जमाखर्च तपासणाऱ्याने शेरा मारला आहे. म्हणतात की, कशाला काही मेळ नाही. तरीही सारे साजिरे केले गेले. सत्य म्हणून वस्तूच नाही. एका गृहस्थाजवळ एक इंजिनिअर बोलत होते. ते म्हणाले, "लढाईत खड्डे खोदण्याचे एक कंत्राट घेतले. २० हजारांच्या कामात काँट्रॅक्टरला दहा हजार फायदा झाला." त्या गृहस्थाने विचारले, "हे कसे शक्य?" "अहो, वरच्या अधिकाऱ्याला दहा हजारांची लाच दिली. दहा मी खिशात टाकले. खड्डे खणले होते पण काही उपायाने ते बुजले असा शेरा मारला." महायुद्धाच्या काळात मिलिटरी काँट्रॅक्टरनी लाखो रुपये मिळविले. लाच दिली की सारे होईल, हीच सवय आजही आहे. कसे या देशाचे व्हायचे? परकीय सरकार जाऊन स्वतःचे सरकार आले तरी जोवर सार्वजनिक सद्गुण नाही तोवर सारे फोल आहे.

सरकार दारूबंदीवर आपली शक्ती केंद्रित करीत आहे; परंतु शेकडो ठिकाणी दारूच्या भट्ट्या गुप्तपणे चालत आहेत. या कोण पकडणार? लोकांचे संवाद कानी येतात. भट्टीवाल्याकडून मोठमोठ्या रकमा पोलीस अधिकाऱ्याकडे जातात. हे खरे का? कोणाला साडेतीन हजारांचा हप्ता, कोणाला पाच हजारांचा हप्ता, कोणाला सात हजारांचा असे पैशाचे रतीब लागलेले आहेत असे लोक म्हणत असतात. पूर्वीचे राजे वेश पालटून हिंडत असत. लोक काय बोलतील तर ऐकत; परंतु आज सारे गुप्त पोलिसांवर चालले आहे आणि तेही भ्रष्ट असतील तर? खरे म्हणजे सर्व बड्या अधिकाऱ्यांच्या इस्टेटीची एकदा चौकशी झाली पाहिजे. दोनशे रुपये पगार असेल तर मी मौल्यवान फर्निचर ठेवू शकेन का? मोटार ठेवू शकेन का? हिंदुस्थानभर गेल्या आठ-दहा वर्षांत सार्वजनिक नीतीचा चक्काचूर झाला आहे. लाचलुचपतीची जडलेली ही सवय राष्ट्र पोखरून टाकीत आहे. परंतु पोलीस खातेच असे असेल असे नाही. सर्वत्र तीच तऱ्हा.

कारखानदारांची, 'आम्ही सचोटीने वागू, प्रामाणिकपणाने वागू' अशी एक संस्था आहे. ठरलेल्या स्टँडर्डप्रमाणे जो वागू इच्छील त्यानेच या संस्थेचे सभासद

व्हायचे असते. हिंदुस्थानातील फक्त १७ कारखानदार या संस्थेचे सभासद आहेत. त्यांतही बरेचसे विदेशी आहेत. प्रामाणिक वागायला हिंदी कारखानदार का मूर्ख आहेत? एका गिरणीतले एक अधिकारी सांगत होते की 'मँचेस्टरचे अमुक एक कापड स्टँडर्ड ठरले म्हणजे ते स्टँडर्ड कधी खाली येत नाही; परंतु आपल्याकडे एखाद्या गिरणीने नवीन चांगला नमुना काढावा, त्याचा बोलबाला झाला की लगेच दोनचार महिन्यांत मिक्सिंग करतील, वाईट कापूस वापरतील, ते स्टँडर्ड राखणार नाहीत.' आमची दानत का अशाने चाढेल? हे चित्र पाहून मन एक प्रकारे सचिंत होते.

महात्माजींनी या देशाला, जगाला मौल्यवान देणग्या दिल्या आहेत. त्यांच्या सर्व देणग्यांचे सार म्हणजे महान् नैतिक शक्ती त्यांनी दिली. ते म्हणत, "सद्गुणसंवर्धन म्हणजेच स्वराज्य." अशी पृथ्वीमोलाची वाक्ये वाचून काही लोक टिंगलही करीत. परंतु आज त्या वाक्यांकडे अधिकच तीव्रतेने लक्ष जात आहे. गांधीजींवर अमेरिकन लेखक डॉ. स्टॅन्ले जोन्स याने जे नवीन पुस्तक लिहिले आहे त्यात तो म्हणतो, "गांधीजींची चळवळ म्हणजे चारित्र्य निर्माण करणारी थोर शक्ती होती."

हिंदुस्थानवर ज्या मोठमोठ्या आपत्ती कोसळल्या, त्यातून पार पडून हे राष्ट्र अजून उभे आहे. याचा अर्थ अजून राष्ट्राचे हृदय शाबूत आहे, असाच करावयास हवा. राष्ट्रे जगतात ती त्यांच्या पुण्यांशावर. राष्ट्राच्या जीवनात जे काही टपोरे, निर्मळ असते त्यातूनच राष्ट्र प्राणमय शक्ती मिळवत असते. प्राचीन काळापासून ऋषिमुनींनी, संतांनी, महात्म्यांनी, अज्ञात अशा कोट्यवधी जिवांनी तेथे जी तीळतीळ पवित्रता ओतली, प्रेम ओतले, मानवता दाखविली, त्याग केले त्यांच्यावर भारत उभा आहे. आज सर्वत्र बुजबुजाट असला तरी या सर्व विषांना पचवून ती पुंजीभूत पारंपरिक पुण्याई राष्ट्राला नवजीवन देत आहे. परंतु राष्ट्राचे हे पुमूंजीभूत भांडवल संपले तर? आज नवीन चारित्र्य निर्माणच होत नसेल तर, भर पडत नसेल तर मात्र धोका आहे.

महायुद्धाच्या वेळेपासून सद्गुणांचा ऱ्हास झाला आहे. लहानांपासून मोठ्यांपर्यंत तात्पुरत्या दोन दिडक्या मिळून चैन कशी करता येईल इकडे लक्ष आहे. गिरणी मालकांनी, धान्यवाल्यांनी, लोक उपाशी आहेत, लोक उघडे आहेत, हे पाहूनही बेसुमार नफेबाजी केली आणि लहानांनीही तेच केले. आगगाडीतील चहा विकणारा, सहा कपांचे दूध आठ कपांना पुरवून दोन कपांची किंमत खिशात टाकतो; रेशनिंगचे

धान्य, कापड आणून, त्याचा काळाबाजार करून, त्या पैशात दारू पिणारे वा सिनेमा पाहणारे गरीबही आहेत. रेल्वे तिकिटांच्या काळ्या बाजारालाही अशीच सीमा नसते. लोक तर चढतातच. पावती मागणाऱ्याजवळ भरदाम-दंडासह, बाकीचे हात ओले करून निसटतात. जेथे पाहावे तेथे घाणच घाण दिसते. या सर्व लहान-थोरांना एकच प्रार्थना की हे राष्ट्र जिवंत राहायला हवे असेल तर पूर्वीची पुण्याई पुरणार नाही. तुम्ही सारे अनीतीचे, खोट्यानाट्याचे, लाचलुचपतीचे, फसवणुकीचे पुतळे होत असाल तर या देशाला अशा नाही.

आज देशाला सोन्यापेक्षा, डॉलरपेक्षा चारित्र्याची जरूरी आहे. शेक्सपियर कवीने म्हटले आहे, "जो माझे पैसे चोरतो तो कचरा नेतो, परंतु माझे चारित्र्य कोणी चोरले तर त्याने माझे सारे काही नेले असे होईल." ज्या देशात लोकमान्य, महात्माजी, रवींद्रनाथ, मदनमोहन मालवीय अशी नररत्ने झाली- त्या देशात काळा बाजार का? लाचलुचपत का? सत्यासाठी प्रसिद्ध असलेल्या भारतात सत्याचा अस्त का व्हावा? सद्गुण असतील तर वैभव. लक्ष्मी चंचल नाही, मनुष्य चंचल आहे. जेथे गुण असतील तेथे भाग्य येईल. आपल्या देशात सामाजिक जीवनाची आज जाणीव नाही, म्हणजेच धर्म नाही. सर्वांच्या धारणेचा जेथे विचार होतो तेथे धर्म आहे. तुम्ही काय निर्माण करीत आहात हा प्रश्न आहे. त्याग, ध्येयनिष्ठा, सत्यता, बंधुता, मानवता, अखंड उद्योग, करुणा, दया, धैर्य हे गुण राष्ट्रात सतत दिसले पाहिजेत. चार मोठ्या माणसांनी राष्ट्र मोठे होत नाही. सर्व जनतेची उंची वाढवायला हवी. नवीन पिढी चारित्र्यसंपन्न होवो. आज भारताला अन्नवस्त्राहून चारित्र्यसंपन्न माणसांची जरूरी आहे. प्राण गेला तरी खोटे बोलणार नाही, अनीतीने पैसे मिळवणार नाही, लाच मागणार नाही, दुसऱ्यास सतावणार नाही, अशा वृत्तीची निःस्पृह, निर्मळ, सेवापरायण माणसे राष्ट्राला हवी आहेत.

कोणत्याही विचारसरणीचे असा, परंतु असत्याचे आणि अन्यायाचे असू नका. काही वृत्तपत्रेही किती असत्य लिहितात ते सांगायला नको. चुकून असत्य लिहिले तर क्षमा मागता येते, परंतु जाणूनबुजून असत्याचा प्रचार करणे हेच ज्यांचे व्रत त्यांना काय सांगायचे? आणि पुन्हा सत्य-अहिंसेचा उदो उदो ही पत्रे करीत असतात. थोडी तरी सद्बुद्धी शाबूत ठेवा म्हणावे. हे राष्ट्र महान व्हावे, वैभवसंपन्न व्हावे, थोर भूमिकेवरून जावे असे तुम्हा सर्वांना वाटते? महात्माजींचे नाव ना येता-जाता घेता?

मग थोडा प्रांजळपणा का दाखवीत नाही? परंतु हे कोणी कोणास सांगायचे? अंतःकरण मृतवत असेल तर काय करायचे?

महाराष्ट्रा, तू पैशाने गरीब असलास तरी सार्वजनिक चारित्र्याच्या संपत्तीत तरी गरीब होऊ नकोस. सद्गुणांनी संपन्न हो. महाराष्ट्रातील तरुणांनो, कोणत्याही दृष्टिकोनाचे असा, परंतु सत्य व प्रामाणिकपणा यांना विसरू नका. पेपर कळले म्हणून विद्यार्थ्यांना आनंद झाला असेल तर राष्ट्रमातेच्या डोळ्यांतून खिन्नतेचे अश्रू आले असतील. ती माता असत्यातच मोठेपणा मानणाऱ्या, आनंद मानणाऱ्या मुलांविषयी का अभिमान बाळगील? कोट्यवधी अशी सत्त्वहीन संताने असण्यापेक्षा मी निपुत्रिक असते तरी सत्त्वाने जगले असते, असे भारतमाता म्हणत असेल. ही भारतभूमी सत्यासाठी विश्वविख्यात होती. सत्यासाठी वनात जाणारा प्रभू रामचंद्र यांची जयंती आपण केली; ते सत्य जीवनात नसेल तर कोठला राम? आणि जेथे सत्याचा राम नाही ते राष्ट्र असून नसल्यासारखे आहे. भारतभूमीचे इतर सारे गेले तरी पर्वा नाही, तिचे सत्त्व न जावो, तिची सद्गुणसंपत्ती न जावो हीच प्रार्थना.

+++

संतांचा मानवधर्म

भारतीय संतांनी केवळ भक्तीचे मळे पिकवले नाहीत, तर आपल्या उपदेशाने भारतीय मनाची मशागत करून त्यांचे चारित्र्य घडवले. 'मऊ मेणाहुनी आम्ही विष्णुदास; कठीण वज्रास भेदू ऐसे' अशा संतांच्या थोर कार्यावर केलेले हे भावस्पर्शी भाष्य.....

४ जुलै ही स्वामी विवेकानंदांची पुण्यतिथी. १९०४ मध्ये स्वामी निजधामास गेले. चाळिशी संपली ना संपली तोच हा महापुरुष आपला दिव्य संदेश सांगून पडद्याआड गेला. विवेकानंदांचे मूळचे नाव नरेंद्र. विवेकानंद हे नाव त्यांनी पुढे घेतले. ते लहानपणापासून विरक्त वृत्तीचे. नवीन धोतर भिकाऱ्याला त्यांनी दिले. अति बुद्धिमान नि खेळकर. तालीम करायचे, कुस्ती करायचे. उत्कृष्ट गाणारे नि वाजवणारेही. तरुणांचे पुढारी असायचे. कॉलेजमध्ये सारे ग्रंथ वाचून काढले. त्या वेळेस केशवचंद्र सेन, रवींद्रनाथांचे वडील देवेंद्रनाथ वगैरे प्रसिद्ध धार्मिक मंडळी होती. त्यांची व्याख्याने विवेकानंद ऐकत.

त्यांनी या दोघांना, "तुम्ही देव पाहिला आहे का?" म्हणून विचारले. दोघांनी नकार दिला आणि याच वेळेस स्वामी रामकृष्ण परमहंसांची नि त्यांची गाठ पडली. नरेंद्रला बघताच रामकृष्णांची जणू समाधी लागली. "तुम्ही देव पाहिला आहे?" या प्रश्नाला, "हो पाहिला आहे. मी तुझ्याजवळ बोलत आहे त्याहूनही अधिक आपलेपणाने मी त्याच्याजवळ बोलतो." असे रामकृष्णांनी उत्तर दिले.

विवेकानंद आरंभी पक्के नास्तिक. "Let Mr. God come and stand before me – तो राजश्री ईश्वर कोठे असेल तर त्याने यावे माझ्यासमोर." असे ते म्हणायचे, परंतु रामकृष्णांनी त्यांच्या जीवनात क्रांती केली. निराळी साधना सुरू

झाली. पुढे रामकृष्ण परमहंस देवाघरी गेले. मरावयाच्या आधी ते विवेकानंदांस म्हणाले, "माझी सारी साधना मी तुला देत आहे !" महापुरुषाने जणू मृत्युपत्र केले! रामकृष्णांच्या साधनेला तुलना नाही. देव मिळावा म्हणून त्यांची केवढी धडपड ! अहंकार जावा म्हणून भंगी बनले. स्त्री-पुरुष भेद जावा म्हणून स्त्रीचा पोशाख करून वावरले. एक दिवस गेला की देवाला रडत रडत म्हणावयाचे, "एक दिवस गेला नि तू आला नाहीस." धनाची आसक्ती जावी म्हणून एका हातात माती नि एका हातात पैसे घेत नि म्हणत, "हीही मातीच आहे." नि गंगेत फेकीत. अशी ही अद्भुत साधना ! अनेक वर्षांची. परमेश्वराचा साक्षात्कार सर्व धर्मांच्याद्वारा त्यांनी करून घेतला. मशिदीतही त्यांना प्रभू भेटला. चर्चमध्येही भेटला. सर्वधर्म समन्वय त्यांनी केला. सर्व धर्म सत्य आहेत, ईश्वराकडे नेणारे आहेत असे त्यांनी अनुभवून सांगितले.

श्री. रामकृष्ण परमहंस यांचा जन्म ही एक ऐतिहासिक आवश्यकता होती. सारे जग जवळ येत होते. अशा वेळेस सर्व धर्मांचे ऐक्य शिकविणारा महापुरुष हवा होता. भारताला आणि जगाला अशा पुरुषाची जरूरी होती. भारतातही नाना धर्म. जोपर्यंत भारत विविधतेतील एकता ओळखून तदनुरूप वागणार नाही तोवर त्याचे नष्टचर्य संपणार नाही. स्वत: हे अनुभवून भारताने जगाला शिकवायचे आहे. भारताचे हे ईश्वरी कार्य आहे. श्री रामकृष्णांनी तो संदेश दिला. विवेकानंदांनी तो अनुभविला, शिकविला. गांधीजींनी त्याचा आणखी विस्तार केला. ते कार्य आणखी पुढे नेले.

स्वामी विवेकानंद रामनवमी, गोकुळाष्टमी या दिवशी उपवास करीत. त्याचप्रमाणे पैगंबरांची जयंती, पुण्यतिथी या दिवशीही उपवास करीत. हिंदू धर्म सर्व धर्मांना आदरील. अमेरिकेतील सर्वधर्म परिषदेत विवेकानंद म्हणाले, "हिंदू धर्म विश्वधर्म होऊ शकेल, कारण तो माझ्यातच सत्य असे मानीत नाही. इस्लाम, ख्रिश्चन धर्म सर्वांमध्ये सत्य आहे असे तो मानतो. सत्याचे बाह्य आविष्कार निराळे. आतील गाभा एकच. 'एक सत् विप्रा बहुधा वदान्त' हे महान् ऐक्यसूत्र हिंदू धर्माने शिकविले आहे."

जगात सर्वत्र द्वेषमत्सर. एकीकडे दुनिया जवळ येत आहे, तर हृदये मात्र दूर जात आहेत. अशा वेळेस तुमचा सर्वांचा आत्मा एकच आहे, अशी घोषणा करणारा प्रबळ पुरुष हवा होती. ही घोषणा अमेरिकेत शिकागो येथे स्वामींनी केली. या सर्वधर्म परिषदेत स्वामींची आधी दादच लागेना; परंतु एके दिवशी त्यांना संधी

मिळाली. भगव्या वस्त्रातील ती भारतीय मूर्ती उभी राहिली आणि 'माझ्या बंधू-भगिनींनो' असे पहिलेच शब्द त्या महापुरुषाने उच्चारले आणि टाळ्यांचा गजर थांबेना. का बरे? त्या दोन शब्दांत कोणती जादू होती? त्यांच्या आधी जे जे व्याख्याते बोलून गेले ते सारे 'Ladies and Gentlemen - सभ्य स्त्रीपुरुषहो' अशा शब्दांनी आरंभ करीत, परंतु ही विश्वैक्याची मूर्ती उभी राहिली. सर्वत्र एकता अनुभवणारे ते डोळे, आपलीच आत्मरूपे पाहणारे ते डोळे, प्रेमसिंधूतून बुचकळून वर आलेले ते शब्द ! त्या दोन शब्दांनी अमेरिकन हृदय जिंकून घेतले आणि मग ते अपूर्व व्याख्यान झाले. स्वामीजी विश्वविख्यात झाले आणि भारताचा विजयी सुपुत्र घरी आला.

मायभूमीने अपूर्व स्वागत केले. विवेकानंद धर्ममूर्ती होते; परंतु त्यांचा धर्म रानावनात जा सांगणारा नव्हता. सभोवती दुर्दशा असताना हिमालयात कोठे जायचे?

महान फ्रेंच साहित्यिक रोमा रोलां याने विवेकानंदांवर एक उद्बोधक ग्रंथ लिहिला आहे. त्यात तो म्हणतो, "Vivekananda was first a Nation builder then a religious reformer", विवेकानंद हे आधी राष्ट्रनिर्माते होते, मग धर्मसुधारक होते. विवेकानंदांचा धर्म राष्ट्राची उभारणी हा होता. भारतावर त्यांचे अपार प्रेम. ते म्हणतात, ''माझ्या बाळपणाचा पाळणा म्हणजे ही भारतभूमी; आणि माझ्या उतारवयातील मोक्षाची वाराणसी म्हणजे हीच भारतमाता. तिचे सारे सारे मला प्रिय आहे. ये पंडिता, तू मला प्रिय आहेस, कारण तू भारताचा आहेस आणि ये अज्ञानी बंधू, तूही मला प्रिय आहेस, कारण तू भारताचाच. सुष्ट वा दुष्ट, ब्राह्मण वा चांडाळ, सारे मला प्रिय. सर्वांना मी हृदयाशी धरीन, सर्वांवर प्रेम करीन.''

भारताची दुर्दशा पाहून ते कासावीस होत. एकदा एका अमेरिकन कोट्यधीश कुबेराकडे ते होते. रात्री सुंदर पलंगावर ते निजले होते. तेथले ते वैभव, तो थाटमाट. स्वामीजींना झोप येईना. त्यांना सारखे रडू येत होते. उशी भिजून गेली. तो पलंग त्यांना निखाऱ्याप्रमाणे वाटू लागला. ते जमिनीवर झोपले. सकाळी मित्राने विचारले, ''उशी ओलीचिंब कशाने?'' ''मी रात्रभर रडत होतो. अमेरिकेत केवढे वैभव आणि भारतात पोटभर खायलाही नाही.'' ते एका पत्रात लिहितात, ''आपण हिंदुस्थानात पाप केले. त्या पार्थसारथी गोपाळकृष्णाच्या भूमीत स्त्रियांची, अस्पृश्यांची पशूहूनही वाईट स्थिति आपण केली आहे.'' अमेरिकेतील लोकांना ते म्हणायचे, ''कृपा करून हिंदुस्थानला मिशनरी नका पाठवू. मोठी मोठी धर्मतत्त्वे आईच्या दुधाबरोबर तेथे मुलांना मिळतात.

रस्त्यातील भिकारी महान् धर्मतत्त्वे सांगणारी गाणी म्हणत जातात. मूठभर भिक्षा घेऊन संबंध हिंदुस्थानभर ते उदारधर्म पसरवीत असतात. भारताला तुम्ही संसार सुखी करणारे विज्ञान, पोटभर जगता येईल असे धंदेशिक्षण द्या."

मार्गारेट नोबल या इंग्रजी बाई विवेकानंदांना लंडनमध्ये भेटल्या. "मी तुमच्या देशासाठी काय करू शकेन." असे त्या ब्रह्मचारी विदूषीने विचारले. विवेकानंद म्हणाले, "माझ्या देशातील मायभगिनींस शिकवायला या. कलकत्त्यात एखादी स्त्रियांची शाळा काढा." आणि निवेदितादेवींनी कलकत्त्यात येऊन शाळा काढली. विवेकानंदांनी १८९९ मध्ये रामकृष्ण मिशन संस्था काढली. 'आत्मनो मोक्षार्थ जगद्वितायच !' स्वत:साठी, मोक्षासाठी व जगाच्या हितासाठी ही संस्था होती. किंबहुना जगाच्या हितातच स्वत:चा मोक्ष असे ही संस्था सांगत असे. विवेकानंद एकदा बेलूर मठात संन्यास धर्मावर बोलताना म्हणाले, "संन्यास म्हणजे मरणावर प्रेम. रोज परसेवेत झिजायचे, तिळतिळ मरायचे. अशा मरणात मोक्ष असतो. देहाची आसक्ती नष्ट करणे, बारीक-सारीक कामात सुद्धा त्यागाची भावना जागृत ठेवणे म्हणजे संन्यास. एखाद्या क्षणी अत्युच्च विचारांत रममाण होऊन सारे वैभव तृणवत् दूर फेकाल तर दुसऱ्या क्षणी कचऱ्याची टोपली उचलून सारे स्वच्छ कराल."

सेवेच्या द्वारा त्यांना मोक्ष हवा होता. निरपेक्ष, निरहंकारी सेवा. एकदा एक मुमुक्षु त्यांच्याकडे येऊन म्हणाला, "मी दारे, खिडक्या बंद करतो. जप करतो. तरी देव भेटत नाही." तेव्हा म्हणाले, "दारे, खिडक्या सताड उघडी टाक. तुझ्या खिडकीखालून रोज शेकडो प्रेते जात आहेत बघ. शहरात साथी आहेत. त्यांची सेवा करायला जा. औषध दे. रस्ते, गटारे स्वच्छ कर." स्वत: स्वामी प्लेगच्या नि कॉलऱ्याच्या दिवसांत कलकत्त्यात मित्रांसह सेवा करीत होते.

कोणी विचारले, "पैसे खुंटले तर?" स्वामी म्हणाले, "बेलूरचा मठ विकीन, तेथील जमीन विकीन." त्यांना आसक्ती कसलीच नसे. महात्माजींनी हरिजन आश्रम नाही देऊन टाकला? महापुरुष वृत्तीने मुक्त असतात, अनासक्त असतात.

दरिद्री नारायण हा महाशब्द प्रथम विवेकानंदांनीच उच्चारला. "नारायण हवा असेल तर दरिद्री बांधवांची सेवा कर. आज नारायण दरिद्री आहे. जा त्याला सुखी कर." महात्माजींनी हा शब्द सर्वत्र नेला. ते जेव्हा दानार्थ हात पसरीत तेव्हा 'दरिद्री नारायण के वास्ते' असे म्हणत.

विवेकानंदांना रडगाणे माहीत नव्हते. ज्ञानवैराग्याचा, अगाध ब्रह्मचर्याचा तो अद्भुत पुतळा! सामर्थ्याचे ते सिंधू होते. ते सिंहाच्या छातीचे होते. ते नेहमी म्हणत, "मला एक हजार माणसे द्या. ती सिंहाच्या छातीची मात्र असू द्यात, मग भारताचा मी कायापालट करीन. वेदांत तुम्हाला सांगतो की तुमच्यात परमात्मा आहे. त्याची चित्कळा, त्याचा अंश तुमच्यात आहे, मग तुम्ही खाली माना घालून का बसता? उठा नि पराक्रम करा. हिंदू धर्मात नाना भ्रष्ट गोष्टी शिरल्या. आपण पापी पापी म्हणत बसलो, हिंदू धर्माने हे दुबळेपणाचे तुणतुणे कोठून आणले? ते मोडूनतोडून फेका. 'चिदानंदरूप: शिवोऽहम्' ही तुमची घोषणा असू दे. 'नायमात्मा बलहीनेन लभ्य:' – दुबळ्याला कोठला आत्मा?

"उपनिषदांचा अभ्यास तेजस्वी बनवितो. नेभळट नाही बनवीत. तुमचा स्वत:वर विश्वास आहे की नाही बोला. ज्याचा स्वत:वर विश्वास नाही त्याचा देवावर तरी कोठून बसणार? रडक्या दुबळ्या आस्तिकापेक्षा स्वत:च्या धर्मशक्तीवर विश्वास असणारा नास्तिक बरा."

स्वामींची अशी जळजळीत वाणी आहे. ते एकदा बंगाली तरुणांना म्हणाले, 'तुम्हाला देव पाहिजे? जा फुटबॉल खेळा. हसू नका. बलवान बना. उत्साही बना. लाथ मारीन तेथे पाणी काढीन ही शक्ती हवी.'

स्वामीजींनी मृतवत पडलेल्या राष्ट्राला वीरवाणी ऐकविली.

एकदा एका मिशनऱ्याजवळ वाद चालला होता. स्वामींनी त्याचे सारे मुद्दे खोडून काढले. तरी तो हट्ट सोडीना. तेव्हा म्हणाले, 'आता हा सोटा पाठीत घालतो म्हणजे ऐकशील.' अशी ती मूर्ती होती.

त्यांची कीर्ती जगभर गेली. कलकत्त्यात त्यांचे अपार स्वागत झाले. हत्तीवरून मिरवणूक. तो गर्दीत त्यांना बाळपणाचा लंगोटी मित्र दिसला. त्यांनी एकदम खाली उडी मारली नि कडाडून भेटले.

विवेकानंदांच्या अशा शतस्मृती आहेत. ते महान जीवन आहे. त्यातून भारताला सदैव स्फूर्ती मिळेल. आज देश स्वतंत्र झाला आहे, परंतु फुटीर वृत्ती बळावत चालली आहे. अशा वेळी सर्व धर्मांच्या ऐक्याची मूर्ती जे विवेकानंद त्यांच्यापासून आपणांस अमर संदेश मिळत आहे. भारताचा मोठेपणा कशात यासंबंधी ते म्हणतात, 'या देशाने कधी कोणावर आक्रमण केले नाही. हा या देशाचा मोठेपणा असे मला विचार

करता करता वाटू लागते.' सर्व धर्मांचा, संस्कृतीचा मेळ घालणे, जगाला प्रेमधर्माने राहायला शिकविणे हे भारताचे कर्तव्य आहे; परंतु आधी स्वतःच्या देशात हे अनुभवूया. देशात एकमेकांची काळजी घेऊया.

विवेकानंद म्हणतात, "समता उत्पन्न करायची असेल तर विशेष हक्क नाहीसे व्हायला हवेत. हे विशेष हक्क नष्ट व्हावेत म्हणून व्यक्तीनेच नव्हे, एखाद्या राष्ट्रानेच नव्हे तर साऱ्या जगाने खटपट केली पाहिजे. पैशाचे दोन पैसे कसे करावेत ही अक्कल एखाद्याच्या अंगी उपजत असणे स्वाभाविक आहे; परंतु तेवढ्यानेच गोरगरिबांना तुडविण्याचा हक्क प्राप्त होतो की काय?"

श्रीमंत आणि गरीब यांच्यातील तेढ विकोपास जाऊ पाहात आहे. आपल्या अंगातील विशेष गुणांचा उपयोग दुसऱ्याला नाडण्याकडे करणे यांलाच विशिष्ट हक्क म्हणतात. हे राक्षसी हक्क नष्ट करण्यासाठी त्या त्या काळातील लोक लढत असतात. नितिशास्त्राचा हाच रोख असतो. आपणही हे विशेष हक्क नष्ट करू तर विविधता राहूनही ऐक्य प्रवृत्ती वाढेल, साम्यावस्था वाढेल.

महात्माजींनी सर्वोदयाचा हाच मार्ग दाखविला. विशेष हक्क नष्ट केल्याशिवाय समता कोठून येणार? विवेकानंद हेच सांगत आहेत. समाजवादी पक्ष याच दिशेने चला म्हणून सांगत आहे. हा गुणधर्मच आहे. याने जाऊ तर कल्याण आहे, नाहीतर हा देश रक्ताळ वातचक्रात सापडल्याशिवाय राहणार नाही.

सावधान !

पंढरपूर म्हणजे महाराष्ट्राचे हृदय. महाराष्ट्राच्या जीवनाची ही किल्ली. पंढरपूरची कळ दाबली तर महाराष्ट्रभर प्रकाश पडेल असे मनात आले. पंढरपूर म्हणजे दक्षिणची काशी, येथील पांडुरंगाचे मंदिर अति प्राचीन. जवळजवळ अडीच हजार वर्षांचे. बडवे मंडळी तेथे येऊनच दोन हजार वर्षे झाली. बडवे मंडळी कर्नाटकातून आली. पंढरीचे वारकरी तिकडेही आहेत. कानात मकरकुंडले घालण्याची दक्षिणेकडचीच पद्धती..आद्य शंकराचार्य पांडुरंगाच्या दर्शनार्थ आले होते. त्यांनी पांडुरंगाष्टक स्तोत्र केले आहे. "देवा, कमरेवर हात ठेवून माझ्या भक्तांना संसारसागर कमरेइतकाच खोल आहे असे का तू दाखवीत आहेत?" असे त्यांनी त्यांत म्हटले आहे. पंढरपूर, बार्शी म्हणजे प्राचीन धर्मसंस्कृतीचा वसौटा. धर्मसंस्कृतीचे माहेरघर. अंबरीष राजा

बार्शीचाच. अंबरीषासाठी भगवान आला, पुंडलिकासाठी पंढरपूरचे परब्रह्म आले. असे हे प्राचीन पवित्र मंदिरच देवाच्या सर्व लेकरांना मोकळे व्हावे म्हणून मी उपवास सुरू केला होता.

वारकरी पंथ सुरू होण्यापूर्वी जवळजवळ हजार वर्षे हे मंदिर प्रसिद्ध होते. पुढे संतांनी आणखी महिमा वाढवला. नामदेव-ज्ञानदेव उत्तरेची यात्रा करून आले. इस्लामी धर्म येत होता. मलबार किनाऱ्यावर तो कधीपासून आलेला होता. इस्लामी धर्मातील समतेचा परिणाम संतांच्या मनावर झाल्याशिवाय राहिला नाही. हिंदू धर्म उदार न होईल तर टिकणार नाही असे त्यांना वाटले असावे. मशिदीत सारे समान. हिंदू मंदिरात असे केव्हा होईल? असे विचार त्यांच्या डोक्यात आले असतील. तेव्हा पंढरपूरच्या वाळवंटात तरी भेदभाव, शिवाशिव नको असे त्यांनी ठरविले असावे. साऱ्या महाराष्ट्रातून विठ्ठलनामाचा गजर करीत येथे या. येथे परस्परांस भेटा. क्षेमालिंगने द्या. आणि नवीन प्रथा सुरू झाली, वाळवंट दणाणले, गजबजले. तुकारामांच्या वाळवंटाचा अपार महिमा आहे.

'एकमेकां लोटांगणी येती रे
कठोर हृदये मृदू नवनीते
पाषाण पाझर फुटती रे,'

असे उचंबळून तुकोबा म्हणतात.

संत बंडखोर होते. संस्कृतातील ज्ञान त्यांनी मराठीत आणले. संत कारुण्यसागर होते. झोपडी-झोपडीत त्यांना ज्ञान न्यायचे होते. खरा धर्म न्यायचा होता. त्यांचा छळ झाला. ज्ञानेश्वरादिकांवर बहिष्कार, कुंभाराचे मडकेही त्यांना मिळू दिले नाही. तुकारामांचे अभंग इंद्रायणीत फेकण्यात आले. एकनाथी भागवत काशीच्या पंडितांनी गंगेत फेकले. संत मेल्यावर त्यांच्या पालख्या आपण उचलतो, परंतु ते जिवंत असताना त्यांचे आपण छळच केले, परंतु ते डगमगले नाहीत. वाळवंटांत तरी त्यांनी भेदभाव नष्ट केला.

त्याच्या पुढचे पाऊल आपण नको का टाकायला? समाज पुढे जात असतो. नदी थबकली की संपली. समुद्राला मिळेपर्यंत ती पुढे जाणार. आपणही अवघाचि संसार सुखाचा होईपर्यंत पुढे गेले पाहिजे, परंतु आपण पुढे गेलो नाही. पंढरपूरच्या वाळवंटात एकमेकांना भेटू; परंतु देवाजवळ हरिजनांना जाता येत नाही. वारी करून

घरी आल्यावर गावात शिवाशिव आहे ती आहेच. शेवटी पंढरपूर स्वत:जवळ आणायचे असते. एकनाथ म्हणतात,

'काया ही पंढरी आत्मा हा विठ्ठल'

शेवटी स्वत:च्या जीवनात सारे आणायचे असते; परंतु आपण संतांचा मागोवा घेत पुढे गेलो नाही. एखाद्या आईचे मूल पहिले पाऊल टाकते. ती शेजारणीला आनंदाने म्हणते, "बाळ्याने आज पहिले पाऊल टाकले." परंतु चार महिने झाले तरी बाळ्या जर दुसरे पाऊल टाकीत नसेल तर मातेला का आनंद होईल? आपण सहाशे वर्षांत दुसरे पाऊल टाकले नाही. संतांनी वाळवंटात सर्वांना जवळ घेतले. आपण मंदिरांत सर्वांना घेऊया. आपले हे वंशज असे कसे गतिहीन करंटे, असे मनात येऊन संत तडफडत असतील, दु:खाने सुस्कारे सोडीत असतील.

आपण का पूर्वजांच्यापेक्षा अधिक शहाणे असे कोणी विचारतात. आपण पुढच्या काळात असल्यामुळे आपणास पुढचे दिसते. बापाने लहान मुलाला खांद्यावर घेतले तर त्या लहान मुलाला बापापेक्षा अधिक दूरचे दिसेल. मुलगा जर बापाला म्हणेल, "बाबा, ती तिकडून लॉरी येत आहे, दूर व्हा. मला दिसते आहे." तर मला बाप का असे म्हणेल, "गाढवा ! मला शिकवतोस? मला दिसत नाही. तुला कशी दिसेल !" आपण मागच्या पिढ्यांच्या खांद्यावर आहोत. आपण पुढचे पाहू शकतो. यात मागील पिढ्यांचा अनादर नाही. उलट पुढे न जाण्यात त्यांचा अनादर आहे. पायरीला नमस्कार करायचा, परंतु तिच्यावर पाय ठेवूनच पुढे जायचे. उंच चढायचे. तेथेच घुटमळत नाही बसायचे. ती ती पिढी एकेक पायरी वर जात असावी. ध्येयमंदिराकडे जात असावी.

आपण काळाप्रमाणे बदल करायला हवा. आजूबाजूची हवा पाहून वागावे लागते. तसे न करू तर मरू. थंडीचे दिवस आले तर आपण गरम पांघरू. उन्हाळ्याचे दिवस आले तर पातळ कपडे पेहरू. थंडीत उघडे बसू तर गारठून मरू. उन्हाळ्यांत घोंगड्या पांघरू तर घामाघूम होऊन गुदमरून मरू.

थंडीच्या दिवसांत कढत चहाचा घोट घ्याल. उन्हाळ्याच्या दिवसांत थंड सरबताचा घोट घ्याल. हवा बघून आपण कपड्यालत्त्यांत बदल करतो, मग डोक्यात नको का बदल करायला? १९४७ सालात वावरायचे आणि डोके का त्रेता युगातील ठेवायचे? आज जगात नवीन विचारांची वादळे आहेत. समाजवादी क्रांतीचे नगारे

वाजत आहेत. इन्किलाबची गर्जना होत आहे. समतेचा घोष होत आहे. अशा वेळेस तुम्ही शिवू नकोची तुणतुणी वाजवीत बसायचे? जरा काळवेळ पाहा. सारी दुनिया जवळ जवळ येत आहे. सारे जग जणू तिमजली घर झाले आहे. अमेरिकेत काय बोलले जाते, काय होते, ते मुंबईत लगेच वर्तमानपत्राच्या कचेरीत आपोआप यंत्राने लिहिले जाते. बंधूंनो, दूर राहायचे हे दिवस नाहीत. डबकी करून बसण्याचे हे दिवस नाहीत. मोठी दृष्टी घ्या. विचारांत, आचारांत उदार दृष्टी आणा.

धर्मात दोन भाग असतात. यम नि नियम. यम म्हणजे कधी न बदलणारी शाश्वत सत्ये. खरे बोलावे, आत्मा अमर आहे, सर्वत्र आत्मतत्त्व पाहा-या तत्त्वांना यम म्हणतात. ही तत्वे त्रिकालाबाधित असतात. प्रभू रामचंद्र, हरिश्चंद्र यांचा काळ असो, महात्माजींचा असो. सत्याला सोडू नये हा निरपवाद सिद्धांत आहे. यमात फरक कधी होत नाही; परंतु नियमात होत असतो. त्या त्या काळी समाजाला फरक करावे लागतात. चालीरीती बदलतात. लहानपणचे कपडे मोठेपणी अंगास येणार नाहीत. असे फरक आपण सदैव करीत होतो. म्हणून तर नाना स्मृती. श्री. शंकराचार्यांनी म्हटले आहे, "अग्नी थंड आहे असे शेकडो श्रुति येऊन सांगू लागल्या म्हणून का प्रमाण मानायचे?"

पूर्वज फरक करणारे, बदल करणारे होते. स्वतंत्र बुद्धी वापरणारे होते. एकदा एक शास्त्री मला म्हणाले, "गीतेत 'तस्मात् शास्त्र प्रमाणं ते' असे म्हटले आहे. शास्त्राने सांगितल्यामुळे आम्ही अस्पृश्यता मानतो. दुष्टपणामुळे नव्हे." परंतु मी त्यांना म्हटले, "भगवान् जे शास्त्र प्रमाण सांगत आहेत ते तुमचे शिवाशिवीचे शास्त्र नव्हे, ते म्हणतात, 'मया प्रोक्तं शास्त्रम्, मी जे शास्त्र तुला सांगितले ते प्रमाण मान. ते तर सारे बुरसटलेले धर्म झुगारून द्यायला सांगत होते."

"सोडून सगळे धर्म शरण ये मज – सर्व धर्मान् परित्यज्य मामेकं शरणं व्रज," असे ते म्हणत आहेत. ते वेदवादांचे धर्म त्यांना नको होते. श्रेष्ठ, कनिष्ठपणाचे धर्म त्यांना नको होते. समाजाच्या सवेचे कोणतेही कर्म करणारा मुक्त आहे अशी त्यांची ही महान शिकवण आहे. "स्वकर्म कुसुमीं त्यास पुजूनी मोक्ष मेळवी." सेवेचे कोणतेही कर्म म्हणजे प्रभूची पूजा. श्रीकृष्णाच्या काळी ब्राह्मण, क्षत्रियांना वरचे स्थान होते. स्त्रियांना कमी मानू लागले होते. श्रीकृष्ण म्हणतात,

'स्त्रियो वेश्यास्तथा शूद्रस्तेऽपियान्ति परांगतिम्.'

शेतकरी, कामकरी, सर्वांना ते जवळ घेत आहेत. सेवेची जी जी कर्मे आपण कमी मानू लागलो ती ती भगवंतांनी स्वत: केली. राजसूय यज्ञाच्या वेळी धर्मराजा श्रीकृष्णास म्हणाला, "देवा, तू कोणते काम करशील? येणाऱ्या थोरामोठ्यांचे स्वागत करशील?" श्रीकृष्ण म्हणाला, "नको, मी एक काम करीन. हजारो लोक जेवून उठतील तेथे मी शेण लावीन." पुरुष जेवून ओटीवर विडा चघळीत बसतात. बायका शेण लावतात म्हणून का त्या तुच्छ? तर मग तेच काम मी करतो. आणि ते कर्म पवित्र आहे, थोर आहे असे जगाला दाखवतो असे श्रीकृष्ण मनात म्हणाले असतील. गाई गुराख्याबरोबर ते जेवले, त्यांनी घोडे हाकले, त्यांचे खरारे केले, त्यांनी उष्टी काढून शेण स्वत: लावले. महापुरुष सेवेची जी जी कर्मे पवित्र आहेत ती कर्मे स्वत: करून सिद्ध करतात. आपल्या महाराष्ट्रांचे महर्षी सेनापती बापट आहेत. त्यांचे दिव्य जीवन तुम्हाला माहीत आहे?

समाजाची सेवा करणाऱ्या सर्वांना ऋषी उचंबळून प्रणाम करीत आहे. रुद्र-सूक्तात ऋषी म्हणतो, 'कुंभारा तुला प्रणाम; सुतारा तुला प्रणाम; चांभारा तुला प्रणाम.' मी लहानपणी हे मंत्र शिकलो. मोठेपणी अर्थ कळू लागला. मी सुटीत गावी जाऊन शंकराच्या देवळात बसत असे. वेद शिकवणारे भटजी 'चर्मकारेभ्यो नमो' - चांभारा तुला प्रणाम असे म्हणत. शंकरावर अभिषेक करीत असत. मी त्यांना म्हणे, "तुम्ही चांभाराला प्रणाम करीत आहात. पंड्या चांभाराला आणू का मंदिरात?" ते रागावत. म्हणत, "तुला शिंगे फुटली." मी म्हणे, "तुम्ही म्हणता त्याचा असा अर्थ आहे." अर्थरूप होणे म्हणजे धर्म.

बंधूंनो, आपण मोठमोठी तत्त्वे बडबडतो, परंतु कृती मात्र उफराटी असते. ओठावरचा घास पोटात गेला नाही तर शरीर धष्टपुष्ट होईल का? त्याप्रमाणे जी तत्त्वे आपण बडबडतो ती कृतीत न आणू, जीवनात न आणू तर समाज समृद्ध होईल का? भगवान श्रीकृष्णाच्या या भूमीत आज सर्वत्र दु:ख, दैन्य, दास्य आहे. त्यांच्या गोकुळात तर अपार आनंद होता.

गोकुळात प्रेमाचा पाऊस पडत होता. 'यारे यारे अवघेजण' अशी भगवंतांची हाक होती. तेथे भेदाभेदांची भुते नव्हती. वणवे भेदाचे श्रीकृष्णाने गिळून टाकले होते. नवीन पिढीच्या सर्व मुलांना त्याने एकत्र जेवायला बसवले. सर्वांच्या शिदोऱ्या एकत्र मिसळून काला केला. त्याने अलग पंगती नाही बसवल्या. याचा पाट असा,

त्याचा तिरका, असला चावटपणा गोकुळात नव्हता. तेथे पेंद्याची भाकरी नि श्रीमंताकडची पोळी एकत्र मिसळण्यात आली होती. तो गोकुळातील काला आठवा. आकाशातील देवांना त्याचा हेवा वाटला.

आपापल्या बंगल्यात बसून अमृत ओरपून ते कंटाळले होते. ते वैभवाला, एकांडे शिलेदारपणाला कंटाळले. ते यमुनेच्या पाण्यातील मासे बनले. गोपाल-कृष्णाच्या हातचे शितकण यमुनेच्या पाण्यात पडत. ते मटकावून ते कृतार्थ होत. त्या एकेका कणात प्रेमाचा सागर होता. मधुरतेचा सिंधू होता. सर्वांसह एकत्र जेवणारा कोठे तो गोपाळकृष्ण आणि अमक्यातमक्याकडे जेवला म्हणून बहिष्कार घालणारे आपण करंटे कोठे ! कशाला रामकृष्णाची आपण नावे घ्यावीत? कशाला ती पवित्र मानता? मुलाबाळांना ठेवता?

तो प्रभू रामचंद्र गुह कोळ्याला हृदयाशी धरी. शबरीची उष्टी बोरे खाई. जटायू पक्ष्याचे श्राद्ध करी. वानरांना, अस्वलांना जवळ घेई. आपण रामजन्म करतो. गोकुळाअष्टमीस कृष्णजन्म करतो, परंतु देव जन्मताच मरतो. आज भारतवर्षात देव नाही. जेथे भाऊ भावाची उपेक्षा करीत आहे, भाऊ भावाला शिवू नको म्हणत आहे, भाऊ भावाला जवळ घेत नाही, प्रेमाने कवळा देत नाही, पाणी देत नाही, तेथे कोठला धर्म?

आणि शंकराची मूर्ती म्हणजे मला जणू अंत्यजाची मूर्ती वाटते. त्याचे नेसू कातडे, हातात कपालपात्र, हाडाचे भांडे, अंगाला धूळ, रक्षा. कोणाचे आहे हे रूप? कोणाची मूर्ती म्हणून महिम्न स्तोत्रात म्हटले आहे की देवा, अमंगल स्वरूपातच मांगल्य आहे. महिम्न स्तोत्र रचणाऱ्याला ते दिसले, परंतु तुम्हा आम्हाला दिसले नाही. हरिजनांचा, सेवा करणाऱ्यांचा महिमा कळला नाही.

आणि दत्ताची मूर्ती बघा ! बरोबर कुत्री आहेत. कशी भणंग वेशाने हिंडत आहेत. त्यातील भावार्थ लक्षात घ्या. देव सर्वत्र आहे. सर्व स्वरूपांत आहे. तो बघा. माणसाला दूर नका करू, परंतु आपण सारे माणूसघाणे झालो.

ज्ञानेश्वर महाराज म्हणतात, देवाची भक्ती मनात असेल तर जातीव्यक्तीच्या नावाने शून्य करा - 'तेथे जाति व्यक्ति पडे बिंदुले.' परंतु देवासमोरही आपण जातींचे अहंकार मिरवतो. मुंबईहून मुलगा सुटाबुटात घरी यावा व एकदम आईला भेटायला जावा. आई म्हणेल, 'तुझे खोगीर उतरून ये. तो जामानिमा ओटीवर काढून आत

ये.' त्याप्रमाणे ती जगन्माता म्हणेल, 'अरे, मी ब्राह्मण, मी मराठा, मी साळी, मी माळी हे बिल्ले छातीवर लावून माझ्याकडे नका येऊ. सारे विसरून या.'

जेथे आपण सारा अहंकार विसरू असे एक तरी स्थान जगात असू दे. बैठकीत, बाजारात, कचेरीत तुझी ऐट आहे, घमेंड आहे, परंतु प्रभूसमोर तरी ती नको. तेथे धुळीतील कण हो. विरघळून जाणारे मातीचे ठिपळ हो. तेथेही अहंकार नेशील तर कसे होईल?

तुकाराम महाराज म्हणतात, "जाळीन मी भेद । येथे प्रमाण तो वेद- मी सारे भेद झुगारीन. वेदांचा मला आधार आहे." आणि वेदांचा आत्मा त्यांच्याजवळ होता.

'वेदांचा अर्थ तो आम्हासचि ठावा ।
येरांनी वहावा भार माथां ।'

पोथ्या-पुराणांची ओझी दुसरे बाळगतील, घोकतील; परंतु त्यातील अर्थ आम्हा संतांजवळ आहे. भेदाभेद अमंगळ म्हणून ते म्हणतात. ज्या गावातील लोक परस्परास प्रेम देणार नाहीत तेथे राहूही नये असे ते म्हणतात. जिकडे तिकडे त्यांना आत्मा दिसे. 'चल नारायण, चल माझे घरी,' असे ते रस्त्यात भेटणाऱ्याला म्हणतात. सर्वत्र त्यांचा नारायण आहे. आपल्या सेनापतींचे असेच.

मी एकदा पुण्यात त्यांना रस्त्यात भेटलो. त्यांनी माझा हात धरला. म्हणाले, "चला जेवायला." मी म्हटले, "मी असा कसा येऊ?" "आपण असेल ते खाऊ," ते म्हणाले. सेनापती मुक्त पुरुष आहेत. सर्वांना जवळ घेत. कोठून आणलीत ही शिवाशिव? अद्वैताच्या या भूमीत का हे दुहीचे अपरंपार पीक? तुकाराम महाराजांनी एकाचाच विटाळ माना म्हणून सांगितले आहे,

'छळीत जो खळ । त्याचा धरावा विटाळ' जो कोणी दुष्ट छळ करीत असेल त्याला दूर उभे करा, परंतु त्याचा तर आम्ही उदो उदो करतो.

समानता हा तर धर्माचा आत्मा. ख्रिस्ती मंदिरात सारे ख्रिस्ती जातात, मशिदीत सारे मुसलमान जातात; परंतु आपल्या मंदिरात सारे हिंदू जमू शकत नाहीत. ते का देवाचे मंदिर? देवाजवळ सारे समान. ना कोणी बडा ना छोटा; ना श्रेष्ठ ना कनिष्ठ.

औरंगजेब एकदा शुक्रवारी नमाज पढायला उशिरा गेला. मशिदीत हजारो मुसलमान आधी आले होते. बादशहास पाहून सारे हटो हटो करून जागा द्या म्हणून

बोलू लागले. औरंगजेब सतापून म्हणाला, ‘‘कोणी हटू नका. जागच्या जागी बसा. येथे मी बादशहा नाही. तुम्ही प्रजा नाही. एका अल्लासमोर आपण आहोत. मी उशिरा आलो आहे. दारात बसेन.’’

मुसलमानी धर्मात ही समानता आहे. बाहेर कोणी अमीर असेल, फकीर असेल परंतु मशिदीत तरी सारे समान. आपल्या देवळात आहे का ही स्थिती? तेथेही आपली भांडणे, श्रेष्ठकनिष्ठपणाचे वाद. तेथेही सर्वांना प्रवेश नाही. माणसाला दूर करणाऱ्याजवळ देव नसतो. थोर कवी रवींद्रनाथ यांनी एक सुंदर गोष्ट कवितेत लिहिली आहे. एक पुजारी देवपूजेसाठी जात असतो. सोवळा आहे तो. हातात पूजेचे ताट आहे. धूपदीप, फुले, उदबत्त्या, कापूर सारे आहे. आपल्या पाठोपाठ कोणीतरी येत आहे असे त्याला वाटले. तो मागे वळून बघतो, ‘‘कोण रे तू? हो दूर. शिवशील, सावली पडेल. हो दूर. मी सोवळा आहे. हो दूर. तिकडे चालता हो.’’ असे म्हणत तो मंदिरात येतो, परंतु त्याला मंदिरात देवाची मूर्ती दिसत नाही.

‘‘करा रे, वाजवा रे नगारे, देवाची मूर्ती कोणी चोरली, धावा, धावा,’ असे तो ओरडतो. चारी दिशांनी लोक येतात, धावतात. त्या पुजाऱ्याने ज्याला हिडीस फिडीस करून घालवलेले असते त्याच्याजवळ सर्वांना मूर्ती दिसते. ‘‘पकडा त्या हरामखोराला. तो बघा मूर्ती घेऊन जात आहे. केव्हा गेला मंदिरात? पकडा,’’ असे म्हणून सारे धावतात. तो चोर सापडत नाही. ते थकतात. इतक्यात चोर अदृश्य होतो. कोठे गेला? पाताळात गेला की आकाशात? सारे वरखाली चोहोबाजूला टकमक बघू लागतात. इतक्यात समोर चतुर्भुज सावळी मूर्ती त्यांना दिसते. ते लोटांगण घालतात. ‘‘देवा, तू इकडे कोठे होतास?’’ ते विचारतात.

‘‘मी तुमच्या मंदिरातून चाललो. त्या माणसाला हो दूर, हो दूर, असे हा पुजारी म्हणत होता. त्या माणसात का मी नव्हतो? माणसाला दूर हो म्हणणारा देवाला दूर हो म्हणत असतो. म्हणून मी चाललो.’’

बंधूंनो, सर्वांत तुच्छ वस्तू म्हणजे माती, दगडधोंडा. त्या मातीची मंगलमूर्ती बनवून तिच्यात आपण प्रभूचे सौंदर्य बघतो. दगडाची मूर्ती बघून तिच्यात प्रभूला पाहतो. मग चैतन्यमय माणसात तो का पाहात नाही? वडपिंपळ, उंबर पाहून नमस्कार करता, परंतु माणसाला का दूर करता? माणसांचा अव्हेर करणाऱ्याला कोठला देव?

धर्म हा जोडणारा असतो. तोडण्यासाठी तो नसतो. समाजाची धारणा ज्याने

होते तो धर्म. कोकणात घराचा जो आधारभूत खांब, आधारभूत तुळई, त्याला धारण म्हणतात, धारणाची पूजा करतात. आंब्याचे डहाळे बांधतात, कारण सारे घर त्यावर आधारलेले. धर्म म्हणजे सर्वांचा साधार, परंतु ज्या समाजात कोट्यवधी लोक दूर फेकले आहेत, तेथे का धारणाप्रधान धर्म शिल्लक आहे? तो समाज धर्महीन आहे. शतखंड झालेला तो असणार.

समर्थ म्हणाले,

"आपणास चिमोटा घेतला । तेणे जीव कासावीस ।।

आपणावरून दुसऱ्याला । ओळखीत जावे ।। –

मला कोणी चिमटा घेतला तर मला दुःख होते, असे दुसऱ्यास चिमटा घेतला तर दुसऱ्यास होते हे ओळखणे म्हणजे धर्म.

विवेकानंदांहून गेल्या शतकात हिंदू धर्माचा थोर उपासक दुसरा कोण असेल? अमेरिकेत त्यांनी हिंदू धर्माचा विजयध्वज फडकावला. तो इतिहास वाचून आमच्या अंगावर मूठभर मांस चढते, परंतु तुमची शिवाशिवी का त्यांनी जगासमोर मांडली?

तुमच्या धर्मातील उदात्त तत्त्वे त्यांनी दुनियेसमोर ठेवली; परंतु हिंदू धर्मातील दिव्यता जगासमोर सांगणारे विवेकानंद हिंदू धर्मातील अनुदारता पाहून एके दिवशी रडले. मित्रांनी विचारले, "स्वामीजी, कां रडता?" ते म्हणाले, "हिंदू लोकांनी आपल्याच बंधूंना पशूच्या स्थितीत नेऊन ठेवले आहे. त्या पार्थसारथीच्या या देशात केवढे हे पाप? या लोकांना मी कसे वर आणू म्हणून मी रडत आहे."

बंधूंनो, विवेकानंदांची ही वेदना तुम्हाला कळते का? रामतीर्थ एकदा म्हणाले, "आमच्या धर्माला शिवू नको हे नाव द्यावे." या रामतीर्थांच्या उद्गारांतील तीव्र दुःख तुम्हाला कळते का?

वाईच्या प्राज्ञपाठशाळेतील थोर आचार्य नारायणशास्त्री मराठे. आज त्यांनी केवलानंद नाव घेतलेले आहे. थोर ब्रह्मचारी विनोबाजी त्यांच्या पायाजवळ शिकले. माझा एक मित्र बाबा फाटक त्यांच्याजवळ शिकत होता. तो त्यांना म्हणाला, "देव मिळावा म्हणून हिमालयात जावे असे वाटते." ते म्हणाले, "हरिजनांची सेवा कर. त्यांच्या मुलांची ढुंगणे धू. तुला देव भेटेल."

त्यांना का धर्म कळत नाही? धर्मासाठी, राष्ट्रासाठी, त्यांना निदिध्यास. १९३१ मध्ये वाटोळ्या परिषदेच्या वेळी लंडनमध्ये आमच्या पुढाऱ्यांचे आपसांत जमेना.

जगासमोर या देशाचे धिंडवडे होत होते. एके दिवशी नारायणशास्त्री जेवताना रडत होते. मुलांनी विचारले, ''आचार्य, अश्रू का?'' ते म्हणाले, ''भारताचे लंडन येथे चाललेले धिंडवडे वाचून डोळे भरून येतात. सुचत नाही.''

अशा नारायणशास्त्र्यांना का धर्म कळत नाही? आणि महामहोपाध्याय श्रीधरशास्त्री, म.म. काणे सांगतात की अस्पृश्यता दूर करा.

श्री. तुकडोजी महाराज म्हणाले, ''हरिजनांना मंदिर उघडेपर्यंत मी मंदिरात जाणार नाही.'' अरे, तुम्हाला कोण धर्म शिकवणार? महात्माजींहून सत्याचा पुजारी कोणता आणायचा? त्यांचे श्वासोच्छवास म्हणजे वेद. त्यांचे बोलणे-चालणे म्हणजे शास्त्र; म्हणजे गीता. थोर महात्मे तुम्हाला हरिजनांना जवळ घ्या सांगत आहेत. आता अंत पाहू नका. अंत बघाल तर तुमचा अंत होईल.

तो थोर चोखोबा. देवाच्या दर्शनासाठी तळमळणारा. ध्यानी-मनी त्याला देव दिसतो. त्याला स्वप्न पडते. विठाई माऊलीने आपल्याला जवळ घेतले आहे. प्रभु आपल्या गळ्यातील तुळशीचा हार आपल्या गळ्यात घालीत आहे असे त्याला दिसते. सासरहून मुलगी माहेरी यावी. आईने तिला जवळ घेऊन स्वतःच्या गळ्यातील हार तिच्या गळ्यात घालावा, तसे चोखोबाला दिसते. ''माझ्या देवाने हार घातला,'' असे आनंदाने मस्त होऊन तो सांगत सुटतो. बडवे त्याला मारतात. त्या चोखोबाची वेदना कोण जाणणार?

''ऊस डोंगा परि रस नोहे डोंगा
काय भुललासि वरलिया अंगा''

असे तो पुकारतो. परंतु आम्ही सारे बहिर्दृष्टि. हृदयाची श्रीमंती कोण ओळखणार?

एका भांडखोर माणसाने एकदा एकनाथांस विचारले, ''तुम्ही कसे शांत असता? आमच्याजवळ तिळभरही शांती नसते.'' नाथ म्हणाले, ''ते सारे जाऊ दे. तू आठ दिवसांनी कदाचित् देवाघरी जाशील.'' ''काय? मी मरणार? आठ दिवसच राहिले?'' असे म्हणून तो मनुष्य घरी गेला. शेजाऱ्यापाजाऱ्यांची तो क्षमा मागू लागला. ज्यांच्या ज्यांच्याजवळ तो भांडला होता, ज्यांना ज्यांना त्याने तुच्छ मानले होते त्या सर्वांची त्याने क्षमा मागितली. बायकोची क्षमा मागतो. उगीच मारले म्हणून मुलांच्याजवळही क्षमा मागतो. एके दिवशी नाथ त्याच्याकडे आले. त्या माणसाने विचारले, ''आली का वेळ? भरली का घटका?'' नाथ म्हणाले, ''ते मला काय माहीत? परंतु हे तुझे

आठ दिवस कसे गेले? किती जणांजवळ भांडलास?'' तो म्हणाला, ''नाथ, कसले भांडण नि काय? समोर सारखे मरण होते. सर्वांची क्षमा मागत होतो.'' नाथ म्हणाले, ''आम्ही नेहमी मरणाचे स्मरण ठेवतो. सर्वांना प्रेम देतो. कशाला अहंकार? भांडणे?'' बंधूंनो, हरिजनांना दूर ठेवून का तुम्हाला मोक्ष मिळणार आहे? स्वत:ला उच्च मानता; परंतु दुसऱ्यास तुच्छ मानून स्वत:ला उच्च समजणाऱ्यास गीतेने आसुरी म्हटले आहे.

आपण बंधुभाव ओळखीत नाही. धर्माचा आत्मा जाणत नाही. मानवतेशी आपण पारखे झालो आहोत. आपण सत्ता ओळखतो. दंडुक थासमोर मान लववितो. मुसलमान बंधू तुमच्या विहिरीवर पाणी भरू शकतात. तुमच्या ओटीवर बसतात. तुम्ही त्यांना प्रेमाने सुपारी, पान देता; परंतु हरिजन मात्र तुम्हाला चालत नाही. तुम्ही मुसलमानास येऊ देता हे चांगले आहे; परंतु त्यांनाही हा हक्क तुम्ही प्रेमाने दिलेला नाही. मुसलमान येथे शेकडो वर्षे राज्यकर्ते होते, त्यांनी तो हक्क मिळविला, सत्तेसमोर तुम्ही वाकलात.

नदी सारे प्रवाह घेऊन मोठी झाली. हा समुद्र अनंत प्रवाह घेऊन अमर झाला; सारखा उचंबळत आहे, असा विचार डोक्यात येऊन सारे मानवी प्रवाह जवळ घ्यायला आपण तडफडावे. या भारतात एक मानवी प्रवाहांचे तीर्थक्षेत्र होवो असे रवींद्रनाथ म्हणत. आपण या देशाला शतखंड केले आहे. हिंदू-मुसलमान दूर राहिले. हिंदू-हिंदूंत किती डबकी ! ब्राह्मण, मराठे, साळी, माळी शेकडो प्रकार. जातीच्या पलीकडे पाहण्याची दृष्टीच नाही. तू कोठे पाणी प्यायलास, याहून महत्त्वाची जणू जगात दुसरी वस्तू नाही. ही सारी डबकी फोडा, डबकी झाली तर हिवताप, डास, मरण. या देशांत भेदांची डबकी माजवली. राष्ट्रावर प्रेतकळा आली. ज्या देशातील लोक एकमेकांवर डोळे वटारतात, शिंगे उगारतात, त्यांच्या पाठीवर मृत्युदेव बसतो. यमाचे वाहन रेडा आहे याचा हाच अर्थ. फोडा डबकी. एक विशाल मानवी प्रवाह करा. जातिभेदाचे बुजबुजाट पुरे.

एक शास्त्री म्हणाले, ''अहो गुरुजी, सर्वत्र एक ब्रह्म आहे, एक आत्मा आहे हे खरे असले तरी सर्वत्र भेद आहेत. या शरीरात पाहा. उजवा हात पवित्र. डावा हात अपवित्र. तसेच समाजात.'' मी त्यांना म्हटले, ''डावा हात अपवित्र म्हणून का कापून फेकून दिलात? डावा हात सकाळी गंमत करतो; परंतु माती लावून धुतला की झाले. त्या हातावर राखुंडी घेऊन दात घासता, त्या हातावर चुन्याचे बोट फासून

तंबाखू चोळता. त्या हातानेच जेवताना पाणी पिता. डावा हात दुखू लागला तर उजवा हात धावतो. डाव्या हाताला दु:ख झाले तर दूरचे वरचे डोळे रडू लागतात. सर्व शरीरात एक प्राण आहे. एका नाडीचे ठोके पडत आहेत. राष्ट्रातील सर्व जातिप्रजाती म्हणजे राष्ट्रपुरुषाचे अवयव. सर्वांमध्ये एक प्राण हवा. एक नाडी हवी. हरिजनांना पाणी मिळत नसेल तर तुमचे डोळे ओले व्हायला हवेत. हरिजनांना घरे नसतील तर तुमच्या हृदयाला घरे पडायला हवीत. उगीच काहीतरी बोलू नका. धर्माची टिंगल नका करू. व्यर्थ कोट्या करून लोकांना झुलवू नका, फसवू नका. तुमचा होतो खेळ, राष्ट्राचा जातो प्राण. तुम्ही हसाल; परंतु तुमच्या धर्माचेही हसे होते."

बंधूंनो, जगाला जवळ घ्याल तर देव तुमच्याजवळ येईल. ज्ञानेश्वर महाराज म्हणतात,

"येथ विद्वत्त पऱ्हां सांडिजे । तेथ व्युत्पत्ती अवघी विसरिजे ।।
जे जगा धाकुटे होई जे । ते जवळीक माझी"

तुमचे विद्वत्त्व; तुमचे पांडित्य विसरून जगाजवळ जा. साऱ्या जगासमोर नम्र व्हाल तर देव तुमच्याजवळ आहे.

तुकाराम महाराज म्हणतात,

नम्र झाला भूतां। तेणे कोंडिले अनंता।।

जो प्राणिमात्रासमोर नम्र होईल, तो विश्वंभराला हृदयात कोंडून ठेवील. ज्ञानेश्वर म्हणतात,

तै झडझडून राहिला निघ। इथे भक्तीचिये वाटे लाग।।
तै पावसी अव्यंग। निजधाम माझें।।

ही सारी क्षुद्र जळमटे दूर करा. खरा धर्म हृदयात येऊ दे. मानवावर, प्राणिमात्रांवर प्रेम म्हणजेच भक्ती. 'पादोऽस्य विश्वा भूतानि' हे सारे प्राणी म्हणजे जणु प्रभुचे चरण. प्रभुचरणभक्ती म्हणजे भूतमात्रांवर प्रेम. तसे कराल तर ते अव्यंग निजधाम मिळेल. सर्वांचे संसार सुखी करणारे स्वराज्य तेव्हाच मिळेल. ऐहिक मोक्ष वा पारलौकिक मोक्ष सर्वांवर प्रेम करण्यानेच लाभेल असे संत पुन्हा पुन्हा सांगतात. परंतु ऐकतो कोण?

तुकाराम महाराज म्हणतात,

बोलणे फोल झाले । डोलणे वाया गेले ।।

आमच्या ओठांवर मोठमोठी वचने, देवता सर्वत्र आहे. जळी, स्थळी, काष्ठी, पाषाणी सर्वत्र तो आहे. आजीपासून पंडितांपर्यंत सारे असे म्हणाले; परंतु माणसाला दूर ठेवतील. म्हणून तुकाराम म्हणाले,

घरोघर अवघे झाले ब्रह्मज्ञान

द्या रे एक कण जरी नीरें !

घरोघर देवतांची चर्चा आहे. सर्वत्र ज्ञानेश्वरीवर प्रवचने, कीर्तने आहेत; परंतु एक कणभर शुद्ध ब्रह्मज्ञान असेल तर द्या, असे तुकाराम महाराज म्हणतात. बडबड म्हणजे ब्रह्मज्ञान नव्हे. अंतःकरणात उत्तरोत्तर सहानुभूती वाढणे म्हणजे ब्रह्मज्ञानाचा उदय.

आता आषाढी एकादशी, पंढरपूरला मोठा सोहळा. लाखो लोकांची यात्रा.अनेक संतांच्या पालख्या येथे येतात. आळंदीहून ज्ञानेश्वरांची, देहूहून तुकारामांची, त्र्यंबकेश्वरहून निवृत्तीनाथांची. अनेक पालख्या पंढरपूरला जातात. यंदा सज्जनगडाहून पालखी येणार आहे. ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम यांनी जो पंथ सुरू केला त्याला वारकरी पंथ म्हणतात. समर्थांच्या संप्रदायाला धारकरी म्हणतात, परंतु हे दोघे पंथ परस्पराला पूरकच होते. वारकरी पंथाने महाराष्ट्रात एकता निर्माण करावयास अपार मदत केली. पंढरपूरच्या वाळवंटात तरी भेदभाव दूर केला. महाराष्ट्रातून लाखो लोक एकत्र यायचे, पायी यायचे, नामघोष करीत यायचे. आपण सारे एक, एका राष्ट्राचे ही भावना बळावे. पुण्याहून या पालख्या जातात. केवढा सोहळा ! लोक आंबे, केळी यांचा पालख्यांवर वर्षाव करतात. लहान मुले पालख्या करून ग्यानबा-तुकाराम करीत या मिरवणुकीत सामील होतात. न्यायमूर्ती रानडे माहीत आहेत ना? पुण्याच्या सार्वजनिक ग्रंथालयाच्या इमारतीतून न्यायमूर्ती रानडे ती श्रद्धा, तो त्याग, ते भक्तिप्रेम पाहून सद्‌गदित झाले. त्यांचे डोळे भरून आले. ज्यांनी ही निष्ठा दिली ते किती थोर!

नवीन निष्ठा द्यावयाची असेल तर ती त्यागानेच देता येईल. पंढरपूरला एकदा एक वेश्याकन्या आली. बादशहाचे तिच्यावर प्रेम. ती म्हणाली, 'पांडुरंगाला भेटून येते' आणि देवाच्या चरणावर डोके ठेवले. असा त्याग पंढरपूरला ओतला गेलेला आहे. परंपरा उगीच नाही सुरू होत. कुत्र्यासही तूप देऊ पाहणारे नामदेव, कोठारे

लुटवणारे दामाजी, विष्णुमय जगत पाहणारे तुकाराम, शांतिसागर एकनाथ आणि ती ज्ञानवैराग्याची मूर्ती ज्ञानदेव सर्वांची पुण्याई पंढरपूरला ओतलेली. लाखो लोक तेथे जमतात. त्यांच्या श्रद्धेला हसू नका. तुम्ही त्यांच्यात मिसळा, नवीन विचार द्या, परंतु मानवधर्माने द्या. मारामारी, कत्तलीने नका देऊ. संतांनी हा मानवधर्म दिला. म्हणून ग्यानबा, तुकाराम हीच महाराष्ट्राची दैवते राहिली. हेच राष्ट्रपुरुष म्हणून महाराष्ट्र ओळखतो. कारण त्यांचा संदेश सकल मानवांना सुखी करण्यासाठी होता. भेदांना दूर करून सर्वांमधील दिव्यता दाखविणारा त्यांचा संदेश होता. संतांची शिकवण आज अधिकच आवश्यक आहे.

श्री. तुकाराम महाराजांची फाल्गुन वद्य द्वितीयेस पुण्यतिथी असते. या वर्षी त्यांची त्रिशत् सांवत्सरिक पुण्यतिथी आहे. सर्वत्र सोहळा होणार आहे. मुंबई सरकार तुकारामांच्या गाथेचे प्रकाशन करणार आहे. द्वितीयेस तुकारामांची पुण्यतिथी आणि षष्ठीस नाथांची पुण्यतिथी. चार दिवसांच्या अंतराने दोन थोर संतांच्या पुण्यतिथ्या प्रतिवर्षी आपण पाळीत असतो.

'ग्यानबा तुकाराम' हा जयघोष शेकडो वर्षे आपण घुमवीत आलो व जोवर मराठी भाषा आहे, महाराष्ट्र आहे, तोवर हा घोष घुमत राहील. विनोबाजी म्हणायचे, "ज्ञानेश्वर गुरूप्रमाणे वाटतात, एकनाथ वडिलांप्रमाणे तर तुकाराम आईप्रमाणे. त्यांची गाथा म्हणजे महाराष्ट्राला अखंड बोधामृत पाजणारी कामधेनूच होय."

संतांची जीवने म्हणजे मानवतेचा मोठा आधार. तुकारामाचे जीवन म्हणजे अखंड प्रयत्नवाद. रात्रंदिवस धडपड करून त्यांनी आपले जीवन प्रभुमय केले. गाथेतील अभंग निरनिराळ्या मनोवृत्तींचे दर्शक आहेत. तुकारामांना एकच वेड होते, एकच ध्यास होता.

'ऐसे भाग्य कै लाहता होईन
अवघे देखे जन ब्रह्मरूप'

ही त्यांची असोशी होती. सारे भेद गळावेत, सर्वत्र मंगलाची अनुभूती यावी हा त्यांचा अट्टाहास होता. परंतु हे सारे कसे साधायचे? काम- क्रोध पदोपदी आड येतात. तो अनंत परमात्मा दूरच राहतो. मीपण मेल्याशिवाय सर्वांबद्दल प्रेम कसे वाटणार? भोगवासना मरायला हवी, स्वार्थ गळायला हवा. जीवनात संयम यायला

हवा. विषयी माणसाजवळ कोठून मोक्ष? जोपर्यंत जीवनात सद्गुणविकास नाही तोवर विनाशच आहे.

'अवगुणां हाती आहे अवघीचि फजिती' असे ते म्हणतात. ही गुणसंपदा जीवनात यावी म्हणून तुकाराम रात्रंदिवस रडले, धडपडले.

'इंद्रियांची दीनें
आम्ही केलों नारायणें'

आम्ही इंद्रियांचे, वासनांचे गुलाम. परम पुरुषार्थ कोठून प्राप्त होणार?

'धीर माझ्या मना
नाही आता नारायणा'

असे ते करुण स्वराने म्हणतात. जीवन अजून शुद्ध होत नाही म्हणून त्यांची कासाविसी होत असे. जीवनाचे सार काय? कशासाठी हे जीवन?

'जन्मा आलियाचे फळ
अंगी लागो नेदी मेळ'

जीवनाला इवलीही घाण लागू न देणे हीच कृतार्थता.

'सर्वांगे निर्मळ
चित्त जैसे गंगाजळ'

जीवन गंगाजळाप्रमाणे अंतर्बाह्य निर्मळ व्हावे म्हणून त्यांची साधना होती. ते आशेने धडपडत होते. जर प्रयत्न खरा असेल तर काय कठीण?

'ओलं मूळ भेदी खडकाचे अंग
उद्योगासि सांग कार्यसिद्धी'

असे ते म्हणतात.

'याचसाठी केला होता अट्टाहास
शेवटचा दिस गोड व्हावा.'

शेवटचा क्षण तरी गोड होऊ दे. मरण समोर आले असता केवळ निस्संग वृत्ती असू दे. आतडे कुठे गुंतलेले नाही. सर्वांबद्दल प्रेम, सर्वांबद्दल समभाव आणि जन्ममरणातून सुटावे असे नाही त्यांना वाटत. पुन: पुन्हा जन्माला घाल असे ते देवाला सांगतात. भगवान बुद्ध म्हणाले, ''एखादाही प्राणी दु:खी असेल तोवर मी पुन: पुन्हा जन्म घेईन.'' ज्याला भूतमात्र जोवर भगवंताचे रूप वाटते तो जगाला कंटाळेल कशाला?

त्याचे हात सेवेत सदैव आनंद मानतील.

तुकारामांना खरी आत्मस्थिती हवी होती, शब्दज्ञानाचा त्यांना कंटाळा होता.

'घरोघर अवघे आले ब्रह्मज्ञान
द्या रे एक कण जरी नीरे'

असे ते म्हणतात. भारतात ब्रह्मज्ञान अवघ्यांच्या तोंडी आहे; परंतु जीवनात मात्र त्याचा दुष्काळ. विवेकानंदांनी एके ठिकाणी म्हटले आहे, 'हिंदू धर्मातल्याप्रमाणे उदात्त तत्त्वे अन्यत्र नाहीत, त्याचप्रमाणे त्या तत्त्वांशी विसंगत असे आचरण करणारेही अन्यत्र नाहीत.'' या शाब्दिक ज्ञानाने काय होणार?

'बोलाचीच कढी बोलाचाच भात।
जेवूनिया तृप्त कोण झाला।।'

असे तुकाराम विचारतात.

'हित व्हावे तरी दंभ दूर ठेवा'

अशी त्यांची सांगी आहे. आपण श्रेष्ठ समजल्या जाणाऱ्या वर्णात जन्मलो नाही हे बरे झाले, नाहीतर दंभ अंगी जडला असता असे ते म्हणतात.

'बरे झाले कुणबी केलो
नाहीतर दंभे असतों मेलो'

समाजसेवेचे आवडीप्रमाणे कोणी कोणतेही काम करावे. समाजदेवाची त्या कर्माद्वारा नीट सेवा केली तर मोक्ष तुमच्या हातात आहे. श्रेष्ठकनिष्ठपणाची थोतांडे मिथ्या आहेत. यासाठी तर संतांनी भागवत धर्माचा पुकारा केला. सारे एकत्र येऊ, देवाची लेकरे म्हणून राहू. ज्ञानेश्वरांनी महान् ध्येय महाराष्ट्रासमोर ठेवले.

'अवघाचि संसार सुखाचा करीन
आनंदे भरीन तिन्ही लोक'

ही त्यांची भव्य प्रतिज्ञा. ज्ञानेश्वरीच्या अखेरीस ते म्हणतात,

'जो जे वांछील तो ते लाहो'

सर्वांना सारे काही मिळो. अर्थात् जे चांगले आहे, मंगल आहे ते मिळो, कारण त्याच्या आधी त्यांनी म्हटले आहे,

'दुरितांचे तिमिर जावो
विश्व स्वधर्मसूर्ये पाहो'

पापाचा अंधार जाऊ दे. सारी मानवजात आपापल्या आवडीचे कर्म करू दे. म्हणजे मग सर्वांना सर्व मिळेल. तुम्ही निष्पाप सुखे आस्वादू नयेत असे नाही. त्यांचे म्हणणे, संत रानावनात गेले नाहीत. जनतेत राहूनच त्यांनी उदात्त जीवनाचा आदर्श घालून दिला.

'विधीने सेवन
धर्माचे पालन'

तुम्ही सुखोपभोगाला काही मर्यादा घाला म्हणजे धर्माचे पालन केल्यासारखे होईल. गीता म्हणते,

'धर्मा ऽ विरुद्धो भूतेषु
कामोऽस्मि भरतर्षम'

धर्माला अविरोधी अशी कामवृत्ती. तीही माझेच स्वरूप समज असे भगवान् म्हणतात, परंतु अविरुद्ध शब्द महत्त्वाचा आहे. जीवनात प्रमाणबद्धता ठेवणे म्हणजेच प्रसन्नता आणणे. गीतेत 'युक्ताहारविहारस्य' असे म्हटले आहे. ज्ञानेश्वरीतील या श्लोकावरील ओव्या प्रसिद्धच आहेत. मोजके बोला, मोजकी झोप घ्या, मोजके खा, अशा रीतीने त्या त्या इंद्रियांना प्रमाणात द्याल तर जीवनात प्रसन्नता वाढेल, जीवनात सुंदरता येईल.

संसार सोडून नको जायला. संसारच सुखाचा करायचा आहे. उद्योगधंदे करा, संपत्तीही मिळवा परंतु संचय नको.

'जोडोनिया धन उत्तम व्यवहारें
उदास विचारें व्यय करी'

असे ते सांगतात. पैसा मिळवा परंतु उत्तम व्यवहाराने मिळवा. काळ्या बाजाराने नका मिळवू. अरे, समोरची जनता म्हणजेच देव. या देवाची वंचना करून कोणता देव मिळणार? तुकाराम पंढरपूरच्या विठ्ठलाचे भक्त.

'तुझ्या नामाची आवडी
आम्ही विठो तुझी वेडी'

असे ते म्हणतात. राजस सुंदर मदनाचा पुतळा असे त्या मूर्तीचे वर्णन करतात. परंतु ते मूर्तीच्या पलीकडे जाणारे. मूर्तीची पूजा करून सर्व मानवात, चराचरात ती पाहायला शिकायचे. नुसती देवाला फुले वाहून काय उपयोग?

'तीर्थो धोंडा पाणी

देव रोकडा सज्जनी'

प्रत्यक्ष देव जेथे सदाचार आहे तेथे आहे.

'दया, क्षमा, शान्ति, तेथे देवाची वसती'

असे ते म्हणतात.

'जे का रंजले गांजले, त्यांसी म्हणे जो आपुले

तोचि साधू ओळखावा, देव तेथेचि जाणावा'

असे ते म्हणतात. अशी त्यांची शेकडो वचने आहेत. तुम्हाला देव मिळाला असेल तर तुमचे जीवन उदार होऊ दे. तुमचे वर्तन ही कसोटी.

'भूमीचे मार्दव, सांगे कोंभाची लवलव.'

जमीन चांगली की वाईट ते तिच्यातून अंकुर वर कसा येतो त्यावरून ठरवावयाचे. मनुष्य कसा वागतो यावरून त्याची धार्मिकता जाणायची.

ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकारामादी संतांनी पंढरपूरची वारी सुरू केली. साऱ्या महाराष्ट्रातून तेथे स्त्री-पुरुष येऊ लागले. एक प्रकारची एकता, मानवता फुलू लागली. तुकाराम महाराज पंढरपूरच्या वाळवंटातील सोहळ्याचे वर्णन करताना उचंबळून म्हणतात,

'कठोर हृदये मृदु नवनीते

पाषाणां पाझर फुटतीं रे

एकमेकां लोटांगणी येती रे ।।'

हा त्याला नमस्कार करीत आहे, तो याला करीत आहे. कठोरता गेली. हृदये प्रेम बनली. पाषाणांसही पाझर फुटतील. संतांनी महाराष्ट्रात एक तरी जागा अशी निर्माण केली की, जेथे सारे समान म्हणून वागतील. परंतु शेवटी पंढरपूर आपण जेथे असू तेथे हवे. एकनाथांनी म्हटले,

'काया ही पंढरी आत्मा हा विठ्ठल'

माझे शरीर म्हणजे पंढरपूर, आत्मा हाच विठ्ठल, माझ्या जीवनातून भेदभाव जावोत. धर्मभावना सर्वत्र हवी. 'जेथे जातो तेथे तू माझा सांगाती' – परमेश्वर नेहमीच जवळ आहे. धर्मभावना अमक्या वेळेस हवी, तमक्या वेळेस नको असे का आहे? कोणी म्हणतात, 'राजकारणात धर्म कशाला?' त्यांना तुकारामाचे उत्तर की जेथे

जाशील तेथे देव जवळ हवा. त्याला आवडेल की नाही हे मनात आणून वागा. गीता सांगते,

'सर्वधर्मान् परित्यज्य
मामेकं शरणं व्रज'

सारे धर्म सोडून प्रभुशरणवृत्तीने वागावे, म्हणजेच प्रत्येक कर्म ईश्वराला आवडेल की नाही हा विचार करून करावे. ही कसोटी आहे.

तुकारामांचे अभंग म्हणजे तुमचे आमचे वेद. ते स्वत:च गर्जना करून सांगतात,

'वेदांचा तो अर्थ आम्हांसीच ठावा
येरांनी वहावा भार माथां'

इतरांनी शब्द घोकावे; परंतु शब्दांतील अर्थ, वेदांचा अर्थ आम्हासच माहीत आहे. सर्वत्र अद्वैत अनुभवणे हा वेदांचा खरा अर्थ. देवाची पूजा म्हणजे नुसती फुले वाहणे नव्हे.

'कोणाही जिवाचा न घडो मत्सर
वर्म सर्वेश्वर पूजनाचे ।।'

या चरणातील 'सर्वेश्वर' शब्द मला फार महत्त्वाचा वाटतो. अमक्या ज़ातीचा, अमक्या धर्माचा देव नव्हे. त्या वेळेस शैव-वैष्णवांची भांडणे असत. त्या त्या उपास्य देवतांवरून भांडणे होत. तुकाराम तुम्हाला म्हणतात, "जर विश्वंभराची पूजा करायची असेल तर कोणाचा द्वेष-मत्सर नाही करता येणार." कारण कोणाचा द्वेषमत्सर करणे म्हणजे तो देवाचाच करणें होय. कारण तो सर्वत्र आहे ना? संत सर्वेश्वराची पूजा करणारे होते म्हणूनच ते चराचरावर प्रेम करणारे झाले. परंतु असे हे जीवन क्षणात अनुभवता येणार नाही. त्यासाठी मागे ओढणारे शतबंध तोडले पाहिजेत. सूर्याजीने मावळे पळत आहेत असे पाहताच दोर तोडून टाकला. आसक्तीचा दोर तोडल्याशिवाय विजय कसा मिळणार? ध्येयासाठी देहावर निखारा ठेवायची तयारी हवी.

'संसारासी आग लावूनिया हाते
मागुते परौते पाहू नये'

असे तुकाराम सांगत आहेत. ते पुन्हा म्हणतात,

तुका म्हणे व्हावी प्राणांसवे ताटी
नाही तरी गोष्टी बोलू नये'

परम पुरुषार्थ प्राप्त करून घ्यायचा असेल तर प्राणांवर पाणी सोडण्याची तयारी हवी. संत हे खरे झुंजार. ते कामक्रोधाची डोकी फोडतात.

'रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग
अंतर्बाह्य जग आणि मन'

बाहेरच्या जगात आणि स्वत:च्या मनात संत रात्रंदिवस झगडत असतात.

'विष्णुवीर गाढे
कळिकाळ पाया पडे'

आम्ही विष्णूचे वीर, कळिकाळही आमच्या पाया पडेल. कारण ज्याने आसक्ती जिंकली, वासना-विकार जिंकले त्याला मरणाची डर कुठली? मृत्यूला पाहून तो हसतो, मृत्यूचे तो स्वागत करतो.

'आपुले मरण पाहिले म्यां डोळा
तो सुखसोहळा अनुपम'

असे धन्योद्गार ते काढतात. मृत्यूने मारण्यापूर्वीच ते देहाला मारून ठेवतात. मृत्यूवर ते स्वार होतात. देहावर विजय मिळवून निर्मळ मनाने हे संत मग जगाची सेवा करीत राहतात.

'तुका म्हणे आतां
उरलो उपकारापुरता'

देह गळेपर्यंत आता लोकांची सेवा होईल ती करायची. जीवनात कसे वागावे?

आणिकांचे कानी, गुणदोष मना नाणी
'बोले ते वचन, जेणे राहें समाधान
तुका म्हणे फार, थोडा करी उपकार ।।'

दुसऱ्यांचे गुणदोष मनात न आणता आपले कार्य करीत राहावे. दुसऱ्यांना जेणेकरून समाधान होईल असे बोलावे. थोडाफार उपकार करावा, असे सूत्रमय सार आहे.

परंतु हजारो अभंगांतून निवडानिवड काय करायची? तुकारामांच्या अभंगावर आणि ज्ञानेश्वरांच्या ओवीवर सारा महाराष्ट्र पोसला गेला आहे. ज्याला तुकारामाचे चार अभंग येत नाहीत असा मनुष्य महाराष्ट्रात आढळणार नाही. महाराष्ट्रात हजारो ठिकाणी भजने होतात. 'रूप पाहतां लोचनी' वगैरे शेकडो अभंग तेथे गायिले जातात.

संतांनी महाराष्ट्राला संस्कृतीच्या समान पातळीवर आणिले. उच्च विचार सोप्या भाषेत घरोघर नेले. ग्यानबा–तुकाराम हे महाराष्ट्राचे हृदयसम्राट आहेत. त्यांचे वाङ्मय हे खरे राष्ट्रीय वाङ्मय, कारण ते सर्व थरांत गेले. मोरोपंतांची आर्या व वामनी श्लोक पांढरपेशी लोकांत व हरदासांत; परंतु आम जनतेत तुकोबांची वाणी गेली. न्यायमूर्ती रानडे, डॉ. भांडारकर यांच्यासारखे नवविद्वान प्रार्थना समाजात तुकारामांचे अभंग घेऊनच कीर्तने करीत व खेड्यातील कीर्तनकार तेच अभंग घेऊन विवरण करतात.

तुकारामांच्या अभंगात प्रसाद आहे, कळकळ आहे. स्वानुभव आहे. ते रोकडे बोल आहेत. ते चावट बोल नाहीत. त्यांच्या अभंगात परिचयाचे दाखले. रोजच्या व्यवहारातील उपमा नि दृष्टांत. कधी कधी त्यांची वाणी कठोर वाटते, ती वाणी क्वचित् शिवराळ होते. विनोबा म्हणाले, "तुकारामांचा आईचा गुण अशा वेळेस प्रगट होतो." आईच मुलावर रागावते. त्यांच्या त्या कठोर, कधी शिवराळ वाटणाऱ्या वाणीत त्यांची अपार करुणा आहे, त्यांचे वात्सल्य आहे.

ज्या समाजात ज्ञानेश्वर, तुकाराम झाले, तो समाज शतखंड का? त्या समाजात द्वेषमत्सराचा बुजबुजाट का? ज्याला त्याला आपली जात, आपला प्रांत, आपला धर्म श्रेष्ठ वाटून तो दुसऱ्यांचे नि:संतान करायला निघतो. तुकाराम म्हणतात,

'देह आणि देहसंबंधि निंदावीं
आणिक वंदावी श्वानसूकरें'

तू तुझ्या जवळच्यांचे दोष बघ, आणि तुला जे वाईट वाटतात त्यांचे गुण बघ. समाजात हीच शिकवण द्यायला हवी आहे, तुकारामांच्या पुण्यतिथीचा हा त्रिशतसांवत्सरिक उत्सव होईल. व्याख्याने, कीर्तने, भजने, मिरवणुकी, सर्व काही होईल; परंतु या सर्वांचा जीवनावर काही परिणाम झाला तर उपयोग!

संतांची ध्येये ही क्षणिक राजकीय ध्येयांहून महान् असतात. ख्रिस्ताने शेजाऱ्यावर प्रेम करा सांगितले; परंतु जगाला अजून तो धडा शिकायचा आहे. संतांची ध्येये मानवजातीला कवटाळणारी असतात. त्यांच्यासमोर जातिधर्मनिरपेक्ष मानवजात उभी असते. सर्व भूतल म्हणजे त्यांना स्वदेश वाटतो.

'अमुचा स्वदेश। भुवनमयी वास।।'

सारे त्रिभुवन त्यांना स्वत:चे वाटते.

'वृक्षवल्ली आम्हां सोयरीं वनचरें'

झाडे–माडे, पशुपक्षी यांच्यावरही त्यांचे प्रेम असते. अशा प्रेमसागर संतांची पुण्यतिथी साजरी करून आपल्या सभोवतालच्या जीवनात प्रेमस्नेह आणूया. सहानुभूती, उदारता आणूया. गरिबांचे दुःख दूर करू या, त्याग शिकूया. आज खरा धर्म उरलाच नाही म्हणून ही मारक विषमता आहे, या युद्धाच्या भीषण छाया आहेत. संतांची पुण्यतिथी साजरी करणे म्हणजे गंमत नव्हे. ती पुण्यतिथी सर्वांना अंतर्मुख बनवो, मानवधर्माची नवप्रेरणा देवो.

+++

निसर्ग

स्वातंत्र्याचे वारकरी, सामाजिक, आर्थिक अन्यायाविरुद्ध अंगार ओकणारे, राजकारणाच्या धकाधकीतही संतांच्या भक्तिरसात डुंबणारे साने गुरुजी, सौंदर्यपूजक होते. सृष्टीतील वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे। असे मानणारे होते. त्यांच्या निसर्गवेडाची हीं हृदयंगम गीता.

जगात आगडोंब केव्हा भडकेल नेम नाही. अमेरिकेजवळ किती अणुबाँब आहेत, त्याची मोजदाद होत आहे. अमेरिकेत अणुबाँब तयार करण्यासाठी जे शहर बसले आहे तेथे मध्ये स्फोट होईल वाटले, परंतु आता सावधगिरी आहे. असा स्फोट झाला असता तर सारी अमेरिका भस्म झाली असती. अटलांटिक व पॅसिफिक महासागर एक झाले असते. अणुबाँब जेथे पडतो त्याच्या आसपासची जमीन जणू वितळते. जळजळीत रसमय होते, इतकी ती आग असते. लाटा आकाशाला भिडू पाहतात. जेथे अणुबाँब तयार करतात तेथे एक अर्धा फर्लांग लांबीचा प्रचंड लोहचुंबक असतो, कित्येक टन त्याचे वजन असते. त्याच्याभोवती विद्युत तारांची भेंडोळी असतात. तेथे काम करणाऱ्यांची काय स्थिती असेल? तेथले कामगार ज्या घरात राहतात, त्यांच्या भिंती अर्धा फूट जाड शिशाच्या पत्र्याच्या असतात. कामगारांच्या अंगावरचे कपडे समुद्राच्या तळाशी बुडवतात. आजचे सारे विज्ञान तेथे मरणाची आयुधे तयार करीत आहे. जर्मनीही हा शोध लावीत होता. नॉर्वे वगैरे देशांतील धबधब्याच्या पाण्यातील विद्युत्मय हायड्रोजन परमाणु त्यांना हवा होता. त्या अणुतून ते बाँब तयार करणार होते. जर्मनीत थोरियम, युरेनियम वगैरेंच्या खाणी नाहीत. ज्या अणुगर्भाच्या आधारावर हा बाँब तयार करावयाचा, तो अणुगर्भ अत्यंत चंचल हवा. थोरियम वगैरेचा अणू तसा असतो. एकमेकांनी एकमेकास धक्के द्यावेत त्याप्रमाणे हा चंचल

अणुगर्भ फोडला की तो दुसऱ्यास, दुसरा तिसऱ्यास अशा प्रकारे ते कोट्यवधी अणू प्रचंड स्फोट करतात. अनंत शक्ती जन्मते, जी त्रिभुवन भस्म करील. महायुद्ध आलेच तर पुराणातील दोन ब्रह्मास्त्रे पृथ्वी जाळू लागली असे वर्णन आहे तसे व्हायचे. सारी प्रचंड शहरे जातील. संस्कृतीचा पुन्हा श्रीगणेशा सुरू होईल. संस्कृतीची अशी का सदैव चाकोरी सुरू राहायची?

आपण या मोठ्या प्रश्नात कशाला शिरायचे, असे म्हटले तरी हे प्रश्न समोर येतात. आपले हिंदुस्थानात सरकार जुनी क्रूझर, जुन्या पाणबुड्या खरेदी करीत असते. जगातील तिसऱ्या महायुद्धात आमच्या या बाहुलीच्या खेळातील विनाशिका हास्यास्पद ठरतील. जाऊ देत या मारण मरणाच्या गोष्टी.

मी फुलांत रमणारा. पावसाळी फुलांचा हंगाम संपत आला. आता कमळाचे दिवस, झेंडूचे दिवस. कोरांट्या आता फुलू लागतील. आमच्या गावातील तळ्यातून निरनिराळी कमळे आहेत. लाल कमळे आहेत. शुभ्र कमळे आहेत आणि निळसर पाकळ्या असणारी ती लहान कमळे आहेत. सकाळच्या वेळी ही कमळे सूर्याला प्रणाम करीत असतात. पाण्यातून माना वर काढून बघत असतात. कमळ हे भारतीय संस्कृतीचे प्रतीक आहे.

सृष्टीच्या निर्मळ सान्निध्यात असावे. विशाल सौंदर्य पाहावे, शहरातील सौंदर्य म्हणजे कापलेले व छाटलेले. शहरातील बागा बघा. झाडांना आकाशाला भेटण्याची परवानगी दिली नाही. त्या झाडांना नाना प्रकारचे आकार देतील, छाटतील, कापतील. परंतु घनदाट जंगलात जा. तेथील सौंदर्यात अनंतता असते, भव्यता असते. ते सौंदर्य स्तब्ध करते, गंभीर करते.

रात्री दहा वाजता आकाशात पाहिलेत तर डोक्यावर अश्विनी नक्षत्र सध्या दिसेल. नांगराच्या आकाराचे एकीकडे दोन तेजस्वी तारे व टोकाला एक तारा सुरेख दिसतो. आणि पहाटे उठून पाहाल तर कृत्तिका, आर्द्रा मावळल्या असतील. मृगही त्याच बेतात दिसतील. पुनर्वसु नक्षत्राचे दोन तेजस्वी तारे दिसतील. आणि ते चित्रा नक्षत्र वर बघा, किती सुंदर ! खरोखर चित्रासारखे. नक्षत्रे पाहण्यात खरोखर मौज असते. तुम्ही बोर्डीला पहाटे प्रार्थनेला जात असाल, चंद्र वरती असतो. भरती येऊन गेलेली असते. ओलसर वाळवंटावर चंद्राचा प्रकाश पडून सारे चांदीसारखे वाटत असते. जावे नि चांदी भरून आणावी, परंतु देवाघरचे हे चांदीसोने दुरून बघावयाचे असते.

अमेरिकेतील थोरो म्हणत असे, "माझे सोने देवाच्या बँकेत असते. सकाळी नि सायंकाळी ती बँक उघडते." सायंकाळी पश्चिमेकडे आकाशात सोन्याची द्वारका शोभत असते.

रात्री आकाशात बघा. गुरू-शुक्राची जोडी मध्यंतरी किती छान दिसते! अजूनही दिसते. प्रथम गुरू वर होता. शुक्र खाली होता. मग शुक्र वर चढला, गुरू त्याच्या चरणांशी बसला. शुक्र म्हणजे प्रेमाचा तारा. पाश्चात्य वाङ्मयात शुक्राचा तारा म्हणजे प्रेमाचा मानतात. गुरू म्हणजे ज्ञानाचा तारा. प्रथम गुरू म्हणजे ज्ञानाचा तारा वर चमकत होता; परंतु ज्ञानाने शेवटी प्रेमाला प्रणाम केला. माझ्याहून तू थोर आहेस असे प्रांजलपणे कबूल करून गुरू शुक्राच्या पायाशी बसला. प्रेमामध्ये हृदय आणि बुद्धी दोहोंचे गुण आहेत. प्रेम समजूनही घेते. प्रेमाची किल्ली हातात घेऊन जाऊ, तर दुसऱ्याची हृदयकपाटे खुली होतात. पायी झिरपण पृथ्वीच्या पोटात जाते. दगड तेथेच दाणकन पडतो. तुकाराम महाराज म्हणतात,

'तुका म्हणे पाणी
पाताळपणे तळाखणी'

आकाश कालपासून ढगांनी भरलेले आहे. दोन-चार दिवस चांगले ऊन पडले. परंतु ऊन खूप पडल्यावर पाऊस येतो म्हणतात. येऊ दे.

'ये रे ये रे पावसा
तुला देईन पैसा'

वगैरे गाणी म्हणत अंगणात नाचू लागतात; परंतु येत नाही अजून जोराने. आरंभी जोराने पडला. रोहिणीतच खळखळ पऱ्हे वाहू लागले; परंतु ते पऱ्हे, ते ओढे, नाले पुन्हा सुकले, वाळले. थोडे थोडे कोठे पाणी आहे इतकेच एक पूर येऊन गेला. साकवावर पाणी आले होते. सोंडेघरच्या पऱ्ह्यांतून एक मुलगा वाहून जाताना वाचला. त्याच्या पाण्याला ओढ फार. गावात पऱ्हे तरी किती! सोनार आळीचा, खोंड्यातला, खेरांच्या आळीचा; आणि तो शिरखलचा, हा सोंडेघरचा. प्रत्येक ओढ्याची निराळी गुणगुण, निराळा नाद. एवढेच नव्हे तर तोच ओढा सर्वत्र तीच भाषा बोलत नाही. आपला सोंड्यातला पऱ्ह्या आहे ना, तो तिकडे मळीच्या शेताजवळ आला की, निराळीच त्याची गुणगुण. दगडावरून उड्या घेत येताना तो खो खो हसतो, तर मग पुढे अगदी गंभीर होतो. जणू त्याची समाधी लागते. नद्यांचा तो अवखळ खो खो

हसणारा, उड्या मारणारा, गडबड करणारा, तोच का हा प्रवाह? परंतु हा मोठा लबाड हो ! केळकरांच्या साकवाजवळ शांतपणा धारण करणारा हा प्रवाह पुढे ओकांच्या शेताजवळ गेला की पुन्हा गाणे म्हणू लागतो. निरनिराळ्या प्रवाहांचे हे विविध संगीत ऐकणे मोठे मजेचे असते. परंतु सृष्टीकडे इतके लक्ष द्यायला वेळ कोणाला नि हौस तरी कोणाला? परंतु हे ओढे पाऊस थांबताच पुन्हा दीन झाले आहेत. कधी येणार बरे पाऊस? गणपतीच्या देवळाजवळील तळे थोडेफार भरले. त्याच्या काठाने आता बेडूक दिसतात. पावसाळा बेडकांना फार आवडतो. पावसात त्यांना बाळसे चढते. हळूहळू सारे पिवळे पिवळे होतील. पाऊस पडू लागताच बेडूक वृन्द-गान करू लागतात. रातकिडे ज्याप्रमाणे एकदम ओरडतात, तसेच बेडूक. रात्रीच्या शांत वेळेस त्यांच्या ओरडण्याचा केवढा आवाज होतो ! फ्रान्स देशात अठराव्या शतकात जमीनदारांची बेडकांच्या ओरडण्यामुळे झोप मोडू नये म्हणून तळ्यांच्या व डबक्यांच्या पाण्यावर गरीब कुळांना काठ्या मारीत बसावे लागत असे.

हे मृग नक्षत्र संपत आले, संपले. परंतु ते मृगाचे किडे फारसे दिसले नाहीत. एकदा मला दोनचार दिसले. क्षणभर एका हातावर घेऊन मी खाली सोडला. किती सुंदर दिसतात हे किडे ! लाल मखमलीसारखे मऊ मऊ अंग. संस्कृतमध्ये या किड्याला 'इन्द्रगोफ' असा शब्द आहे. बायकांच्या कुंकवाच्या करंड्यात सौभाग्यवर्धक म्हणून हे किडे ठेवण्याची पद्धत असे. परंतु ती पद्धत दुष्टच नाही का? पिंजरेत ते किडे मरून जातात. तू 'एकच प्याला' हे गडकऱ्यांचे अमर नाटक वाचले आहेस का? वाच. त्यात मरताना सिंधू आपल्या भावाला म्हणते, "तू त्यांच्यावर नको रागावू. अरे, तू माझे सौभाग्य राहावे म्हणून माझ्या पिंजरेच्या करंड्यात मृगाची पिले ठेवायचास." मला त्या वाक्याची परवा आठवण आली. परंतु तू हसशील. आता कुंकूसुद्धा काळे निघाले आहे. कुंकू म्हणजे लाल ही भाषा आता गेली आहे. तूही काळे कुंकू कदाचित लावीत असशील. कपाळाला शोभेल ते लावावे. नाही का? हे लहानसे मृगाचे किडे, आठ दिवस दिसतात नि पुन्हा नाहीसे होतात. कोठे असतात त्यांची बारीक अंडी? मातीतील ती अंडी उन्हात, थंडीत मरत कशी नाहीत? का एकदम हे किडे कोठून जन्म घेतात? काय आहे हा प्रकार? साध्या क्षुद्र मातीतून हे नयनमनोहर किडे कोठून आले? आणि हे सौंदर्य, हे रंग सारे क्षणात पुन्हा नष्ट होणार. एकीकडे हे सुंदर मृगाचे किडे तर

दुसरीकडे लवलव करणारी गांडुळे. य़ा सर्वांचे या सृष्टीच्या जीवनात काय कार्य, आपणास काय कळे?

मळ्यातील बी उगवले आहे. पडवळीचे, काकडीचे वेल थोडे थोडे आता वर जातील; परंतु पाऊस हवा. पाऊस जोराने येत नाही म्हणून सारे हवालदिल झाले आहेत. मी परवा काही गुजराती कविता वाचीत होतो. पाऊस येत नाही म्हणून कवी मोराला म्हणतो, 'मोरा, मोरा, तू तरी टाहो फोड. पृथ्वीची तगमग त्या दूर गेलेल्या मेघांच्या कानांवर घाल. मोरा, ओरड मोठ्याने ओरड.' आणि मग पाऊस येतो. जणू श्यामलकृष्णच इंद्रधनुष्याने सजून येतो. आकाशात वाद्ये वाजू लागतात. आला मेघराज आला. धरित्रीला भेटायला भाऊ आला. प्रेमाने ओथंबून आला. आणि कवी म्हणतो, हा भाऊ रिकाम्या हाताने नाही आला. त्याने हिरवे पातळ आणले आहे आणि निर्झराच्या संगीताच्या तोरड्या आणल्या आहेत. छान आहे कल्पना नाही ! आणि एका कवितेत पुढील प्रसंग आहे. शेतकऱ्याची एक मुलगी पाऊस येणार नाही म्हणून निघते. तो वाटेत तिला पाऊस गाठतो. ती ओलीचिंब होते. मला भिजवायला आलास लबाडा, परंतु मला राग नाही तुझा. तुझ्या येण्यामुळे पृथ्वी नवरंगाने नटते, तसे माझे हृदयही भावनांनी उचंबळते. मी शेतकऱ्याची मुलगी. मी का पावसाला कंटाळेन असे ती म्हणते, आपल्याकडे पावसावर फारशी गीते नाहीत. सृष्टीकडे आमच्या कवींचे लक्षच कमी. कोकणातील अपार सौंदर्याचे वर्णन करणारा कवी अजून जन्मायचा आहे.

महान फ्रेंच लेखक व्हिक्टर ह्यूगोने म्हटले आहे, 'आकाशातील तारा-बाग सदैव घवघवीत आहे, ती नित्य नवीन आहे.'

'पश्य देवस्य काव्यं
न ममार न जियति'

हे देवाचे काव्य आहे, ते अजरामर असे आहे. तुला सृष्टीचे काव्य वाचण्याची गोडी लागो.

झऱ्यातून पुस्तके आहेत. पाषाणांतून प्रवचने आहेत, परंतु पाहायला डोळे हवेत. ऐकायला कान हवेत. आणि सायंकाळी परत येत होतो. खाडीतून यायचे होते, भरती लागली होती. द्वादशी होती. रात्री ९ ला पुरी भरती व्हायची. नदीच्या पाण्याला समुद्राचे पाणी जोराने भेटायला येत होते. पडाव उसळत होता. समुद्र नदीचा प्रेमबंध

तोडून दूर जातो; परंतु पुन्हा प्रेमाने मागे येतो. सारखी बिचाऱ्याची ओढाताण. सायंकाळ झाली. सूर्यास्ताचे रंग हळूहळू मंद झाले. अंधाराच्या छाया पसरू लागल्या. गंभीर होते ते दृश्य. दूर काळा किनारा सर्पाप्रमाणे दिसत होता. आकाशात शुक्र दिसू लागला. हळूहळू मृग नक्षत्र व खाली व्याध दिसू लागला. आकाशाची बाग गजबजली. कृष्णपक्ष होता. ताऱ्यांना स्वातंत्र्य होते. तिकडे राजबाग पक्षी मधून उडताना दिसत. हंसांचा जसा राजहंस प्रकार तसा बगळ्याचा हा राजबाग प्रकार आहे आणि शीळ घालणारे ते बारके पक्षीही मधून दिसत होते. त्यांना कोणी कागला म्हणतात.

समुद्राकडे पाहण्याचा मला कधी कंटाळा येत नाही. सृष्टीतील महाकाव्य म्हणजे हा समुद्र. कन्याकुमारीजवळ अनेक समुद्र एकत्र मिळताना दिसतात. नद्यांचे संगम आपण कल्पू शकतो. हा तर सागरांचा संगम आणि पौर्णिमेच्या दिवशी सायंकाळी तेथे पूर्वेच्या बाजूला चंद्र वर येताना दिसतो, तर पश्चिमेकडे सूर्य मावळताना दिसतो. जणू विराट विश्वंभर सायंकाळी दोन हातांत दोन चेंडू घेऊन खेळत आहे. आकाशातील गंमत बघत जा. सूर्योदय, सूर्यास्त, रात्रीचे तारे-सारे बघावे. कधी पहाटे उठावे व हळूहळू तारे कसे दिसेनासे होतात ही मौज पाहावी. जणू एकेक पडद्याआड जात असतात. मराठीतील मुक्तेश्वर थोर कवी. तो म्हणतो, आकाशातील तारे म्हणजे जणू मोती. सकाळी पुढे येणारा अरुण हा जणू हंस. या हंसाने का ती मोती-एकेक गिळली? हंस मोत्यांचा फराळ करतात अशी कल्पना आहे. मोरोपंत म्हणतात,

सागरतीरी येथे
आले दैवे कदाचित मराळ
जे मुक्ताफळ भक्षुनी
करिती बिसतंतू सेवूनि फराळ

हंस मोती खातात. कमलतंतू खाऊन फराळ करतात, असे या आर्येत वर्णन आहे.

दिवसा आपण फुले फुलवावी. रात्री आकाशाच्या बागेतील देवाची फुलबाग बघावी.

काल रात्री मी अंगणात एकटाच फिरत होतो. किती वाजले होते कळेना. थोड्या वेळाने कोंबडा आरवला. म्हणजे प्रहरभर रात्र असावी. पाऊस थांबला होता. केळांब्याच्या डोक्यावर चंद्र होता. ढगांबरोबर तो लढत होता. क्षणात ढगांच्या लाटांत

तो बुडे, गुदमरे. त्याच्या धडपडीचा प्रकाश ढगांतूनही थोडा थोडा दिसे; परंतु क्षणात अजिबात दिसेनासा होई. तो पुन्हा तोंड वर करी आणि हसे. मी बघत होतो. आपले मन असेच आहे. अंधाराशी, निराशेशी ते झगडत असते. क्षणात निरुत्साही विचार त्याला बुडवतात; परंतु पुन्हा उत्साहाचे त्याला भरते येते. मोठी गंमत आहे. जीवन म्हणजे ओढाताण. परंतु आपण विजयी होऊ या श्रद्धेनेच धडपडत राहिले पाहिजे. आत्मविश्वास हवा. ज्याचा स्वत:वर विश्वास नाही त्याच्या जीवनाला काय अर्थ?

मला सेवा दलाच्या मुलांना घेऊन जंगलात जावे असे वाटते, सेवा दलाचे वर्ग नको शहरात, नको खेड्यात. ते दाट जंगलात भरवावेत. सृष्टीच्या सान्निध्यात. निसर्गात राहावे आठ-दहा दिवस. तेथे नदी मात्र हवी. नदीसारखा आनंद नाही. डुंबायला, पोहायला पाणी हवे. कपडे धुवायला, भांडी घासायला नदीवर जाता येते. रानातील झाडेमाडे, लता-वेली, फुले यांची मुलांना ओळख करून देता येईल. आपल्याला कशाची माहिती नसते. चार झाडांची, चार फुलांची नावे माहीत नसतात. मोठमोठ्या जंगलात प्रचंड वेली प्रचंड वृक्षावर चढलेल्या असतात. कधी दोराप्रमाणे त्यांचा उपयोग करून वर चढता येते. जणू वृक्षांनी खाली सोडलेले मजबूत दोर. कधी दोन झाडांच्या मधून या वेली गेलेल्या असतात. त्यांच्यावर झोके घेता येतात. भारतीय संस्कृती तपोवनात जन्मली, सृष्टीच्या सन्निध्यात संवर्धिली गेली.

आणि तेथे पाखरांची ओळख होते. नाना रंगांचे नि आकारांचे पक्षी. त्यांचे ते निरनिराळे आवाज. पालगडच्या किल्ल्याजवळच्या राईत मोर आहेत. लहानपणी त्यांचा आवाज ऐकला म्हणजे मी नाचत असे. मोराचा तो उत्कट आवाज मला फार आवडतो. मोरोपंतांनी देवाचा धावा मांडला. त्याला त्यांनी 'केकावलि' असे नाव दिले. 'आर्या केकावलि' व 'पृथ्वी केकावलि' अशा दोन केकावलि मोरोपंतांनी लिहिल्या. पृथ्वी वृत्तातील त्यांची केकावलि फार प्रसिद्ध आहे. विनोबाजी विद्यार्थी असताना बडोद्यास केकावलितील श्लोक मोठ्याने म्हणत आणि सारी आळी दणाणवीत. मला केकावलि फार आवडे. मी ती सारी पाठ केली होती. 'सुसंगति सदा घडो' वगैरे केकावलीतील श्लोक पूर्वी मुलांना पाठ येत. मोराच्या आवाजाला 'केका' असा शब्द आहे. मोरोपंतांनी स्वत: मोर कल्पून या काव्याला केकावलि असे नाव दिले. पाखरांचे आवाज ऐकण्यात एक विशिष्ट आनंद असतो. दुपारची वेळ व्हावी. पक्षी वडासारख्या मोठ्या झाडावर दुपारी विसावा घ्यायला बसतात.

गोड किलबिल चाललेली असते. अशा वेळेस झाडांच्या बुंध्याशी डोके ठेवून ती किलबिल ऐकत ऐकत झोपी जाण्यात एक मधुर सुख असते. मला पाखरे पाहण्याचा लहानपणी फार नाद होता. लहानपणी आपला आत्मा मोकळा असतो. आपल्या मनोबुद्धीला जणू त्यावेळेस पंख असतात. पुढे वाढत्या वयाबरोबर शेकडो चिंता येतात. आपले पंख जणू तुटतात. हृदयावर बोजा असतो. मग पाखरे आवडेनाशी होतात.

आई मुलाला चिमण्या, कावळे दाखवीत जेवविते. तुळशी रामायणात राम बर्फीचा तुकडा कावळ्याला दाखवतो व त्याला पुढे पुढे आणतो, असे मनोरम वर्णन आहे. सेवा दलाची मुले जर जंगलात आठ-दहा दिवस राहतील तर पक्ष्यांची सुरेल सृष्टी त्यांच्या परिचयाची होईल आणि कधी रात्री वाघ दिसेल, तरस दिसेल, कोल्हा दिसेल. कधी जवळून सळसळ करीत साप जाईल. अनेक अनुभव येतील. अनुभवाने समृद्ध करणे याहून महत्त्वाचे दुसरे काय आहे.

चैत्र, वैशाख वसंत ऋतू असे आपण परवचा शिकवताना मुलांना शिकवतो. सर्व ऋतूंचा वसंत जणू राजा. जुन्या काळच्या मराठी पुस्तकांत-

'ऋतूंमध्ये हा पहिला वसंत । वाटे जनांना बहुधा पसंत ।'

असा एक श्लोक होता. साऱ्या सृष्टीत नवजीवन येत आहे, बहर आहे. सृष्टी जणू रंगपंचमी खेळत आहे. लाललाल फुले सर्वत्र दिसतात. शेवरी, कळस, कांचन, सर्वत्र लाललाल फुले. मुंबईस एक प्रकारचा पारिंगा रस्त्याच्या बाजूला लावलेला आढळतो, त्यावरही लाल तुरे दिसतात. कोकणात पारिंग्यावर लाल फुले मी कधीही पाहिली नव्हती. हा का विलायती पारिंगा? कांचनाचेही किती प्रकार ! कांचनाची फुले वास्तविक नावानुरुप पिवळी हवीत. कांचन म्हणजे सोने. परंतु या ऋतूंत फुलणाऱ्या कांचनाला लाल फुले असतात. जाडसर पाकळ्या. काही कांचनाची झाडे पावसात फुलतात.

रानात जाऊ तर नाना प्रकारची फुले लतावेलींवर आढळतील. त्यांची नावे-गावे कोण जाणे? कुसरीचे वेल पांढऱ्या फुलांनी बहरलेले दिसतील. परवा मी एका गावी जात होतो. दुतर्फा जंगल होते. जंगलात मधून लाल लाल काही दिसे. मला वाटे ही कसली फुले? परंतु ती फुले नव्हती. ती लालसर कोवळी पाने होती. पायरीच्या झाडांची ती पाने किती सुंदर दिसत दुरून !

परवा वारे अशा सोसाट्याचे सुटले ! माझे अंथरूण उडून जाईल असे वाटले. खाटेसकट मला वारा घेऊन तर नाही ना जाणार असा गमतीदार विचार मनात आला. पालगड गावाकडील खऱ्यांकडची गोष्ट आहे. ते म्हणे, रात्री अंगणात माच्यावर झोपले होते. सकाळी ते उठले तेव्हा ते तांब्यांच्या माळावर होते ! त्यांच्या माच्यासकट रात्री तांब्यांच्या माळावर आणून टाकले कोणी? अंतर तरी का कमी? चांगले मैल. भुताने त्यांना खाटेसकट उचलून नेले असावे, असे लोक म्हणाले. आम्ही लहानपणी अंगणात रात्री झोपलो म्हणजे ही दंतकथा डोळ्यांसमोर येत असे. झोप लागेपर्यंत भीतीही वाटे; परंतु कधी कोणाची खाट दूर गेली नाही. परवाच्या रात्रीच्या वादळाच्या वेळेस ती गोष्ट आठवली !

वारा म्हणजे अद्भुत वस्तू ! तो दिसत नाही, परंतु त्याचे अस्तित्व सारखे भासते. कोठून येतो, कोठे त्याचे घर? तो दरीत राहतो की गुहेत राहतो? वनात राहतो की डोंगरात? आकाशात की पाताळात? वाऱ्यावर आपले जीवन अवलंबून आहे, हवा म्हणजे वाराच ना? हवा अधिक चलनवलन करू लागली म्हणजे आपण तिला नाना नावे देतो. वारा झाडामाडांशी खेळेल, फुलांजवळ गुजगोष्टी करील, लाटांजवळ धिंगामस्ती करील, मनुष्य घामाघूम झालेला असावा, वाऱ्याची झुळूक आली तर परमानंद होतो; परंतु हा खेळकर प्रेमळ वारा कधी कधी रौद्ररूप धारण करतो. मग तो डोंगर उडवील, समुद्रात पर्वतप्राय लाटा उठवील. वाळूचे ढीग वर नेईल व एकदम खाली फेकील, झाडे मोडील, घरे पाडील. फुलांना नाचवणारा फुलांच्या फाडफाड थोबाडीत देईल. प्रत्येकाचे सौम्य व रुद्ररूप असते. कृष्ण परमात्म्याने अर्जुनाला विराट रूप दर्शविले तेव्हा अर्जुन म्हणाला. "देवा, तुझे ते सौम्य रूपच दाखव."

ज्येष्ठ महिना संपला आहे. आषाढ सुरू झाला. आर्द्रा नक्षत्र निम्मे होऊन गेले, तरी आर्द्रता कोठे नव्हती. कसे होईल वाटत होते. तो चारी दिशांनी ढग आले. पश्चिमेचे वारे येऊ लागले, आकाश मेघांनी भरले. जो तो अंगणात येऊन पाहू लागला. सोनारआळीची बया आते म्हणाली, "देव भरून आला आहे." ढग म्हणजे देव ! किती यथार्थ ! जो आधार देईल तो आपला देव. महात्माजी एकदा म्हणाले, "चरखा माझा देव ! कारण तो अन्न देतो, स्वाभिमानाची भाकर देतो, स्पर्धातीत धंदा देतो." बया आते पावसाला देव म्हणाली. आपले धर्मग्रंथ वेद. त्यात पर्जन्यदेवाची सुंदर स्तोत्रे आहेत. आकाशात देव भरून आला, कारुण्याच्या अमृताने ओथंबून आला

आणि गडगडाट होऊ लागला. वीजही चमकली. मेघांना फाडून ती बाहेर येऊ पाही. पाऊस आला, आला ! किती आनंद झाला सर्वांना ! मला संस्कृतमधील कवी कालिदास यांच्या मेघदूतातील त्या सुप्रसिद्ध चरणांची आठवण झाली. कालिदास मोठा निसर्गप्रेमी. त्याने लिहिलेल्या शाकुंतल नाटकातील शकुंतला फुलपल्लवही तोडीत नाही, इतके तिचे झाडांवर प्रेम. ''वृक्षांनो, पल्लवांवर प्रेम असूनही जी तोडीत नसे ती ही शकुंतला आज सासरी जात आहे. तिला आशीर्वाद द्या.'' असे शकुंतलेला पाळणारा कण्व ऋषी म्हणतो. कालिदासाचे कोमल, प्रेमळ, निसर्गप्रेमी हृदयच येथे प्रकट होत आहे असे वाटते. पावसाळ्यात हा कवी आकाशाकडे बघत असावा आणि तो म्हणतो,

'आषाढस्य प्रथमदिवसे
मेघमाश्लिष्टसानु
वप्रक्रीडापरिणतगज-
प्रेक्षणीयं ददर्श'

– आषाढाचा पहिलाच दिवस आणि डोंगरावर ढग उतरले. मत्त हत्तीप्रमाणे जणू ते दिसत होते. परवा खरोखरच असे ढगांवर ढग आले आणि पाऊस, वारा, गडगडाट, चमचमाट सारे प्रकार सुरू झाले. मी ओटीवर बसलो होतो. सुखावलो होतो. शेजारच्या सुंदराताईंची छोटी विभा आली होती. तिची आईही होती. विभा रडू लागली. मी तिला म्हटले, ''ये, पाण्यात होडी टाकू.'' आणि मी कागदाची होडी केली. विभाने पाण्यात टाकली, तिने टाळ्या वाजवल्या. पागोळ्या मोत्यांच्या सराप्रमाणे गळत होत्या. विभाने आपले चिमुकले हात पागोळ्यांसमोर केले. हातांवर पडलेले पाणी ती प्यायली. मौज. अंगावरचे घामोळे जावे म्हणून गोविंदभटजींचा वामन अंगणात नाचत होता.

शरद ऋतू म्हणजे प्रसन्नतेचा काळ. शेते-भाते पिकत असतात. नद्या शांत वाहत असतात. आकाश निरभ्र होते. रात्री स्वच्छ चांदणे पडते. अशा या रमणीय काळातच कृष्ण वेणू वाजवी. सर्व गोकुळाला वेड लावी. शरद् ऋतूतच कमळे. शरद ऋतूतच फुलपाखरे. हजारो, लाखो सर्वत्र बागडताना दिसतील. देवाघरचे जणू रंगीबेरंगी लखोटे. ही फुलपाखरे त्या त्या फुलांना का संदेश पोहोचवीत असतात? आणि फुलांवर ती हळूच बसतात. प्रथम ती चिमणे पंख जरा हलवतात, परंतु पुढे

अगदी मिटून घेतात. जणू त्यांची समाधी लागते. अशाच वेळेस मुले त्यांना पकडतात. आणि चतुर ! पऱ्यांची जणू छोटी विमानेच ! त्याचे पंख कसे पारदर्शक असतात. लहान मुले चतुरांना पकडतात, त्यांना दोरा बांधतात नि सोडून देतात. परंतु या लहान प्राण्यांना, सृष्टीतील या मुक्या सजीव खेळण्यांना त्रास देणे बरे नाही.

परवा सकाळी झाडांवर दूर बगळे बसलेले पाहिले. हिरव्या हिरव्या झाडांवर ते पांढरे जणू गुच्छ! किती सुंदर दिसत होते ते दृश्य! एखादे वेळेस सायंकाळी निळ्या आकाशातून हे बगळे रांगेने जात असतात. जणू आकाशात कोणी रांगोळी काढीत आहे, आकाशाच्या निळ्या फळ्यावर पांढरी रेघ ओढीत आहे असे वाटते. बगळा दिसतो ढवळा; परंतु आत काळा! ध्यानस्थ बसेल नि पटकन् मासा मटकावील. पंपा सरोवरावर रामलक्ष्मण येतात. राम म्हणतो, "लक्ष्मणा, ते बघ धर्मनिष्ठ बगळे! – पश्य लक्ष्मण पंपायाम् बक: परमधार्मिक:।।"

पाऊस ओसरला. मी परवा बाहेर पडलो. सृष्टी धुतल्यासारखी दिसत होती. नद्यानाले पुन्हा खळखळ वाहत होते. पाणी पुन्हा स्वच्छ झाले होते आणि चरायला नेलेल्या म्हशी पाण्यात बसल्या होत्या. तोंडे तेवढी वर ठेवून रवंथ करीत होत्या. एकमेकींच्या अंगावर माना ठेवीत होत्या. जणू त्या सुखावल्या होत्या. म्हशींना पाऊसपाणी फार प्रिय. लठ्ठ प्राण्यांना पाण्याशिवाय जगवत नाही. हत्तींनाही जलक्रीडा फार आवडते. वरून पाऊस पडत असावा, म्हशी सुखाने चरत असतात, त्यांच्या त्या तुळतुळीत काळसर पाठी आकाशातील काळ्या ढगांसारख्या दिसतात. मृच्छकटिक नाटकात हा 'मेघ आर्द्र महिषोदरतुल्य काळा' असे सुंदर वर्णन आहे. मृच्छकटिक नाटकाचा कर्ता पावसाचा भक्त असावा ! चारुदत्त व वसंतसेना पावसातून जातात. मोठा सुंदर प्रसंग, वरून देवाघरची वृष्टी. हृदयाकाशातून प्रेमाची वृष्टी !

पहाटे फिरायला गेले की कृत्तिकांचा, द्राक्षांच्या घडासारखा सुंदर पुंजका दिसतो. कार्तिक स्नान करणारे हे नक्षत्र दिसत आहे तोच थंड पाण्याने आंघोळ करतात. आश्विनाच्या वद्य प्रतिपदेपासून कार्तिक स्नानास आरंभ करतात. लहानपणी आई मला उठवी. मी विहिरीवर जाऊन स्नान करायचा. तो सारे आठवले.

अपार धुके पडले होते. उंच गवतामधून मी जात होतो. अंगावरचे सारे कपडे ओले होते. दवाने भिजलेले गवत मलाही आर्द्र करीत होते. समोरचे दिसत नव्हते काही. दव पडू लागले म्हणजे पाऊस गेला असे म्हणतात. कोळी गवतांमधून किंवा

कुंपणांतून जाळी विणतात. सूर्यप्रकाशात ही जाळी हिऱ्यामाणकांप्रमाणेच चमकतात. जणू परींची सोनेरी, रुपेरी मंदिरे आणि या जाळ्यांत अनेक जीवजंतू अडकतात. कोळी मेजवानी करतो !

वर अनंत आकाशात अनंत तारे दिसता. भारताचा सारा इतिहास वर रंगवून ठेवला आहे. डोक्यावर आशीर्वाद देण्यासाठी पूर्वज आहेत. तो ध्रुव वर आहे. ते सप्तर्षी आहेत. ययातिशर्मिष्ठा आहेत. ते सत्यवचनी मृग तेथे आहेत. तो श्रावण आईबापांना कावडीत नेणारा तेथे आहे. प्रोफेसर आपटे आम्हाला ताऱ्यांची माहिती सांगताना रंगत. खेड्यातील वृद्ध माणसांना ताऱ्यांची किती माहिती; परंतु आम्हाला एक चंद्र ओळखता येतो. बाकीच्यांची माहिती शून्य.

महात्माजी येरवड्याच्या तुरुंगात असताना आकाशातील देवाचे हे काव्य अभ्यासू लागले, चाखू लागले. आकाशातील ताऱ्यांचे महान उपासक श्री. काकासाहेब कालेलकर तेथे होते. महात्माजी तुरुंगातून आश्रमातील मुलांना ताऱ्यांसंबंधी पत्रे लिहू लागले. महापुरुषांना नेहमी नवीन नवीन शिकावेसे वाटते. त्यांना जीवनाचा कोठेही कंटाळा येत नाही. आपण आकाशाकडे कधी पाहातही नाही. प्रभातकाळी अद्याप झुंजुमुंजु आहे. ती कशी मौज असते त्याचा आपणास अनुभव नाही. आकाशात आता थोडे ठळक ठळक तारे दिसत असतात. महाकवी मुक्तेश्वरांनी म्हटले आहे, तो अरुण हंस येत आहे. त्याने आकाशातील तारारूपी मौक्तिकांचा फराळ चालविला आहे. आता थोडेसेच मोती शिल्लक आहेत तेही तो खाईल.

हळूहळू तारे जातात. पूर्वेकडे रंग पसरतात; किती प्रसन्न शोभा, परंतु आपण कधी पाहतो का? रात्री आकाशात ताऱ्यांची अमर व मनोरम मौज दिसते; परंतु कोण बघतो !

दिवसा थकलेल्या जनतेच्या डोळ्यांना आनंद देण्यासाठी देव वर फुलबाग फुलवितो; परंतु आपण डोळ्यांना दिपविणाऱ्या झगझगीत बोलपटांनाच जाऊ. बोलपट पाहू, पण ईश्वराचा हा मुका चित्रपट पाहा.

+++

मृत्यूचे काव्य

मृत्यू म्हणजे महायात्रा. मृत्यू म्हणजे महानिद्रा. मृत्यूचे महान् काव्य गुरुजींनी निरंतर ओठांवर नाचविले... आणि एक दिवस फाटक्या कपड्याप्रमाणे आपले जीवन सहजतेने फेकून दिले. त्यांच्या अखेरच्या मन:स्थितीची द्योतक अशी काही शेवटची पत्रे.....

मृत्यू म्हणजे महायात्रा. मृत्यू म्हणजे महानिद्रा. दररोजच्या धडपडीनंतर आपण झोपतो. झोप म्हणजे लघुमरण. सर्व जीवनाच्या धडपडीनंतर, अनेक वर्षांच्या धडपडीनंतर–असेच आपण झोपतो. रोजची झोप आठ तासांची; परंतु ही झोप मोठी असते एवढाच फरक.

मरण उपकारक आहे. जीवनाने जे काम होत नाही ते काम मरणाने होते. संभाजी महाराजांच्या जीवनाने मराठ्यांच्यात फूट पडली; परंतु त्यांच्या महान मरणाने मराठे जोडले गेले. ते मरण म्हणजेच अमृत ठरले. ख्रिस्ताच्या जीवनाने जें झाले नाही ते त्याच्या क्रॉसवरच्या मरणाने झाले. मरणात अनंत जीवन असते.

अमावास्येला आपणास अंधार दिसतो. अमावस्येस चंद्र नाही असे आपणास वाटते; परंतु समुद्राला सर्वात मोठी भरती अमावस्येच्या दिवशीच येत असते. अमावस्या म्हणजे सर्वात मोठी परवणी. अमावस्येला चंद्र–सूर्याची भेट होत असते. चंद्र सूर्याशी एकरूप होऊन जातो. त्याप्रमाणे मरण म्हणजे जीवनाची अमावस्या होय. जीव शिवाशी मिळून जातो. जीवात्मा परमात्म्याशी एकरूप होतो. जीव दिसत नाही कारण विश्वंभरात विलीन झालेला असतो. मरण म्हणजे अनंत जीवनात मिळून जाणे. मरणाची अमावस्या म्हणजे जीवनाची मोठी पूर्णिमा होय.

मरण म्हणजे जगाचा वियोग, परंतु जगदीश्वराशी योग. जिवा-शिवाची लग्नघटिका म्हणजे मरण.

मृत्यू ही प्राणमात्राची आई आहे, या जगदूअंगणात मुले खेळून थकली असे पाहून आयुष्याच्या सायंकाळी ही मृत्युगंगा हळूच येते व आपल्या बाळांना निजवते व पुन: जीवनाचा रस देऊन त्यांना खेळण्यासाठी परत पाठवून देते. अमर जीवनाच्या सागरात नेऊन सोडणारी मृत्युगंगा पवित्र आहे.

अखेरची काही पत्रे

: एक :

६ मे १९५०

मला सीतारामनाना आठवल्यामुळे त्यांच्या घरचाच तो मुलगा आठवतो. दुपारच्या वेळेस तो आंबे काढावयास गेला. उंच झाड आणि वारा सुटला जोराचा. तो खाली येऊ लागला; परंतु त्याचा हात निसटला. तो खाली पडला उंचावरून, आणि तत्काळ देवाघरी गेला. घरी माणसे वाट बघताहेत-की अजून जेवायला येत कसा नाही? तो हाकाहाक कानी आली. कसले जेवण नि काय ! मरण कोणाला कुठे कसे येईल याचा नेम नसतो. जणू कोणी ओढून नेतो. आपल्या विठोबारावांचा मुलगा नाही का? मागे विहिरीतून चांगला पोहून वर आला; परंतु म्हणाला, ''पुन्हा दोन उड्या मारून येतो.'' आणि त्याने पुन्हा उडी मारली; परंतु वर आला नाही. त्याला का मृत्यूने ओढून नेले? गावोगाव अशा गोष्टी असतात. मला मावशी बडोद्याची गोष्ट सांगावयाची. नर्मदाकाठच्या चांदोद कर्नाळी गावी लग्न होते. दुपारची जेवणाची पंगत मांडलेली. एक मुलगा नर्मदेवर गेला. तेथे नर्मदेत सुसरी नि मगरी. ती बघ एक सुसर तीराजवळ आहे, आणि मुलाला एकदम ओढून घेऊन ती गेली. मुलगा ओरडतो आहे ! गेली सुसर! मंडपात बातमी आली. ज्याच्या त्याच्या तोंडचे पाणी पळाले. लग्नाचा समारंभ आणि मरण येऊन उभे राहिले ! सुख आणि दु:ख जवळ जवळ असतात. ज्ञानेश्वरांनी म्हटले आहे, ''जीवनाच्या पोटी येथे मरण आहे.''

होऊ दे या मरणाच्या गोष्टी. जीवन अनंत आहे. मरणही जीवनाचेच जणू रूप. मरण म्हणजे पुन्हा नवजीवन मिळविण्यासाठी घेतलेले तिकीट. सभोवती मरण असले तरी आपण जीवनाकडेच पाहतो.

: दोन :

६ मे १९५०

परवा झोप येईना म्हणून मी आरामखुर्ची बाहेर टाकून एकटाच पडलो होतो. आकाश स्वच्छ होते. निळ्या-काळ्या आकाशातील तारे धुतल्यासारखे स्वच्छ होते. सर्वत्र शांत होते. मी आकाशात पाहात होतो. ताऱ्यांचे मुके सकंप संगीत अनुभवीत होतो. वेदामध्ये वरुण ही आकाशाची देवता आहे. वरुण म्हणजे आच्छादन घालणारा. हा आकाशाचा देव पुढे समुद्राचा कसा झाला कोणास कळे. वेदांत वरुण ही नीतीची देवता आहे. ताऱ्याच्या हजारो डोळ्यांनी तो तुमच्याकडे बघत आहे असे वर्णन येते. मला त्या वर्णनाची परवा आठवण झाली. जणू विराट विश्वंभर बघत आहे असे वाटले. ते सहस्र डोळे माझ्या जीवनात घुसत आहेत असे वाटले. मी घाबरलो. आपले सारे जीवन कोणी बघावे असे आपणास वाटत नाही. जीवनात नाना खळमळ असतात. दडून राहिलेल्या शेकडो गोष्टी. वरून रंगीत दिसणारे कृत्रिम फळ आत मातीचे वा शेणाचे असते. मी डोळे मिटले आणि उठून घरात आलो. केव्हा झोप लागली कळलेही नाही. उठलो तो मन शांत होते. झोप म्हणजे जणू अमृत, नवजीवनदायी अमृतांजन ! विश्वमातेचा प्रेमळ हात ! झोपेचा केवढा उपकार! परंतु झोप म्हणजे लहानसे मरण. मोठी झोप म्हणजे मोठे मरण ! म्हणून मरणाचेही उपकार! मरणही सुंदर, जीवनही सुंदर ! गंमत.

: तीन :

३ जून १९५०

मी बगाराम आला असता दूर आहे तोच बरा. मित्रांना सर्वस्व द्यावे असे मला वाटते, परंतु आज मजजवळ काय आहे? आणि त्यांच्या कार्यातही मी मदत करू शकत नाही. माझा पिंड राजकीय नाही. मला संघटना करता येत नाही. चर्चा करता येत नाही. मित्र माझ्यापासून या अपेक्षा करतात. मला त्या पुऱ्या करता येत नाहीत. आपणाला मित्रांच्या अपेक्षा पुऱ्या करता येऊ नयेत यासारखे दुःख नाही. म्हणून सर्वांपासून दूर जावे असे मला कधी वाटते. मला शेकडो प्रेमळ सखे असूनही मनात एकटे वाटते व माझे डोळे भरून येतात. हे लिहितानाही अश्रू येत आहेत. किती वेळ मी लिहीत आहे ! बाहेर वारा सूं सूं करीत आहे. झिमझिम पाऊस आहे. मलाही थोडे

गार गार वाटत आहे. पांघरूण घेऊन पडू का? किती वाजले असतील? पहाट झाली असावी; परंतु कोंबडा आरवलेला ऐकला नाही ! कोंबड्याचे घड्याळ हजारो वर्षांचे आहे. पाणिनीनेही या घड्याळाचा उल्लेख केला आहे.

: चार :

१० जून १९५०

गदंगला त्या दिवशी रात्री थोडा पाऊस आला. सारी झोपली होती. पाऊस आला म्हणजे माझे मन नाचते. उचंबळते. पावसातून फिरायला जावे असे मला नेहमी वाटते. बाहेरच्या झाडावर टप्‌टप् आवाज होत होता. कोकणात आपल्या घराजवळ केळीची झाडे असायची. केळीच्या पानांवर पावसाचे थेंब कसे वाजतात, नाही? मी खिडकीतून बाहेर हात घातला. पावसाचे थेंब हातावर पडले. मी तो ओला हात तोंडावरून फिरवला. परंतु हा क्षणिक पाऊस. खरा पावसाळा अजून नाही सुरू झाला. होईल लवकरच. ढग दोन आले होते, रिते होऊन ओलावा देऊन गेले. ते जाताच पुन्हा चंद्र दिसू लागला. मी खिडकीतून त्याच्याकडे बघत होतो. निळ्या आकाशात तो हसत होता. चंद्र म्हणजे विश्वंभराचे मुके भावगीत आहे ! खिडकीतून मध्यरात्री माझ्यासारखा कोणी वेडा पीर त्याच्याकडे बघत असेल का?

जुन्या आठवणी गमतीच्या वाटतात. आज दादा नाहीत, वहिनी नाही, परंतु या स्मृती आहेत. चैत्र-वैशाखाचे दिवस आले ! असे चांदणे पाहिले की त्या स्मृती पुन्हा जागृत व्हावयाच्याच, नाही? जीवनात दुःखे आहेत, सुखे आहेत; परंतु सुखावर, आनंदावर दृष्टी ठेवून आशेने माणसाने वागावे. फुले, फळे, पक्षी, आकाश, तारे, रवी, शशी, नद्या, सागर, वने, उपवने, मित्र, सखे-सोयरे या आनंदाच्या राशी आपल्या सभोवती आहेत. सायंकाळी हल्ली किती मस्त देखावा दिसतो ! ढगांचे शत आकार दिसतात! क्षणात हत्ती तर क्षणात धावणारे ससे ! क्षणात खादीचे पोशाख केलेले ढेरपोट्ये व्यापारी, तर दुसऱ्या क्षणी भरजरी पोषाख केलेले विश्वेश्वराचे भालदार चोपदार! अनंत रंगांची अनंत मिश्रणे! जणू विराट नाटक चाललेले असते. किती अंक, किती प्रवेश ! आणि शेवटी सारे रंग लोपतात !गंभीर अंधार येऊ लागतो ! शेवटचा काळा पडदा पडतो ! रवींद्रनाथांना सायंकाळच्या कृष्णछाया नेहमी मृत्यूचे स्मरण करून

द्यावयाच्या. जणू रोज सायंकाळी आपण आपलेच नव्हे तर साऱ्या समाजाचे, जगाचे थोडक्यात रुपकात्मक नाटक बघत असतो !

सुधा, मी तुला जवळजवळ गेले वर्षभर दर आठवड्यास पत्र लिहीत आहे. परंतु आता हे शेवटचे साप्ताहिक पत्र. आता मी तुला केव्हातरी अधूनमधून लिहीन. परंतु आता बंधन नको.

: पांच :

प्रिय नारायण,

तुलाच बाळ हे पत्र. तू भेटलास माझे काम पुढे चालवायला. मी मनाने व शरीराने अस्वस्थ आहे. झोपेचे औषध घेऊन पडत आहे. चिरझोप लागली तर? मधूला म्हणावे खानदेशात जा. माझा शेवटचा निरोप सांग की लोकशाही, सत्याग्रही समाजवाद हे ध्येय धरा. ते तारील. खानदेशचा मी चिरऋणी आहे. त्यांनी माझ्या नावे पैसे जमवले असतील तर ते कामाला घ्या. नारायण, तू परीक्षेत नापास म्हणून मला वाईट नाही वाटत. तू गुणी आहेस. साधना प्रेस चालवा. तू रावसाहेब पटवर्धनांस साधनेचे संपादक व्हायला गळ घाल. प्रिय वसंता व यदू सहसंपादक. नाहीतर वसंता संपादक, यदू सहसंपादक. सारे मिळून चालवा. तू आजोबांजवळून थोडे भांडवल माग वेळच पडली तर.

प्रिय सुधाच्या शिक्षणाबद्दल डॉ. रामभाऊंस सांग. प्रिय अप्पास मदत लागली तर प्रेसमधून प्रेस चालली, साधना चालली तर देत जा.

वसंता, यदू, गजानन जोशी, रावसाहेब, मधू, डिच्चू, राजा कुलकर्णी, एस. एम्., रावसाहेब, अच्युतराव सारे मिळून साधना सुंदर चालवाल. विविधता आणाल. मी मनाने तुमच्यात राहीन. श्रीरंगला अपार कष्ट माझ्यामुळे. माधव, आंबे तुम्ही सर्व, कृतज्ञ व आभारी. खोलीतील सर्वांचा ऋणी. सर्वांचे स्मरण व मंगल चिंतून झोपी जात आहे. जर शेवट झाला तर गुपचूप हार्टफेल डिक्लेअर करा. म्यु. गाडी आणा. चार जणांस कोणाला कळवू नका. अप्पांचे समाधान करा. साधनेतून द्यालच. इतर वर्तमानपत्रांना कळेल. कोणासही तुम्ही कळवू नका. खोलीतील चार पुरेत.

डोक्यांत असह्य वेदना. काय करू? जवळच्या झोपेच्या गोळ्या घेत आहे. झोप लागेल का? का चिरनिद्रा लागेल? तसे झाले तर चुकल्या- माकल्याची क्षमा करा.

चित्रशाळेला एक हजार रुपयांसाठी पुस्तके लिहून न झाल्यामुळे त्यांना 'विनोबा व देशबंधू दास' ही पुस्तके त्या रकमेत कायमची विकत घ्यायला सांगून कृपा करून म्हणावे ऋणमुक्त करा. साधनेला ज्यांचे देणे आहे त्यांना प्रेसला ती देणगी द्या म्हणून माझ्या वतीने विनवा. आंतरभारतीसाठी हजार-अकराशे रुपये जमले. तेवढ्यात काय करणार?

श्री. शहाणे यांस दोनशे रुपये पाठवा. म्हणजे ते मराठीतून कन्नड अनुवाद करतील. इतर पैशांतून एखादा कन्नड ग्रंथ अनुवादून घ्यावा. तो छापावा. विकून पैसे आले तर दुसरा छापावा. अनुवादकाला मोबदला द्यावा. लेखकासही हक्कासाठी. निरनिराळ्या भाषांतून असे अनुवाद करवून घ्यावेत. 'आंतरभारती माला' असे नाव द्यावे. मराठीतीलही इतर भाषांत करवावेत.

परंतु मी काय सांगू? जगलो तर आहे. मेलो तर मनाने आहे. प्रेसला शक्य झाले तर माझ्या भावास थोडी मदत मधून मधून लागली तर करावी. सुधाचे शिक्षण, डॉ. जोशी उंबरगावचे त्यांना करायला माझ्या वतीने सांगावे.

मी मेलोच तर निमूटपणे खोलीतून मित्रांनी म्यु. गाडीतून न्यावे. कोणाला कळवू नये. साधनेतून द्यावेच लागेल. इतर पत्रांत आपण होऊन नये देऊ. माझ्या भावास धीर द्यावा. प्रेसमधील सर्वांना प्रणाम, त्यांचे अनंत उपकार. श्रीरंग, नारायण, यदू, आंबे क्षमा करा.

प्रेसचा एस. एम्., अण्णासाहेब, कोष्टेच्या विचाराने ट्रस्ट करा. मी काय सांगू?

खानदेशला व महाराष्ट्राला अखेरचा भक्तिप्रेमाचा, कृतज्ञतेचा संदेश की लोकशाही समाजवादी पक्षात या. अजातीय व अहिंसक लोकशाही व सत्याग्रही दृष्टी घ्या.

(हे फक्त तूच वाच व फाड. हे तुझ्या व माझ्यात.)

: सहा :

१०-६-५०

प्रिय मधू,

मला बहुतेक देवाचे बोलावणे आहे. कर्तव्य कठोर असते. तू ध एरंडोल, अमळनेरला जाच. माझी अखेरची इच्छा सांग की लोकशाही नि

समाजवादी ध्येयाने खानदेशाने, महाराष्ट्राने जावे; परंतु मी कोण? खानदेशाचा मी चिरऋणी आहे. त्यांनी पैसे जमवले असले मला द्यायला तर ते मी समाजवादी कार्यास द्या सांगत आहे. खानदेशाने मध्ये मला १५००० रुपये दिले. त्यांतील जवळजवळ ११ हजार वर्षभर खानदेशातील कार्यास दिले. दोन हजार उरले ते साधना प्रेसमध्ये घातले आहेत. क्षमस्व खानदेशा, तुला विसरणार नाही. मधू क्षमस्व.

(मधू लिमये यांना पत्र)

गुरुजींची इच्छा

'अंगावरच्या कपड्यांतच न्या. मृताची इच्छा पाळा.

अखेरच्या विधीसाठी'

+++

विश्वभारती

एक सुंदर चिनी पत्र
(चेंग पॅचिओची पत्रे)

एक प्राचीन चिनी म्हण आहे; 'स्वतःची उगीच फुशारकी नको मारू; तुझी कौटुंबिक पत्रे कशी लिहितोस ते आधी बघ.' माणसाचा खरा स्वभाव कौटुंबिक पत्रांतूनच प्रगट होत असतो. चेंग पॅचिओ म्हणून एक सुप्रसिध्द लेखक नि चित्रकार सतराव्या शतकात होऊन गेला. त्याची पत्रे प्रसिध्द आहेत. 'चिनी शहाणपण' हा लिन यूटांगचा सुप्रसिध्द ग्रंथ आहे. त्यातील चेंगने आपल्या भावाला लिहिलेले पत्र पुढे देत आहे.

'माझा एकुलता मुलगा मला बावन्नाव्या वर्षी झाला. मी त्याच्यावर प्रेम करतोच, परंतु मुलावर प्रेम करायचीही एक बरोबर रीत आहे. खेळातही वृत्ती उदार नि दयाळू ठेवायला, दुष्टपणा नि निर्दयता टाळायला त्यांना शिकवायला हवे. पक्ष्यांना पिंजऱ्यात ठेवणे तर मला अगदी सहन होत नाही. त्यांना त्यांचा आनंद आपण द्यायचा ! आपल्या हौसेसाठी पक्ष्यांची अशी गळचेपी करण्याचा आपणास काय अधिकार आहे? काही मुले चतुराच्या पायांना दोरा बांधतात किंवा काही मुले काजव्यांना पकडून ठेवतात. क्षणभर त्यांना आनंद मिळतो; परंतु ते गरीब जीव मरून जातात. सृष्टी सर्वांना जन्म देते; सर्वांना पोसते. लहानशी मुंगी असो, किडा असो, त्यांना अस्तित्त्वात आणण्यासाठी पंचमहाभूतांना सारी शक्ती वापरावी लागली आहे. ईश्वराचेही त्या सर्वांवर अपार प्रेम असते आणि आपण सृष्टीतील सर्वांत थोर प्राणी असूनही ईश्वरी

इच्छेशी एकरूप होऊ शकत नाही ही किती दुःखाची गोष्ट? मानवेतर प्राणी बिचारे जगायचे कसे? साप, गोमा, घोणी, वाघ, चित्ते, लांडगे हे तर अति भयंकर प्राणी; परंतु ज्या अर्थी देवाने त्यांना जन्माला घातले त्या अर्थी त्यांना मारण्याचा आपल्याला काय अधिकार? जर त्यांना मारणे हेच उचित असेल तर त्यांना प्रभूने जन्माला तरी का घातले? जास्तीत जास्त आपण इतकेच करावे की त्यांना दूर पिटाळावे. तो कोळी आपले जाळे विणीत असतो. त्याने काय तुमचे पाप केले? तुमच्या भिंती का त्याच्या जाळ्यामुळे पडणार आहेत? का त्यांना केरसुणीने झटकता, मारता? आपण या जीवजंतूंना का मारावे? काय अधिकार? हे बरे आहे का? सांगा, आहे का बरे?

मी घरापासून दूर आहे. माझ्या मुलाला नीट वाढवा. त्याच्याकडे नीट लक्ष द्या. त्याचे हृदय निर्दय न होता सदय होईल असे करा. त्याच्या उदार भावना संगोपा. तो तुमचा पुतण्या, भावाचा मुलगा म्हणून कसे बोलायचे, कसे रागवायचे, असे मनात नका आणू.

गडी माणसांची मुले

आणि आपल्या गडी माणसांची मुले. तीही आपल्या कुटुंबातीलच. आपण त्यांचेजवळही प्रेमाने वागले पाहिजे. आपल्या मुलांनी त्यांचा अपमान नाही करता कामा. त्यांना उध्दटपणे बोलता नाही कामा. घरात मासे किंवा खाण्यासारखे इतर पदार्थ असतील ते गडीमाणसांच्या मुलांनाही प्रेमाने द्यावेत. आपल्या मुलांनी खात असावे आणि त्यांच्या मुलांनी मात्र दुरून बघावे, हे वाईट. त्यांच्या आईबापांना काय वाटेल? त्यांना स्वतःच्या मुलांची कीव येईल. रागाने त्यांना म्हणतील, 'व्हा चालती इथून, कशाला बघता तिकडे?' आईबापांना असे बोलताना किती दुःख होत असेल नाही? त्यांचे हृदय विदीर्ण होत असेल. विद्वान् होणे, शिष्यवृत्ती मिळविणे, पदवीधर होणे, म्हणजे काही मोठीशी गोष्ट नाही. सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे विवेकाने वागणे, भलेपणाने वागणे, सज्जन होणे, ही आहे. माझे हे पत्र घरात सर्वांना वाचून दाखवा. मुलांवर प्रेम करण्याची योग्य रीत असते तशीच अयोग्यही असते हे सर्वांना समजू दे.

पक्ष्यांवर प्रेम करण्याचा खरा मार्ग

पिंजऱ्यात पक्षी ठेवू नये म्हणून मी वर लिहिले याचा अर्थ पक्ष्यांवर माझे प्रेम नाही असा नाही. मला पाखरे फार आवडतात; परंतु त्यांच्यावर प्रेम करण्याचा खरा

मार्ग निराळाच आहे. पक्ष्यांवर प्रेम करणाऱ्याने झाडे लावावीत. घराभोवती हजारो हिरव्या गर्द फांद्या होतील आणि पक्ष्यांना तेथे राहायला आवडेल. पहाट झाली म्हणजे आपण अंथरुणात जागे होऊ आणि चोहोबाजूंनी स्वर्गीय संगीताची गोड किलबिल ऐकू येईल. आपण उठू, तोंड धुऊ, कपडे घालू, चहा पिऊ आणि समोर नानारंगी पक्ष्यांचे सुंदर पिसारे दिसतील. पाहावे तर दुसरा डौलाने येतो व तिकडे दृष्टी जाते. पिंजऱ्यांत पक्षी ठेवण्याच्या आनंदापेक्षा हे केवढे सुख, हा केवढा आनंद ! सारे विश्व म्हणजे उद्यान, नद्या, प्रवाह म्हणजे जणू पुष्करणी मानावे. असे मानू तरच सर्व प्राणिमात्रांना आपापल्या वृत्ती-प्रवृत्तीप्रमाणे नांदता येईल. हा खरा थोर आनंद! पिंजऱ्यात पक्षी ठेवणे, एखाद्या काचेच्या भांड्यात मासा पाळणे, यातील आनंदापेक्षा झाडावरच पक्षी पाहणे, नद्यांतच मासे पाहणे, यातील आनंद किती उदार, किती सहृदय नि सज्जन वृत्तीचा नाही का?

+++

एक चिनी लेखक
(लि हिवेंगचे निबंध)

लि हिवेंग हा सतराव्या शतकातील चिनी लेखक. त्याचे छोटे छोटे सुंदर निबंध आहेत. चुलीजवळ बसून गप्पा माराव्या, तसे ते आहेत. पोषाखावर, झाडांवर, झोपेवर, अशा साध्या साध्या गोष्टींवर त्याने निबंध लिहिले आहेत. तुम्हाला थोडी थोडी चव देतो आज.

झाडांवर निबंध

झाडांच्या फांद्या लांब असणे छान ! म्हणजे त्यांना कसे डौलाने डौलता येते. झाडांवर पक्ष्यांना बसणे आवडते. लांब डोलणाऱ्या फांद्या असणारी झाडे पक्ष्यांना फार प्रिय आणि अशी झाडे जवळ असली म्हणजे पाखरांचे संगीत वाऱ्याबरोबर आपणासही ऐकू येते. उन्हाळ्यात अशी झाडे भोवती असली म्हणजे कधी एकटे वाटणार नाही. शेकडो पाखरे आपल्याजवळ बोलत आहेत असे वाटते. झाडे लावून डोळ्यांनाच शीतल समाधान वाटते असे नाही, तर कानांनाही होते. डोळ्यांचे सुख मर्यादित–अंथरुणावर पहाटे असताना डोळ्यांना थोडेच काही दिसणार? परंतु ती मंजुळ किलबिल कानांना ऐकू येते. पक्ष्यांची पहाटेची मंजुळ गाणी अंथरुणात पडूनच ऐकावीत. प्रत्येकाला माहीत आहे की, पाखरांचे गाणे पहाटेस जसे गोड वाटते तसे अन्य वेळेस नाही वाटत. का बरे? पक्ष्यांना नेहमी बंदुकीची भीती वाटते. कोण खडा मारील, कोण गोळी घालील, काय नेम? सात वाजले की माणसे हिंडू फिरू लागतात

नि पाखरे अस्वस्थ असतात. त्यांचे सारे लक्ष मग आत्मरक्षणाकडे असते. अशा वेळेस कोठले गाणे, कोठली तान? त्यांची मान मागेपुढे सारखी सचिंतपणे हलत असते. दिवसाही पाखरे गातात; परंतु सकाळच्याइतके ते सुंदर नसते. पक्ष्यांचे खरे गाणे ऐकण्याची दिवस ही वेळ नव्हे. पहाटे लोक झोपलेले असतात. उठणारे अपवाद. अशा वेळेस निश्चिंतपणे पक्षी आवाज काढतात. ते मुक्त संगीत असते. रात्रभर विसावाही मिळालेला असतो. त्या जिभा गाणे गायला उत्सुक असतात. कंठ स्फुरत असतो आणि म्हणून ते सारे गोड वाटते.

दुपारच्या वामकुक्षीवर

रात्रीच्या झोपेपेक्षा दुपारच्या वामकुक्षीत दुप्पट सुख आहे. त्यांतही पुन्हा उन्हाळ्यातील वामकुक्षी. उन्हाळ्यात दिवस मोठे असतात. रात्री लहान म्हणून रात्रीची झोप पुरेशी नाही होत. उन्हाळ्यामुळेही मनुष्य थकतो. भूक लागली असता खाणे जितके स्वाभाविक तितकेच दमले असता झोपणे स्वाभाविक. आरोग्याचा हा अभंग कायदा आहे. दुपारचे जेवण झाल्यावर अंथरुणाजवळून जरा फेऱ्या घालाव्यात. निजायचे असे ठरवू नये. झोपेची कल्पना मनात नसावी. झोपेच्या निश्चयाने घेतलेल्या झोपेत गोडी नसते. काहीतरी करायला घ्यावे, वाचावे आणि ते काम संपण्यापूर्वीच डोळ्यांवर झापड येऊ लागते, डोळे मिटू लागतात. झोपेच्या जगातील लोक बोलू लागतात आणि प्रयत्न न करता, नकळत आपण एकदम स्वप्नसृष्टीत जातो. त्या जुन्या कवितेतील चरण मला आठवतात: 'थकलेले हात पुस्तक दूर फेकतात आणि दुपारची वामकुक्षी मला कुशीत घेते.' हातात जेव्हा पुस्तक असते तेव्हा निजायची कल्पना नसते. पुस्तक दूर करतो तेव्हा वाचायची कल्पना नसते. म्हणून तर ते करताना काही प्रयत्न नसतो. नकळत सारे होते. झोपण्याच्या कलेतील असा हा प्रारंभ नि अंत आहे. मानवाला ही कला साधेल तेव्हा तो सुधारला असे म्हणता येईल.

+++

सादी
(इराणमधील एक महान लेखक)

मध्य-पूर्वेतील राष्ट्रांत इराणला फार महत्त्व आहे. इराणमध्ये तेलाच्या खाणी म्हणून आज साऱ्या जगाचे लक्ष त्यावर; परंतु पूर्वी विद्येचे केंद्र म्हणूनही इराण प्रसिध्द होते. बगदादला 'मदरसा-ए-नजमिया' हे महान विद्यापीठ होते. आठ हजार विद्यार्थी तेथे असत. अनेक विद्यांचे शिक्षण तेथे असे. विज्ञान, गणित, खगोल, भूगोल, साहित्य वगैरे विषय तेथे शिकवीत. या विद्यापीठातून थोर थोर कलाकार तयार होत. इराणचे नाव ज्याच्यामुळे आजही साऱ्या जगभर झाले तो महात्मा सादी याच विद्यापीठातून अल्लामा झाला होता. सादीच्या 'बोस्ता' आणि 'गुलिस्ता या दोन महान ग्रंथांचे अनुवाद जगातल्या बहुतेक सर्व भाषांत झाले आहेत. त्याचे मूळ लिखाण फारसीत आहे.

सादीचा जन्म शेख कुळात झाला. शेख म्हणजे धर्मशिक्षण देणारा. त्यांचे नाव शेख मुसालहुद्दीन. त्यांचा जन्म ११७२ साली झालेला. शिराज या विद्याकेंद्राच्या जवळच्या खेड्यात त्यांचा जन्म झाला; परंतु शिराजचा बादशहा साहबीन जंगी. तो फार युध्दप्रिय. त्यामुळे सादी बगदादला निघाला. त्याचे वडील तर लहानपणीच वारले होते. घरची गरिबी. बगदादला जाताना त्याने फक्त कुराण बरोबर घेतले होते. रस्त्यात त्याला डाकू भेटले. डाकूंना तो म्हणाला, ''वाटले तर माझे कपडे घ्या पण कुराणाचा दुरुपयोग नका करू. एखाद्या विद्यार्थ्यास ते द्या.''

सादीला देशपर्यटनाचा अतिशय नाद होता. इब्नबतूता नावाच्या एका यात्रेकरूचा अपार परिणाम त्याच्यावर झाला होता. त्याचे 'सभरनामा 'हे पुस्तक वाचून सादीलाही प्रवास करावासा वाटू लागला. चार वेळा तर सादी हा हिंदुस्थानात आला होता. सोमनाथच्या मंदिरापर्यंत तो आला होता. सादी ११६ वर्षांचा होऊन निवर्तला. अजून त्याची कबर आहे. ३०-४० वर्षे तो फिरला. आयुष्याच्या संध्याकाळी एक धर्मशाळा बांधून तेथेच तो राहिला होता.

सादी हा कोणाचा मिंधा नव्हता. आपले विचार अति निर्भयपणे तो कोणाहीपुढे मांडीत असे. तो दुसऱ्या वेळी बगदादला गेला तेव्हा अकबर खाँ बादशहा होता. सादीकडून त्याला स्वतःची स्तुती ऐकावयाची होती. त्याने सादीला बोलावले. म्हणाला, 'उपदेश द्या.' सादी म्हणाला, 'बादशहा गुराख्याप्रमाणे प्रजेचे पालन करतो. प्रजेकडून घेतलेला कर ही त्याची मजुरी. जर तो योग्य प्रकारे प्रजापालन करीत नसेल तर तो हरामाचे खातो.'

त्याच्या स्वाभिमानी स्वभावामुळे त्याला अति गरिबीत दिवस काढावे लागले. इराणचा हा महान कवी; परंतु एक दिवस पायात घालण्याला पादत्राणे घेण्यालाही त्याच्याजवळ पैसे नव्हते. सादीने पंधरापेक्षा जास्त ग्रंथ लिहिले आहेत. गझलांचे चालीवर त्याचे ग्रंथ आहेत. त्याने कसीहेही लिहिले. 'कसीहे' म्हणजे स्तुतीचे श्लोक. परंतु खोटी स्तुती त्याने कधी केली नाही. सादीने काव्यग्रंथ जरी लिहिले असले तरी तो प्रसिध्द मात्र गद्यरचनेसाठी आहे. फारसी गद्याचा त्याला जनक समजतात. त्याच्या लिखाणात सर्वत्र सुभाषिते विखुरलेली आहेत. थोडी वानगी चाखा-

'जर पोटाची चिंता नसती तर पक्षी जाळ्यात सापडलेच नसते. पण मग शिकाऱ्याने जाळे तरी कशाला पसरले असते !'

'जो मनुष्य घमेंडानंदाला उपदेश करण्यास जातो त्याला स्वतःलाच उपदेशाची जरूरी असते.'

'ज्ञान घेऊन त्याप्रमाणे न वागणे म्हणजे जमीन नांगरून तिथं काही न पेरण्यासारखे आहे.'

'निःशक्त बुध्दी म्हणजे कपट व निर्बुध्द शक्ती म्हणजे क्रौर्य.'

'मनुष्य ईर्ष्येने स्वतःच जळत असतो, त्याला आणखी त्रास कशाला द्या? '

'कस्तुरीची परीक्षा गंधावरून होते. गंधाच्या शब्दावरून नाही होत.'

'दीनांना दे नाहीतर हिसकावून घेतील.'

सादीच्या गोष्टीही प्रसिध्द आहेत. लहान-लहान कितीतरी चुटकेवजा त्याच्या गोष्टी आहेत. त्यातही सुभाषितेच भरलेली आहेत. तो एका गोष्टीत सांगतो :

'बादशहा एकदा एका भक्ताला म्हणाला, माझीही तू आठवण करत असशील?' भक्त म्हणाला, "जेव्हा देवाचे विस्मरण होते तेव्हा तुझी आठवण." दुसरी मजेदार गोष्ट ऐका-

एक बादशहा होता. त्याच्यावर एकदा महान् संकट आले. त्याने नवस केला. म्हणाला, "संकट निवारण झाले तर अर्धी संपत्ती साधुसंतांना वाटून टाकीन." त्याच्या सुदैवाने संकट निवारण झाले. त्याने नोकरांना संपत्ती घेऊन वजिराबरोबर पाठविले; परंतु संध्याकाळी सारी संपत्ती घेऊन तो तसाच परतला. राजा रागावला. तेव्हा वजीर म्हणाला, "जे खरे संत आहेत ते संपत्तीला शिवत नाहीत आणि जे खरे संत नाहीत त्यांना संपत्ती द्यायची नव्हती." इराणचा हा असा महान कवी नि लेखक. त्याची ओळख आपण आता ठेवूया.

+++

फिरदौसीचे तेजस्वी उत्तर

शहानामा ह्या विख्यात महाकाव्याचा जनक फिरदौसी हा महाकवी. गझनीच्या महमुदाच्या तो पदरी होता. ६० हजार सोन्याची नाणी देण्याचे त्याने कबूल केले होते; परंतु ग्रंथ पुरा झाल्यावर रुप्याची देऊ लागला. ते मानधन या कवीने नाकारले. महमुदाने पकड वॉरंट काढले. याला हत्तीच्या पायी द्या फर्माविले; परंतु शिपाई येण्याच्या आधीच फिरदौसी निसटला होता. त्याने 'शहानाम्या'च्या अखेर महमुदावर पुढील कठोर काव्य केले आहे.

'जुलमी राजा , पृथ्वीवरची सत्ता काही कायमची नसते, समजलास ! हे क्षणभंगुर आहे सारे. ईश्वराची भीती बाळग, मानवजातीला सतावू नकोस. ईश्वराची कृपा हवी असेल तर त्याच्या इच्छेप्रमाणे वाग. मुंगीलाही दुखवू नकोस. जरी ती लहान आणि क्षुद्र असली तरी तिला प्राण असतो आणि प्राण कोणाला प्यारा नाही? माझा स्वभाव तुम्हाला माहीतच आहे. माझ्यासारख्याचा अपमान करावयास तुला वाटत कसे नाही काही? इतके नीच कर्म करावयास कसा उद्युक्त झालास? हत्तीच्या पायांखाली मला तुडवायची शिक्षा देतोस? मला भीती वाटेल असे तुला का वाटले? मी एका देवाला भितो, त्याच्या सिंहासनासमोर नमतो, त्याच्या कृपेने माझे काव्य बाहेर पडते, त्याचे रक्षण असल्यामुळे भूतलावरील शत्रूस मी भीत नाही. काव्याच्या अभिमानाने मी माझे आयुष्य नेतो. ईश्वराचा मी कृतज्ञ असतो, त्याला स्मरतो.

तू मरशील तेव्हा तुझे काय होईल? फिरदौसीचे तुकडे तुकडे करून दशदिशांत फेकलेस तरी मी जगेन. कारण तुझ्यावर माझे नाव अवलंबून नाही. माझ्या वीर शौर्यात्मक काव्यावर माझे नाव विसंबून आहे आणि ईश्वराच्या अपार कृपेवर.

अरे महमुदा, देवाला तरी भीत जा. अरे मोठमोठे राजे, महाराजे शमशेद वगैरेसारखे गेले, मेले. राजेही मरतात. सारे मातीत जायचे. पृथ्वीवर कोण अमर राहणार आहे? गरिबांना छळणारा तू, तुला कोठला स्वर्ग, कोठला पुण्यलोक? तू कायमचा अधःपतित आहेस.

परंतु माझे महाकाव्य विजयी पंखांनी सतत उड्डाण करीत राहील. जे ते ऐकतील ते आनंदतील, अधिक शहाणे होतील. ते प्राचीन वीरांचे पोवाडे, ते सर्वांना उचंबळवतील.

तीस वर्षांचे माझे श्रम आज सफल होत आहेत. अनेक शौर्य-धैर्याच्या कथांचा हा भव्य, दिव्य संग्रह आहे. नाना कष्ट, संकटे सहन करीत हे महाकाव्य लिहिले आहे. सर्वांच्या हृदयाला ते हलवील. शौर्याच्या, पराक्रमाच्या कृत्यांना प्रेरणा देईल. लाजणारी मुलगीही हे काव्य वाचून पराक्रमी वीर बनेल. राजाने वचन दिल्यावरून वीस वर्षे मी हे अपार श्रम घेतले; परंतु या वृध्द कवीला अति नीचपणे फसवण्यात येत आहे. ते कबूल केलेले बक्षीस, ते हिरावून घेण्यात येत आहे.

+++

महान तत्त्ववेत्ता नित्शे

नित्शेचे नाव आपण सुशिक्षित म्हणून मधून मधून ऐकतो. सामर्थ्याचा तो उपासक. दंभ नि दुबळेपणा यांचा कट्टर वैरी. १८४४ मध्ये तो जन्मला. १९०० मध्ये मृत्यू पावला. 'असे बोलला झरथुष्ट्र' या नावाचा त्याचा महान ग्रंथ आहे. नित्शे म्हणतो, 'या पुस्तकाचे नाव घेताना त्याच श्वासात दुसऱ्या ग्रंथकाराचे नाव नका घेऊ. या पुस्तकासारखे सामर्थ्यसिंधूतून बुचकळून झालेले दुसरे पुस्तक जगात कोठे आहे? जगातील सारी स्फूर्ती नि शक्ती एकवटलीत तरी या पुस्तकातील एखादाही निर्मू शकणार नाही.' हा थोडा अधिक अभिमान असेल; परंतु हे पुस्तक महान आहे यात शंका नाही. आज या ग्रंथांचा थोडा आरंभ सांगतो.

संकटांना मिठी मारा

झरथुष्ट्र तीस वर्षांचा असतो. ध्यानाच्या पर्वतावरून तो खाली येत जगाला संदेश द्यायला येतो; परंतु लोक त्याच्याकडे न येता डोंबाऱ्याचे खेळ पाहायला जातात. दोरीवरून डोंबारी चालत असतो; परंतु तो पडतो नि मरतो. लोक निघून जातात. झरथुष्ट्र त्या डोंबाऱ्याला खांद्यावर घेतो व दूर जातो. तो म्हणतो, 'डोंबाऱ्या, धोक्यांनी, संकटांनी भरलेले जीव तू उपजीविकेचे साधन म्हणून उचललेस. तू मरणाचा खेळ केलास. तुला मरणाचा डर नव्हता म्हणून मी तुला डोक्यावर घेत आहे. मी माझ्या हातांनी तुला मूठमाती देईन.' तो लोकांना उद्देशून म्हणतो, 'संकटास मिठी मारून जगा. तुमची शहरे ज्वालामुखीजवळ उभारा. तुमची गलबते अज्ञात, अमर्याद तुफानी

सागरात लोटा, सदैव झगडण्याच्या स्थितीत व युध्दाच्या स्थितीत राहा, संकटांना तोंड देत जगा.'

पृथ्वीवर श्रध्दा ठेवा, दूरच्या देवांवर नको

तो पुन्हा सांगतो, 'कशावर विश्वास ठेवायचा नाही हे आधी शिका. जंगलात एक साधू होता. कसले करीत होता ध्यान? देव मेला ही वार्ता अजून कशी त्याला कळली? ते म्हातारे देव, त्या सर्वांनी कधीच राम म्हटला आहे. कटकट मिटली! ते मेले ही किती धन्यतेची गोष्ट !' तो पुन्हा गर्जून सांगतो, 'बंधूंनो, शपथपूर्वक सांगतो की या पृथ्वीवर श्रध्दा ठेवा. पृथ्वीची प्रतारणा नका करू. त्या आकाशातील दूरच्या देवांवर कधीही विश्वास ठेवू नका.'

मनुष्याने स्वतः उभे राहावे, धडपडावे. दुबळे, रडके जीवन काय कामाचे? अलसलुलित जीवन म्हणजे शाप. देव करील, देव करील म्हणत नका बसू. देव का तुझ्यात नाही? झरथुष्ट्र म्हणतो, 'देव असतील तर मी देव नसणे मला कसे सह्य होईल?'

सुंदर उद्गार !

तुकाराम महाराज म्हणतात, 'भक्तच देवाला जन्माला घालतो.' मनुष्य धडपडून स्वतःचे निर्मळ सामर्थ्य व चरित्र प्रकटवतो तेव्हाच देवाचा संभव होत असतो. उपनिषदे सांगतात; 'नायमात्मा बलहीनेन लभ्यः' अजिंक्य निर्धाराने पुढे चला. विवेकानंद म्हणाले, 'फुटबॉल खेळा, तुम्हाला देव मिळेल.'

संपूर्ण सत्याशी अर्धसत्यांचा मेळ

थोरांच्या उध्दारातील अर्थ लक्षात घेऊन आपण पाहिले पाहिजे. त्या त्या वेळच्या परिस्थितीची क्रिया-प्रतिक्रिया होऊन ते ते विचार जन्मतात. त्या त्या परिस्थितीत ते सत्यरूप असतात; परंतु या तत्कालीन सत्याचा शाश्वत सत्याशी मेळ घालूनच आपणास सुसंवादाचे जीवन निर्माण करता येईल.

+++

जलालुद्दीन

सूफी पंथाचा जलालुद्दीन हा महान कवी. त्याची 'मसनवी' जगप्रसिध्द आहे. ामतीर्थांना फार आवडायची. जलालुद्दीन १२०७ मध्ये बाल्क येथे जन्मला. राजांची भवकृपा व पुढे मोगली दंगली यांमुळे तो भटकत आशिया मायनरमध्ये गेला. धर्मशास्त्र व तत्त्वज्ञान यात तो पारंगत होता. त्याची मसनवी सहा भागांत आहे. सातवा ुरवणीदाखल भाग आहे तो त्याचा नसावा. जगातील गूढ वाङ्मयांतील मसनवीचे स्थान परमोच्च आहे. तिच्यात ४७ हजार कविता आहेत. सूफी पंथाचे सारे तत्त्वज्ञान ोथे कथा, दंतकथा, आख्याने, उदाहरणे यांच्या द्वारा दिल्यामुळे क्लिष्टता नष्ट झाली भाहे.

प्रेमाची महती

जलालुद्दीनच्या मते सर्वांत मोठा गुण म्हणजे प्रेम. त्यामुळे आध्यात्मिक शुध्द ााव येतो. प्रेमानेच परमात्म्याचे दर्शन घडते. प्रियकराचे स्थान मशीद, मंदिर, र्च यांत नसून हृदयात आहे हे समजते. श्रध्दा नि प्रार्थना यांनी हृदय शुध्द करणे : मुख्य काम. मनुष्य वासनांना पूजित बसतो आणि 'अहं'ची प्रतिष्ठा मांडतो. याला जग वाईट दिसते; परंतु ते त्याचेच प्रतिबिंब असते. आरसा तुझे रूप ाखवील. जग म्हणजे आरसा. पूर्ण प्रेम म्हणजे पूर्ण स्वातंत्र्य, त्यामुळे मानवी च्छा व ईश्वरी इच्छा यांचे ऐक्य होते. या जिवाशिवाच्या ऐक्याचे वर्णन करताना ०वी संस्फूर्त होतो.

पोपटाची गोष्ट

स्वातंत्र्य, मोक्ष पाहिजे असेल तर अहंकाररहित व्हा, हे तत्त्व सांगताना जलालुद्दीन एक गोष्ट सांगतो.

एका इराणी व्यापाऱ्याजवळ एक हिंदी पोपट होता. व्यापारी हिंदुस्थानात जायला निघाला. पिंजऱ्यातील पोपट त्याला म्हणतो, 'हिंदी पोपटांना सांगा की मी तुम्हाला भेटायला अधीर आहे.' व्यापारी हिंदुस्थानातील एका जंगलात गेला. तेथे पोपटच पोपट होते. त्याने त्यांना पिंजऱ्यातील पोपटाचा निरोप सांगितला. ते शब्द ऐकून एक पोपट मरून खाली पडला. घरी परत आल्यावर व्यापारी पोपटाला म्हणाला, 'तुझा निरोप ऐकताच एक पोपट मरून पडला.' हे ऐकताच पिंजऱ्यातील पोपटही मरून पडला. व्यापाऱ्याने पिंजऱ्यातून तो पोपट बाहेर टाकला. तो काय आश्चर्य? तो उडाला व झाडांच्या उंच फांदीवर जाऊन बसला ! मुक्त व्हायला पोपटाला मरणाचे सोंग करावे लागले; परंतु तुम्ही आम्ही सोंग करूनही भागणार नाही. स्वतःला शून्य करा, आपुले मरण आपुल्या डोळ्यांनी बघा, देहावर पाणी सोडा, की परमात्मा मिळेल.

कर्म देवासाठी असो

मसनवीचा हा महान लेखक म्हणतो, 'जे संताला छळतात ते देवालाच छळतात. सत्कर्माला विरोध म्हणजे देवालाच विरोध. मनुष्याचे कर्म देवासाठी असावे म्हणजेच निःस्वार्थ व दोषरहित असावे. चौथे खलिफा अली एका दुष्टाला ठार करणार होते. त्यावेळेस तो दुष्ट अलीच्या तोंडावर थुंकला. अलीने तरवार म्यान केली.

''का नाही मारीत?'' दुष्टाने विचारले.

''मी तुला द्वेषबुध्दीने, सूडबुध्दीने मारणार नव्हतो. सत्कर्माच्या आड येतोस म्हणून मारणार होतो; परंतु तू थुंकलास माझ्या तोंडावर, मला चीड आली, संताप आला. माझ्या प्रहारांत द्वेषभाव, सूडभाव असेल म्हणून मी या वेळेस मारीत नाही.'' ही गोष्ट सांगून जलालुद्दीन म्हणतो, निर्मळ कर्म करा, स्वतःची पशुता दूर करा आणि सर्वांवर प्रेम करू लागलात म्हणजे सारे मंगलच वाटेल. त्या लुकमनने आपल्या गुलामाला कडू कलिंगड नकळत दिले; परंतु गुलामाने ते गोड म्हणून खाल्ले. कारण प्रेमळ धन्याच्या हातून एखादे वेळेस चुकून कडू मिळाले तरी का ते गोड नये करू? कवी म्हणतोः प्रेम म्हणजे अपूर्व किमया. प्रेमाने कडू गोड होते, लोखंडाचे सोने

होते, सिंह ससा होतो, राजा दास बनतो, धार्मिक विधींपेक्षा प्रेमळ तळमळीनेच प्रभू लवकर प्रसन्न होतो.

देवाला सर्वांची प्रार्थना प्रिय

एकदा मोझेस–ज्यूंचा प्रेषित–प्रार्थनेच्या घळीकडे जात होता. वाटेत त्याने एक गुराखी पाहिला. तो गुराखी म्हणत होता. "हे देवा, कोठे आहेस तू? तू मला भेटलास तर तुझा फाटका जोडा मी शिवीन, तुझे केस विंचरीन, तुझे कपडे धुईन, तुला दूध देईन, तुझ्या हातांचे चुंबन घेईन. कोठे आहेस तू? तुझे पाय चेपीन, तुझी खोली झाडीन, कोठे राहतोस तूं? मला भेट, माझी सेवा घे."

मोझेस त्या गुराख्याला म्हणाला, "ज्याने हे अनंत आकाश निर्मिले, चंद्र-सूर्य–तारे निर्मिले, त्या राजाधिराजाला का असे बोलावे? नास्तिक कोठला !"

त्या पोराला दटावून मोझेस गुहेत गेला. तो त्याला पुढील वाणी ऐकू आली :

भक्त तू माझ्यापासून दूर केलास. तुला यासाठी का जगात पाठविले? माझे क्त माझ्यापासून दूर नेऊ नकोस. दोन प्रेमी जिवांची फारकत करणे पाप. ा मी अनेक वृत्तीप्रवृत्ती दिल्या आहेत. जी प्रार्थना तुला गोड वाटेल, तीच ग वाटेल असे नाही. मी शुध्द–अशुध्दांच्या पलीकडे आहे. निंदा–स्तुतीच्या े आहे. मी बाहेरचे शब्द नाही बघत, आतील भाव बघतो. हे विश्व निर्माण । माझ्या डोळ्यांसमोर नफातोटा नव्हता. त्यासाठी नाही हे दुकान थाटले. हिंदू ा पध्दतीने प्रार्थना करतील, तुम्ही तुमच्या पध्दतीने ! मुख्य गोष्ट म्हणजे ाषा तात्पुरती; क्षणिक. माझ्या प्रेमाने जळणारे हृदय मला हवे आहे. धर्म ईश्वराशी एकरूप होण्याचे साधन आणि प्रेमी भक्त तर कधीच एकरूप झालेला तुमची विधिविताने, अवडंबरे हीच तुम्हाला दूर ठेवतात. तो गुराखी तुला , अशुध्द वाटला. अरे, रणांगणात पडलेला वीर धुळीने नि रक्ताने माखलेला त्याला का अशुध्द म्हणशील? त्याचे ते रक्त पाण्याहून शुध्द आहे. त्याचे ायला अधिक पवित्र नि स्वच्छ कपडे कोठून आणणार?"

े जलालुद्दीन सांगतो : एकदा पैगंबराची पत्नी आयेजा त्यांना म्हणाली, "तुम्ही अस्वच्छ जागा न बघता वाटेल तेथे प्रार्थना करता हे का बरे?" पैगंबर म्हणाले, प्रार्थनास्थान ईश्वर आधीच स्वच्छ करून ठेवतो." किती खरे ! प्रेमासमोर ी घाण टिकत नाही. प्रेमाचा सूर्य सारे प्रकाशमय करतो.

नावे भिन्न, वस्तू एक

ईश्वराला कोणत्याही नावाने हाक मारा. तो सर्वत्र तोच आहे. निरनिराळ्या भाषांत कलिंगडाला निरनिराळे शब्द. चार प्रवासी वाटेत एकत्र आले. प्रत्येकजण कलिंगडच आणा म्हणत होता. परंतु शब्द निराळे ! आले हमरीतुमरीवर. इतक्यात कलिंगडविक्याच तेथे आला. सारे म्हणाले, "हेच हेच." प्रभू तोच सर्वांना हवा आहे. नावामुळे भांडणे. वेडे.

विश्वाकार होणे

ही मसनवी अपूर्व आहे. शेवटी जलालुद्दीन म्हणतो, "मनुष्य सर्वांतून उत्क्रांत होत आला आहे. म्हणून चराचराकडे त्याची ओढ आणि अखेरीस विचाराने शुध्द होऊन त्यातून हा पसारा त्याला मिठी मारतो." जलाल काव्यमय वाणीने म्हणतो, "मी सूर्यकिरणात नाचेन, उषःकालची लाल प्रभा होईन, सायंकाळची झुळूक बनेन."

नळीचे नाविन्य

कृपासागर दयाळू प्रभूच्या नावे : ती गवताची पोकळ नळी, ती काय सांगत आहे ऐका. ती म्हणते, "मला माझ्या आधारापासून दूर केल्यामुळे मी रडत आहे. माझ्या विलापाने सारी मानवजात हळहळत आहे. मला वियोगाने विदीर्ण झालेले हृदय हवे आहे. अशाजवळच माझी प्रेमकथा मी प्रगट करीन. जो मूळ आधारापासून वियुक्त केला गेला तो त्या पूर्वीच्या ऐक्याचा क्षण पुन्हा यावा म्हणून तळमळत असतो.

सर्वांसमोर मी माझी शोककथा सांगितली. सुखी-दुःखी लोक सर्वांना मी माझे दुःख सांगितले. प्रत्येकजण सहानुभूती दाखवी; परंतु स्वतःच्या कल्पनेने नि मताने. माझे मनोगत जाणण्याची कोणीच तसदी घेतली नाही.

माझे रहस्य माझ्या विलापापासून निराळे नाही; परंतु ते समजून घेणारे कान आणि डोळे आहेत कोठे? शरीर आत्म्यापासून दूर नाही. आत्मा शरीरापासून दूर नाही. तरीपण तो आत्मा कोणी पाहू शकत नाही.

या पोकळ नळीतून येणारा हा आवाज हा वारा नाही, ही आग आहे. ही आग ज्याच्या जीवनात नाही तो असून नसल्यासारखाच. या नळीत प्रेमाची आग आहे. दारूत उन्मादकता असते ती त्या प्रेमाचीच.

ही नळी, ही बासरी त्याची मैत्रीण आहे. जो तो मित्रापासून विमुक्त केला गेला. या नळीची शोकगीते हृदय विदीर्ण करतात.

ही नळी विषमय आहे आणि अमृतमयही आहे. या नळीसारखा तळमळणारा प्रियकर, सहानुभूती दाखविणारा मित्र दुसरा कोण आहे?

ही नळी बलिदानाचा रस्ता दाखविते, मजनूच्या प्रेमाच्या कथा सांगते. हा अर्थ त्याला समजतो ज्याला बाकीचे सारे निरर्थक, निस्सार वाटते. जिभेला कानाशिवाय गिऱ्हाईक कोण?

दुःखामुळे काळाचे भानही नाही. सारे दिवस हातात हात घालून भडकलेल्या दुःखाग्नीने जात आहेत.

दिवस गेले तर जावोत, हरकत नाही, तू राहा. तुझ्यासारखा पवित्र कोण? माझ्याशिवाय बाकीच्यांना पाव्याचा कंटाळा येईल. जो अन्नाशिवाय आहे त्याला दिवस दीर्घ वाटतो. जो कच्चा आहे त्याला पिकलेपणाची दशा काय कळणार? म्हणून माझे शब्द थोडेच असले पाहिजेत. राम राम.

काळ, बंधने तोड आणि मुक्त हो. सोन्या-चांदीचा किती दिवस गुलाम होऊन राहणार? सागराला मडक्यात ओतू गेलास तरी त्या मडक्यात कितीसे मावणार? फार तर दिवसाला पुरेल इतके पाणी. लोभ्याचा डोळा कधी का तृप्त होतो? घडा का कधी भरतो? परंतु शुक्तिका तृप्त होऊन स्वतःला मिटून घेणार नसेल तर तिच्यात मोती कोठून होणार? प्रेमाच्या प्रभावाने ज्याचे वस्त्र विदीर्ण होते (ज्याला देहरूपी वस्त्राची शुध्द राहात नाही) तोच शुध्दबुध्द होतो. लोभादी दोषांपासून तो मुक्त होतो.

मांगल्य आणणाऱ्या प्रेमा, तुझे स्वागत असो. आमच्या सर्व आधी-व्याधींना दूर करणारा तू धन्वंतरी. आमच्या अहंकारावर, अभिमानावर तुझाच एक उपाय ! तू आमचा प्लेटो. तू सॉक्रेटिस. प्रेमामुळे हे पार्थिव शरीर आकाशात भरारी घेते. प्रेमामुळे पर्वत नाचू लागतात. त्यांना जणू पंख फुटतात. प्रेमाने सिनाई पर्वताला स्फूर्ती दिली. प्रेमाने मूसा मूर्च्छित पडला.

माझ्याशी एकरूप होणाऱ्याच्या ओठांशी माझेही ओठ जर लागतील तर मीही त्या नळीप्रमाणे माझे शक्य ते सांगेन; परंतु तीच भाषा बोलणाऱ्यापासून जेव्हा ताटातूट होते तेव्हा शेकडो जिभा असल्या तरी त्या मुक्या होतात. जेव्हा गुलाब गळतात, बाग सुकते, तेव्हा बुलबुलांची गीतकथा का ऐकायला येणार आहे? प्रियकर म्हणजे छाया, प्रियाच खरी, तीच सर्वस्व, प्रिया प्राणमय आहे, प्रियकर मृत वस्तू आहे.

प्रियेला पर्वा नसेल तर पंखहीन पाखराप्रमाणे त्याची दशा. त्याच्या दुःखाला मग सीमा नाही !

माझ्या आगे नि मागे जर प्रेमाचा प्रकाश नसेल तर मलाही मागची-पुढची जाणीव कशी असेल बरे? प्रेमाची इच्छा आहे की हा शब्द प्रगट व्हावा; परंतु आरसा प्रतिबिंब नसेल दाखवीत तर काय उपयोग ! तुझ्या आत्म्याच्या दर्पणात कसलेच प्रतिबिंब पडत नाही. का माहीत आहे? अरे, त्याच्यावरची धूळ पुसलेली नाही म्हणून.

मित्रांनो, ऐका ही कथा : आपल्या अंतःस्थितीचा हा खरोखर गाभा आहे.

+++

मानसशास्त्रज्ञ फ्राइड

ज्याने आपल्या जन्मभूमीला विश्वव्यापक कीर्ती मिळवून दिली, शाश्वत लौकिक मिळवून दिला तो हा महान् मानसशास्त्रज्ञ लंडनला मातृभूमी सोडून पळून आला होता. तो वृध्द झाला होता, आजारीही होता; परंतु तो थकला नव्हता किंवा वाकला नव्हता. व्हिएन्ना शहरात ज्या वेदना त्यांना भोगाव्या लागल्या त्यामुळे ते विषण्ण असतील, त्यांच्या जीवनात कडवटपणा आला असेल; अशी माझी कल्पना होती. परंतु मी जेव्हा त्यांना भेटलो तेव्हा ते अधिकच मुक्त दिसले, अधिकच सुखी भासले. लंडन शहराच्या परिसरातील त्यांचे ते घर. माझा हात धरून त्यांनी मला बागेत नेले. "किती सुंदर आहे हे घर नाही !" असे ते मला म्हणाले आणि एके काळी कठोर दिसणाऱ्या त्यांच्या त्या मुखावर हे शब्द उच्चारताना प्रसन्न हास्य खेळत होते. त्यांनी मला ते लहान इजिप्शियन पुस्तक दाखविले. मेरीआ बोनापार्टने कसेतरी सांभाळून त्यांच्याकडे पाठवून दिले होते. "आता हे पुन्हा घर नाही का?" ते म्हणाले. त्यांच्यासमोर टेबलावर त्यांच्या हस्तलिखित ग्रंथांची पाने पडली होती. आज त्यांचे ८३ वर्षांचे वय; परंतु अजून ठसठशीत अक्षर, तोच पूर्ववत् उत्साह, तेच स्वच्छ मन, तीच स्वच्छ बुध्दी, थकवा माहीतच नाही. त्यांची अगम्य इच्छाशक्ती, आजारीपण, वृध्दपण, हद्दपारी, सर्व संकटांना जिंकून अजिंक्य राहिली होती. झगड्याच्या अनेक वर्षांमध्ये त्यांच्या हृदयाची सदयता जी आजवर प्रगट झाली नव्हती ती आता ओसंडून येऊन वाहत होती. वाढत्या वयाबारोबर ते अधिकच सदय होत गेले. कसोटीच्या

प्रसंगांनी त्यांना अधिकच क्षमाशील बनविले. पूर्वी ते जरा आतल्या गाठीचे होते पण आता मोकळेपणाने बोलत; माझ्या खांद्यावर हात ठेवीत आणि त्यांच्या चकचकीत चष्म्यातून त्यांचे डोळे प्रेमाने भरलेले दिसत.

या मानसशास्त्रज्ञाजवळ बोलायला मिळणे म्हणजे माझे परमोच्च समाधान असे. ऐकत असताना ज्ञानही मिळे आणि आश्चर्यही वाटे. त्यांच्या मनात पूर्वग्रह नसे. ऐकणाऱ्याचा प्रत्येक शब्द समजून घेत. त्यांचे म्हणणे मान्य केले तरी त्यांना आश्चर्य वाटत नसे. आपण काही म्हटले तरी ते प्रक्षुब्ध होत नसत. दुसऱ्यांना दृष्टी देणे, दुसऱ्यांना भावना समजून घ्यायला शिकविणे हे तर त्यांचे आता जीवनकार्यच झाले होते. मी आजपर्यंत त्यांच्याशी अनेक वेळा संभाषण केले होते; परंतु जे हे वर्ष त्यांचे अखेरचे ठरायचे होते ते मी कधीच विसरू शकणार नाही. मी त्यांच्या खोलीत शिरत असताना दुनियेतला सारा मूर्खपणा बाहेर बंद करून मी आत शिरत आहे असे वाटले. ज्याचे भय वाटे ते विचारमय दिसू लागले. घड्याळाच्या टिकटिकीसारखे जे क्षणिक वाटे ते अनंत काळातील विवक्षित जागेचे असे वाटू लागले. एका थोर महर्षीजवळ बसलो, स्वतःच्या पलीकडे गेलेल्या पुरुषाजवळ बसलो आहे, असे वाटले. दुःख किंवा मरण या दोन गोष्टी त्यांना वैयक्तिक वाटत नव्हत्या, तर व्यक्तीच्या पलीकडील निरीक्षणाच्या आणि चिंतनाच्या वाटत होत्या. त्यांचे मरण हे त्यांच्या जीवनाइतकेच नैतिक पराक्रमाने भरलेले होते. आजारीपणाने त्यांना घेरले होते, त्यांना बोलायला त्रास होत होता, कृत्रिम जीभ लावून ते बोलत होते. प्रत्येक शब्दागणिक त्यांना तकलीफ होत होती. त्या एकेका शब्दाबद्दल अपार कृतज्ञता. नका आता बोलू असे म्हटले तरी ते ऐकत नसत. शारीरिक दुःखाहून आपली इच्छाशक्ती अजिंक्य आहे, हे आपल्या मित्रांना दाखवायची त्यांना इच्छा असे. पोलादी इच्छाशक्तीचा त्यांना अभिमान होता. वेदनांनी विव्हळणारे ते तोंड, तरीही ते शेवटच्या क्षणापर्यंत आपल्या टेबलावर लिहीतच असत.

पूर्वी त्यांना गाढ झोप यायची. ऐंशी वर्षापर्यंत त्या झोपेमुळेच त्यांची आश्चर्यकारक शक्ती टिकली होती. परंतु आता वेदनांमुळे झोप येत नसे. परंतु झोपेची औषधे ते घेत नसत. गुंगी आणणारी औषधे प्यायला तयार नसत. असली दुःखशामक औषधे घेऊन आपल्या मनाची क्षमता क्षणभरही गमवायला ते तयार नव्हते. सहन करीन, परंतु मनाने स्वच्छ राहीन, विचार न करण्यापेक्षा वेदना होत असताही विचार

करीत राहीन ही त्यांची वीरवृत्ती शेवटच्या क्षणापर्यंत होती. शारीरिक वेदना व मानसिक बळ यांचा तो झगडा होता आणि तो झगडा दिवसेंदिवस अधिकच भव्य आणि प्रखर होत गेला. मृत्यूची छाया दिवसेंदिवस मुखावर अधिकच दिसू लागली. गाल खोल गेले. कानशिले निराळी दिसू लागली. मुख वक्र झाले, ओठांवर शब्द येईनासे झाले. मृत्यूची शक्ती एकाच गोष्टीवर चालत नव्हती आणि ती म्हणजे फ्राइडचे डोळे. ते डोळे म्हणजे त्यांचा अजिंक्य असा टेहळणीचा किल्ला होता. त्या किल्ल्यात बसून त्यांचे पुरुषार्थशाली मन जगाकडे बघत राहिले. शेवटच्या क्षणापर्यंत बुध्दी आणि दृष्टी शाबूत होती. माझ्या शेवटच्या भेटीच्या वेळेस एका तरुण चित्रकाराला मी बरोबर नेले होते.

मी फ्राइडबरोबर बोलत होतो आणि चित्रकार त्यांचे चित्र काढीत होता. मी ते चित्र फ्राइडला दाखवू शकलो नाही कारण चित्रकार डाली याने त्या चित्रात मृत्यूचे आगमनच जणू दाखविले होते. मृत्यूबरोबर चाललेला तो झगडा क्षणाक्षणाला वाढतच चालला. अति अंतर्भेदी प्रज्ञेचा तो पुरुष, ज्याला स्वच्छ विचार करणे म्हणजेच विचारांचे परमोच्च स्वरूप असे वाटे. जेव्हा त्याला वाटले की अतःपर आपण लिहू शकणार नाही-तेव्हाच डॉक्टरांना एखाद्या वीराप्रमाणे हे दुःख आता संपवा, खेळ खलास करा, ते म्हणाले. उदात्त जीबनाचा तो उदात्त शेवट होता. हे युगच मरणाचे, खुनाखुनीचे अशा या युगातील हे मरण किती संस्मरणीय, किती लोकोत्तर आणि जेव्हा त्यांची शवपेटी आम्ही भूमिगर्भात ठेवली तेव्हा-इंग्लंडमधील अत्यंत प्रिय अशी भूमी आम्ही त्या पेटीला दिली अशी आम्हाला श्रध्दा !

(दि वर्ल्ड ऑफ यस्टरडे-स्टीफन झ्वाइंगवरून)

+++

अंधार अंधार

बायरन हा प्रसिध्द इंग्रजी कवी. सूर्य नष्ट झाल्यावर या पृथ्वीचे, विश्वाचे काय होणार याचे त्याने भयानक वर्णन केले आहे. त्याची कल्पना पुढील वर्णनावरून येईल:

मला स्वप्न पडले. सारे स्वप्नच नव्हते. सूर्य नष्ट झाला आहे, निस्तेज झाला आहे. अनंत आकाशात तारे अंधारमय होत भटकत होते. ना किरण ना मार्ग. पृथ्वी गोठू लागली. चंद्रही नाही. पृथ्वी आंधळी. काळीकुट्ट सकाळ आली, गेली, पुन्हा आली. परंतु दिवस नाही. लोक भयभीत झाले. त्यांचे वासना- विकार सारे मावळले. सारे एकाच प्रकाशाची प्रार्थना करीत होते. आगट्या पेटवून जगत होते. राजवाडे, सिंहासने, झोपड्या, घरे-दारे, सारे पेटवून त्याच्या धगीत लोक जगत होते. त्या प्रकाशात एकमेकांच्या तोंडाकडे बघत ज्वालामुखीच्या मशालीजवळ राहणारे सुखी असे वाटले.

जंगलांना आग लावण्यात आली; परंतु सारी संपली. कडाड पेटून झाडे पडत होती. शेवटी राख होऊन नष्ट होत होती. पुन्हा अंधार. लोकांच्या चर्या विचित्र दिसत होत्या. तोंडावर निस्तेजपणा, काही पडून राहिले, काही रडू लागले, कोणी हातावर हनुवटी ठेवून बसले, कोणी धावपळ करत होते. आकाश जणू अज्ञात जगावरचे, मृत जगावरचे वस्त्र वाटत होते. मध्येच लोक दात-ओठ खात, शिव्या शाप देत. रानटी पक्षी किंकाळत आले, पंख फडफडून थंडगार होऊन पडले. रानटी पशू क्रूरत्त्व विसरून

जवळ आले, बिलगले. साप आले आणि वेटाळून राहिले. फुस्कारीत पण चावत नव्हते. सापांना मारून खाऊ लागले आणि आता जगायचे कसे? हा त्याला मारून खाऊ लागला, तो त्याला. जो तो स्वतःपुरते पाहू लागला. प्रेम नष्टच झाले. सारी पृथ्वी म्हणजे एकच विचार ! मृत्यू ! थंडगार होऊन मरणे ! माणसे मरू लागली ! हाडे सर्वत्र विखुरलेली ! विश्वासू कुत्रीही धन्यावर उलटली ! एकच कुत्रा विश्वासू होता. तो शक्ती होती तोपर्यंत धन्याच्या प्रेताला सांभाळत होता. परंतु शेवटी धन्याचा हात चाटून एक दीनवाणी किंकाळी फोडून तोही मेला ! सारे जग शून्य झाले ! ऋतू नाहीत, वृक्ष-वनस्पती नाहीत, पशू-पक्षी नाहीत, मनुष्य नाही, जीवनच नाही !सारे अचेतन; माती ! हालचाल संपली ! समुद्रावर गलबते सडत होती. डोलकाठ्या तुकडे होऊन पडत होत्या. लाटाही मेल्या. कारण चंद्रच मेला होता-हवाच बंद पडली. वारे वाहावयाचे थांबले. ढग नांही. काही नाही. अंधारमय, अधिक अंधाराला ढगांची आता जरूरच नव्हती. कारण अंधार म्हणजे आता विश्व होते !

+++

विश्वमंगल

विश्वाशी एकरूप होण्यासाठी आपली भावना अनंत भावनांशी एकरूप केली पाहिजे. आपल्या भावनांचे क्षेत्र वाढविणे यातच मानवाची खरी प्रगती. ज्या मानाने तुमची भावना विशाल, त्या मानाने तुमची उन्नती. मानवी भावना अधिकाधिक विशाल व्हावी म्हणून काव्ये, तत्त्वज्ञाने, कला, शास्त्रे, धर्म यांचे सतत प्रयत्न. तुमची इस्टेट किती, यावरून तुमच्या जीवनाला किंमत नसून, तुमची सहानुभूती किती व्यापक, यावर ती अवलंबून आहे. आपली जाणीव मुक्त करण्यासाठी, विशाल करण्यासाठी, किंमत द्यायला हवी. स्वार्थाचा होम ही ती किंमत. आत्मज्ञान हवे असेल तर देहार्पण करा. त्यागानेच वैभव.

मनुष्याचे खरे स्वरूप म्हणजे विश्वव्यापी होणे, सर्वांशी मिळून जाणे हे आहे. मनुष्य स्वतःचा वा सृष्टीचा दास नाही. तो मुळात प्रेम करणारा आहे. मनुष्याची मुक्ती व पूर्णता प्रेमात आहे. प्रेम म्हणजे काय? पूर्णपणे एकरूप होणे म्हणजे प्रेम. या सर्व विश्वाशी एकरूप होण्याची जी शक्ती तिच्यामुळे जीव शिव बनतो.

सर्व प्राणिमात्रांशी मनाने, बुध्दीने, प्रत्यक्ष, सेवाकर्माने एकरूप होणे, सर्वांवर प्रेम करणे, परमात्म्यात स्वतःला मिसळणे, त्याच्यामध्ये आपण आहोत याचा अनुभव घेणे म्हणजे खरे मंगल, म्हणजे परम कल्याण, हे उपनिषदांचे सार. 'प्राणो विराट्' जीवन विशाल आहे, अनंत आहे, याचा अनुभव घ्या.

+++

भारतीय नारी

वेदकाल

आपला देश स्वतंत्र झाला आहे. सर्वांच्या विकासाला आता वाव हवा. कोणाचा कोंडमारा नको. आत्म्याची अनंत शक्ती सर्व क्षेत्रांत सर्वांनी प्रकट करावी. स्त्रियांनीही केवळ संसारातच रमू नये. संसार तर नेटका करावाच, परंतु स्वतःचा संसार राष्ट्राच्या संसारासही जोडावा. अलग असणे म्हणजे माया. सर्वांशी मिळून असणे म्हणजे सत्य. हेच ब्रह्मज्ञान. भारतीय नारींनी हे लक्षात ठेवावे.

आज स्वतंत्र भारतात सात्त्विक अभिमानाने उभे असताना मला शेकडो शतकांतील भारतीय नारींचा इतिहास दिसत आहे. भारतीय इतिहासात तुम्हीही भर घातली आहे. भारतीय संस्कृती तुम्ही वाढवली, सांभाळली. तुमच्या इतिहासाचा धावता चित्रपट दाखवू? या माझ्याबरोबर.

तो बघा, वेदकाळ. पाचसात हजार वर्षांपूर्वीचा काळ. आर्य आणि नाग यांच्या संमिश्रणाचा काळ. आर्य आणि एतद्देशीय यांच्या संघर्षाचा नि संग्रामाचा काळ. तो मोकळा काळ होता. स्त्रिया श्रमजीवनात रमत.त्या दळीत, कांडीत, विणीत: वयन्ती. म्हणजे विणणारी, हा शब्द वेदांत येतो. घरात हातमागावर का तुम्ही विणीत होता ? तुम्ही श्रमाने मिळवीत होता म्हणून स्वतंत्रही होता. त्या वेळेस प्रेमविवाह होते. 'उषेपाठोपाठ हा सूर्य तिची प्रेमआराधना करीत जात आहे, जसा पुरुष स्त्रीच्या पाठोपाठ जातो' असे वर्णन येते . एक प्रियकर रात्री प्रियेच्या घराजवळ येतो. कुत्रा भुंकूलागतो. 'अरे कुत्र्या, नको भुंकू.' असे तो प्रार्थितो. त्या काळात का वैवाहिक नीती आली?

यमयमी संवादात बहीण- भावांच्या लग्नाचा उल्लेख आहे. यमी यमाला म्हणतेः 'पूर्वी तशी प्रथा असेल, परंतु आता नाही.' म्हणजे नवीन नियम आले. 'सप्तमर्यादा कवयस्ततक्षुः' सात मर्यादा शहाण्या लोकांनी घातल्या, असे वेद सांगतो. वेदांतील स्त्रिया सुशिक्षित असत. त्यांनी सूक्ते रचली आहेत. वेदांत त्यांचा अंतर्भाव आहे. विवाह प्रौढपणी होत. कारण विवाहसूक्तातील मंत्र म्हणतात, 'मुली, तू आता घराची स्वामिनी. सासूसासऱ्यांना विश्रांती दे.' स्त्रीला प्रतिष्ठा होती. विवाहसूक्तांत सुंदर उपमा वधुवरांस दिलेल्या आहेत. वर ऋग्वेद तर वधू सामवेद. हा सामवेद म्हणजे संगीताचा वेद. संसारात संगीत आणणारी अशी ही नववधू आहे. स्त्री म्हणजे व्यवस्था, स्वच्छता, सुंदरता. वराला आकाश म्हटले तर वधूला पृथ्वी म्हटले. पृथ्वीप्रमाणे ती क्षमाशील. असा तुम्हा नारींचा वेदकालीन महिमा आहे. पुरुष द्यूत खेळणारा, दारू पिणारा. ती सारे सहन करते. कधी त्याची कानउघाडणीही करते. वेदांतील एक द्यूत खेळणारा म्हणतो, 'सर्वत्र अपमान, घरी बायकोही बोलते.' स्वतंत्र वृत्तीची, स्वाश्रयी, कष्ट करणारी, ज्ञानी अशी ही प्राचीन भारतीय स्त्री दिसते.

+++

वेदोत्तरकाल

वेदकालामध्ये भारतीय स्त्रियांची प्रतिष्ठा दिसते. उपनिषदांतही त्यांचा महिमा आहे. याज्ञवल्क्य आपली मालमत्ता उभय पत्नींना देऊन वनात जायला निघतो. तर त्याची एक पत्नी त्याला म्हणते, 'ही संपत्ती जर त्याज्य असेल, तर ती मला काय करायची ? जे सुख तुम्ही जोडू इच्छिता, तेच मलाही हवे आहे.' स्त्रिया तत्वज्ञानाच्या चर्चा करतात; राजदरबारात वाद करतात, केवढे भव्य हे दृश्य ! परंतु स्त्रियांचा महिमा हळूहळू कमी होत आला असावा. गीता 'स्त्रियोवैश्यास्तथा शूद्राः' असा उल्लेख करते. म्हणजे स्त्रियांना स्वतंत्रपणे मोक्ष मिळणे अशक्य, अशी भावना होऊ लागली होती. स्त्रिया म्हणजे का पापयोनी ?

जी स्त्री सर्व संसाराची आधार, ती तुच्छ का ? रामायण, महाभारतकाळी स्त्रियांचे स्वयंवर होत असे. स्वतःला पती शोधायला सावित्री जाते. स्त्रिया प्रौढ असत. स्त्रियांचे मौंजीबंधनही होई. त्या गुरुगृही शिकायला राहात. सीता गोदावरीच्या तीरी संध्या करी, असे रामायणात वर्णन आहे. म्हणजे वेदविद्येचा त्यांना अधिकार होता. 'ब्रह्मवादिनी' अशी विशेषणे सीता, द्रौपदी यांना लावलेली आढळतात. रामाच्या मुद्रिकेवरचे नाव सीता वाचते. स्त्रिया राजकारणातही लक्ष घालीत. त्यांना युद्धकलेचेही शिक्षण असे. दशरथाबरोबर कैकयी रणांगणात जाते. सत्यभामा नरकासुराला मारते. सुभद्रा रथ उत्तम तऱ्हेने हाकी. क्षत्रियकन्यांना हे सारे शिक्षण मिळत असे का? इतर कलांचेही शिक्षण त्यांना मिळे. उत्तरेला नृत्य शिकवायला

अर्जुन राहतो. चित्रकलाही त्या शिकत. उषा अनिरुद्धाला स्वप्नात पाहते. तिची मैत्रीण चित्रलेखा तिला जगातील सर्व तरुणांची चित्रे काढून दाखवते. तिचे नाव चित्रलेखा. क्षत्रिय मुलींना हे सारे सांस्कृतिक शिक्षण मिळत असेल. ब्राह्मणकन्या काय करीत? त्याही गुरुगृही शिकत. गुरुगृही त्या मुलींना अनुरूप शिक्षण मिळत असावे. महाभारतात उद्योगपर्वात एक तपस्विनी म्हणते: 'मी सत्तर वर्षांची होऊन गेले. अनेक आश्रमांतून राहिले, ज्ञान मिळवले.' सत्तर वर्षे ती अविवाहित होती. सत्तरी ओलांडल्यावर ती चिरयुवती विवाह करू इच्छिते. स्त्रियाही का वाटेल तितके शिकत, इच्छेनुरूप विवाह करीत?

परंतु हे काही असेल, तरी त्यांचे सामाजिक स्थान कमीच मानले जाऊ लागले. धर्मराजा द्रौपदीसही पणास लावतो, याचा अर्थ काय? परंतु तो आपल्या भावांनाही पणास लावतो. कुटुंबाचा मुख्य असल्यामुळे त्याची का सर्वांवर सत्ता? खरा प्रश्न असा होता की, धर्माने स्वतःला आधी पणाला लावले होते. स्वतः गुलाम बनल्यावर पत्नीला त्याला पुन्हा पणास लावता येत होते का? पत्नीला स्वतंत्र अस्तित्व आहे की नाही? परंतु 'धर्मस्य सुक्ष्मा गतिः' असे म्हणून भीष्मद्रोणही मुके बसतात. पतीच्या जीवनाहून पत्नीला निराळे जणू अस्तित्व नाही. पतीच्या हाताला हात लागल्याने मोक्ष मिळेल. तिला स्वतंत्र मोक्षाचा कुठला अधिकार? म्हणून का गीतेचे बंड? ज्याप्रमाणे वैश्य, शूद्र यांना कमीपणा आला, त्याप्रमाणे स्त्रियांनाही. ज्यांनी स्वयंपाक करावा, दळावे, कांडावे, शेण लावावे, त्यांना कोठला मोठेपणा? परंतु राजसूय यज्ञात उष्टी काढण्याचे कर्म स्वीकारून श्रीकृष्णाने स्त्रियांची प्रतिष्ठा स्थापिली. परंतु स्त्रियांची प्रतिष्ठा वाढवली नाही. त्यांना स्वतंत्र किंमत नाही.

कालिदास, भवभूती यांच्या नाटकांतून स्त्रियांची स्थिती बरी दिसते. शाकुंतलात कण्वाच्या आश्रमात मुलांबरोबर मुलीही शिकत आहेत, असे दृश्य आहे. उत्तररामचरितात लवकुशांबरोबर भराभर शिकता येत नाही, म्हणून एक तापसी दुसऱ्या आश्रमात जाते; परंतु हे उल्लेख त्या त्या कविवरांच्या काळाला धरून होते, की प्राचीन काळाचे चित्र त्यांनी रंगवले होते, हे कळत नाही.

स्मृतिग्रंथ पाहिले तर निराळे प्रकार दिसू लागतात. प्रौढविवाह लोपले असे दिसते. बालविवाहाची प्रथा रूढ झाली. मग कोठले शिक्षण नि काय? पती हाच गुरू. त्याने शिकवावे. स्त्रियांना स्वातंत्र्य दिसत नाही. हा फरक का आला, कसा

आला? हा का बुद्ध धर्माचा परिणाम होता? बुद्धधर्म स्त्री-पुरुषांना कमी लेखीना. पुरुषांप्रमाणे स्त्रियाही दीक्षा घेत. त्या भिक्षुणी बनत. धर्मप्रचार करीत. परंतु यातून पुढे अनाचार माजला का? ब्रह्मविहार हे कामविहार झाले की काय? म्हणून का निराळी लाट आली? वैदिक कर्मकांडाने पुन्हा उचल खाल्ली तेव्हा का लहानपणीच विवाह करावे असे ठरले? काही असो. स्त्रियांच्या जीवनातील मोकळेपणा गेला.

स्त्रीला स्वातंत्र्य योग्य नव्हे, असा दंडक झाला. ती अबला बनली. लहानपणी पिता रक्षक,पुढे पती रक्षक, वृद्धावस्थेत पुत्र रक्षक. ती एक रक्षणार्ह वस्तू बनली. आणि जिचे रक्षण करायला दुसरे लागतात, तिला स्वतःची काय किंमत? स्त्री म्हणजे जणू एक इस्टेट, मालमत्ता, एक चीज, तिचा आत्मा कुठे उरला?

'यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवताः'

जेथे स्त्रियांची प्रतिष्ठा ठेवण्यात येते तेथे देवता रमतात, असे जरी स्मृतींतून उल्लेख असले तरी ते फार मोठी मजल मारताहेत असे नाही. स्त्रियांची पूजा म्हणजे त्यांचे स्वातंत्र्य नव्हे. त्यांना नीट वस्त्र द्यावे, दागदागिना द्यावा, त्यांना संतुष्ट ठेवावे, असे स्मृती सांगते. थोडक्यात, स्त्रिया म्हणजे बाहुल्या. खायला, प्यायला-ल्यायला मिळाले की कृतार्थता मानणाऱ्या. स्त्रियांना का याहून थोर आनंद नको होते? वैचारिक आनंद, ज्ञानाचा आनंद, तो का त्यांना नको होता?

'दारिका हृदयदारिका पितुः' मुलगी म्हणजे पाप, तिच्या लग्नाची चिंता, असे वातावरण दिसू लागते. यास्कांचे निरुक्त जवळजवळ अडीच हजार वर्षांपूर्वीचे. परंतु त्यातही दारिका म्हणजे पित्याचे हृदय विदीर्ण करणारी, अशी व्युत्पत्ती लावलेली. दारिका म्हणजे मुलगी. यास्काचार्यांनी या शब्दाचे अनेक धात्वर्थ दिले आहेत; परंतु हाही दिला आहे. अजूनही तीच स्थिती आहे. मुलीचे लग्न कसे करायचे, हीच चिंता आज हजारो वर्षे भारतात आहे. मुलाप्रमाणे मुलगी मोकळेपणाने वाढली नाही, शिकली नाही. तिला विवाह करण्याचे वा न करण्याचे स्वातंत्र्य नाही, अशी ही स्थिती दिसू लागते.

अरे, स्थित्यंतर व्हायला काय करणार? लहानपणीच लग्न लावले तर मुलगी सासरी जाऊ-येऊ लागते. लहानपणी झाड उपटून दुसरीकडे लावले तर नीट जगते. मोठेपणी ते नीट मुळे धरू शकत नाही. त्या वेळेस एकत्र कुटुंबपद्धती होती. ती नांदवण्यासाठी का हा प्रयोग सुरू झाला ? सासरच्या मंडळींबद्दल, तेथील दीर,

नणंदा, भावजया यांच्याबद्दल लहानपणापासून परिचयामुळे प्रेम वाटेल, असे का प्रयोग करणाऱ्यांस वाटू लागले ? ते काही असो, अशी पद्धत सुरू झाली खरी. पुराण-कीर्तन- श्रवण हेच ज्ञानाचे साधन राहिले. वेदांचा अधिकारच गेला. प्रत्यक्ष शिक्षण संपले. अप्रत्यक्ष ज्ञान कळेल तेवढेच. अपवाद म्हणून स्त्रिया पंडित होत असतील. शंकराचार्य व मंडनमिश्र यांच्या वादविवादाच्या वेळेस मंडनमिश्रांची पत्नी अध्यक्ष असते. तिला का मंडनमिश्रांनी शिकवले होते? काही घराण्यांतून ज्ञानोपासना सुरू असेल.

कालिदासाची पत्नी शिकलेली होती परंतु तो अज्ञानी होता. शरमेने तो निघून गेला. त्याने उपासना केली. ज्ञान मिळवून घरी परत आला. त्याने दार ठोठावले. 'कोस्ति ?– कोण आहे' असा पत्नीने आतून प्रश्न केला 'अस्ति कश्चित वाग्विलासः' वागदेवतेजवळ क्रीडा करणारा आहे कोणीतरी, असे त्याने उत्तर दिले. आणि पुढे या चार शब्दांतील एकेक घेऊन त्याने काव्याचा आरंभ केला, अशी दंतकथा आहे.

संस्कृत भाषा स्त्रियांना समजे, परंतु बोलता येत नसे. कारण शिक्षणच बंद झाले. वेदांमध्ये मंत्र लिहिले. उपनिषदांतून त्या चर्चा करताना दिसतात, परंतु संस्कृत नाटकांतून स्त्रिया संस्कृत न बोलता प्राकृत बोलतात. संस्कृत ही वरिष्ठांची भाषा राहिली. जे शिकत त्यांची भाषा. वैश्य, शूद्र , स्त्रिया यांना संस्कृत शिक्षणच मिळेनासे झाले.

सर्व बाजूंनी आत्म्याचा हा असा कोंडमारा होत होता. पतिव्रत्याचे स्तोम माजले. सती जाण्याची चाल पडली. पुरुषाने अनेक विवाह केले तरी परवानगी, एवढेच नव्हे तर त्याने पत्नी वारल्यावर लवकरच पुन्हा विवाह करावा म्हणून धर्माज्ञा. आणि स्त्रीने काय करावे? तिला का भुका नाहीत? परंतु तिने व्रतस्थ जीवन कंठायचे. ती संसारातील संन्यासिनी. तिने सारे काम करायचे. ती सोज्वला, सोवळी. तिने इतरांची बाळंतपणे करावी, आजाऱ्यांची सेवा करावी, स्वयंपाक करावा, लहान मुलेबाळे घरात असतील त्यांना सांभाळावे. मुलाबाळांची हौस तिने देवाला मूल मानून भागवून घ्यावी. तो बाळकृष्ण. त्याला कुंची घालील, साखळी घालील. तो तिचा मुलगा. देवाची ती आई होते. वरिष्ठ वर्गांतून तरी स्त्रियांना असे हे प्रखर वैराग्य शिकवण्यात आले. ती परंपराच पडली.

+++

इस्लामच्या आगमनानंतर

वेदकालीन नि उपनिषदकालीन स्त्री मागे पडली. मोकळेपणा गेला. ते प्रौढ विवाह गेले. ज्ञानार्जनाची सवलत गेली. बालविवाह रूढ झाले. पती हाच गुरू झाला. तोच देव. त्याच्या हाताला हात लावला की सारे झाले. स्त्रियांचे स्वातंत्र्य, अस्तित्वच जणू लोपले. पती निवर्तला तर आमरण व्रतस्थ राहावयाचे. मग ती बालविधवा का असेना. तिला संन्यासिनी, व्रतस्थ करण्यात आले. केशवपनासारख्या चाली रूढ झाल्या. मारून मुटकून वैराग्य देण्यात येऊ लागले. तिच्या मनात वासना येऊ नयेत, सुखाची इच्छा उत्पन्न होऊ नये म्हणून तिने सत्कार-समारंभास जायचे नाही. ती जणू अशुभ ! तिचे पांढरे कपाळ कसे पाहावयाचे? ती सर्वांची सेवा करी नि सर्वांचे शिव्याशाप घेई. पुढे वृद्धपणी तिला कोणी मान दिला तर दिला. प्रतिष्ठित वर्गात तरी असा प्रकार सुरू झाला. गरीब, श्रमणाऱ्या जातीत मोकळेपणा असे. त्यांच्यात पुनर्विवाह असे; परंतु ज्या जाती स्वतःला श्रेष्ठ मानीत, त्यांच्यात स्त्रियांची अधिक कुचंबणा.

याच सुमारास इस्लामही इकडे आला.इस्लामी धर्माच्या आक्रमणामुळे म्हणा किंवा त्यांच्यात पडद्याची चाल असे म्हणून म्हणा, उत्तर हिंदुस्थानात पडदा आला. खानदानी घराण्यातील स्त्रिया मोकळेपणी जात-येतनाशा झाल्या. मेण्यातून जायच्या-यायच्या. घरी कधी इतरांना त्यांचे दर्शन व्हायचे नाही. 'ज्यांच्या पायांचे नख सूर्याला कधी दिसले नाही.' असे गौरवाचे वर्णन करण्यात येऊ लागले. उत्तर हिंदुस्थानभर ही

पडद्याची चाल आली. राजपुतांत प्रथमपासूनच होती की मुसलमानांमुळे आली? रजपूत स्त्रिया शूर म्हणून प्रसिद्ध. मोठमोठ्या घराण्यांतील स्त्रिया घोड्यावर बसायला शिकत. तलवार चालवायला शिकत; परंतु संकटकाळी त्या लढाईला नसत बाहेर पडत. त्या जोहार करीत. शेकडो स्त्रिया आगीत उड्या घेत. पुरुष रणांगणी धारातीर्थी पडत. रजपूतांत चालच होती की, मुलगा जन्मला म्हणजे त्याला तलवार दाखवायची, मुलगी जन्मली म्हणजे तिला दिवा दाखवायचा. पुरुषाने तलवार हाती घेऊन मरावे, स्त्रीने आगीत जळावे, हा त्या प्रतीकांचा अर्थ. उत्तर हिंदुस्थानात मध्ययुगात किंवा नंतर, कोणी प्रसिद्ध स्त्रिया आढळत नाहीत. मुसलमानी अमदानीत रझिया व नूरजहान व चांदबीबी हीच नावे येतात. रझिया दरबारात बसे, राज्य चालवी. ती जणू बंडखोर होती. मुसलमानी धर्म काही स्त्रियांना पडद्यात बसा नाही सांगत. काबाला प्रदक्षिणा घालताना स्त्रियांनी तोंडावर जरा पडदा ओढून घ्यावा, एवढेच पैगंबरांचे सांगणे.

महंमदांच्या काही पत्न्या प्रवचने करीत. स्त्रीला वारसा हक्क देणारे पैगंबर स्त्रीला कमी मानीत नसत. पुरुष काय, स्त्री काय एकाच मातीतून आलात, ते म्हणत. अरबस्तानात लहान मुलींना वाळूत जिवंत पुरून मारीत. आईबापांना मुलींना सांभाळणे कठीण जाई. कशाला मुलगी जन्मली, असे म्हणत; परंतु पैगंबरांनी या गोष्टीला आळा घातला. कुराणात पुनः पुन्हा मुलींना नीट वागवा, असे उल्लेख आहेत; परंतु इस्लाममध्ये पडदा आला खरा. केमालपाशाने तुर्कस्थानातून तो दवडला; परंतु इतर मुस्लीम राष्ट्रांतून तो अजून आहे. हिंदुस्थानातही आहे. मुस्लीम संस्कृतीने हिंदू संस्कृतीसही हा बुरखा बहाल केला. पडदा म्हणजे प्रतिष्ठितपणाचे लक्षण ! गरिबांना पडदा घेऊन कसे चालेल? त्यांना तर कामाला जायला हवे. गरिबांत मोकळेपणा राहिला. ही दळभद्री चाल श्रीमंतांत, नबाबांत, राजेरजवाड्यांत राहिली.

सरदारकन्यांची, राजेरजवाड्यांच्या मुलांची लग्ने पुष्कळदा राजकीय हेतूने होत. या लग्नांवरून कधी युद्धेही होत. मुलगी म्हणजे जणू स्वातंत्र्यहीन वस्तू. देण्याघेण्याची चीज. खरोखर या अशा लग्नाची चीड येते. त्यातून दुःखद घटनाही घडत. मीराबाई, कृष्णाकुमारी यांच्या कथा माहीत आहेत; परंतु शेकडो अज्ञात कथा असतील. बड्या लोकांचे हे प्रकार, तर सामान्य जनतेतही निराळ्या रीतीने तेच प्रकार होते. एक तर बालविवाह सर्रास रूढ झाले आणि स्त्रियांना व्यक्तिमत्त्व असे उरलेच नाही.

परंतु उत्तरेतील पडदा दक्षिणेत आला नाही. गुजरातमध्येही पडदा नाही. इकडे अधिक मोकळेपणा राहिला. मद्रासच्या बाजूला तर अधिकच स्वातंत्र्य. मलबारकडे तर स्त्रियांना अधिक मान. त्या मोकळेपणाने हिंडतील, फिरतील, तळ्यावर स्नानास जातील. मुक्त स्नान करतील; परंतु असा मोकळेपणा असला तरी लग्ने लहानपणीच होत. ज्ञानप्राप्तीला संधी नाही, वाव नाही. क्वचित् भिन्नजातीय विवाह होत, परंतु अपवादात्मकच. ब्राह्मण आणि क्षत्रिय यांच्यामध्ये क्वचित् कधी लग्ने झाल्याची उदाहरणे आहेत. दक्षिणेकडे अगदी बालविवाह होत नसावेत, असे वाटते; परंतु मुलीच्या लग्नाला अडचणी फार. तिकडे मुलीचे लग्न करताना दागदागिने देण्याची पद्धत. कानात निदान हिऱ्यामोत्यांची कुडी तरी आईबापांनी द्यायलाच हवीत. महाराष्ट्रातही मोकळेपणा होता. ज्ञानेश्वराबरोबर त्याची बहीण मुक्ताबाई ही मुक्तपणे हिंडते. ती व्रती असते. बालब्रह्मचारी असते. तिचा छळ झाला नाही. तिला नाव ठेवल्याचे माहीत नाही. संन्याशांची मुले म्हणून सामान्यतः त्यांच्यावर बहिष्कार असे एवढेच.

खेड्यापाड्यांतून स्त्रिया मोकळेपणाने वावरत. शेतात कामाला जात. सणावारी यात्रेला जात. नागपंचमी आली तर झाडाला झोका बांधून घेत. संक्रांतीच्या दिवशी काही ठिकाणी या गावाच्या, त्या गावाच्या स्त्रिया सीमेवर जमायच्या नि उखाळ्या पाखाळ्या काढून गमतीने भांडायच्या. खेळ खेळायच्या. नाना प्रकार आहेत. महाराष्ट्रातील स्त्रियांचे हे स्वतंत्र जीवन हा एक विशेष आहे. वारकरी पंथाने स्त्रियांत अधिक मोकळेपणा निर्माण केला. साधुसंतांच्या कीर्तनाला स्त्रिया जात. वारकरी पंथाची दीक्षा त्या घेत. गळ्यात माळ घालीत. पंढरपूरला पायी वारीला जात. ही अपूर्व वस्तू आहे. खांद्यावर पताका नि पडशी, हातांत टाळ, अशा स्वरूपात या भगिनी जात. मुक्ताबाई, जनाबाई ही नावे महाराष्ट्राच्या भक्तिप्रेमाची. अनेक स्त्रियांनी अभंग रचले.

वरच्या वर्गांतून स्त्रिया थोड्याफार शिकत असाव्यात असे वाटते. चंद्रावळीने सावित्रीचे अभंग रचले. तिला लिहिता येत नसेल? ही चंद्रावळी कोण, कधी झाली, फारशी माहिती नाही; परंतु मराठीतील एक सुंदर खंडकाव्य तिने निर्मिले, जे परंपरेने पवित्र झाले. कहाण्यांचे वाङ्मय तर स्त्रियांनीच रचले असावे. त्यांतील भाषा फार सुंदर. कहाण्या फार प्राचीन काळापासून मराठीत आहेत. ओवी वाङ्मयही मराठीत

फार प्राचीन काळापासून आहे. स्त्रियांनी हे वाङ्मय तोंडातोंडी परंपरागत आणले नि जिवंत ठेवले. कथा-पुराणश्रवण हेच त्यांचे ज्ञानाचे साधन; परंतु काही काही घराण्यांतून स्त्रिया शिकत असाव्यात. समर्थ रामदासस्वामी एका घरी भिक्षेला गेले. एक सोवळी भगिनी एकनाथी भागवत वाचीत होती.

"काय वाचता?" समर्थांनी विचारले.

"नाथांचे भागवत" त्या माउलीने उत्तर दिले.

"अर्थ समजतो का?" पुन्हा समर्थांचा प्रश्न.

त्या भगिनीने काय उत्तर दिले माहीत नाही; परंतु पुढे समर्थांची ती शिष्या झाली.समर्थांचे अनेक आश्रम भगिनी चालवीत. वेणाबाई अक्काबाई इत्यादी समर्थांच्या थोर शिष्या. वेणाबाईने 'सीता-स्वयंवर' हा सुंदर ओवीबद्ध ग्रंथ लिहिला. या सर्व भगिनी लिहिणाऱ्या-वाचणाऱ्या असल्याच पाहिजेत.

महाराष्ट्रीय भगिनी राजकारणातही सरसावत. सरदारांच्या, प्रतिष्ठितांच्या मुली घोड्यावर बसणे, नेमबाजी यात तरबेज होत असत. छत्रपतींची माता श्रीजिजाई ही शहाजी दक्षिणेकडे असता इकडे हिमतीने जहागिरी बघत होती. शिवछत्रपतीस रामायण-महाभारतातील धडे देत होती. तो कोंढाणा मला घेऊन दे, असे सांगत होती. आणि संभाजी महाराजांची पत्नी येसूबाई ! ती किती थोर नि हिमतीची ! ताराबाईची तेजस्विता इतिहासप्रसिद्धच आहे. गोपिकाबाई, आनंदीबाई यांची राजकारणे चालतच. उमाबाई दाभाडे कशी तेजस्विनी नारी ! आणि देवी अहिल्याबाई. ती जमाखर्च उत्कृष्ट ठेवी. सासरा तिला मुलाप्रमाणे मानी आणि पुढे दौलतीचा कारभार तिने चालवला. हिंदुस्थानात विख्यात झाली. दरबारात बसे, न्याय देई. हिंदुस्थानभर अन्नछत्रे, घाट. अनेक राजे आपसांतला तंटा तोडायला अहिल्याबाईकडे जात, अशा आख्यायिका आहेत. रघुनाथराव चालून आले तर घोड्यावर बसून सेना घेऊन निघाली. पत्रात लिहिते: "घाबरू नये. मी डेरेदाखल होते." राजवाडा सोडून ती छावणीत येते. रघुनाथराव शरमून जातात. आणि ती भारतभूषण झाशीची राणी ! ते धैर्य, ते शौर्य; त्याला तुलना नाही. तटावरून घोडा फेकून फळी फोडून ती जाते. शत्रूंशी झुंजते. मारता मारता मरते. महाराष्ट्रीय भगिनींचा असा हा इतिहास आहे.

कवी मोरोपंत यांच्या सुना पंडिता होत्या. महाकाव्ये पढलेल्या. पंतांच्या आर्यांचा कोणाला अर्थ न कळला तर त्यांच्या सुनांकडे कीर्तनकार वा दुसरे अर्थजिज्ञासू येत.

मोरोपंत उदार विचारांचे. त्यांनी आपल्या मुलांचा हुंडा घेतला नाही. हुंडा घेणे पाप, असे म्हणाले. ते ज्या बारामतीकरांकडे राहात, त्यांच्या मुलीसाठीच त्यांनी सीतागीत, सावित्रीगीत वगैरे गीते करून दिली. त्या मुली झोपाळ्यावर बसून ती गीते म्हणत. लोकमान्य टिळकांनी आपल्या मुलींना हीच गीते पाठ करायला सांगितली म्हणतात.

समर्थांचे आश्रम कोठे कोठे भगिनी चालवीत, हे आपण पाहिले. वारकरी पंथानेही स्त्रियांना स्फूर्ती दिली. या सर्वांमुळे महाराष्ट्रात कीर्तनकार स्त्रिया झाल्या. रामशास्त्र्यांच्या वेळेस तुळशीबागेत स्त्रिया कीर्तन करीत, असे उल्लेख आहेत. एकदा एका स्त्री-कीर्तनकारिणीच्या कीर्तनाला स्वतः रामशास्त्री गेले होते. ती भगिनी पूर्वरंग रंगवीत होती. विवेचन करता करता ती भगिनी शास्त्रीबुवांस भर कीर्तनात प्रश्न करते! ''शास्त्रीबुवा, पुरुषांनी पुनः पुन्हा लग्ने करावीत. एक बायको मेली, दुसरी; ती मेली तर पुन्हा आणखी; परंतु शास्त्राने पुरुषांना ही परवानगी दिली. स्त्रियांना का दिली नाही? त्यांना का मरेतो वैधव्य?'' शास्त्रीबुवा निःस्पृह. ते म्हणाले, ''स्मृती पुरुषांनी लिहिल्या. त्यांनी पुरुषांची सोय पाहिली. स्त्रियांनी लिहिल्या असत्या तर स्त्रियांनी स्वतःच्या भावनांना अनुरूप लिहिले असते.'' रामशास्त्र्यांनी बालविधवांच्या पुनर्विवाहास संमती दिली होती. मोरोपंत, रामशास्त्री ही माणसे काळाच्या पुढे होती, थोर विचारवंत होती म्हणा ना ! मानवतेचा उदार धर्म त्यांच्याजवळ होता.

महाराष्ट्रात जरी स्त्रियांना एक प्रकारचा मोकळेपणा होता, तरी सर्वसाधारणपणे त्यांना जीवनात खालचेच स्थान: विवाह लहानपणीच व्हायचे. स्वतःची सुखदुःखे मनातच राहायची, बायकांच्या ओव्यांत हे चित्र आहे-

'लेकीचा जन्म, नको देऊ सख्याहरी
जन्मवेरी ताबेदारी, परक्याची ।।
लेकीचा जन्म, जन्म घालून चुकला ।।
बैल घाण्याला जुंपला, जन्मवेरी ।।'

देवा, मुलीचा जन्म नको देऊ. जन्मवेरी परक्याची ताबेदारी. मरेपर्यंत बैलाप्रमाणे राबायचे. जणू पोटाला चार घास आणि अंगावर वस्त्र, एवढे तिला मिळाले म्हणजे झाले. तिची कशावर सत्ता नाही. देवाधर्माला दोन दिडक्या हव्या असल्या तरी त्या मागाव्या लागायच्या. जरा नवऱ्याची मर्जी गेली की अपमान, मारहाण. एकंदरीत जीवनाचा कोंडमाराच !

मी काही जुनी गाणी ऐकली होती. त्यात गावच्या पाटलासमोर नवराबायकोचे भांडण आले आहे, असे सुंदर वर्णन आहे. ती बाई म्हणते: 'पाचामुखी परमेश्वर असतो. न्याय द्या. हा कसला नवरा! डोक्याचे पागोटे तीन-तीनदा सोडतो, बांधतो. मिळवायची अक्कल नाही. माझे माहेर केवढे ! याला काही शिकवा.''

नवरा आपलीही बाजू मांडतो व म्हणतो: 'माहेरची ऐट ही तीनतीनदा सांगते. माझा का हिने अपमान करावा?' वगैरे. म्हणजे गावातील अशी भांडणे पंचांसमोर जात की काय? इंग्लंडमध्ये अशा गोष्टी घडत, असे इतिहास सांगतो. भांडखोर बायकोला नवऱ्याने विहिरीत दोरीला बांधून सोडावे, पाण्यात बुडवावे, वर काढावे, नाकातोंडात पाणी दवडावे-असे प्रकार तिकडे होत. नवऱ्याला असा छळ करण्याचा हक्क असे. आपल्याकडे हक्क होता की नव्हता, प्रभू जाणे. परंतु नवरे बायकांना मारायचे. रस्त्यांतूनही मारीत न्यायचे. त्यांचा तो हक्क ! अजूनही अशा समजुती आहेत. स्त्रियांची सुखदुःखे स्त्रियाच जाणत. इतर ठिकाणांपेक्षा महाराष्ट्रात मोकळेपणा दिसतो; परंतु स्त्रीच्या स्वतंत्र आत्म्याचे वैभव ही निराळीच गोष्ट. ती प्रभा अजून फाकायची होती.

एक प्रकारे भारतवर्षात सर्व स्त्रियांची तीच दशा होती. गुजराती लोकगीते, स्त्रीगीते आहेत, त्यांतूनही आपल्याकडील ओव्यांत स्त्रियांच्या जीवनाचे जसे चित्रण आहे तसेच आहे, करुण असेच ते चित्र आहे. गुजरातेतही स्त्रियांना एक प्रकारे मोकळे जीवन आहे. खेड्यापाड्यांतील स्त्रिया कामाला जातात, कष्ट करतात. तिकडे गरबा-गीते वगैरे स्त्रियांचे नृत्यप्रकार आहेत. आपणाकडे फुगड्या वगैरे स्त्रियांचे नाना खेळ आहेत; परंतु गरबा-नाचासारखे सुंदर प्रकार आपणाकडे नाहीत. सामुदायिक नृत्याचे प्रकार, नाना ऋतूंची वर्णने, कृष्णाची गाणी-हे सारे प्रकार गरबा नृत्यातून येतात.

दक्षिण हिंदुस्थानातील मंदिरांतून देवदासी असत. त्या देवासमोर नृत्यगीतादी कलाप्रदर्शन करायच्या. दक्षिणेकडे अनेक घराण्यांतून मुलींना संगीत शिकवण्याची पद्धत असे. संगीताला तिकडे मान, नृत्यासही. परंतु या गोष्टी सर्रास अशा नसत. अपवादात्मकच. एकंदरीत जीवन चुलीजवळचेच. बाहेरच्या व्यापक जीवनाचा त्यांना स्पर्श नसे. उत्सव, यात्रा, समारंभ या वेळेसच बाहेरची हवा. रोज देवदर्शनास जावे; नदीवर जावे; परंतु सार्वजनिक जीवनात स्थान नसे. पुरुषांप्रमाणेच स्त्रीला बुद्धी

आहे; भावना आहेत, तिला आत्मा आहे, तिच्या जीवनाचा सर्वांगीण विकास व्हायला हवा, ही भावना नव्हती. स्त्रीला वाटे की, पुरुषाच्या सेवेतच माझी कृतार्थता. स्वतःला जणू तिने शून्य केले होते. 'स्त्रिया यशाची' असा चरण आहे. स्त्रिया धीर देणाऱ्या, कोंड्याचा मांडा करणाऱ्या, घरी आल्यावर तुम्हास सुखशांती देणाऱ्या. जगात कोठे आधार नसला तरी घरी आहे. घरी तेल नसले तरी प्रेमस्नेहाचा दिवा पाजळून स्त्री बसलेली आहे. स्त्रीची शक्ती जगात गाजली नाही, तरी जीवनात ती अनुभवाला येते. पतंग जगाला दिसतो, परंतु त्याला नाचवणारा तो बारीक धागा असतो. त्याप्रमाणे स्त्रीचा तो आधार तुमच्या यशाचा पाया असतो. स्त्रीचा असा महिमा असला तरी तिच्या संपूर्ण जीवनाचा विकास आम्ही कधी पाहिला नाही. स्त्रियांनीही जे समाजाने दिले त्यांतच समाधान मानले. त्यांनी बंड केले नाही:

'रुसवेफुगवे, त्यांत प्रेम पिकवते'

घरात रुसवे, फुगवे, परंतु त्यातच मी प्रेम पिकवते, अशी जुनी महाराष्ट्रीय भगिनी सांगते. स्त्रियांचा हा मोठेपणा तर खराच; परंतु अतःपर तेवढ्याने स्त्रियांना वा पुरुषांना समाधान वाटता कामा नये.

मी खानदेशातील खेड्यांतून हिंडायचा. ''घरात कोण आहे?'' मी विचारी. ''घरात माणसे नाहीत'' मला सांगण्यात येई. बायका तर घरांत असत. पुरुष म्हणजे माणसे, असा खानदेशी अर्थ. बायकांना कोण माणूस म्हणतो? बायकांतली अभिजात मानवजातही जणू आम्ही विसरून गेलो. त्यांना स्वतंत्र अस्तित्व आहे, व्यक्तिमत्त्व आहे, आत्मा आहे, हृदय आहे, बुद्धी आहे, सुखदुःखे आहेत, हे आम्ही विसरून गेलो. खानदेशात पेरणी करायची असली म्हणजे भरल्या कपाळाची स्त्री शेतात घेऊन जातात. तिच्या हाताने आरंभ करतात. ती सुवासिनी आणि गतधवा असेल तर ती अशुभ! शुभाशुभ का अशा गोष्टींवर अवलंबून आहे? परंतु समजुती असतात. व्यक्तीला अभिजात स्वतंत्र महत्त्व आहे हे आम्ही विसरून गेलो. सर्व जगात हीच तऱ्हा. खरे स्वातंत्र्य अजून यायचेच आहे. जोवर दुसऱ्यांच्या आत्म्याची प्रतिष्ठा आपणास कळली नाही तोवर स्वातंत्र्याचा अर्थ आपणास कळला असे मी तरी म्हणणार नाही.

+++

इंग्रजी अमदानी

इंग्रजी अमदानीत पाश्चात्य जगाशी, अर्वाचीन संस्कृतीशी भारताचा संबंध आला. चीन आणि हिंदुस्थान दोन प्राचीनतम राष्ट्रे; परंतु घरातच स्वयंतृप्त राहिल्यामुळे ज्ञानविज्ञानात मागे राहिली. दीडदोन हजार वर्षांपूर्वी गोबीची वाळवंटे ओलांडून हिंदी पंडित चीनमध्ये बुद्ध धर्म घेऊन गेले. चिनी भाषा शिकून तिच्यात त्यांनी संस्कृत ग्रंथ अनुवादले. भारतीय तत्त्वज्ञ आणि भारतीय व्यापारी दशदिशांत जात होते; परंतु ती स्फूर्ती, ते साहस सारे लोपले आणि आपण घरकोंबडे बनलो. युरोप पुढारले. तो वास्को द गामा, अटलांटिका नि हिंदी महासागर ओलांडून येतो. तो कोलंबस तिकडे पॅसिफिक ओलांडतो. चालले जगभर युरोपचे धाडसी नावाडी. प्रचंड दर्यावर चिमुकली गलबते घेऊन जाताहेत.

हिंदुस्थानात युरोपियन लोक येऊ लागले. पोर्तुगीज, फ्रेंच, इंग्रज आले. युरोपातील भांडणे घेऊन इकडे आले. त्या भांडणांत शेवटी इंग्रज विजयी झाले. हिंदुस्थानात ब्रिटिश सत्ता आली. नवसंस्कृतीशी भारतीय संस्कृतीचा संबंध आला. नवीन शिक्षण-पद्धती आली. नवी विद्यापीठे स्थापन झाली. छापखाने सुरू झाले. १८४८ मध्ये पुण्याचा ज्ञानप्रकाश सुरू झाला. लोकहितवादी लिहू लागले. नवीन युग आले.

आपल्याकडे तर लहानपणीच लग्ने होत; परंतु मुलगे थोडेफार शिकू लागले. मुलींचें काय? इंग्रजी शिकणे अवश्य, तरी अधर्मरूप वाटे. इंग्रजी शब्द घोकायला दूर जाऊन बसावे लागत असे. इंग्रजी शाळेतून आल्यावर बाहेर बसवून डोक्यावर

पाणी ओतून मग घरात घेत, अशी स्थिती होती. अशा काळात पुण्यात महात्मा ज्योतिबा फुल्यांनी अस्पृश्यांच्या मुलींसाठी छात्रालय काढले. अजून ब्राह्मणांच्या मुलीही शाळेत जाऊ लागल्या नव्हत्या तो ज्योतिबांची केवढी धडाडी! शिक्षणाशिवाय मागासलेला समाज पुढे येणे कठीण आणि स्त्रिया सुशिक्षित होत नाहीत तोवर सारेच फोल.

त्या काळात एक नाव डोळ्यांसमोर ठसठशीतपणे उभे राहते. पंडिता रमाबाईंचे नाव. अनेक आपत्तींपासून त्या नि त्यांचे कुटुंब गेलेले. त्या संस्कृतमध्ये सुंदर बोलत. कलकत्त्यात त्यांनी संस्कृतमध्ये खूप भाषणे केली. स्त्रियांना शिक्षण मिळाले पाहिजे, म्हणून कोण त्यांची तळमळ ! परंतु महाराष्ट्रात त्यांचा उपहास होऊ लागला. पंडिता रमाबाईंची अपार महत्त्वाकांक्षा. महाराष्ट्रीय भगिनींना ज्ञानदान देण्याची त्यांना केवढी तळमळ; परंतु स्वधर्मात राहून हे करता येईल असे त्यांना दिसेना ! कोण देणार पैसा, कोण देणार आधार? ख्रिस्ती धर्म स्वीकारला तर पैसा मिळेल, सरकारी आधार मिळेल, असे त्यांना वाटले. परंतु तेथे हिंदी स्त्रिया येणार कशा? ते त्यांच्या लक्षात आले नाही. शारदासदन संस्था त्यांनी स्थापिली. त्यांचा उपहास झाला. पंडिता रमाबाई अमेरिकेत गेल्या. तिकडे त्यांनी व्याख्याने दिली. परधर्मात जाऊन स्वकीयांची सेवा करणे कठीण होते. समाजात राहूनच सेवा करता येईल. समाजाच्या शिव्याशापांतच सेवा करीत राहिले पाहिजे. कोणावर रागवता? रुसता? आपलेच ओठ नि आपलेच दात.

पुण्याचे श्री. गोपाळराव जोशी यांनी आपल्या पत्नीस अमेरिकेत पाठवण्याचे धाडस केले. आनंदीबाई त्यांचे नाव. मराठीत त्यांचे चरित्र आहे. काही सुंदर चरित्रांपैकी ते एक आहे. आनंदीबाई अमेरिकेत गेल्या. त्या डॉक्टर झाल्या. तिकडेही त्या हिंदी पद्धतीने राहात. भारतीय विचार, राहणी यांविषयी त्यांनी आदर उत्पन्न केला. तिकडील भगिनींना पुरणपोळी वगैरे करून खायला द्यायच्या. त्यांनाही कधी साडी नेसवायच्या. अति मनमिळाऊ, कष्टाळू आणि सद्गुणी. परंतु डॉ. आनंदीबाईंना देवाने आयुष्य कमी दिले. त्या लवकरच देवाघरी गेल्या. एक निर्मळ सुगंधी फूल सेवा करणारं तोच सुकून गेले !

स्त्रियांना शिक्षण मिळाले पाहिजे, म्हणून प्रचार सुरू झाला. काँग्रेसची स्थापना झाली होती. काँग्रेसच्या अधिवेशनावर सामाजिक सुधारणांचे अधिवेशन न्या. रानडे

भरवू लागले. सामाजिक सुधारणेच्या अधिवेशनाचे ते प्राण होते. त्यांची ती भाषणे अति उद्बोधक आहेत. आगरकर स्त्रियांचा आत्मा मुक्त व्हावा म्हणून सर्व शक्तींनिशी लढत होते. तिकडे स्वामी दयानंदांच्या स्फूर्तीने स्त्रियांच्या शिक्षणाचा प्रश्न असा पुढे येत होता; तर बंगालमध्ये पंडित ईश्वरचंद्र विद्यासागर यांनी पुनर्विवाहाचा प्रश्न हाती घेतला. स्त्रियांना पुनर्विवाहाची का अनुज्ञा नसावी? राजा राममोहन राय यांनी बंगालभर नवविचारांची गुढी उभारली. सतीसारख्या चाली बंद पाडायला ब्रिटिश सरकारला त्यांनी नैतिक पाठिंबा दिला; परंतु स्त्रियांचा सर्व प्रकारे आत्मा मुक्त व्हावा म्हणून प्रयत्न हवे होते. सहस्रमुखी प्रयत्न हवे होते. बालविधवांना का मरेपर्यंत संन्यासाची दीक्षा देऊन सक्तीने अंधारात ठेवायचे ? ती कठोरता अमानुष होती. विद्यासागर कळवळले. शास्त्राधार मिळावा म्हणून कलकत्त्यास रात्रंदिवस ते स्मृतिग्रंथ बघत राहिले आणि एके दिवशी पहाटे त्यांना स्त्रियांना पुनर्विवाहाची परवानगी देणारे वचन आढळले. त्यांच्या आनंदास पारावार राहिला नाही. विद्यासागर पुनर्विवाह रूढ करायला उत्सुक होते. तळमळीने म्हणायचे: ''माझी मुलगी विधवा झाली तर तिचा पुनर्विवाह करीन नि समाजाला उदाहरण घालून देईन.'' महाराष्ट्रातही हे विचार आले आणि महर्षी आण्णासाहेब कर्वे यांनी पुनर्विवाह केला. हरी बल्लाळ परचुरे यांनी पुनर्विवाह केला. हे दोघे धर्मवीर दापोली तालुक्यातलेच. दोघांवर बहिष्कार पडले. महर्षी कर्वे पाच वर्षांपूर्वी म्हणाले, ''अजून मुरूडला गेलो तरी निराळे जेवायला बसवतात!'' मग त्या काळात परिस्थिती कशी असेल? इंग्रजी वाङ्मयाने नवीन वाङ्मयप्रकार येत होते. कादंबरी हा त्यातलाच प्रकार. कादंबरी समाजात क्रांती करू शकते. हरिभाऊंच्या 'पण लक्षात कोण घेतो' या कादंबरीने महाराष्ट्रीय जनतेचे हृदय हलवले. बाबा पदमजींची 'यमुना पर्यटन' कादंबरी यापूर्वी बरीच वर्षे प्रसिद्ध झाली होती. तीही एका विधवेचीच करुण कथा; परंतु ती कथा मागे पडली. एका ख्रिश्चन झालेल्या बंधूने लिहिलेली म्हणून ती कादंबरी मागे पडली असेल, परंतु सामाजिक प्रश्न हाती घेऊन ती लिहिलेली होती. अशा प्रकारे स्त्रियांची स्थिती सुधारावी म्हणून साहित्यिकही पुढे येऊ लागले.

पुण्याची हुजूरपागा फार जुनी मुलींची शाळा. बोर्डिंगही होते. आरंभी हिंदुधर्मी मुलींसाठी निराळे, ज्यू मुलींसाठी निराळे अशी तेथे बोर्डिंगे होती. तिकडे एक पंचहौद मिशन शाळा होती; परंतु तेथे चार इयत्तांपर्यंतच शिक्षण मिळे. तेथे ख्रिश्चन झालेल्या

मुलीच बहुधा शिकत. पाचवीपासून मग हुजूरपागेत येत. हुजूरपागा इंग्रजी शिक्षण देऊ लागली. तिकडे महर्षी कर्वे यांनी पुण्याजवळ हिंगणे येथे अनाथ बालिकाश्रम स्थापिला. तेथे मुलींची मराठी शाळा होती. प्रथम तर चार इयत्तांपर्यंतचे शिक्षण मिळू लागले व पुढे फायनलला मुली बसू लागल्या. इंग्रजी तीन इयत्तांपर्यंतही तेथे शिक्षण मिळू लागले. कर्व्यांच्या संस्थेमार्फतच महिला विद्यालय म्हणून संस्था लाकडी पुलाजवळ चालवण्यात येत असे. ती संस्था वसतिगृहच होते म्हणा ना. कर्व्यांच्या पत्नी बाया याच तेथे व्यवस्था बघत. तेथील काही मुली हुजूरपागेत जात,काही न्यू इंग्लिश स्कूलमध्ये शिकत. असे हे प्रयत्न शहरांतून होऊ लागले. मोठ्या शहरांतून जिल्ह्याच्या, तालुक्याच्या गावांपर्यंत शिक्षणाचे लोण थोडे थोडे जाऊ लागले.

श्रीमंत सयाजीराव महाराज हे पुढारलेल्या विचारांचे. स्त्रियांचे शिक्षण व्हावे, हरिजन पुढे यावेत, म्हणून त्यांना तळमळ. श्री. काशीबाई हेर्लेकर या बडोद्यास त्या वेळेस पुढे आल्या. बडोद्यास स्त्रियांचे ट्रेनिंग कॉलेज व मुलींचे हायस्कूल या संस्था प्रथम एकत्रच होत्या. मिस मेरी भोर या बडोद्याच्या ट्रेनिंग स्कूलच्या काही दिवस मुख्य होत्या. श्री. काशीबाई हेर्लेकर तेथील ट्रेनिंग कॉलेजात शिक्षक होत्या. त्या शिक्षकच राहिल्या. त्यांच्या विद्यार्थिनी येऊन तेथे मुख्य झाल्या. काशीबाईच्या आई सगुणाबाई देव याही चांगल्या सुशिक्षित होत्या. मराठी तर त्यांना येईच परंतु इंग्रजीही त्या शिकल्या. काशीबाईंना विद्येची गोडी आईपासून मिळाली. अगदी आरंभीच्या अर्वाचीन मराठी लेखिकांत काशीबाईंचे स्थान आहे. स्त्री-स्वातंत्र्यासाठी त्यांना घरीही त्रास सोसावा लागे; परंतु सहनशीलपणाने त्यांनी सारे सहन केले. स्त्रिया स्वातंत्र्यास योग्य आहेत, असे पुरुषांना पटवले. तो संक्रमणावस्थेचा काळ होता, सुशिक्षित स्त्रियांवर जबाबदारी होती, आणि काशीबाई हेर्लेकर म्हणजे एक असे आदर्श उदाहरण. श्री. शांताबाई कशाळकर, सौ. गीता रानडे या त्यांच्याच सुविद्य मुली.

मुलींच्या शिक्षणाला थोडीफार सुरुवात झाली. मराठी श्रीगणेशा तरी येऊ लागला. शिक्षणाला आरंभ होणे म्हणजे विवाहकाळ पुढे जाणे, कारण चार इयत्ता व्हायच्या म्हटल्या तरी दहा-बारा वर्षांची मुलगी होणार; आणि इंग्रजी शिकायचे म्हटले तर वयाची मर्यादा आणखीच पुढे जायची. त्या प्रश्नांवर खडाजंगी माजली. केसरी आणि सुधारक यांतून स्तंभच्या स्तंभ लेख येऊ लागले. मुलींच्या विवाहाची वयोमर्यादा काय असावी, हाच जणू महान राष्ट्रीय प्रश्न होऊन बसला.

मुलीच्या वयाचे प्रश्न, त्याचप्रमाणे हुंड्यासारख्या घातक चालीही होत्या. मुलींना सतरा ठिकाणी दाखवायला न्यायचे ! ज्या वेळेस शिक्षणच नसेल त्या वेळेस नाकडोळे बघून, चालते कशी, बोलते कशी बघून, लग्न करीत असावेत. मुली शिकायला लागल्या तर त्यांचे शिक्षण वगैरे बघावे. मुली शिकल्या, परंतु मुलीची प्रतिष्ठा वाढली नाही. महर्षी सेनापती नेहमी म्हणतात, ''मुलगी ही देण्याघेण्याची वस्तू नाही. मुलगे-मुली आपापले अनुकूल वधुवर निवडून विवाह करतील. आईबापांनी, पालकांनी आशीर्वाद द्यावा. इतर काही अडचणी असतील तर दूर कराव्यात.'' परंतु मुलीच्या आत्म्याला ही प्रतिष्ठा अजून यावयाची आहे.

राम गणेश गडकरी हे कवी, नाटककार तसेच जबरे विनोदी लेखक. त्यांनी 'ठकीचे लग्न' म्हणून विनोदी लेखमाला लिहिली. मुलीचे लग्न मोडायला सतराशे विघ्ने कशी आड येतात ते त्यांनी अति विनोदाने दाखवले आहे. कोठे मंगळ आड येतो, कोठे नाडी जमत नाही. कोठे गण विघ्न आणतो तर कोठे हुंड्यापायी जमत नाही. सतरा प्रकार. मुलींची विटंबना थांबत नव्हती. त्यांच्या जिवाचा गुदमरा होत असेल. पूर्वी लहानपणी लग्ने करीत तेव्हा जाणीव तरी आलेली नसे; परंतु आता शिक्षण मिळू लागले. थोडेफार वय वाढू लागले. पुस्तके वाचनात येऊ लागली. कधी कादंबरी हातात पडावी, कधी नाटक. प्रेम वगैरे शब्द कानांवर येऊ लागले. भावना वाढू लागल्या. हृदय विकसू लागले; परंतु आईबापांची, समाजाची वृत्ती जुनाटच. वाढत्या परिस्थितीनुरुप वाढती दृष्टी नाही, वाढती सहानुभूती नाही. कधी कधी या लहान मुलीचा थेरड्यापाशीही विवाह करीत. मुलीचे पैसे घेत. मुलाचे काय, मुलीचे काय पैसे घेणे पाप. काही जातींतून मुलामुलींचे लग्न होणे कठीण जाते. मुलाला मुलीच्या बापाला पैसे द्यावे लागतात. काही गुजराती जातींत ही अनिष्ट चाल आहे.चार मुली असल्या तर बाप म्हणतो, 'ही माझी इस्टेट, चारी जणींचे दहाबारा हजार तर खरे!' मद्रासकडे मुलींचे सालंकृत कन्यादान करण्याची चाल म्हणून अडचण. विवाह म्हणजे वधुवरांनी एकमेकांस हृदय देणे, ही गोष्ट कधी होईल? मराठीतील शारदा नाटकाने केवढी खळबळ माजवली? देवलांचे हे अपूर्व नाटक. त्यातील गाणी खेड्यापाड्यांपर्यंत गेली, 'लग्ना अजून लहान । अवघे पाउणशे वयमान।।' इत्यादी गाणी सर्वांच्या ओठांवर खेळू लागली. अशा रीतीने स्त्रियांच्या प्रश्नांना वाचा फोडण्यात येत होती.

'देश स्वतंत्र व्हावा म्हणून देशात बाँब आले, पिस्तुले आली. लोकमान्य काळ्या पाण्यावर चालले. खुदीराम फाशी गेला. क्रांतिकारक अंदमानात चालले. देश स्वतंत्र व्हावा म्हणून ना ही सारी बलिदाने? परंतु देश स्वतंत्र व्हावा म्हणजे काय? देशातील नरनारींची जीवने विकसित व्हावीत हा ना स्वातंत्र्याचा अर्थ ? स्त्रियांच्या जीवनाचा विकास कधी होणार? तरुण देशभक्तीच्या गोष्टी बोलत आहेत, स्वदेशीच्या शपथा घेत आहेत, परंतु लग्नाच्या वेळेस हुंडे घेत आहेत! हे विचित्र नव्हे का?

आणि म्हणून बंगालमधील मुलगी स्नेहलता बलिदानार्थ उभी राहते. ती पत्र लिहिते, 'हुंड्याच्या चालीमुळे मुलींची दैना होते. आई–बापांना मुलगी म्हणजे संकट वाटते. देशातील तरुणांना आपल्या भगिनींची विटंबना थांबावी असे नाही वाटत? ही हुंड्याची चाल बंद व्हावी म्हणून मी स्वतःचे प्राण देत आहे.' स्नेहलतेने अशा आशयाचे पत्र लिहून ठेवले. तिने अंगावर रॉकेल ओतून काडी लावली. त्या दिव्य ज्वालेने क्षणभर भारतीय तरुणांच्या जीवनात प्रकाश आला. ठायी ठायी युवकांच्या सभा झाल्या. हुंडा न घेण्याच्या प्रतिज्ञा झाल्या.

स्त्रियांचे शिक्षण, साहित्यिकांचे प्रयत्न आणि स्नेहलतेचे बलिदान अशा अनेक मार्गांनी स्त्रियांच्या जीवनात नवीन प्रकाश येऊ लागला. शिक्षण वाढू लागले. क्वचित पदवीधर भगिनी दिसू लागल्या आणि स्त्रियांचे शिक्षण हाती घ्यायला सेवासदन, सूतिकागृहे इत्यादी संस्था काढायला भगिनीच हिमतीने पुढे येऊ लागल्या. महाराष्ट्रातील सेवासदन संस्थेचे या दृष्टीने फार थोर कार्य आहे. तो इतिहास पुढे पाहू.

✦✦✦

स्वातंत्र्याचा उष:काल

हिंदी स्त्रिया थोडेफार शिकू लागल्या. अर्थात खालपर्यंत अजून शिक्षण गेलेच नव्हते. आजही नाही गेले, तर ३०-४० वर्षांपूर्वीची गोष्ट विचारायलाच नको; परंतु मुलींना शाळेत घातले पाहिजे याला फारसा विरोध आता राहिला नव्हता. स्त्रियांनीच स्त्रियांची उन्नती करायला पुढे यायला हवे होते. महर्षी कर्वे यांच्या संस्था वाढल्या. त्यांना चिपळूणकरांसारखे उत्साही सहकारी लाभले. चिपळूणकर अमेरिकेतून शिकून आलेले. अति उत्साही नि कळकळीचे. हिंगण्याचे प्रयत्न अविरत चालू होते आणि पुण्यात सेवासदन निघाले. त्या वेळेस न्या. रानड्यांच्या पत्नी रमाबाई हयात होत्या. भारत सेवक समाजाचे थोर सेवक गोपाळ कृष्ण देवधर यांनी सेवासदनाचा पाया घातला.रमाबाईंनी त्या कामाला वाहून घेतले. सेवासदनाचा आज अपार पसारा आहे. अनेक ठिकाणी त्याच्या शाखा आहेत. हिंदुस्थानातील मोठमोठ्या दवाखान्यांतून हिंदी परिचारिका नसत. गोऱ्या किंवा एतद्देशीय ख्रिश्चन किंवा ज्यू परिचारिका असत. या देशात शिक्षणच नव्हते. स्त्रियांनी निर्भयपणे काम करण्याची परंपरा नव्हती. संस्थांतून नोकरी-चाकरी करण्याची रूढी नव्हती. दळण-कांडण, स्वयंपाक, भांडी घासणे हेच त्यांचे धंदे. परिचारिका होणे, डॉक्टर होणे, वकील होणे, शिक्षण होणे; समाजातील अनेक क्षेत्रांत जाणे, स्वावलंबी होणे, स्वाभिमानाने भाकरी मिळवणे हे अजून नव्हते. सेवासदनाने ही कोंडी फोडली, सेवासदनाने परिचारिकांचा, सेविकांचा वर्ग काढला. विधवा हिंदी स्त्रियांना नवमार्ग दाखवला. त्यांच्या निराश, अंधारमय जीवनात प्रकाश

आणला. हळूहळू हे वातावरण सर्वत्र पसरले. दवाखान्यांत देशी परिचारिका नसत म्हणून आजारी स्त्रिया तेथे राहायला तयारच नसत; परंतु आता दवाखान्यांत राहायला त्या नाखूश नसतात.

अमेरिकेतील प्राथमिक शिक्षण स्त्रियांच्या हाती आहे. आपल्याकडे स्त्रिया शिक्षक होऊ लागल्या. सेवासदनाने स्त्रियांचे ट्रेनिंग कॉलेज काढले. पुढे आणखी निघाली. लहान मुलामुलींना स्त्रियांनीच शिकवावे. स्त्रियांचा स्वभाव प्रेमळ नि कोमल असतो. प्लेटो म्हणतो, "ज्याला मुलांविषयी प्रेम वाटत नाही त्याने शिक्षक होऊ नये." स्त्रिया उच्च शिक्षण घेऊ लागल्या . पदवीधर होऊ लागल्या. लेखन करू लागल्या. मुलींच्या शाळा चालवू लागल्या. कितीतरी प्रथितयश अशा साहित्यिक स्त्रिया डोळ्यांसमोर येतात.

परंतु स्त्रियांचे शिक्षण असे वाढू लागले, तरी खरी दृष्टी त्याच्या पाठीमागे नव्हती. अजूनही नर्सिंगचा कोर्स घेतला तर लग्न व्हायला अडचणी येतील, असे आईबापांना वाटते, पालकांना वाटते. लग्नासाठी सारे, अशीच वृत्ती आहे. मुलांना शिकवताना त्याचे लग्न व्हायचे आहे ही भावना नसते. मुलींना शिकवताना ती असते. 'न शिकेल तर लग्न कसे होईल?' असे म्हणतात. लग्नासाठी शिकायचे. स्त्रियांनी का शिकावे? कोण म्हणतील, 'लग्न व्हायला अडचण येऊ नये म्हणून,' दुसरे म्हणतील, 'हिशेब ठेवील, दुकानातून माल आणील. धोब्याला कपडे किती दिले वगैरे लिहून ठेवील.' आणखी कोणी म्हणतील, 'पतीबरोबर वादविवाद करील. काव्यशास्त्रविनोद करील. कलात्मक व साहित्यिक आनंद उपभोगायला पतीला बाहेर नको जायला. आपली बायको भुक्कड, नुसती चूल फुंकणारी, असे त्याला नको वाटायला.' अशा या नाना दृष्टी असतात; परंतु यांतील एकही खरी नाही. स्त्रियांनी का शिकावे? त्यांना आत्मा आहे म्हणून, त्या मानव आहेत म्हणून. शिक्षणाचा इतर काय उपयोग व्हायचा असेल तो होईल, परंतु स्वतःच्या विकासासाठी शिकायचे. देहाला भाकरी हवी तशी मनाला विचारांची भाकर हवी. स्त्रियांची मनोबुद्धी का उपाशी ठेवायची? ही दृष्टी शिक्षण घेणाऱ्या स्त्रियांत नव्हती, त्यांना शिक्षण देणाऱ्यांमध्येही क्वचित असे.

इंग्रजी शिकलेल्यांची जशी एक स्वतंत्र जात झाली, तशीच सुशिक्षित स्त्रियांचीही होऊ लागली. साहेबी पोषाख करावा, नटावे, मुरडावे असे सुशिक्षित पुरुषांस वाटे, तसेच सुशिक्षित स्त्रियांना वाटे. सुशिक्षित स्त्री-पुरुष परदेशी मालाच्या जिवंत

जाहिराती असत! स्वदेशी, परदेशी विचारच आमच्याजवळ नसे. देशी जनतेजवळ जणू संबंध राहिला नाही. आपल्याच कोट्यवधी बंधूंना तुच्छ मानणे हा आमच्या शिक्षणाचा परिणाम झाला. पुष्कळ वर्षांपूर्वी एकदा एक मित्र मला म्हणाले, 'मी आगगाडीतून प्रवास करताना टॉमीचा पोषाख करतो. डोक्यावर हॅट, हातात छडी, शॉर्ट खाकी पँट; मग मला नेहमी जागा मिळे !' असे करण्यात सुशिक्षितांना प्रतिष्ठा वाटे. पुरुषांपेक्षा स्त्रियांत सजण्याची वृत्ती अधिकच असते. सुशिक्षित स्त्रियांचे समाज म्हणजे परदेशी मालाची प्रदर्शने वाटत!

देशात स्वराज्याच्या स्वातंत्र्याचे लढे सुरू होते, स्वदेशीच्या काळात 'देशी बांगड्याच घालू' म्हणून काही भगिनींनी शपथा घेतल्या. 'सगळ्यांनी विणलेले गावठी लुगडेच वापरू' अशा शपथा घेतल्या. लोकमान्य टिळकांमुळे महाराष्ट्रातील पांढरपेशा स्त्रियांत थोडीफार जागृती आली; परंतु तात्पुरती. अजून हृदय हलले नव्हते. देशातील नवीन ध्येये स्त्रियांपर्यंत जाऊन पोहोचली नव्हती.

या सुमारास महात्माजी दक्षिण आफ्रिकेतून आले. दक्षिण आफ्रिकेतील हिंदी स्त्रियांनी नवीन इतिहास लिहिला होता. कडेवर मुले घेऊन हिंदी मायभगिनी त्या दूर देशात सत्याग्रहात सामील झाल्या होत्या, तुरुंगात गेल्या होत्या; आणि त्यांनी बलिदानही केले होते. महात्माजी कस्तुरबांना म्हणाले, ''तू तुरुंगात मेलीस तर जगदंबेप्रमाणे मी तुझी पूजा करीन !'' भारतीय नारीचे तेज पुन्हा प्रकट होऊ लागले होते. देवी सरोजिनी, ॲनी बेझंट या इकडे व्याख्याने देत होत्या. सरोजिनींनी गोखल्यांच्या आज्ञेवरून हिंदू-मुस्लीम ऐक्यार्थ दौरा काढला. गोखले त्यांना 'हिंदचा बुलबुल' असे म्हणत. सरोजिनींनी इंग्रजीत अप्रतिम कविता लिहिलेल्या. यापूर्वी बंगालमधील तारूलता दत्त (तोरू दत्त) या तरुण मुलीने इंग्रजीत कविता लिहिल्या होत्या. तोरू अल्पवयात मरण पावली. तिला अनेक भाषा येत. फ्रेंच भाषेत ती पारंगत होती. ती जगती तर तिच्या प्रतिभेचा परिमल जगभर जाता. आणि पुढे सरोजिनी आली. ॲनी बेझंटबाईंनी नि टिळकांनी स्वराज्याची चळवळ सुरू केलेली. सरोजिनींनी त्यातही भाग घेतला; परंतु खेड्यापाड्यांत जाऊन जनतेची सेवा करणे, स्वयंसेवक होणे ही गोष्ट नवीन होती. आम जनतेत ही भावना अजून गेली नव्हती. स्त्रियांत तर नव्हतीच; परंतु महात्माजींनी हाक मारली. चंपारण्यातील शेतकऱ्यांचा प्रश्न सोडवायला ते गेले; परंतु महात्माजींचे सारे काम पायाशुद्ध. तेथील जनतेत

त्यांना प्राण ओतायचा होता. त्यांनी स्वयंसेवक भगिनींचीही मागणी केली... ज्या शेतकरी मायबहिणींत जातील. आणि हिंदी स्त्रिया पुढे आल्या.

श्रीमती अवंतिकाबाई गोखले त्या वेळेस बिहारमध्ये गेल्या. कस्तुरबांबरोबर काम करू लागल्या. अवंतिकाबाईंनी गांधीजींचे पहिले चरित्र मराठीत लिहिले व लोकमान्यांनी त्याला प्रस्तावना लिहिली. असा हा आरंभ होता. राष्ट्राच्या जीवनात स्त्रियांनी समरस होण्याचा तो मंगल प्रारंभ होता. महात्माजींनी राष्ट्रव्यापक आंदोलनास सुरुवात केली. सत्याग्रह आला. असहकार आला. पिकेटिंग आले. नेहरूंच्या, देशबंधूंच्या घराण्यांतील स्त्रिया जाडीभरडी खादी नेसून मिरवणुका काढू लागल्या.

लाठीमार होऊ लागला. कलकत्त्याच्या विलायती मालावर निरोधन करायला वासंतीदेवी उभ्या राहिल्या. स्त्रियांचा आत्मा मुक्त झाला. हजारो वर्षांचे ग्रहण जणू सुटले. सतीचे तेज पुन्हा प्रकटले. अब्बास तय्यबर्जींच्या कुटुंबातील मंडळी, अल्ली बंधूंची माता बीअम्मा, अशा मुस्लीम भगिनीही सभांतून, सत्याग्रहांतून झळकू लागल्या.

२० ते ३० साल या काळात ठायी ठायी आश्रम निघाले. आश्रमवासीयांच्या पत्नीही त्यात सामील झाल्या. अनेक भगिनींना सेवेची, साधेपणाची दीक्षा मिळाली. शिक्षणात संस्कृती येऊ लागली. लोकमान्य टिळक म्हणत, "जो दुसऱ्याच्या सुख दुःखाचा विचार करू लागला, तो शिकला." ते खरे शिक्षण स्त्रियांना मिळू लागले. आणि महात्माजींचा मिठाचा सत्याग्रह आला. भारतीय नारीही सरसावल्या. दारूच्या दुकानांवर परदेशी मालावर निरोधन करायला त्या उभ्या राहिल्या. मिठाचा कायदा तोडू लागल्या. जंगलचे कायदे तोडू लागल्या. महर्षी कर्वे जगाची यात्रा करून मुंबईस आले होते. पोलिसांच्या लाठ्यांना न भिता, स्त्रिया 'नहीं रखनी नहीं रखनी,जालीम सरकार नहीं रखनी' गाणे म्हणत बेकायदा मीठ करायला जात होत्या. अण्णा म्हणाले, 'ते दृश्य पाहून माझ्या डोळ्यांचे पारणे फिटले!' स्त्रियांनी शिकावे असे अण्णांना का वाटे? केव्हा त्यांच्या डोळ्यांचे पारणे फिटणार होते? लहान संसार सोडून त्या मोठ्या संसारातही पडतील तेव्हा. स्वतःचा संसार राष्ट्राच्या जीवनाशी, मानवजातीच्या जीवनाशी जोडतील तेव्हा. हिंदुस्थानभर स्त्रियांनी ३० नि ३२ साली अपूर्व तेज प्रकटविले. धारासना येथे उन्हात सरोजिनीदेवी सत्याग्रहात बसल्या होत्या. बोरसद येथे गुडघे रक्तबंबाळ झाले तरी रस्त्यातून स्त्रिया उठल्या नाहीत. मुलींनी लाठीमार

सहन करीत प्रभातफेऱ्या काढल्या. अनेक ठिकाणी मुलींनी झेंडे लावले. खेड्यापाड्यांपर्यंत ही चळवळ गेली. सत्याग्रहींचा सत्कार करण्यात येई. त्यात स्त्रियाही सामील होत. आरत्या ओवाळीत. तिकडे बार्डोलीच्या लढ्याच्या वेळेस सरदार म्हणायचे, 'स्त्रियांनाही सभेला आणा. मग मी बोलेन. तुम्हाला पकडून नेले तर त्यांना लढावे लागेल.' देशभर शेकडो स्त्रिया तुरुंगात गेल्या. कलकत्त्याला स्त्रियांना मोटारीतून घालून पोलिसांनी रानात नेऊन सोडले; परंतु त्या भ्यायल्या नाहीत.

फैजपूर काँग्रेसच्या वेळेस महाराष्ट्रातून शेकडो भगिनी सेवादल सैनिक होऊन आल्या. पुण्याला त्या वेळेस त्यांचा उपहास करण्यात आला. खानदेशातील भगिनींनी गावोगाव काँग्रेस प्रचार केला. पायात न घालता प्रचार केला. गीताबाई झेंडावंदनास दहा मैल पायी जात. कितीतरी भगिनी देशप्रेमाने पेटल्या होत्या. नवऱ्यांना पसंत पडेना. तेव्हा काडीमोडही जातीच्या नियमाप्रमाणे झाल्या; परंतु भगिनींनी आत्मस्वातंत्र्य सांभाळले. पुढे काँग्रेसची मंत्रिमंडळे आली. स्त्रियांचे साक्षरतेचे वर्ग सुरू झाले. खानदेशातील खिरोदे गावी पाऊणशे बायका रात्री शिकायला जमत. दिवसा शेतात काम करीत. अमळनेरला एक ७० वर्षांची वृद्ध माता म्हणाली, "मला शिकायचे आहे." राजेंद्रबाबू महाराष्ट्रात दौऱ्यावर होते. अमळनेर तालुक्यातील नांदेड गावी पुरुषांपेक्षा थोड्या अधिकच स्त्रिया असतील सभेला. शेकडो स्त्रिया. राजेंद्रबाबू म्हणाले, "असे दृश्य शहरांतही मी पाहिले नाही." स्वातंत्र्याची चळवळ सत्याग्रह,आश्रम, अनेक गोष्टींमुळे. खालच्या थरापर्यंत जागृती गेली. हरिजन भगिनींतही त्यांच्या सत्याग्रहामुळे चैतन्य आले. नाशिकच्या राममंदिर सत्याग्रहात हरिजन भगिनी तुरुंगात आल्या! महात्माजींच्या सभेला हजारो भगिनी जमायच्या. सामुदायिक प्रार्थना भगिनी चालवायच्या. स्वातंत्र्याच्या लढ्याने ब्रिटिशांची गुलामगिरी जात होतीच; परंतु घराच्या गुलामगिरीचेही पाश तुटत होते.

आणि ४२ चा 'चले जाव' लढा आला. भारतीय नारींनी बलिदान केले. तो अश्रूंचा नि रक्ताचा इतिहास आहे. चिमूरला कोण विसरेल? चिमूरहूनही भीषण अत्याचार रामनंद जिल्ह्यात झाले. कोण विसरेल त्या गोष्टी? स्त्रिया निर्भय झाल्या होत्या. पोलीस झडतीला आले तर 'बंघ मेल्या घरात आहे का?' म्हणत. शेकडो स्त्रिया तुरुंगात होत्या. लहान मुली मिरवणुका काढीत. मामलेदाराने अडवले तर म्हणत, "चले जाव. तुमची सत्ता संपली." नाशिकला एक गोरा सार्जंट रस्त्यावरून

जाऊ देत नव्हता. एक माळीण आली व 'जा रे टोपड्या' म्हणत निघून गेली. सार्जंट बघतच राहिला. आणि समाजवादी पक्षाच्या त्या सवितादेवी ! ४२ च्या चळवळीत तुरुंगात क्षयी झाल्या. सरकारने सोडले; परंतु देवाघरी गेल्या. श्रद्धानंदांच्या त्या कन्या. त्यांचा त्याग, ज्वलंत वाणी, कोण विसरेल? असा हा देशभराचा इतिहास.

आणि तिकडे नेताजींच्या आझाद हिंद फौजेत मुली दाखल झाल्या. बंदुका घेऊन हिंडू लागल्या. कॅप्टन लक्ष्मीचे नाव कोणाला माहीत नाही? २६ तास बाँब-वर्षाव होत असता त्या जखमी शिपायांची शुश्रुषा करीत राहिल्या.

आज देश स्वतंत्र आहे आणि देवी सरोजिनी संयुक्त प्रांताच्या गव्हर्नर झाल्या. विजयालक्ष्मी वकील म्हणून गेल्या. हंसा मेहता जागतिक हक्कांच्या सनदेसाठी विचारविनीमयार्थ गेल्या. मध्य-प्रांतातील श्री. अनसूयाबाई काळे यांनी चिमूरबाबतीत केवढे कार्य केले ! सुचेता कृपलानी नौखालीच्या आगीत गेल्या नि भगिनींना सोडवित्या झाल्या. मद्रासकडच्या सुब्बालक्ष्मी कोणाला माहीत नाहीत? कमलाबाई चट्टोपाध्याय तर जगप्रसिद्ध ! कोठवर नावे लिहायची ? आणि घटना समितीत चमकणाऱ्या चिरसेवक श्रीमती दुर्गाताई जोशी! राजकीयदृष्ट्याच स्त्रिया पुढे येऊ लागल्या असे नाही, तर सामाजिक सेवेतही पुढे येऊ लागल्या.

+++

विश्वदर्शन

प्रस्तावना

पूज्य साने गुरुजींनी लहान मुलांसाठी बरेच लिहिले, कारण मुले आणि फुले या दोन्हींतही त्यांना मानसिक आनंद देणारे आंतरिक सौंदर्य दिसत होते. अशा प्रकारच्या बालसाहित्याचाच एक प्रकार म्हणजे ही छोटीशी विज्ञानविषयक पुस्तिका 'गोड गोष्ट' आणि 'सुंदर पत्रे' यांच्या मालिकेत बसणारी.

गुरुजींच्या पुस्तिकेला प्रस्तावना लिहिताना मनात संकोचाची भावना आहे आणि म्हणून हात आखडतच ही प्रस्तावना रेखाटली आहे. साने गुरुजींसारख्या महान व्यक्तीच्या पुस्तिकेला प्रस्तावना लिहिण्यासाठी अधिक समर्थ हात हवेत. त्या मानाने माझे हात अगदीच तोकडे. पण मोत्याच्या दाण्यांचे सौंदर्य असलेले शाईने लिहिलेले लिखाण खडबडीत टिपकागदाने टिपावे त्याचप्रमाणे गुरुजींचे हे बालकांसाठी लिहिलेले लिखाण टिपून घेऊन त्यावर मी ही छोटीशी प्रस्तावना लिहिली आहे.

या पुस्तिकेत गुरुजींनी हिमवर्षावाची पर्वा न करता गिर्यारोहण करणाऱ्यांची कहाणी सांगितली आहे. त्याचप्रमाणे सागराच्या लाटा तोडीत खोल बुडी घेणाऱ्या पाणबुड्यांच्या झुंजार प्रयत्नांची कथाही कथन केली आहे.

पृथ्वीप्रमाणे चंद्र, मंगळ आदी ग्रहांवर जीवसृष्टी आहे का याचीही त्यांनी चर्चा केली आहे. चंद्रावरील गुरुत्वाकर्षण पृथ्वीच्या मानाने फारच कमी असल्याने तेथील प्राणी (जर तेथे प्राणी असेलच तर) पृथ्वीवर आल्यास आपल्या वाढत्या वजनानेच खचून जातील असेच जणू गुरुजींनी सुचविले आहे.

सुप्रसिद्ध शास्त्रज्ञ जगदीशचंद्राचा हवाला देताना गुरुजी वाचकांना सांगतात की, मानवी मनात भावनांचा उगम होतो, तसाच वनस्पतींमध्ये असावा हे मानावे तरी हे तर्कशास्त्र फार पुढे रेटीत जाऊन जड वस्तूंना देखील भावना आहेत असा अवास्तव

निष्कर्ष काढणे योग्य ठरणार नाही. तारेला स्पर्श केला की झंकार उमटतात आणि उफाळून येणाऱ्या लाटांत आनंदाच्या लहरी आहेत असे क्षणभर वाटते; पण म्हणून काही या जड वस्तुत भावना आहेत असे आपण मानीत नाही असा दावा गुरुजींनी या पुस्तिकेत केला आहे. ही सर्व विज्ञानाचीच किमया.

निरनिराळ्या कालखंडात प्राणी आणि वनस्पती यांचे वर्गीकरण विविध शास्त्रज्ञांनी कसे केले याचा त्रोटक आणि धावता आढावा गुरुजींनी या पुस्तिकेत घेतला आहे.

रूढी आणि परंपरा यांच्या ओझ्याखाली दबलेल्या जुनाट समाजाने एकेकाळी विज्ञानाच्या उपासनेचे रस्ते रोखून धरले. प्राण्यांचे शरीरशास्त्र समजून घ्यावयाचे असेल तर त्यांच्या शरीराची चिरफाड केल्याशिवाय हे कसे जमणार ? हा प्रश्न विचारून गुरुजींनी परखडपणे या पुस्तिकेत लिहिले आहे की ही चिरफाड होऊ न देण्यात भूतदयेची भावना नव्हती. तसे असते तर माणसांना मेणबत्तीप्रमाणे समाजाने जाळले असते का ? हा रोखठोक सवाल गुरुजींनी केला आहे.

ग्रीक कालखंडात ज्ञानाची उपासना झाली आणि नंतर पुन्हा एकदा अंधेरी रात्र पसरली आणि लपत छपतच शास्त्रज्ञांना विज्ञानाची आराधना करावी लागली. एक हाडाचा शिक्षक या नात्याने साने गुरुजींनी आपल्या पुस्तिकेत म्हटले आहे की, "शिक्षणशास्त्राचे सर्वांत मोठे काम प्रत्यक्ष वस्तुस्थिती पाहावयास शिकविणे हे आहे."

गुरुजींनी आपल्या पुस्तिकेत फक्त गिर्यारोहण करणाऱ्या झुंजार व्यक्तींचा उल्लेख केला आहे. पण चंद्रावर जीवसृष्टी आहे की नाही हा प्रश्न विचारणारे गुरुजी आज हयात असते तर चंद्रावर अवतरलेल्या अंतराळवीरांचे अपूर्व यश पाहून गुरुजी आनंदाने बेहोष झाले असते. 'सारे विश्वचि माझे घर' असे मानणाऱ्या गुरुजींना चांद्रवीरांचा विजय पाहून अभिमान वाटला असता.

अंतराळवीरांचा हा देदीप्यमान विजय हा विज्ञानाचाच विजय. विज्ञानाची प्रज्ञा राष्ट्राराष्ट्रांच्या कुंपणाआड बंदिस्त होऊ शकत नाही. जे अंतराळवीर पृथ्वीवर यशस्वी उड्डाण करून चंद्राच्या शोधात अंतराळात शिरले, त्यांचे पाय आपल्या भूमीवरून निसटले. त्यांच्या विशाल दृष्टीच्या झेपेत सारी पृथ्वी आली. सारे खंड अखंड झाले आणि विज्ञानाच्या रेशमी धाग्याने चंद्राचे नाते पृथ्वीशी जोडले गेले. सत्याची उपासना

करणारे विज्ञान, शिवाची आराधना करणारी पृथ्वी आणि सौंदर्याचे प्रतीक बनलेला चंद्रमा यांचा हा समन्वय म्हणजे सत्यम्-शिवम्-सुंदरम् याचाच मिलाफ. हा अपूर्व मिलाफ पाहण्यासाठी आज श्रद्धेय साने गुरुजी आपणात नाहीत हीच खंत गुरुजींच्या या छोट्याशा पुस्तिकेला प्रस्तावना लिहिताना मनात आहे

नवी दिल्ली,
१५ ऑक्टोबर १९८०

– मधू दंडवते

विश्व हे अनंत

मुलांनो, हे विश्व अनंत आहे. सूर्याभोवती आपली ग्रहमाला फिरत आहे; परंतु असे सूर्यही अनंत आहेत. या विश्वात फक्त पृथ्वीवरच जीव आहे. दुसऱ्या एखाद्या ग्रहावर जीव असल्याचा अजून तरी पुरावा नाही.

हवेशिवाय जीव असू शकत नाही. जीव कितीही सूक्ष्म असो जगण्यासाठी त्याला हवा हवी. पृथ्वीच्या खाली किंवा पृथ्वीच्या वर जीव कोठवर जिवंत असू शकतो ? पाण्याखाली किती अंतरापर्यंत तो जाऊ शकतो ? अनेक प्रयोग या बाबतीत झाले आहेत.

अति उंच

वरती आकाशात किती उंचीपर्यंत मनुष्य जाऊ शकतो ? हिमालयाच्या सर्वोच्च शिखरावर १९२४ मध्ये मॅलरी आणि आयर्विन-ने यांनी चढण्याचा प्रयत्न केला. २६,८०० फुटांवर त्यांचा तंबू होता. तेथून ६ जून १९२४ ला ते आणखी वर जायला निघाले, परंतु पुन्हा दिसले नाहीत. बर्फाच्या वादळात त्यांचे प्राण गेले असावेत. त्यांच्या अगोदर डॉ. सोमरव्हिल व ले. कर्नल नॉर्टन २८,२०० फुटांपर्यंत गेले होते. सोमरव्हिल यांचा घसा कोरडा पडला. अत्यंत कोरडी गार हवा. नॉर्टन हे झगझगीत बर्फामुळे आंधळे झाले. कॉक्सवेल व ग्लेशर हे १८६२ मध्ये बलूनमधून जवळजवळ ३० हजार फूट उंच गेले. २९ हजार फूट चढेपर्यंत जिवंत होते. नंतर ग्लेशर बेशुद्ध

पडला. डॉ. वर्सन व सुरिंग हे बर्लिनमध्ये बलूनमधून १९०१ च्या जुलै महिन्यात ३४,५०० फूट उंच गेले. दोघे बेशुद्ध पडले. १९२७ च्या नोव्हेंबर महिन्यात अमेरिकेच्या हवाई खात्यातील कॅप्टन ग्रे ४२,४७० फूट उंच गेले. त्यांचा प्राण गेला. कारण उतरत असताना ऑक्सिजन संपला. इतक्या उंचीवर माणसाशिवाय कोणी अजून गेला नाही. प्रख्यात शास्त्रज्ञ हंबोल्ट सांगतो की अँडीज पर्वताच्या २३ हजार फूट शिखरावर कौन्डौर पक्षी आढळतात.

बेचाळीस हजार फूट मानव गेला म्हणजे आठ मैलांहून थोडे अधिक. मोटार तासात जाते त्याच्या दशांश फक्त; परंतु इतके उंच जायला किती यातायात असते ! मुख्य म्हणजे श्वासोच्छ्वासाची अडचण पडते. खूप थंडी असते. शरीरावरचा हवेचा दाब कमी होतो. आपण फुगत आहोत, सुजत आहोत, असे वाटते. कानांत त्रासदायक आवाज होऊ लागतो. कानांतून, नाकातून, फुफ्फुसांतून, एवढेच नव्हे तर डोळ्यांतून व हिरड्यांतून रक्त येऊ लागते. पर्वत चढणाऱ्याला चालावे लागते, बलूनमधून जाणारा बसून जातो. पर्वत चढणाऱ्याला ८-१० मोठे श्वास घेऊन एक पाऊल टाकता येते. कर्नल नॉर्टन हिमालयावर चढताना शेवटी एका तासात फक्त ८० फूट चढू शकला.

१८७५ ला पॅरिसमध्ये सिव्हेल, टिसँडिअर व फोसे हे बलूनमधून २७,९५० फूट उंच गेले. टिसँडिअर फक्त जिवंत राहिला. तो खाली आल्यावर म्हणाला, 'तेथे दुःख नव्हते, आंतरिक आनंद होता.' अति उंच गेल्यावर जणू मनुष्य बेफाम होतो. ऑक्सिजन जवळ असूनही घ्यायची शुद्ध राहात नाही. जणू समाधी लागते; शून्याखाली ३० अंश पारा जातो. शरीरात उष्णता ठेवणे कठीण जाते. बलूनमधून जाणारा गरम कपडे, कागदाचे कपडे वगैरे घेतो; परंतु पर्वत चढणारा ओझे बरोबर घेऊ शकत नाही.

अति खोल

वर जावे तर थंडी, पृथ्वीच्या पोटात जावे तर उष्णता वाढत जाते. समुद्रातही आपणास परिचित असे काही जीव काही फुटांपर्यंतच असतात. त्याच्या खाली अपरिचित व त्या त्या स्थितीत राहू शकणारेच जीव असतात. पाणबुड्या हा सर्व सोईनिशी ३०० फूटच पाण्यात जाऊ शकतो. तेथे २० मिनिटे राहू शकतो व हळूहळू

मुक्काम करीत दीड तासाने वर येतो. सामान्य मनुष्य फक्त ३० फुटांपर्यंत खाली राहू शकतो व २ मिनिटे थांबू शकतो.

वातावरणाच्या दाबाचा आपल्या शरीरातील रक्तामधील वायूवर परिणाम होतो. म्हणून उंच वा खोल जाताना अनेकविध त्रास होतात. पाण्यात बुडणाऱ्यांचे कान कधी बहिरे होतात, वांत्या होतात, श्वासोच्छ्वास करणे जड जाते, सांधे दुखतात, अकस्मात भरतातही. सेंट लुई येथे पूल बांधला जात होता. पाण्यात बुडून काम चालले होते. सहाशेपैकी शंभर जणांना गंभीर आजार झाला व चौदा मेले.

जीवनाचा विविध दाबांशी संबंध आहे. फ़ार खोल पाण्यात राहणारे फार वर येऊ शकत नाहीत. कारण खोल पाण्याला उपयुक्त अशीच त्यांची शरीररचना असते. देवमासाही नेहमी फार खोल जात नाही. तरीही तो आश्चर्य वाटेल इतका जाऊ शकतो. परंतु दाबामुळे त्याच्या रक्तात बुडबुडे उत्पन्न होणे तो वर येऊ लागताच थांबते. ग्रीनलँडकडील देवमासे जवळजवळ एक मैल खोल जाऊ शकतात. खोल पाण्यात राहणाऱ्या माशांच्या अंगाला पोहण्याचे फुगे असतात. या फुग्यात प्रचंड दाबाखाली राहायला योग्य अशी हवा असते; परंतु भक्ष्यासाठी खोल असलेला मासा जर वर आला तर फुग्यातील हवा प्रसरण पावते. मासा फार खाली जाऊ शकत नाही, तो गेलाच व नंतर वरवर येऊ लागतो तेव्हा फुगा फुटतो व तो मासा मरतो.

सागराची जास्तीत जास्त खोली ७ मैल आहे. म्हणजे खाली ७ मैल व वरती ७ मैल अशी १४ मैलांची पाण्याची खालची व वरची कमाल मर्यादा; परंतु कोणताही प्राणी खाली वा वर ७ मैल जाऊ शकत नाही. मनुष्य वर ४ मैल गेला परंतु पाण्याखाली ३०० फूटच जाऊ शकतो. देवमासा पाण्याखाली १ मैल जाईल परंतु हवेत मुळीच जाऊ शकत नाही.

+++

सजीव सृष्टी

पृथ्वीशिवाय अन्यत्र कोठे जीव आहे का ? जीवनाला लागणारी परिस्थिती दुसऱ्या कोणत्या ग्रहावर आहे का ? मंगळावर पृथ्वीहून अधिक उष्ण व अधिक ओलसर हवा असेल असे म्हणतात; परंतु हा तर्कच आहे. मंगळावरचे वातावरण इतके अभ्राच्छादित असते की तेथे वृक्षवनस्पती आहेत की नाहीत ? तेथे जीव आहे की नाही, हे नीट समजत नाही. चंद्राच्या पृष्ठभागावरही काही अंधुक छटा दिसतात. चंद्रावर प्रकाश पडून जेव्हा तेथे मोठा दिवस असेल त्या वेळेस कदाचित थोडा वेळ वाढलेल्या झाडाझुडुपांसारख्या सजीव वस्तूंच्या त्या खुणा असतील. मंगळावर कालवे असावेत अशा खुणा दिसतात. एरव्ही इंजिनिअरांनी केलेल्या कालव्याच्याच त्या असाव्यात असे कोणी तर्क करतात. मंगळाच्या रंगातही फरक दिसतात. मधून मधून शेते-भाते पिकल्याची काही खूण ? का मंगळावरचा तो शरद ऋतू अन् हंगामाचा वेळ ? मंगळावर बर्फाच्छादित शिखरे असावीत, उन्हाळ्यात बर्फ वितळू लागते व ती शिखरे लहान होतात. या पाण्याचेच कालवे असावेत.

सूर्यमालेतील पृथ्वीहून अन्य ग्रहांवर जर खरेच सजीव सृष्टी असेल तर तिची रचना आपल्या पृथ्वीवरील सजीव सृष्टीपेक्षा अगदी निराळी असेल. तेथील सजीव सृष्टी पृथ्वीवर आणली तर मरेल आणि पृथ्वीवरचीही तेथे नेऊ तर बहुधा जगणार नाही. चंद्र, मंगळ यांचा वस्तुसंचय पृथ्वीपेक्षा बराच कमी असल्यामुळे दोघांच्या पृष्ठभागावरील गुरुत्वाकर्षण कमी असणार. हवेचा, वातावरणाचा दाबही कमी

असणार. निर्वात चंद्रावर तर हवेचा दाब अधिक असेल म्हणून तेथील सजीव शरीराचे, त्याच्या अवयवाचे, प्रवाही द्रव्यांचे वजन खूपच कमी असेल, पृष्ठभागावरील दाब कमी असेल. पृथ्वीवरील प्राणी जर मंगळावर, चंद्रावर जातील तर पुरेशी हवा श्वासोच्छ्वासाला मिळणार नाही. शरीरातील द्रवांमधील वायू अधिक वितळतील, खदखदू लागतील, प्रसरण पावतील, फुटून बाहेर येतील, सांधे धरतील, हृदय सर्व फटींतून, कान, नाक, डोळे, फुफ्फुसे, घसा यांतून रक्त घुसवील. सारे रक्ताने भरून जाईल. याउलट मंगळावर राहायला योग्य असा मनुष्य जर खाली आला तर पृथ्वीवरील स्वत:च्या वजनानेच चिरडला जाईल. मंगळावरील जीवन पृथ्वीवरील जीवनाहून इतके निराळे असेल की त्याला निराळाच शब्द वापरावा लागेल. पृथ्वीवरील जीवनाला 'अ' म्हटले तर तेथील जीवनाला 'ब' म्हणावे लागेल. वस्तू सजीव परंतु अगदी निराळी. तेथील सजीव वस्तूला व्यक्तित्त्व नसेल, तेथील सृष्टीत संतत्युत्पादक व्यक्ती नसतील. तेथील सजीव सृष्टी द्रवरूप असेल. प्राणवायू वगैरेची क्रिया करणारी (मेटॅबॉलिक) असेल. खरे म्हणजे पृथ्वीवरच्या व मंगळादी ग्रहांवरच्या
एकाच अर्थाने संबोधणे म्हणजे अर्थाची फारच ओढाताण करणे होय.

सजीव सृष्टीची मर्यादा

आणि एकदा का पृथ्वीवरील जीवनासारखे नसले व कोणत्यातरी स्वरूपातले जीवन मंगळावर आहे असे मानले तर इतरही लाखो ठिकाणी कोणत्यातरी स्वरूपाचे कल्पायला काय हरकत ? कारण जीवन म्हणजे काय ? गुंतागुंतीची रासायनिक मिश्रणेच ना ? कार्बन, नायट्रोजन. हायड्रोजन, ऑक्सिजन वगैरेंची विविध मिश्रणे. परंतु ही मिश्रणे एवढीच नाहीत. हजारो प्रकारची दुसरी असतील. आपल्या या जीवनापलीकडे एकदा मनोबुद्धी दौडू लागली म्हणजे लाखो प्रकारची रासायनिक मिश्रणे कल्पिता येतील. कार्बनचे कार्य मोठे सिलिकॉन करील, ऑक्सिजनचे सल्फर करील. निरनिराळ्या उष्णतामानात, निरनिराळ्या दाबाखाली अशा अनेक गोष्टी कल्पिता येतील. तेथे पृथ्वीहून भिन्न अशी हालचाल असू शकेल. काही एक प्रकारची जाणीव असेल. कदाचित व्यक्तित्त्व व संतत्युत्पादन धर्मही असेल. आपण कल्पनेचा खेळ कसा करू शकू ! 'अ' जीवन, 'ब' जीवन, 'क' जीवन वगैरे अनेक प्रकार वर्ण संपेपर्यंत कल्पू शकू. प्रत्येक भौतिक घडामोडीच्या वर व खाली अधिक जाणिवेचे,

काही जाणिवेचे अनेक प्रकार कल्पू शकू. परंतु 'जीवन' शब्दाची ही फारच ओढाताण. सजीव प्राण्याची आपली कल्पना वास्तविक अगदी मर्यादित असते.

रॉयल सोसायटीचे गाढे पंडित जे. एच्. जोन्स म्हणाले, 'ज्या परिस्थितीत सजीव सृष्टी शक्य आहे, अशी परिस्थिती या अनंत विश्वात अत्यंत अल्प आहे. जीवनाचा विचार म्हटला म्हणजे काळाचीही कल्पना येते. जेथे एका सेकंदात परमाणू कोट्यवधी वेळा बदलत असतात आणि दोन परमाणू कधी एकत्र येऊ शकत नसतात, तेथे जीवन कसे शक्य असेल? जीवन म्हणजे काहीतरी गतिमानता. ही गतिमानता कोणत्यातरी अवकाशातच असणार म्हणजे प्रवाही स्थिती तरी हवी. परंतु या अनंत विश्वात प्रवाही स्वरूप फारच थोड्या ठिकाणी आहे. ते मूळ प्रकृतितत्व कोट्यवधी पराधीवधी वर्षे उष्णता फेकीत थंड थंड होत जाईल व एक चिमूटभर निर्जीव अचेतन राख उत्पन्न होईल, जिच्यात जीवन शक्य होईल. ही राखही फार उष्ण किंवा फार थंड नाही असता कामा नाहीतर जीवन शक्य होणार नाही. जरा उच्च दर्जाचे विकसित असे जीवन सूर्यामुळे उबदार झालेल्या ग्रहांवाचून अन्यत्र कल्पिणे अशक्य आहे. एखादा दुसरा तारा लाखो वर्षे जगला असला तरी सूर्याभोवती ग्रह आहेत तसे त्या ताऱ्याभोवती असतीलच याचा काय नेम ? म्हणून काळ, अवकाश व भौतिक परिस्थिती यांचा विचार करता विश्वाच्या कल्पनातीत लहानशा कोपऱ्यातच सजीव सृष्टी मर्यादित आहे असे म्हणणे भाग आहे.'

या मर्यादित जीवनाची अंतिम मर्यादा आज नाही सांगता येणार. जीवन केव्हातरी सुरू झाले; परंतु ते कधी काळी संपेलच असे निश्चितपणे म्हणता येणार नाही !

+++

भावनाविश्व

आपण प्राण असलेली सृष्टी कुठे कुठे असेल ते पाहात होतो. जीवन शक्य व्हायला कोणती परिस्थिती हवी ते समजून घेत होतो; परंतु जीवनाचा एक खास विशेष सांगायचा राहिलाच. तो आपणास आपल्या व्यक्तिगत जीवनातच समजतो. सभोवतालच्या जीवनातही तो आपण तर्काने जाणतो. तो विशेष सर्व जीवनात एवढेच नव्हे तर जीवनाच्या ज्या मर्यादा आपण निर्धारलेल्या त्याच्याही पलीकडे असेल असे वाटते. हा जो विशेष त्याला आपण 'भावना' म्हणू. बाह्य गोष्टीची प्रतिक्रिया होते, एवढेच नव्हे तर आपणास काहीतरी वाटते. आपणास जाणीव असते आणि सजीव प्राण्यांपैकी बहुतेकांना ही जाणीव असावी असे दिसते. कालव पाहिले आहे तुम्ही ? काठीचा आवाज ऐकताच ते कवचात घुसते. लांब शेपटीचा मासा पायांनी व चिमट्यांनी अन्न शोधतो. या प्राण्यांना ही जाणीव असावी. आपण प्रतिकूल गोष्टींपासून परावृत्त होतो, अनुकूल गोष्टींनी सुखावतो तसेच याचे नाही का ? परंतु आपण आपल्याच भावना जाणू शकतो. दुसऱ्यांच्या भावना आपण सदृश हालचालीवरून अनुमानतो. सूक्ष्मदर्शकातून दिसणारे जंतूही संकोचतात, त्यांना भूक असते, असे दिसून आले आहे आणि आपले जगदीशचंद्र यांनी आश्चर्यकारक हळुवार यंत्रांनी वनस्पतींना आनंद होतो, दुःख होते, हे दाखवून दिले. झाडे थरारतात,

वळवळतात. यावरून त्यांनाही भावना असाव्यात; परंतु तुम्ही म्हणाल तारेच्या स्प्रिंगला स्पर्श करताच तीही थरारते आणि नाचणाऱ्या लाटांत का आनंद नसेल, उगवत्या सूर्योदयात का ताजेपणा नसेल ?

परंतु भावना म्हटली की तद्नुरूप बाह्य फरक होतो. बाह्य फरकाच्या दर्शनाशिवाय भावना कळत नाही. उलट असेही म्हणता येईल की भावनेशिवाय बाह्य फरक नाही. परंतु एक गोष्ट निश्चित की, आपण कालवाला किंवा सूक्ष्म जंतूला भावना आहे असे का म्हणतो, तर आपल्यासारखीच त्यांची थोडी वागणूक दिसते म्हणून. निर्जीव भौतिक वस्तूला भावना असेल असे आपण म्हणतो ते तर्काने म्हणतो, सह अनुभूतीने नव्हे. हायड्रोक्लोरिक ॲसिडमध्ये जस्त विरघळते तेव्हा त्या जस्ताला अनुभवगम्य भावना असेल असे नाही म्हणता येणार. भावनेचा नेहमीचा अर्थ फारच ताणला असे होईल; परंतु ही गोष्ट जेव्हा आपण सजीव प्राण्यांच्या रचनेचा विचार करू, ज्ञानेंद्रिये, मेंदू, ज्ञानतंतूंचा विचार करू तेव्हा अधिक स्पष्ट होईल. हे सर्व अभ्यासून मग भावनेचा प्रश्न होती घेऊ. आधी बाह्य स्वरूप समजून घेऊन मग त्या गूढ अशा अंत:सृष्टीत जेथे भावना आहेत, विचार आहेत, तेथे जाऊ.

सजीव आकारांचा प्रथम परिचय

प्राणिशास्त्रात पारंगत नसलेला सामान्य मनुष्य या बाह्य जीवनाकडे कशा रीतीने बघतो ? सजीव सृष्टीचे प्राणी आणि वृक्षवनस्पती असे दोन भाग तो प्रथम करील. तो म्हणेल झाडे पुष्कळशी हिरवी असतात, एकाच ठिकाणी दृढमूल असतात. झाडांचे खाद्यही निर्जीव असते. भूमीतून व वातावरणातून ती खाद्य मिळवतात. परंतु स्पंज वगैरेंना झाडे म्हणायचे की प्राणी ? आणि ते अळंबे, कुत्र्याचे मूत्र ? त्याचा रंग हिरवा कुठे असतो? हे अपवाद समजू; परंतु अधिकाधिक विचार करता प्राणी आणि वनस्पती यांच्यातील फरक दाखविणे सोपे नाही असे दिसले. सभोवतालची परिचित सृष्टी पाहून पटकन भेद सांगता

येतो; परंतु दूर चला जरा समुद्रकिनाऱ्यावर, घनदाट जंगलात, गुहांत, दगड-धोंड्यांच्या कपारीत, अंधारमय छायांत जाऊन पाहू लागलो तर आपणास आपल्या समजुतीत बराच बदल करावा लागेल.

आणि प्राणी तरी किती प्रकारचे ? प्रश्न केला तर पशू, पक्षी, मासे ठराविक उत्तर मिळेल. माणसे प्राण्यातच धरायची का? आणि पशू, पक्षी, मासे यांत सारे प्राणी आले का ? प्राण्यांचे आणखी प्रकार सांगावे लागतील. जंतू, कीटक, किडे, सरपटणारे प्राणी आणि कोळी, तसेच उवा, लिखा नाना प्रकार, आणि नुसते मासे म्हणून प्रश्न नाही सुटणार. कालवे; लांब शेपटीचे मासे, उडते मासे, तेजाळ मासे ? तसेच बेडूक, मगरी-सुसरी यांना कशात घालणार ? यांना पशू म्हणाल तर त्यांच्यावर लव नाही, पक्षी म्हणाल तर पिसे नाहीत, शिवाय त्यांचे रक्त थंड. उष्णता नाही त्यांच्या रक्तात. सामान्य माणसाला सामान्यत: पशू, पक्षी व मासे एवढीच मुख्य सृष्टी वाटते. परंतु या पृथ्वीवर एखादे फूल, एखादे पान, एखादा पक्षी, एखादा प्राणी दिसू लागण्यापूर्वी ही लक्षावधी वर्षे - पृथ्वीवर विविध प्रकारची सजीव, सक्रिय सृष्टी होती असे सांगितले तर आश्चर्य वाटेल. पशू, पक्षी, मासे ही महत्त्वाची परिचित सृष्टी झाली आहे. आपण आपल्या कथा, दंतकथा, परीच्या गोष्टी, आपल्या कल्पना, नाना समज, भयभीती, हे सारे पशू, पक्षी, मासे यांच्या भोवती गुंफले आहे. त्याच्या शिवायची सजीव सृष्टी कल्पिणे कठीण आहे. या तीन प्रकारांच्या मागे जाऊन आपण आपल्या मूळच्या माहेरी जाऊया.

प्राण्यांचे वर्गीकरण

पृथ्वीवरचा प्राण्यांचे वर्गीकरण करणारा पहिला बुद्धिमान शास्त्रज्ञ म्हणजे ग्रीस देशातील ॲरिस्टॉटल. त्याने केलेले वर्गीकरण पुरे नाही; परंतु त्याने लाल रक्ताचे व लाल रक्त नसलेले असे दोन भाग पाडून पहिल्यात पिलांना एकदम जन्म देणारे सस्तन प्राणी, पक्षी तसेच साप वगैरे अंडी घालणारे प्राणी आणि

मासे घातले. लाल रक्त नसलेल्या प्राण्यांत त्याने आधी मृदू अंगाचे प्राणी घातले. नंतर साधे सांधे असलेले प्राणी, तसेच कोळी, विंचू आणि कठीण संरक्षक कवचे असलेल्या गोगलगायी, कालव वगैरे प्रकार. स्पंज वगैरे वनस्पती प्राण्यांचाही त्याने उल्लेख केला आहे.

ॲरिस्टॉटलच्या या वर्गीकरणानंतर आता नवे केलेले वर्गीकरण पुढे देऊ, परंतु प्राण्यांचा, सजीव सृष्टीचा जसजसा विचार करू तसतसे आढळून येईल की परिचित प्राणिसृष्टीत फारसा बदल नाही; परंतु अपरिचित आकारच नवे नवे प्रतित झाले आहेत. सृष्टिशास्त्राचा अभ्यास करणाऱ्याला 'चमत्कारिक', 'गूढ', 'ज्यांचे वर्गीकरण करणे अशक्य' अशा सदराखाली अनेक प्रकार घालावे लागतात. पक्ष्यांचे नाना प्रकार, माशांचे प्रकार असे सांगता सांगता पुढे असे प्रकार आढळू लागले की मती गुंग होई. वनस्पती शास्त्रज्ञाचीही हीच गत. फुलांच्या झाडांचे त्याने मोठे सुंदर वर्गीकरण केले परंतु अपरिचित अशा क्षुद्र शेकडो वनस्पतींचे वर्गीकरण कसे करणार ? आणि अकिंचित काळातील उद्‌बोधक असे मनोरंजक कार्य याच वनस्पतींच्या नि फुलांच्या सृष्टीत झालेले आहे.

बागेतील रस्त्यावरच्या लहानशा हिरवट घाणीपासून तो उमद्या सालोमान माशापर्यंत, वृक्षापासून वाघापर्यंत, बोटाच्या जखमेतील लाखो जंतूंपासून तो राणीच्या बागेतील हत्तीपर्यंत, आतडच्यातील किन्यापासून तो सुंदर गुलाबकळीपर्यंत, दगडावरील शेवाळापासून तो देवमाशापर्यंत, अनंत रूपांनी जीवनाचे नाटक चालले आहे. लाखो स्थित्यंतरे, लाखो फरक, निर्जीव सृष्टीतूनच केव्हातरी सजीव सृष्टी उत्क्रांत झाली जी स्वतःमधून उत्पादन करू लागली आणि निर्जीव सृष्टीपासून सजीव सृष्टी संपूर्णपणे अलग दिसू लागली. हे जीवन बाह्य-सृष्टीत अनंत रूपांनी क्रांत-उत्क्रांत होत आहे, तद्वतच अतः सृष्टीत सुप्त व असुप्त जाणीवेत अनंत रूपांनी क्रांत उत्क्रांत होत आले आहे. वृक्षवनस्पतींत, शांत माशांत जाणीव सुप्त असेल तर उन्हात चमकणाऱ्या सर्पांत, बागडणाऱ्या वत्सांत, गाणाऱ्या पक्ष्यांत, पारध्याच्या मनांत, ज्यांची शिकार

होणार त्यांच्या मनांत कसे भावनांचे कल्लोळ उसळत असतील? भीती, आनंद या भावना कशा असतील आणि या सर्वांचा विचार करणारी बुद्धी तीही जीवनाचाच एक भाग. आजचे प्राणिशास्त्र सारे समजून घ्यायचे म्हणजे या साऱ्या प्रकारांकडे लक्ष दिल्यावाचून गत्यंतर नाही, खरे ना ?

+++

जीवशास्त्राची वाटचाल

प्राणिशास्त्र किंवा जीवशास्त्र हे शास्त्रीय होण्याआधी व्यावहारिक होते. इतिहासपूर्व काळात कधीचाच मनुष्य हा एकटाच जीवशास्त्रज्ञ झाला. त्याला तसे होणे भागच होते. कोणते पाले खायचे, कोणते खायचे नाहीत, हे तो ठरवू लागला. ज्याची तो शिकार करी व जे त्याची शिकार करीत अशा प्राण्यांसंबंधी तो ज्ञान मिळवू लागला. वीस हजार वर्षांपूर्वी अशा युगात (स्टोन एज़) तो पशू-पक्ष्यांची रीतसर चित्रे काढू लागला होता.

आणखी काही वर्षे गेली. माणसाने बरेच प्रायोगिक ज्ञान मिळविले. माणसाळवणे शक्य अशा सर्व द्रव्यांना त्याने माणसाळविले, त्याची अवलाद हेतुपुरस्सर तो सुधारू लागला. दंतकथा पाहिल्या तर अपूर्व असे संकर प्राणी त्याने निर्माण केले असे वाटते. माणसाळवलेल्या प्राण्यात शक्य ते सारे संकर त्याने केले असावेत. अर्वाचीन शास्त्र ग्रीक लोकसत्तांकांच्या प्रभावी काळात जन्मले. रोमन साम्राज्याच्या कृष्णछाया भूमध्य समुद्रासभोवतालच्या जगावर पडल्या नि ही वैज्ञानिक जिज्ञासा हळूहळू लोपली. अलेक्झांडरच्या पुरस्कारामुळे ॲरिस्टॉटलचे हस्तक अनेक ठिकाणी माहिती गोळा करायला फिरत. एक पदार्थसंग्रहालय स्थापण्यात आले व ते ज्ञानदेवतांना अर्पिण्यात आले होते. आरंभी आरंभी सर्व चमत्कारिक वस्तुसंग्रह मंदिरांतून असत. तो कार्येजीनीयनवार हॅन्वो याने अफ्रिकेच्या किनाऱ्याकिनाऱ्याने पर्यटन केले होते. मारलेल्या गोगीलांची

कातडी एका मंदिरात त्याने टांगून ठेवली होती. सारी हकिकतही त्याचबरोबर तेथे लिहून ठेवली होती.

ग्रीकांच्या वैभवकाळात जीवनशास्त्रात काही प्रगती झाली, अलेक्झांड्रिया येथे शवविच्छेदन वगैरे केल्याचा उल्लेख आहेत. काही सजीव प्राण्यांचेही अवयव पृथक्करण केल्याचे उल्लेख आहेत. आपल्याचसारखे हे जे हजारो लहानमोठे प्राणी त्यांच्याबद्दल जिज्ञासा उत्पन्न झाली होती. अलेक्झांड्रिया येथे जिवंत माणसावर शस्त्रक्रिया केली जाई की काय ते नक्की कळत नाही. ग्रीक उत्कर्षानंतर इकडे हिंदुस्थान वगैरे भागात वनस्पती संशोधनाची प्रचंड लाट आली. निरनिराळ्या ठिकाणच्या वनस्पती आणणे, कोणत्या हवेत कोणत्या वाढतात ते पाहणे असे प्रयोग झाले. त्यांचे गुणधर्मही तपासले जाऊ लागले. ख्रिस्त शतकापूर्वीची चारशे वर्षे जगातील बौद्धिक चळवळीच्या इतिहासात महत्त्वाची आहेत. या काळात प्राणिशास्त्रापेक्षा गणितशास्त्र व ज्योतिषशास्त्र यांची अधिक प्रगती झाली. शवविच्छेदन किंवा शस्त्रक्रिया यांची चित्रे उपलब्ध नाहीत. नीट पद्धतशीर माहिती नाही. सूक्ष्मदर्शक यंत्राचा उल्लेखही नाही. वस्तू मोठ्या दिसाव्यात म्हणून पाणकुप्या वापरीत. इजिप्तमधील प्राचीन जवाहिऱ्यांना ही गोष्ट माहिती असावी; परंतु धंदेवाले व ज्ञानोपासक यांच्यात ज्ञानाची देवघेव नव्हती; म्हणून जवाहिऱ्यांना जे धंदेविषयक ज्ञान होते ते शास्त्रज्ञांना नव्हते.

पुढे ख्रिश्चन धर्म आला व धर्मातील कला व ज्ञान यांचीच वाढ खुंटली. ग्रीकांची मनोबुद्धी स्वतंत्र होती. ख्रिस्तपूर्व ५ व्या शतकात अलेक्झांड्रिया व अथेन्स येथे प्रयोग होत होते; परंतु पुढे रोमन साम्राज्यात हे सारे वातावरण बंद झाले. ज्ञानाच्या वृक्षांची भीतीच वाटू लागली. त्याला कोण घालणार पाणी ?

ज्ञान अंधार

प्राण्यांचे शरीरशास्त्र चिरफाडीशिवाय कसे कळणार ? परंतु या ज्ञानाला मज्जाव झाला. भूतदयेमुळे नव्हे. भूतदया असती तर हजारो माणसांना मेणबत्त्यांप्रमाणे जाळते ना. अत्यंत निर्दय प्रकारांनी हालहाल करून मारते ना. फक्त शास्त्रज्ञांचा चाकू त्यांना अधार्मिक वाटे. ईश्वराने लपवून ठेवलेले ज्ञान शोधून काढणे म्हणजे पाप, अब्रह्मण्यम् असे ठरविण्यात आले.

ग्रीक काळात मानवी मन थोडा काळ तरी मुक्त होते; परंतु पुन्हा अंधार झाला. मानवी स्वभाव मुळातच गूढ अंधारमय आहे. मोकळेपणाने, स्वच्छपणाने पाहण्याची त्याला भीती वाटते, संकोच वाटतो. तो लपून छपून ज्ञान मिळवू पाहील. शिक्षणशास्त्रज्ञांचे सर्वात मोठे काम प्रत्यक्ष वस्तुस्थिती पाहायला शिकविणे हे आहे. स्वत:चे उघडे शरीरही आरशात पाहायला लोक भितात. काही काही धार्मिक सांप्रदायांनी संपूर्ण शरीराचे स्नानही अधार्मिक मानले आहे. सारे शरीर स्वच्छ करणे जणू पाप. जीवशास्त्रविषयक ज्ञान समजून घ्यायला जणू उपजत विरोध आहे आणि सापळ्याचा, मनाचा, शरीराचा अभ्यास करायला तर फारच विरोध. माणसे या बाबतीत स्वत: ज्ञान मिळवायला तयार नसतात व दुसऱ्यासही तसे करू देत नाहीत. मानवी मन मोठे चमत्कारिक आहे. स्वत:चे हेतूही त्याला कळत नसतात. १६ व्या शतकापासून विज्ञानशोधाला पुन्हा आरंभ झाला. परंतु समाजात १९ व्या शतकापर्यंत वाङ्मयातून, गोष्टीतून त्याचा उपहासच केला जाई. पिकविक पेपरमध्ये शास्त्रज्ञाचे विडंबन चित्र रेखाटलेले दिसेल; परंतु बाकीची यशे, वैभव मावळतील पण विज्ञानाची महती वाढतच जाईल.

+++

साने गुरुजी लिखित अनमोल ग्रंथसंपदा

अध्यापन कार्य, समाजसेवा, स्वातंत्र्ययुध्द अशा बहुविध क्षेत्रांमध्ये आपल्या कार्यकर्तृत्वाचा ठसा उमटवणारे आदर्श व्यक्तिमत्त्व म्हणजे 'साने गुरुजी!' मातृभूमीच्या सेवेसाठी नोकरीचा राजीनामा देऊन स्वातंत्र्यसमरात त्यांनी स्वतःला झोकून दिले आणि अखेरच्या श्वासापर्यंत जनतेच्या सुखासाठी झटत राहिले. समाजातील अस्पृश्यता नष्ट व्हावी, एकता निर्माण व्हावी, शेतकरी-कामकरी वर्गाचे दैन्य-दारिद्र्य दूर व्हावे व सर्वत्र समाजवादाची स्थापना व्हावी या हेतूने ते सर्वत्र जनजागृती करत राहिले. लहान मुले, स्त्रिया, तरुण, दीन-दलित यांना स्वत्त्वाची जाणीव व्हावी व उत्तमोत्तम विचारांची देणगी मिळावी यासाठी अत्यंत संस्कारक्षम असे साहित्य त्यांनी निर्माण केले.

आज साने गुरुजींसारखे उदात्त व्यक्तिमत्त्व आपल्यामध्ये नसले तरीही त्यांचा हा साहित्यरूपी अनमोल ठेवा आपल्याकडे आहे. अत्यंत सोप्या भाषेतील या बोधप्रद कथा, वैचारिक लेख, इतर भाषांमधील महान लेखकांचे अनुवादित साहित्य घरोघरी पोहोचावे या हेतूने साने गुरुजींची सर्व पुस्तके एकूण ५१ खंडामध्ये आम्ही आपणासमोर सादर करीत आहोत. महाराष्ट्रातील प्रत्येक घर गुरुजींच्या विचारांनी पावन व्हावे, हीच एकमेव इच्छा !

स्वप्न आणि सत्य व इतर

₹ 210

200023

रिया पब्लिकेशन्स्

e mail : riyapublications@gmail.com